# लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५- २०१६ च्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालामधील कौशल्य विकास व उद्योजकता विभागाशी संबंधित**
**(परिच्छेद क्र. ३.२, ३.९ व ३.१०),**
**विधी व न्याय विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.३),**
**वित्त विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.७),**
**गृहनिर्माण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.८)**
**यावरील**

# चाळीसावा अहवाल

सत्यमेव जयते

**( हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास**
**दिनांक जुलै, २०१८ रोजी सादर करण्यात आला.)**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर.
जुलै, २०१८

# लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५- २०१६ च्या सामान्य आणि सामाजिक
क्षेत्र अहवालामधील कौशल्य विकास व उद्योजकता विभागाशी संबंधित
(परिच्छेद क्र. ३.२, ३.९ व ३.१०),
विधी व न्याय विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.३),
वित्त विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.७),
गृहनिर्माण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.८)
यावरील

# चाळीसावा अहवाल

# लोकलेखा समिती

**२०१७-२०१८**

**समिती प्रमुख**

(१) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री.शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री.नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री.संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री.सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री.राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री.अतुल भातखळकर, वि.स.स.

(८) श्री.योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ.सुनिल देशमुख, वि.स.स.

(१०) श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(११) श्री.संजय केळकर, वि.स.स.

(१२) श्री.सुरेश ऊर्फ बाळुभाऊ धानोरकर, वि.स.स.

(१३) श्री.अजय चौधरी, वि.स.स.

(१४) श्री.शंभुराज देसाई, वि.स.स.

(१५) श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१६) श्री.अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१७) प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री.दिलीप वळसे-पाटील, वि.स.स.

(१९) श्री.जयंत पाटील, वि.स.स.

(२०) श्री.राजेश टोपे, वि.स.स.

(२१) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(२२) श्री.रविंद्र फाटक, वि.प.स.

* (२३) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

(२३अ) श्री.विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स.

(२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

**निमंत्रित**

(२६) श्री.जयंत पाटील, वि.प.स.

**सदरहु समिती दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी विधानसभा व दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठित करण्यात आली.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM).

(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(४) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(६) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी.

(७) श्री. रविंद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी.

*** श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

## प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-२०१६ च्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालामधील कौशल्य विकास व उद्योजकता विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.२, ३.९ व ३.१०), विधी व न्याय विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.३), वित्त विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.७), गृहनिर्माण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.८) यावर विचार करून लोकलेखा समितीचा चाळीसावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक १५, २०, २१, २२ फेब्रुवारी, २०१८, दिनांक ११ एप्रिल २०१८, दिनांक ३ मे, २०१८ तसेच दिनांक १३ जून, २०१८ रोजी अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, प्रधान सचिव, विधी व न्याय, वित्त विभाग तसेच सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट 'अ' मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट 'ब' मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक १४ व २६ जून, २०१८ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशींवर सुधारणा सुचवून प्रारुप अहवालाला मान्यता दिली.

विधान भवन,
मुंबई/नागपूर.
दिनांक : २६ जून, २०१८

**गोपालदास अग्रवाल,**
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती

**अनुक्रमणिका**


| अ. क्र. | विभाग व तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | प्रस्तावना .. .. .. .. | (पाच) |
| (१) | कौशल्य विकास व उद्योजकता विभाग .. .. .. | १ |
| | (परिच्छेद क्र. ३.२) | |
| | (परिच्छेद क्र. ३.९) | |
| | (परिच्छेद क्र. ३.१०) | |
| (२) | विधी व न्याय विभाग .. .. .. .. | ६४ |
| | ( परिच्छेद क्र. ३.३) | |
| (३) | वित्त विभाग .. .. .. .. | ९७ |
| | (परिच्छेद क्र. ३.७) | |
| (४) | गृहनिर्माण विभाग .. .. .. .. | १०९ |
| | (परिच्छेद क्र. ३.८) | |

## कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

१. भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-१६ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ "औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जावाढ करणे" परिच्छेद क्र. ३.९ निष्फळ खर्च तसेच परिच्छेद क्र. ३.१० "ई-विद्या प्रकल्पावरील निष्फळ खर्च" यासंदर्भात महालेखापरिक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

| कौशल्य विकास व उदयोजकता विभाग | | |
|---|---|---|
| परिच्छेद क्रमांक | परिच्छेदांचा तपशिल | स्पष्टीकरणात्मक ज्ञापने |
| ३.२ | औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जा वाढ करणे...<br>प्रस्तावना -<br>प्रशिक्षणाच्या संकल्पनेस आणि पध्दतीस अधिक मागणी प्रतिक्रियाशील करुन व्यवसाय प्रशिक्षण घेतलेल्या स्नातकांचे रोजगार स्तर उंचावण्यासाठी भारत सरकारने (GOI) भारतातील १,८९६ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा, (ITI) दर्जा उंचावून त्यांना सेंटर ऑफ एक्सलन्स (Center of Excellence -- CoE) मध्ये रुपांतरीत करण्याचा निर्णय (ऑक्टोबर २००७) घेतला. १,८९६ ITIs पैकी ५०० ITIs चे आधीच CoE मध्ये दर्जावाढ करण्यात आले आणि शेष १३९६ ITIs चे टप्प्या- टप्प्याने दर्जावाढ करण्याचे ठरविण्यात आले (एप्रिल २००८) एप्रिल २००८ च्या GoI मार्गदर्शक सूचनानुसार दर्जावाढ साठी प्रस्तावित प्रत्येक ITI साठी राज्य शासनाने सहयोगी उद्योजकाची (Industry Partner-IP) नेमणूक करावयाची होती. ज्यांनी ITI•s मधील अभ्यासक्रमांमध्ये त्यांना सहाय, मार्गदर्शन करुन पुढे वाढण्यास मदत करावयाची होती. त्यांच्या अध्यक्षतेखाली एक संस्था व्यवस्थापन समिती (IMC) स्थापन करावयाची होती, ज्यात ITI•s चे प्राचार्य सदस्य सचिव होते. IMC ची संस्था नोंदणी अधिनियमांतर्गत नोंदणी करावयाची होती आणि ITIs च्या व्यवहारांच्या व्यवस्थापनेसाठी IMC जबाबदार होती. विविध पक्षांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या विहित असलेला एक सामंजस्य करार (Memorandum of Agreement -MOA) मांडावयाचा असून त्यावर GoI राज्य शासन आणि प्रत्येक IMC अध्यक्षाने स्वाक्षरी करावयाची होती.तसेच, प्रत्येक IMC ने संस्था विकास आराखडा (IDP) तयार करावयास पाहिजे होता, ज्यात संस्थेचे कार्य | प्रस्तावना असल्याने अभिप्राय नाहीत. |

| | | |
|---|---|---|
| | साध्यता आणि आर्थिक मुख्य निदर्शकांचे दीर्घकालीन लक्ष्य आणि वर्ष-निहाय विच्छेदन विहित असावयास पाहिजे होते. उक्त IDP राज्य सुकाणू समितीकडे (SSC) त्यांच्या तपासणीसाठी पाठवावयास पाहिजे होते आणि नंतर निधी पुरविण्यासाठी त्यास राष्ट्रीय सुकाणू समितीकडे (NSC) पाठवावयाचे होते. IDP च्या मंजुरीनंतर GoI ने रुपये २.५० कोटी बिन व्याजी कर्ज मंजूर करुन थेट प्रत्येक IMC ला द्यावयाचे होते, ज्याची परतफेड ३० वर्षात करावयाची असून त्यात १० वर्षे अधिस्थगन कालावधी अंतर्भूत होता व त्यानंतर समान वार्षिक हप्त्यामध्ये २० वर्षात त्यांची परतफेड करावयाची होती.<br>महाराष्ट्रात SSC च्या शिफारशींवर NSC ने २५० ITIs चा टप्प्या-टप्प्याने दर्जावाढ करण्याचे मंजूर केले (२००७-०८ ते २०११-१२) दर्जावाढ करण्यासाठी ITIs ची निवड योग्य व पारदर्शकरित्या करण्यात आली आहे. पुरविलेला निधी यथोचितरित्या वापरण्यात आला आणि दर्जावाढीमुळे कौशल्यमुक्त मनुष्यबळ विकसित झाले. याबाबतची खातरजमा करण्याच्या दृष्टीने लेखापरीक्षेने २५० पैकी ६६ ITIs च्या दस्तावेजांची तसेच क्षेत्रीय स्तरावरील सहा (*१३) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण (JDs) कार्यालय, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय (DVET) मुंबई आणि प्रधान सचिव., कौशल्य विकास आणि उद्योजकता विभाग (मंत्रालय) येथील दस्तऐवजाची नमुना तपासणी केली (जानेवारी २०१६ ते जुलै २०१६) राज्य शासनाने ऑक्टोबर २०१६ मध्ये सादर केलेले उत्तर यथोचितपणे योग्य ठिकाण सामिल करण्यात आले आहे. | |
| | (*१३) अमरावती, औरंगाबाद मुंबई नागपुर नाशिक आणि पुणे | |

| लेखा परीक्षा निष्कर्ष | | |
|---|---|---|
| ३.२.१ | नियोजन | |
| ३.२.१.१ | <u>ITI's ची निवड</u><br>GoI ने २००८ मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये दर्जावाढ करावयाच्या असलेल्या ITIs ची निवड करण्यासाठी धोरण विहीत केले नव्हते. तसेच दर्जावाढीसाठी निवडलेल्या २५० ITI's च्या निवडपध्दतीचे दस्तावेजीकरण केले नव्हते आणि मंत्रालय व DVET, मुंबई मध्येही असे दस्तावेज आढळले नाही. प्रधान सचिवांनी फेब्रुवारी २०१६ मध्ये लेखापरीक्षेस दर्जावाढी साठी ITI's निवडण्यासाठी अवलंबविलेले तीन धोरण लेखापरिक्षेस कळविले, जे पुढील प्रमाणे (अ) ०१ जानेवारी २००७ पूर्वी स्थापित झालेल्या ITI's (ब) स्वत:ची इमारत असणे, आणि (क) ज्या ITI's चा जागतिक बँक योजनेंतर्गत अंतर्भाव नव्हता. लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले कि, हे धोरण एप्रिल २०११ मध्ये GoI व्दारे अधिघोषित करण्यात आले होते. तथापि, २५० पैकी ४४ ITI's ज्या २०११-१२ मध्ये दर्जावाढीसाठी निवडण्यात आल्या होत्या त्यापैकी तीन(१४) १ जानेवारी २००७ नंतर स्थापित करण्यात आल्या होत्या आणि१३ ITI's भाडेतत्वावरील इमारतीमधून चालविण्यात येत होत्या.<br>याशिवाय SSC ने तीन (१५) आदिवासी ITI's चे IDPs मंजूर केले (नोव्हेंबर आणि डिसेंबर २०११) आणि GoI ने रुपये ७.५० कोटी निधी पुरविला. परंतु मंजूरीच्या एक ते दोन महिन्यातच DVET, मुंबई ने आदिवासी ITI's ना निधी खर्च न करण्याबाबत सूचना जारी केल्या (जानेवारी २०१२) कारण त्यांच्याकडे त्यांची स्वत:ची जमीन व इमारती नव्हत्या आणि पुरवलेला निधी दुस-या ITI's ला देण्यासंबधी शिफारस केली.तथापी ऑक्टोबर २०१६ पर्यंत आदीवासी ITI's निधी प्रत्यार्पित केला नव्हता आणि | पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप अंतर्गत संस्था निवडीचे धोरण तथा कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचना सन २०११ मध्ये प्राप्त झाल्या असल्या तरी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार सदर कार्यक्रम २००७-०८ या आर्थिक वर्षापासुन राबविण्यास सुरुवात झाली. सदर कार्यक्रमाच्या अंतर्गत कौशल्य युक्त जागतिक दर्जाचे मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी औदयोगिक प्रशिक्षण संस्था व सहयोगी उदयोजक यांच्या सहकार्याने पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप अंतर्गत महाराष्ट्रातील २५० औ. प्र. संस्थांची टप्याटप्याने विकास करण्यासाठी निवड करण्यात आली. यामधील ४४ संस्थांची निवड २०११ मध्ये करण्यात आली होती.<br>• सदर ४४ संस्थांपैकी दर्जावाढीसाठी निवडलेल्या ३ संस्था आदिवासी बहुल भागात कार्यरत असुन त्या २००७ नंतर स्थापन झालेल्या आहेत ही वस्तुस्थिती जरी असली तरी दुर्गम भागातील आदिवासी विदयार्थ्यांना केंद्र शासनाच्या सदर योजनेचा लाभ व्हावा या उददेशाने सदर ३ औ.प्र.संस्थांची निवड करण्यात आली होती.<br>• सन २०१०-११ मध्ये निवड करण्यात आलेल्या ४४ संस्थांपैकी १३ भाडेतत्वावरील इमारतीमधुन चालविण्यात येणा-या संस्थांच्या इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर होते व योजना कालावधीत ते पुर्ण होणे अपेक्षित असल्याने सदर संस्थांची निवड करण्यात आली होती.<br>• आदिवासी क्षेत्रातील प्रशिक्षित उमेदवाराना तातडीने रोजगार उपलब्ध व्हावा व विकासीत भागातील प्रशिक्षणार्थ्यां बरोबर आदिवासी क्षेत्रातील प्रशिक्षार्थ्यांना पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप योजनेमार्फत अदययावत प्रशिक्षण सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने या तीन |

| | | |
|---|---|---|
| | निधीच्या पुर्नवापरासाठी दुसरे ITI's पण शोधले नव्हते.<br>राज्य शासनाने वस्तुस्थितीची पुष्टी करतांना असे नमूद केले (ऑक्टोबर २०१६) की या संबधी SSC व्दारे धोरणात्मक निर्णय घेण्यात येत आहे<br><br>(*१४) पुणे क्षेत्रातील कडेगाव आणि पलुस, औरंगाबाद क्षेत्रातील मुदखेड<br>(*१५) नाशिक क्षेत्रातील सुकापुर आणि नवापाडा, नागपुर क्षेत्रातील बिजेपार | आदिवासी औ. प्र. संस्थाची (नवापाडा, सुकापुर व बिजेपार) निवड करण्यात आलेली होती. सदर ३ संस्थांच्या ऐवजी निवडण्यात यावयाच्या संस्थांबाबत राज्य सुकाणू समितीची बैठक आयोजित करुन लवकरच निर्णय घेण्यात येईल व नंतर या संस्थांना राष्ट्रीय सुकाणु समितीची मान्यता घेऊन निधी वर्ग करण्यात येईल. |
| ३.२.१.२ | <u>सहयोगी उद्योजकांची निवड</u><br>एप्रिल २००८ च्या GoI च्या मार्गदर्शक सुचनांनूसार दर्जावाढीची प्रक्रीया पूढे वाढविण्यासाठी प्रत्येक ITI सोबत एक सहयोगी उदयोजक (Industry Partner -IP) असावयास पाहीजे होते. परंतु असे निर्देशनास आले की, दर्जावाढीसाठी प्रस्तावीत ITI's चे IPs सोबत एकास एक असे संबंध नव्हते. जसे नमूना तपासणी केलेल्या ६६ ITI's सोबत ५४ IPs जूळले होते. याशिवाय GoI ने विहीत केले होते. (एप्रिल २०११) की IP हे (अ) एक उत्पादन घटक किंवा मूलभूत सुविधा कंपनी किंवा माहीती तंत्रज्ञान कंपनी असावयास पाहीजे. जीची वार्षिक उलाढाल कमित कमी १० कोटी असावयास पाहीजे. (ब) ITI पासून १०० कि.मी त्रिज्या अंतराच्या आत स्थीत असावयास पाहीजे. (क) कमीत कमी पाच वर्षापासून क्रियाशील असले पाहीजे. आणि (ड) कमीत कमी २५ लोकांना रोजगार दयावसास पाहीजे. लेखापरीक्षेस असे निर्देशनास आले की, एप्रिल २०११ नंतर SSC ने २०११-१२ मध्ये ४० IPs निवडले, ज्यापैकी १३ IPs ची वार्षिक उलाढाल | सहयोगी उद्योजक निवडीबाबत शक्यतो भारत सरकारने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांची काटेकोर पणे अंमलबजावणी करून सहयोगी उदयोजक निवडीची प्रक्रिया करण्यात आलेली होती. तथापी सदर १३ औदयोगिक प्रशिक्षण संस्थांच्या परीसरात जास्त औद्योगिक आस्थापना उपलब्ध नसल्यामुळे त्या परिसरात उपलब्ध असलेल्या ज्या औद्योगिक आस्थापनांनी दर्जावाढ योजनेत रुची दर्शविली त्यांची आर्थिक उलाढाल आवश्यकतेपेक्षा कमी असली तरी इतर सर्व अटी व शर्तींची पुर्तता करत असल्याने योजनेची प्रभावि अंमलबजावणी तातडीने होण्याकरीता तसेच योजनेवर आवश्यक सहनियंत्रण राखण्याच्या दृष्टीने सदर १३ औद्योगिक आस्थापनांची संस्थाची निवड करण्यात आल. सदर निवडीस राष्ट्रीय सुकाणू समितीच्या बैठकीमध्ये मान्यता घेण्यात आलेली आहे.. |

| | | |
|---|---|---|
| | फक्त रूपये २.५० कोटी ते रूपये ७.५० कोटी दरम्यान होती.<br>राज्य शासनाने वस्तूस्थिती मान्य केली आणि नमुद केले की, ITI's च्या आजूबाजूला जास्त औदयोगीक आस्थापना उपलब्ध नसल्यामूळे ज्या औदयोगिक आस्थापनांनी दर्जावाढ योजनेत रूची दर्शविली त्यांची वार्षिक उलाढाल विचारात न घेता IPs म्हणून निवड करण्यात आली. | |
| ३.२.१.३ | संस्था व्यवस्थापन समितीचे गठन .<br>एप्रिल २००८ च्या GoI मार्गदर्शक सूचनांनुसार एक ११ सदस्यीय संस्था व्यवस्थापन समिती गठित करावयाची होती, ज्यात (अ) IP किंवा त्यांचे प्रतिनिधी अध्यक्षपदी आणि प्राचार्य ITI सदस्य सचिव (ब) IP ने नजिकच्या उद्योगधंद्याचे असे चार सदस्य नामनिर्देशित करावयास पाहिजे. ज्यामुळे संस्था व्यवस्थापन समितीची व्यापकता वाढेल आणि (क) राज्य शासनाव्दारे नामनिर्देशित पाच*१६ सदस्य असतील.<br>लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की नमूना तपासणी केलेल्या ६६ पैकी सात*१७ ITI's मध्ये IPs ने नामनिर्देशित केलेले चार सदस्य त्याच उद्योगधंदयाचे होते किंवा IPs चे कुटूंबिय सदस्य होते अथवा ब्युटीपार्लर, शिकवणी वर्ग(टयुटारिअल्स) इत्यादी सेवा पुरवठादार होते. असे निदर्शनास आले की, SSC व्दारे IP बदलण्याची मंजुरी असल्यामुळे JD पुणे हे चार * १८ ITI's च्या IMC चे अध्यक्ष म्हणून तीन महिने ते चार वर्षे (जून २०१६ पर्यन्त) एवढया कालावधीसाठी कार्यरत होते.<br>राज्य शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले की IPs ने त्याग पत्र दिल्यामुळे, JD पुणे यांची IMC च्या अध्यक्षपदी नेमणूक करण्यात आली होती. तथापि, वस्तुस्थिती कायम आहे की ही व्यवस्था GoI च्या मागदर्शक सूचनांचे उल्लंघन आहे कारण JD चे कोणत्याही उद्योगासोबत काहीही संबंध नव्हते. | केंद्रशासनाच्या सुचनेप्रमाणे नवीन सहयोगी उदयोजक निवड करण्याबाबत राज्य सुकाणू समितीच्या (SSC) मान्यतेने कार्यवाही करण्याचे प्रस्तावीत आहे. तथापी ४ औद्योगिक प्रशिक्षण संस्था पुरंदर, कोरेगाव, सोलापुर (मु) व मेढा या संस्थेच्या संस्था व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष यांनी राजीनामा दिलेला असल्याने SSC कडुन मान्यता प्राप्त होई पर्यंत योजनेच्या अंमलबजावणीमध्ये खंड पडू नये याकरिता सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय, पुणे यांना तात्पुर्ती व्यवस्था म्हणुन संस्था व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष म्हणुन नेमण्यात आलेले होते. राज्य सुकाणु समितीच्या दि ४.३.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये ज्या संस्थांच्या सहयोगी उद्योजकांनी राजीनामे दिलेले आहेत त्यांचे निष्कर्ष ठरवून त्या निष्कर्षाप्रमाणे पडताळणी करुन राजीनामा स्विकृत करुन त्यानंतर डी.जी.टी च्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे संस्थानिहाय नविन सहयोगी उद्योजक निवडण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर निर्णयानुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्था कोरेगाव, सोलापुर (मु) व मेढा या तीन संस्थांमध्ये नवीन IMC Chairman यांची निवड खालील प्रमाणे करण्यात आलेली असुन, त्याबाबतचा MoA करण्याची कार्यवाही अंतिम टप्यात आहे. |

(*१६) (i) सहसंचालक DVETचे प्रतिनिधी म्हणून,(ii) जिल्हा रोजगार आणि स्वयं रोजगार अधिकारी, (iii) स्थानिक प्रबोधक मंडळाचे एक तज्ञ (iv) एक करीष्ठ निर्देशक सदस्य आणि (v)एक विद्यार्थी प्रतिनिधी

(*१७)मालवण ,बाळापूर, भिवापूर, बीजेपार, हिंगणा,आष्टी आणि चाळीसगाव

(*१८)पुरंदर (सासवड): ३०.१२.२०१३ पासून, कोरेगाव १०.०३.२०१६ पासून सोलापूर (मूली) १८.९.२०१४ पासून आणि मेढा ०४.०९.२०१२ पासून

| अ.क्र. | औ.प्र.संस्थेचे नाव | आस्थापनेचे नाव | सहयोगी उदयोजक |
|---|---|---|---|
| १ | कोरेगाव | मे.सायक्लो ट्रान्समिशन लि. सातारा | श्री राहुल शिंदे |
| २ | सोलापुर (मु) | मे.सागर क्रिएशन ऑफ ग्रुप ऑफ इंडस्ट्री, सोलापुर | श्री प्रफुल पी.वैद |
| ३ | मेढा | मे.कुपर कार्पोरेशन लि. सातारा | श्री.एम.पी.देशपांडे |

**३.२.१.४** मंजुरीनंतर संस्था विकास आराखडयात बदल करणे

नमूना तपासणी केलेल्या ६६ पैकी ६२ ITI's व्दारे सादर केलेल्या माहितीत असे आढळले की, तक्ता ३.२.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे ४५ ITI's नी त्यांच्या IDPs मध्ये GoI व्दारे निधी वितरीत केल्यानंतर एकदा किंवा एक पेक्षा जास्त वेळा बदल केले होते.

तक्ता ३.२.१ ITI॰s व्दारे IDPs मध्ये बदल करण्याची स्थिती

| बदल करण्याची स्थिती | ITI॰s ची संख्या | वितरीत केलेली रक्कम (रु.कोटीमध्ये) |
|---|---|---|
| एकदा बदललेले IDP॰s | ३३ | ८२.५० |
| दोनदा बदललेले IDP॰s | ११ | २७.५० |
| तीनदा बदललेले IDP॰s | ०१ | ०२.५० |
| एकुण | ४५ | ११२.५० |

स्त्रोत:-संबंधित ITI॰s ने सादर केलेली माहिती.

याशिवाय ITI's व्दारे बदल करण्यासाठी सादर केलेल्या ४५ IDPs पैकी

आक्षेपित ४५ संस्थांमधील मुळ IDP मध्ये प्रस्तावित केलेल्या अभ्यासक्रमांपेक्षा इतर अभ्यासक्रमांना संस्थेच्या क्षेत्रामध्ये मागणी असल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित संस्थांनी (IMC) Revised IDP सादर केले. औ. प्र. संस्थांकडून प्राप्त झालेल्या IDP बदलास राज्य सूकाणू समितीची मंजुरी घ्यावी लागत असल्याने त्यानुसार मंजुरीची प्रक्रीया उपलब्ध मनुष्यबळाच्या आधारे करण्यात आली असुन या विलंबाच्या कालावधीत संस्थास्तरावर मुळ IDP नुसार कार्यक्रम योजना अंमलबजावणी मध्ये कोणतीही कमतरता नव्हती. तसेच या ठिकाणी नमुद करण्यात येते कि, IDP च्या प्रस्तावित बदलास राज्य सुकाणु समितीची मान्यता मिळेपर्यंत साधन, यंत्रे आणि उपकरणांवरील कोणताही नवीन खर्च करण्यात आलेला नाही.

| | | |
|---|---|---|
| | SSC ने फक्त् ११ IDPs ना सुधारीत IDPs च्या सादर करण्याच्या तारखेपासून एक ते चार वर्ष एवढया कालावधीच्या विलंबाने मंजुरी प्रदान केली. परिणामी ITI's संलग्नीकरणाची प्रक्रिया सुधारीत IDPs मध्ये प्रस्तावित व्यवसाय अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण आणि त्या व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी साधन, यंत्रे आणि उपकरणांवरील खर्च या संबंधात पुढे कार्य करु शकले नाही.<br>राज्य शासनाने IDPs सुधारणेतील विलंबासाठी DVET मुंबई आणि SSC स्तरावर वेळेची आणि मनुष्यबळाची कमतरता जबाबदार असल्याचे सांगितले. | |
| ३.२.२ | **वित्तीय व्यवस्थापन** | |
| ३.२.२.१ | <u>निधीचा कमी वापर</u><br>दर्जावाढ कार्यक्रमांतर्गत GoI ने २५ ITI's ना रुपये ६२५ कोटी *१९ संवितरीत केले. एप्रिल २००८ च्या GoI च्या मार्गदर्शक सुचनांनुसार सहभागी होणा-या ITI's ना दर्जावाढ निधीच्या ५० टक्के (रुपये ३१२.५० कोटी) सीड मनी *२० (Seed Money) म्हणून राखण्याची मुभा होती. २५० ITI's नी आणि नमूना तपासणी केलेल्या ६६ ITI's नी दर्जावाढ कार्यक्रमांतर्गत जून २०१६ पर्यंत केलेला खर्च तक्ता ३.२.२ मध्ये तपशिलवार दर्शविलेला आहे. | केंद्रशासनाचे पत्र २४th June २०१० च्या पत्रान्वये ५० % रक्कम (रू. १.२५ कोटी) Seed Money म्हणुन संस्था व्यवस्थापन समितीच्या बँक खात्यात जमा करणे बंधनकारक आहे. त्यानुसार एकुण रू. ६२५.०० कोटी रक्कमे पैकी उर्वरित रु. ३१२.५० कोटी रक्कम बिजभांडवल म्हणून जमा आहे. तथापि, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी दर्जा उंचावण्यासाठी केलेला खर्च कमी आहे ही वस्तुस्थिती आहे. खालील कारणामूळे संस्था व्यवस्थापन समितीचा (IMC) खर्च कमी झालेला आहे:-<br>१. संस्था विकास आराखडयात सेंटर ऑफ एक्सलन्स (COE) हा अभ्यासक्रम प्रस्तावित असलेल्या संस्थांतुन वर्ष २०१४ पासून व केंद्रशासन व राज्यशासनाच्या सुचनेनूसार योजना बंद झाल्याने खर्च कमी झाला आहे. |

तक्ता ३.२.२ : ITIs ने केलेल्या खर्चाचे तपशिल

| राज्यस्थिती | | | नमुना तपासणी केलेल्या ITIs ची स्थिती | | |
|---|---|---|---|---|---|
| ITIs ची एकुण संख्या | केलेला खर्च (रु.कोटीत) | "निरंक खर्च करणाऱ्या ITIs ची संख्या | ITIs ची एकुण संख्या | केलेला खर्च (रु.कोटीत) | "निरंक खर्च करणाऱ्या ITIs ची संख्या |
| २५० | १६७.२२ | १२ | ६६ | ५१.२८ | ४ |
| स्रोत:- DVET मुंबई ने सादर केलेली माहिती. | | | | | |

वरील तक्तावरून असे दिसते की २५० ITI's ने पाच त नऊ वर्षाच्या (*२१) कालावधीत एकुण उपलब्ध निधी रू.३१२.५० कोटी मधून फक्त रुपये.१६७.२७ कोटी (५४ टक्के) खर्च केले या शिवाय काही ITI's भाडयाच्या इमारतीमधून कार्यरत असणे,जागेचा अभाव,व्यवसायाचे संलग्नीकरण न करणे, IDP कार्यान्वयीत करण्याकरीता IMCs तयार नसणे इत्यादी कारणांमूळे २००९-१२ दरम्यान मंजूर केलेल्या १२ ITI's जून २०१६ पर्यंत काहीही खर्च केला नाही. तसेच २००७ ते २०१२ दरम्यान मंजूर केलेल्या ५६ ITI's नी मोठा कालावधी लोटल्यानंतरही जून २०१६ पर्यंत फक्त रु १० लाखापेक्षा कमी खर्च केला.

राज्य शासनाने २५० ITI's व्दारे दर्जा उंचावण्यासाठी करण्यात आलेला खर्च कमी असल्याची वस्तूस्थिती मान्य केली.

२. संस्था विकास आराखडा (IDP) ची सहयोगी उद्योजक, आय.एम.सी यांनी प्रभावीपणे अंमलबजावणी केलेली नाही, काही IMC मधील सहयोगी उद्योजकाची योजनेप्रती असलेली अनास्था हे देखिल खर्च कमी होण्याचे कारण आहे.

३. राज्य सुकाणू समितीच्या दि. १५ मे २०१५ रोजी झालेल्या बैठकीत जोपर्यंत योजनेचा आढावा होत नाही तोपर्यंत फक्त निदेशकांचे मानधन व ऑडीट फी या व्यतिरिक्त कोणताही खर्च करण्यात येवु नये असा निर्णय घेण्यात आलेला असल्याने सर्व संस्था व्यवस्थापन समितीस तशा सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

४. राज्य अंमलबजावणी कक्ष (SIC) करीता पदांची मान्यता असतानाही पदभरती न झाल्यामुळे सदर योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करणे शक्य झाले नाही.

५. नवीन अभ्यासक्रमास शासनाकडुन पदनिर्मीती केली जाणार नाही त्यामुळे नवीन व्यवसाय/तुकडी सुरु करण्यात आली नाही.

दि.२०.१.२०१८ रोजी झालेल्या राज्य सुकाणु समिती बैठकीमध्ये खर्चावरील निर्बंध उठविण्यात आले असुन त्याप्रमाणे पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप योजने अंतर्गत २५० औदयोगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये अदययावत Computer Lab व Virtual Class Room विकसित करणे. तसेच संस्थेमध्ये किरकोळ कामे करण्यासाठी मंजुरी देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| | (*१९) २५० ITI's X रूपये २.५० कोटी.<br>(*२०) सीडमनी एखादया दिर्घकालीन संलेखात ठेवावयास पाहीजे जेणेकरून त्यावर IMCs ना जास्तीत जास्त परतावा मिळणे शक्य होईल . याप्रमाणे प्राप्त होणारे व्याज कार्यक्रमाला दिर्घकाल टिकवण्याची क्षमता प्रदान करते आणि १० वर्षाच्या अधिस्थगन कालावधीनंतर सुध्दा कर्जाची परतफेड करण्यास मदत करते.<br>(*२१) २०११-१२ मध्ये दर्जावाढीसाठी मंजूर ITI's साठी पाच वर्ष आणि २००७-०८ मध्ये मंजूर ITI's साठी नऊ वर्ष परिगणित करण्यात आली | |
| ३.२.२.२ | <u>औदयोगिक प्रशिक्षण संस्थाव्दारे उत्पन्न निर्मिती ( Revenue Generation)</u><br>GoI, राज्य शासन आणि IMC चे अध्यक्ष यांच्यात संपादित MoA नूसार ITI ने केवळ संस्था कायम स्वरुपी चालविण्यासाठी पुरेसे उत्पन्न निर्मिती करावयास पाहीजे तर त्या उत्पनातूनच दर्जावाढ कार्यक्रमांतर्गत देण्यात आलेल्या कर्जाची परतफेड ही करता येईल, यासाठी पूरेसे उत्पना निर्मीत करावयास पाहीजे.<br>६६ IDPs च्या पडताळणीत असे दिसून येते की, IMCs नी उत्पादनाभिमूख प्रशिक्षण योजना (Production-Oriented Training Scheme-POTs) जसे संगनक जॉब वर्क, विदयूतीकरण,वेल्डींग काम,मशिन जॉब वर्क,आणि अल्पावधी कोर्सेस चालविणे अशा कार्य योजना आखून त्यातून उत्पन्न निर्मिती केली होती.तथापी ६६ ITI-s पैकी कोणतीही ITI's पडताळणीसाठी लेखा परीक्षेस या कार्य योजनांचे दस्तावेज सादर करू शकले नाही.<br>या शिवाय ६३ IMCs नी DVET मुंबई ला सादर केलेल्या तीमाही प्रगती अहवालांच्या (QPRs) पडताळणीत असे आढळले की, मार्च २०१६ पर्यत ३० | महालेखाकार कार्यालयाच्या पथकाने पडताळणी केलेल्या ६६ औ.प्र.संस्थांनी चालविलेल्या उत्पादनाभिमूख प्रशिक्षण योजना (Production-Oriented Training Scheme-POTs) जसे संगणक जॉब वर्क, विदयूतीकरण,वेल्डींग काम,मशिन जॉब वर्क,आणि अल्पावधी कोर्सेस बाबतचे दस्ताऐवज परीक्षणासाठी उपलब्ध झालेले नाहीत हि वस्तुस्थिती आहे. याबाबत संबंधित औ.प्र.संस्थांना व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे पत्र दिनांक २.२.२०१८ अन्वये खुलासा विचारण्यात आला आहे.<br>पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप योजने अंतर्गत निवड केलेल्या संस्थांना नियमित प्राचार्य नसल्याने महसुल प्राप्ती करण्याच्या उपाय योजना करण्यात अडचणी आलेल्या आहेत. त्याचबरोबर IDP मध्ये नमुद केलेले अभ्यासक्रम पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप योजने अंतर्गत सुरू करण्याकरिता प्रथम संलग्नता प्राप्त करून घेणे यास प्राधान्य असल्याने महसुल प्राप्ती कमी झालेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | IMCs व्दारे POTS सुरु करण्यात आले नव्हते. आणि उर्वरीत ३३ IMCs मध्ये २००७-०८ ते २०१५-१६ (नऊ वर्ष) दरम्यान अल्पावधी प्रशिक्षण कोर्सेसच्या माध्यमातून एकूण रू १.७८/- कोटी उत्पन्न निर्मिती केली, जे रूपये ६,२५० ( ITIs देवगड) ते रूपये ७९.७८ लाख ( ITIs नाशिक मुली) दरम्यान होते. अशा प्रकारे ( ITIs दिर्घावधी साठी कायम राखण्यासाठी ही उत्पन्न निर्मिती खुप कमी होती . हे नमुद करणे सर्मपक आहे की या ६३ IMCs ने २००७-०८ ते २०१५-१६ दरम्यान GoI अनूदान नियत ठेव (Fixeds Deposited) म्हणूण ठेवल्यामूळे मिळणा-या व्याजाच्या स्वरूपात एकूण रू ७४.३९ कोटी अर्जित केले.<br>राज्य शासनाने वस्तूस्थिती मान्य केली आणि नमूद केले की, ITIsमध्ये नियमित प्राचार्य नसल्यामूळे व नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी संलग्नीकरण प्राप्त न झाल्यामूळे उत्पन्न निर्मितीवर प्रतिकूल परीणाम झाले. | ६३ IMCs नी DVET मूंबई ला सादर केलेल्या तिमाही प्रगती अहवालांनुसार ३० IMCs व्दारे उत्पादनाभिमूख प्रशिक्षण योजना (Production-Oriented Training Scheme-POTs) सुरु करण्यात आले नव्हते आणि उर्वरीत ३३ IMCs मध्ये २००७-०८ ते २०१५-१६ (नऊ वर्ष) दरम्यान अल्पावधी प्रशिक्षण कोर्सेसच्या माध्यमातून एकूण रू १.७८/- कोटी उत्पन्न निर्मिती केली तसेच या ६३ IMCs ने २००७-०८ ते २०१५-१६ दरम्यान GoI अनूदान नियत ठेव (Fixeds Deposited) म्हणूण ठेवल्यामूळे मिळणा-या व्याजाच्या स्वरूपात एकूण रू ७४.३९ कोटी अर्जित केले हि वस्तुस्थिती आहे.<br>दि.२०.१.२०१८ रोजी झालेल्या राज्य सुकाणु समिती बैठकीत पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप योजने अंतर्गत निवड केलेल्या २५० संस्थांमध्ये आधुनिक संगणक प्रयोग शाळा तथा अभासी वर्ग(virtual classroom) तयार करण्याचे ठरविण्यात आले. सदर Computer Lab व Virtual Class Room चा वापर इतर संस्थेच्या परीक्षा तथा प्रशिक्षण कामासाठी करुन संस्था व्यवस्थापन समिती (IMC) च्या उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण होऊ शकते. तसेच संस्था व्यवस्थापन समित्यांना उद्योगांच्या मागणी नुसार लघु मुदतीचे अभ्यासक्रम राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेने सुरु करुन महसुल प्राप्तीसाठी प्रोत्साहीत करण्यात येत आहे. |
| ३.२.३ | अंमलबजावणी | |
| ३.२.३.१ | राज्य अंमलबजावणी कक्षाची स्थापन न करणे<br>राज्य स्तरावर या कार्यक्रमाची व्यवस्थापन, संनियंत्रण आणि मुल्यमापन करण्यासाठी दोन सहाय्यक संचालक (तांत्रिक),एक लेखाधिकारी (वित्त), एक कार्यालय अधिक्षक आणि सहायक कर्मचारी कार्यरत असलेले एक राज्य अंमलबजावधी कक्ष २००७-०८ ते २०११-१२ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी स्थापित करावयाचे होते. SIS हे SSCच्या मार्गदर्शनाखाली | केंद्रशासनाने दिलेल्या निर्देशानुसार पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप योजने अंतर्गत राज्य अंमलबजावणी कक्ष (SIC) स्थापन करण्याचे अभिप्रत होते. त्या अनुषंगाने शासनाने दि..७ जूलै २०११ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये राज्य अंमलबजावणी कक्ष (SIC) साठी एकूण ११ पदास मान्यता दिली.<br>तथापि, संचालनालय व प्रादेशिक कार्यालय स्तरावर मोठया प्रमाणावर |

| | | |
|---|---|---|
| | दर्जावाढ कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार होते. लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की GOI ने जरी SIC च्या स्थापनेसाठी २००९-११ मध्येच रुपये ४०.७५ लाख वितरीत केले होते तरीही जानेवारी २०१७ पर्यन्त SIC ची स्थापना झाली नव्हती. GOM ने निधी प्रत्यार्पित ही केला नव्हता आणि जानेवारी २०१७ पर्यन्त GOI कडे उपयोगिता प्रमाणपत्र ही पाठविले नव्हते.<br>SIC नसल्यामुळे IDPS ची अपुरी पडताळणी झाली, सुधारित IDPS च्या मंजरीसाठी विलंब झाला, उभारलेल्या नवीन इमारती तशाच विनावापर पडून राहिल्या, SSC द्वारे IMCS वर नियंत्रण अपूरे राहिले, ज्यामुळे कार्यक्रमाच्या एकूण अंमलबजावणीवर आणि संनियंत्रणावर, पुढील परिच्छेदांमध्ये चर्चिल्याप्रमाणे प्रतिकूल परिणाम झाला.<br>राज्य शासनाने मान्य केले की कर्मचारी वर्गाच्या कमतरतेमुळे SIC ची स्थापना होऊ शकली नाही आणि SIC ऐवजी DEVT व क्षेत्रीय स्तरावर कार्यक्रमाची कामे समन्वयित करण्यासाठी एक समन्वयकाची नेमणूक करण्यात आली होती. | मनुष्यबळाची कमतरता असल्याकारणाने मोठया प्रमाणात अधिकारी व कर्मचारी यांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे राज्य अंमलबजावणी कक्ष SIC करीता पदभरती न झाल्यामूळे सदर योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करणे शक्य झाले नाही. तदनंतर सदयस्थितीत सहाययक संचालक (तां) वर्ग १ व वर्ग २ तसेच १ लेखाअधिकारी सहीत आवश्यक कर्मचारी वर्ग यांचे मार्फत राज्य अंमलबजावणी कक्षाची कामे करण्यात येत आहेत. या कक्षातील सहाय्यक संचालक (तां) हे योजनेच्या समन्वयकाचे काम पहात असुन त्याच धर्तीवर प्रादेशिक कार्यालयांमध्ये प्रादेशिक स्तरावरील देखरेख तथा नियंत्रणासाठी समन्वय नेमण्यात आलेले आहेत. |
| ३.२.३.२ | <u>औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची अधिस्वीकृती</u><br>राष्ट्रीय अधिस्वीकृती बोर्ड, शिक्षण व प्रशिक्षण (National Accreditation Board forEducation and Training-NABET)द्वारे जाहिर अधिस्वीकृती धोरणानुसार सर्व ITI-S (शासकीय आणि खाजगी,) ज्यांना राष्ट्रीय परिषद, व्यवसाय प्रशिक्षण (National Council for vocation Training-NCVT) अंतर्गत त्यांच्या द्वारे चालविण्यात येणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी संलग्नीकरण करावयाचे होते, त्यांनी आधी भारतीय गुणवत्ता परिषदे (Quality Council of India-QCI) कडून अधिस्वीकृती *२२ प्राप्त करावयास पाहिजे. २०१२ पासून कामगार व रोजगार मंत्रालय, GOI ने NCVT संलग्नीकरण करावयाचे असलेल्या ITI-S साठी NABET अधिस्वीकृति | राष्टीय अधिस्वीकृत बोर्ड, शिक्षण व प्रशिक्षण (National Accreditation Board for Education and Training NABET) व्दारे जाहिर अधिस्वीकृति धोरणानुसार सर्व ITIs, (शासकीय व खाजगी) ज्यांना राष्टीय परिषद. व्यवसाय प्रशिक्षण (National Council Training -NCVT) अंतर्गत त्याच्या व्दारे चालविण्यात येणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी संलग्नीकरण करावयाचे होते.<br>औ. प्र. संस्थेमधील व्यवसाय / तुकडीच्या संलग्नतेसाठी Quality Council of India कडे अर्ज करण्याचे निर्देश DGT नवी दिल्ली यांनी दिले होते. त्यानुसार भारतीय गुणवत्ता परिषदेच्या (Quality Council of India-QCI) निकषा नुसार औ.प्र.संस्थामध्ये अधिस्वीकृतीसाठी आवश्यक पायाभुत |

| | | |
|---|---|---|
| | अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला. लेखापरीक्षेस असे आढळले की दर्जावाढीसाठी निवडलेल्या २५० ITI॰S पैकी एकाही ITI ने जानेवारी २०१७ पर्यन्त अधिस्वीकृति साठी केले नव्हते.<br>लेखापरीक्षेस पुढे असेही आढळले की चाचणी तपासणी केलेल्या ६६ ITI॰S पैकी ६२ ITI॰S नी २०१२ पूर्वी २२७ नवीन व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी NCVT कडे संलग्नीकरण प्राप्त झाले होते. परंतु आता २०१२ पासून जेव्हा GOI ने ITI॰S ची अधिस्वीकृति अनिवार्या केली होती. उर्वरित १६३ नवीन व्यवसाय अभ्यासक्रमांना NCVT कडून संलग्नीकरण मिळण्यात लक्षणीयरित्या विलंब झाला.<br>राज्य शासनाने नमूद केले की ITI॰Sमधील रिकामी पदे भरण्याचा, गरजेनुसार उपकरणे/साधन खरेदी करण्याचा,ITI॰Sच्या अधिस्वीकृतीसाठी आणि नवीन व्यवसाय अभ्यासक्रमांच्या संलग्नीकरणा साठी शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेण्यात येत होता.<br>(*२२) अधिस्वीकृती म्हणजे व्यावसायिक प्रशिक्षणाचे आवश्यक घटक देण्याकरीता आणि प्रशिक्षणार्थीद्वारा संपादन केलेल्या कार्यक्षमतेचे मूल्यांकन करण्यासाठी ITI॰S ची कार्यक्षमता स्थापित करण्याची पध्दती होय. | सुविधा, यंत्रसामुग्री तथा निधीची तरतुद इत्यादी बाबी उपलब्ध होत्या तथापी बहुतांश संस्थामध्ये आवश्यक मनुष्यबळ उपलब्धतेचा निकष पुर्ण होत नसल्याने भारतीय गुणवत्ता परिषदे (Quality Council of India-QCI) कडे अधिस्वीकृतीसाठी अर्ज करणे शक्य झालेनव्हते. त्यामुळे नवीन व्यवसाय अभ्यासक्रमाचे संलग्नीकरण झाले नाही.<br>सद्यस्थितीत (ऑक्टोबर २०१६) केंद्र शासनाने नियुक्ती केलेल्या QCI या एजन्सी मार्फत व्यवसाय/तुकडीच्या संलग्नीकरणाच्या कार्यवाहीसाठी अधिस्वीकृतीचे काम बंद असल्यामुळे केंद्रशासनामार्फत पुढील आदेशापर्यंत अधिस्वीकृती बाबतचे काम स्थगित करण्यात आलेले आहे. केंद्र शासनामार्फत अधिस्वीकृती बाबत कार्यवाही सुरु होताच औ.प्र.संस्थांच्या अधिस्वीकृती बाबत कार्यवाही त्वरीत करण्यात येईल. |
| ३.२.३.३ | <u>सेंटर ऑफ एक्सलन्स चे अपयश</u><br>सेंटर ऑफ एक्सलन्स (CoE) हे बहु-कौशल्यपूर्ण अभ्यासक्रम आहेत ज्यासाठी ITIs ने व्यापक तत्वावर मूलभूत प्रशिक्षण मॉडयुल्स (प्रथम वर्गाच्या विद्यार्थ्यासाठी) आणि एडवान्स मॉडयुल्स (व्दितीय वर्गाच्या विद्यार्थ्यासाठी) चालविण्यासाठी नवीन पायाभूत सुविधा निर्माण करणे क्रमप्राप्त होते. विद्यमान संलग्नीकरण पध्दतीनुसार CoE अभ्यासक्रम सुरू करण्यापूर्वी NCVT चे संलग्नीकरण आवश्यक होते. २५० पैकी ७५ ITIs चा CoE म्हणून दर्जावाढ करावयाचे ठरविण्यात आले होते. नमूना तपासणी केलेल्या ६६ | १.केंद्र शासनाच्या निर्देशानुसार व राज्य शासनाचे निर्णयानुसार राज्यात दिनांक १९ जुलै, २००५ पासून Center of Excellence (CoE) ही बहुकौशल्यावर आधारित योजना सुरू करण्यात आली होती. सदर योजना Multiskill, Multientry, Multiexit या तत्वांवर आधारित स्वरुपाची होती.<br>२.या योजनेअंतर्गत प्रत्येकी ०२ महिने कालावधीचे ०६ मॉडयुल्स असल्याने कोणत्याही एका क्षेत्रातील मॉडयुल्समध्ये संबंधित प्रशिक्षणार्थ्यांना संपूर्ण कौशल्य प्राप्त होत नव्हते. त्यामुळे दिनांक ०२.०६.२०१४ रोजी राष्ट्रीय |

| | | |
|---|---|---|
| | ITIs पैकी २५ ITIs चा CoE म्हणून दर्जावाढ करावयाचे ठरविण्यात आले होते.<br>CoE म्हणून नामांकित करण्यात आलेल्या ITIs च्या दस्ताऐवजाच्या लेखापरीक्षा पडताळणीत असे आढळले की २५ ITIs पैकी फक्त ११ ITIs (*२३) नी प्रत्यक्षात CoE अभ्यासक्रम सुरू केले होते. उर्वरित १४ ITIs नी जानेवारी २०१७ पर्यंत CoE अभ्यासक्रम सुरु केले नव्हते. ११ ITIs (*२४) पैकी आठ ITIs नी अनिवार्य असलेले NCVT संलग्नीकरण प्राप्त न करताच, CoE अभ्यासक्रम सुरु केले होते आणि विद्यार्थ्यांना प्रवेश दिला होता. तथापि, ही वस्तुस्थिती विद्यार्थ्यांना प्रिंट /इलेक्ट्रॅनिक माध्यमातून कळविण्यात आली नव्हती. कामगार व रोजगार मंत्रालय, GoI च्या असे निदर्शनास आले (जून २०१४ ) की CoE अंतर्गत असलेल्या बहु-कौशल्य अभ्यासक्रमांना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागत होते. जसे शासकीय क्षेत्रात पदभरती साठी योग्यता क्षमतेत CoE चा अंतर्भात नव्हता, मूलभूत आणि प्रगत (Advance) मॉडयुल्स साठी एक एकत्रित प्रमाणपत्र नसणे, CoE अभ्यासक्रम व शिल्प कारागिर प्रशिक्षण योजना (Craftsman Training Scheme- CTS) यांच्या अभ्यासक्रमांच्या कालावधीत फरकामुळे त्यांच्यात समतोल साधण्यात येणाऱ्या अडचणी, CoE अभ्यासक्रमांना उद्योग धंद्याची मान्यता प्राप्त न होणे इत्यादी. म्हणूनच GoI ने ऑगस्ट २०१५ पासून CoE अभ्यासक्रमात प्रवेश देण्याची प्रक्रीया बंद करावयाची आणि CoE ला संबंधित CTS अभ्याक्रमांमध्ये रुपांतरीत करण्याची शिफारस केली होती. परंतु काही विशिष्ट प्रकरणात जिथे CoE प्रशिक्षणार्थ्यांची रोजगार मिळविण्याची क्षमता ठळकपणे उंचावली होती, अशा प्रकरणात राज्य शासनास CoE अभ्यासक्रमात २०१५ नंतरही प्रवेश देण्याची मुभा देण्यात आली होती. तथापि, GoI च्या शिफारशी जारी होण्याच्या एक महिन्यातच GoM ने सर्व ITIs ना CoE अभ्यासक्रमामध्ये ऑगस्ट २०१५ पासून प्रवेश देणे | व्यवसाय शिक्षण परिषदेच्या Sub Committee च्या झालेल्या बैठकीत सदर योजना रुपांतरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला. (DGT, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.DGET-१९/१५/२०१४-CD, दिनांक १७ जून, २०१४)<br>३.उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.आयटीआय-२०१४/प्र.क्र.९४/व्यशि-३ दि.०३.०७.२०१४ अन्वये CoE Basic Modules च्या ५४० तुकडयांना संलग्नता प्राप्त असून सदर तुकडयांचे शैक्षणिक वर्ष सन २०१४-१५ पासून CTS योजनेत येणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमात रुपांतर करण्यास मान्यता देण्यात आली.<br>४.त्यानुसार CoE योजनेतील CTS योजनेतर्गंत रुपांतरीत करण्यात आलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांतर्गत उमेदवारांचे प्रवेश झालेल्या सदर व्यवसायासाठी खरेदी करण्यात आलेली यंत्रसामुग्री, उपकरणे तसेच उपलब्ध मनुष्यबळाच्या सेवेचा पुर्ण क्षमतेने विनियोग करण्यात आलेला आहे.<br>५.राज्यातील विविध औद्योगिक आस्थापनांमध्ये तसेच शासकीय / निमशासकीय आस्थापनांमध्ये उमेदवारांची भरती करताना सदर आस्थापनांच्या Recruitment Rules (RR) मध्ये CoE योजनेंतर्गत प्रशिक्षण पूर्ण करण्यात आलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांचा समावेश नव्हता. तसेच CTS व CoE योजनेतर्गतचा प्रशिक्षण कालावधी हा भिन्न असल्याने नसून केवळ शिल्पकारागीर प्रशिक्षण प्रशिक्षण योजनेंतर्गत (CTS) येत असलेल्या व्यवसायांचा समावेश असल्याने CoE योजनेतंर्गत येणाऱ्या विविध अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण केलेल्या उमेदवारांना या ठिकाणी रोजगारासाठी अर्ज दाखल करता येत नाही. त्यामुळे सन २००५ पासून CoE योजनेतंर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमदेवारांना रोजगाराची समस्या निर्माण झाली होती. |

| | | |
|---|---|---|
| | बंद करण्याचे निर्देश दिले. (जूलै २०१४) परिणामी, CoE म्हणून नामांकित असलेल्या सर्व २५ ITIs नी शिक्षण सत्र २०१५-१६ पासून प्रवेश देणे बंद केले. २५ ITIs पैकी १४ *२५ ITIs नी CoE अभ्यासक्रम चालविण्यासाठी रु.८.७० कोटी खर्चून भौतिक पायाभूत संरचना (इमारती) आधीच तयार केल्या होत्या. ज्या ऑगस्ट २०१५ पासून विनावापर पडून होत्या. तसेच, २५ पैकी १० *२६ ITIs नी २००८-०९ ते २०१४-१५ दरम्यान खरेदी केलेले रु.७.२८ कोटी किमतीची यंत्रे व उपकरणे सुध्दा ऑगस्ट २०१५ पासून विनावापर पडून होती. काही ITIs मधील विनावापर पडून असलेल्या इमारती आणि यंत्रांची छायाचित्रे दर्शविली आहेत. (उदा.विनावापर असलेली CoE इमारत (ITI भिवापूर), विनावापर असलेली CoE इमारत (ITI मूल), विनावापर असलेली यंत्रे (ITI हिंगणा), विनावापर असलेली यंत्रे (ITI भिवापूर)<br>राज्यशासनाने नमूद केले की, विनावापर / वायफळ पडून असलेल्या इमारती आणि यंत्रांचा वापर करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात येत आहे. | ६.सदर परिस्थिती बदल्यासाठी व CoE उत्तीर्ण उमेदवारांना अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत समाविष्ट व्यवसाय अभ्यासक्रमांशी समकक्षता निर्धारित करण्यात आली आहे.<br>७.उच्च व तंत्र शिक्षण, शासन निर्णय क्र.आयटीआय-२०१५/प्र.क्र.१५१/व्यशि-३, दिनांक ०९ जूलै, २०१५ अन्वये Centre of Excellence या योजनेअंतर्गत सुरू असलेले व्यवसाय अभ्यासक्रम शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंर्गत (CTS) येणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमांशी समकक्ष ठरविण्यात आले आहे.<br>८.CoE चालविण्यासाठी रुपये ८.७० कोटी खर्च हा भौतिक पायाभूत संरचना (इमारती) व रु.७.२८ कोटी इतक्या किमतीची खरेदी करण्यात आलेले यंत्रे व उपकरणे यांचा वापर संबंधित औ.प्र.संस्थेतील CTS योजनेतर्गत रुपांतरीत करण्यात आलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी करण्यात येत आहे.<br>९.उदयोग आस्थापनांना आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यासाठी अतिरिक्त तसेच विनावापर इमारती व यंत्रसामुग्रीचा वापर करुन स्थानिक उद्योगांच्य शिफारशीनुसार SCVT अंतर्गत नवीन अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत धोरण ठरविण्यात येत आहे.<br>१०. CoE म्हणून नामांकित करण्यात आलेल्या २५ औ.प्र.संस्थांपैकी १४ औ.प्र.संस्थांनी जानेवारी २०१७ पर्यंत CoE अभ्यासक्रम सुरु केले नव्हते ही वस्तुस्थिती आहे. तथापी, CoE अभ्यासक्रम सुरु केलेल्या ११ संस्थांपैकी ८ NCVT संलग्नीकरण नसलेल्या संस्थांमधील प्रवेशाला DGT यांची मान्यता आहे. |
| | (*२३) भिवापूर, अर्जूनी मोरगाव, हिंगणा, नाशिक (मुली), श्रीगोंदा, सोलापूर (मुली), सांगोला, मुरबाड, कर्जत,औरंगाबाद (मुली) आणि घनसावंगी.<br>(*२४) भिवापूर, अर्जूनी मोरगाव, हिंगणा, सोलापूर (मुली), सांगोला, मुरबाड, कर्जत आणि घनसावंगी.<br>(*२५) समुद्रपूर, मुल, निफाड, संगमनेर, सांगोला, नाशिक (मुली), कर्जत, भिवापूर, अर्जूनीमोरगाव, श्रीगोंदा, सोलापूर (मुली), हिंगणा, औरंगाबाद (मुली) आणि रेणापूर.<br>(*२६) भिवापूर, अर्जूनीमोरगाव, हिंगणा, मौदा श्रीगोंदा, औरंगाबाद (मुली), घनसावंगी, सांगोला, कर्जत आणि रेणापूर. | |

| | | |
|---|---|---|
| ३.२.३.४ | <u>प्राचार्य आणि निदेशकांची रिकामी पदे</u><br>राष्ट्रीय अंमलबजावणी कक्ष, GOI ने मे २०१३ मध्ये सादर केलेल्या अहवालात असे निदर्शनास आणले होते की ITIS चा दर्जावाढ करण्यासाठी पुढील बाबींमुळे प्रतिकूल परिणाम झाला (अ) प्राचार्यांनी एकापेक्षा ITIS चा कार्यभार सांभाळणे, (ब) प्राचार्यांनी वारंवार होणाऱ्या बदली, आणि (क) निदेशकांची रिकामी पदे. नमुना तपासणी केलेल्या ६६ ITIS मध्ये (IDP च्या मंजुरीनंतर) ITIS च्या प्राचार्यांच्या बदल्या दिड (१-१/२) वर्षे ते सहा वर्षांच्या कालावधीत तीन ते नऊ वेळा करण्यात आल्या, परिणामी ITIS च्या दर्जावाढीच्या प्रगतीवर प्रतिकूल परिणाम झाला. याशिवाय, दर्जावाढ कार्यक्रमांतर्गत २५० ITIS च्या प्रभावी कार्यचालनासाठी GoM ने २,२९९ निदेशकांची गरज असल्याचे परिगणित केले, त्यापैकी फक्त २० पदे भरण्यात आलीत. निदेशकांची कमतरता कंत्राटी पध्दतीने निदेशकांची नियुक्ती करुन भरण्यात आली. राज्य शासनाने वस्तुस्थिती मान्य केली. | १. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत प्राचार्यांची मंजूर, भरलेली व रिक्त पदे खालील प्रमाणे<br><br>(table below)<br><br>२.औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील प्रशासकीय कामकाज व प्रशिक्षणार्थ्यांचे प्रशिक्षण हितांचा विचार करुन रिक्त पदांचा अतिरीक्त कार्यभार अन्य नजिकच्या संस्थेच्या प्राचार्यांवर सोपविण्याचे आवश्यक असल्याने अतिरीक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. तसेच प्राचार्यांच्या बदल्या हया बदली अधिनियम २००६ कायद्यांतर्गत करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये काही अधिका-यांचे स्वत:चे /कौटुंबीक सदस्यांचे गंभीर आजारपण/कौटुंबीक समस्या यामुळे त्यांच्या विनंतीप्रमाणे अधिनियमांतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत.<br>३. निदेशकांची रिकामी पदे:- २०१४ साली संचालनालयाकडून संपूर्ण महाराष्ट्रातील विभागनिहाय रिक्त निदेशकांची पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द केली होती. त्यानुसार अर्ज मागविण्यात येऊन सर्व कार्यवाही पुर्ण झालेली आहे.दरम्यान काही उमेदवारांनी मा.न्यायालयात सदर भरती प्रक्रियेसंदर्भात याचिका दाखल केली. त्यानंतर दि.२३/११/२०१६ रोजी मा.न्यायालयाने मान्यता दिल्यानंतर फक्त शिल्पनिदेशकांची २८० पदे |

| अ.क्र. | गट | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | अ | ३० | १६ | १४ |
| २ | अ (क) | ६८ | ४६ | २२ |
| ३ | ब | ३०३ | २२३ | ८२ |
| एकुण | | ४०१ | २८५ | ११६ |

| | | |
|---|---|---|
| | | वगळून इतर सर्व जाहीरातीतील पदांची भरती प्रक्रिया पुर्ण केली आहे. त्यामुळे पात्र आणि निवड यादीतील उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. २०१४ मध्ये दिलेल्या जाहीरातीतील शिल्पनिदेशकांची पदे भरण्यासबाबतच्या जाहीराती मा. उच्च न्यायालय यांनी दि.२२/०८/२०१७ च्या अंतिम आदेशान्वये रद्द केली आहे.<br>४. कंत्राटी निदेशक:- शासन निर्णय क्र. आयटीआय-२०१० प्र.क्र.६४/व्यशि-३ दि.२३/०८/२०१० नुसार राज्यातील औ.प्र.संस्थेत कंत्राटी पध्दतीने एकुण १५०० निदेशकांची पदे निर्माण करण्यात आलेली होती. त्यानुसार एकुण ३३८ पदे कंत्राटी तत्वावर भरण्यात आलेली होती. त्यापैकी दर्जावाढ कार्यक्रमांतर्गत २५० ITI<sup></sup>S मध्ये २० पदांची भरती करण्यात आली ही वस्तुस्थिती मान्य आहे. तथापी, सद्यस्थितीत राज्यातील एकुण ४१७ औ.प्र.संस्थेत कंत्राटी तत्वावर ३०९ कर्मचारी कार्यरत आहेत. सदर पदे पदांच्या आढाव्यामध्ये समर्पित करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील पदांचा आढावा घेण्याची कार्यवाही सुरु आहे. पदांचा आढावा मंजूर झाल्यानंतर शिल्प निदेशकांची रिक्त पदे भरणेबाबतची कार्यवाही करण्यांत येईल. |
| ३.२.३.५ | <u>प्लेसमेंट सेल्स ची स्थापना न करणे आणि फिडबॅक यंत्रणा नसणे.</u><br>MPA नुसार IMCS ने ITI<sup></sup>S मध्ये स्नातकांना रोजगार/स्वयंरोजगार मिळविण्यासाठी मार्गदर्शन/मदत करण्यासाठी प्लेसमेंट सेल्स ची स्थाना करावयास पाहिजे होती आणि स्नातकांचे करिअर कसे घडल आहे, | औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये ट्रेनिंग कम प्लेसमेंट सेल ( TCPC) ची स्थापना करण्यात आलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, सद्यस्थितीत औ.प्र.संस्थांमध्ये उपलब्ध असणारे मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषांगिक सुचना केंद्र यांचा विनियोग TCPC सेल म्हणून होत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | याबाबत कमीत कमी तीन वर्षांसाठी,माग घेण्यासाठी एक यंत्रणा विकसित करावयास पाहिजे होती. नमूना तपासणी केलेल्या ६६ ITI-S पैकी ६२ ITI-S ने पुरविलेल्या माहितीनुसार १९ ITI-S नी प्लेसमेंट सेल्स स्थापित केले नव्हते. ITI-S च्या प्राचार्यांनी सांगितले की प्रत्येक व्यवसाय अभ्यासक्रमाचे निदेशक एक स्वतंत्र वही, ज्यास फॉलो-अप रजिस्टर (FOLLOW-UP Register) असे संबोधल्या जाते, ठेवतात, त्यात अभ्यासक्रम पुर्ण करुन गेलेल्या विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंट चे तपशील राखले जातात. लेखापरीक्षेस असे आढळले की अभ्यासक्रम-निहाय ठेवलेल्या वही (Follow up) अपुर्ण होत्या, कारण त्यात महत्तवपुर्ण माहिती,जसे अभ्यासक्रम पुर्ण होण्याची तारीख, विद्यार्थ्यांचा संपर्क क्रमांक, पता आणि छायाचित्र, नियोक्ताचे (Employer) तपशील इत्यादी नमूद केले नव्हते. तसेच, DVET, मुंबई ला तिमाही अहवाल सादर करताना ITI-S नी विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंटची टक्केवारी आणि त्यांना मिळणाऱ्या उत्पन्नाची मर्यादा (Range) नोंद करणे क्रमप्राप्त होते. तथापि, २१ ITI-S नी प्लेसमेंट संबंधी "निरंक" अहवाल सादर केला होता आणि ४० ITI-S नी प्लेसमेंटची टक्केवारी ४७ ते १०० दरम्यान दर्शविली होती. तथापि, या ITI-S नी त्यांच्या दाव्यांच्या समृथनार्थ कोणतेही दस्तावेज सादर केले नव्हते.<br>याशिवाय,MOA नुसार IMCS ने प्रशिक्षणाच्या दर्जाबाबत प्रशिक्षणार्थ्यांकडून आणि उद्योग समुहांकडून या फीडबॅक प्राप्त करण्यासाठी एक उपयुक्त यंत्रणा तयार करावयास पाहिजे होती आणि या फिडबॅक चा ITI-S मधील प्रशिक्षणाचा दर्जा उंचविण्यासाठी उपयोग करावयास पाहिजे होता. लेखापरीक्षेस असे निर्दशनास आले की नमूना तपासणी केलेल्या ६६ ITI-S मध्ये विद्यार्थ्यांसाठी आणि उद्योग समूहांसाठी अशी कोणतीही फीडबॅक यंत्रणा नव्हती. | |

| | | |
|---|---|---|
| ३.२.३.६ | <u>दर्जावाढ करण्यासाठी मिळालेल्या निधीतून अनियमित खर्च</u><br>२००८ च्या GOI मार्गदर्शक सूचनांनुसार दर्जावाढ करण्यासाठी मिळालेल्या निधीचा वापर ITI•S मध्ये अतिरिक्त नागरी बांधकामे (Civil Works) करण्यासाठी, ITI•S मध्ये पायाभूत सुविधांचा दर्जा उंचवण्यासाठी संबंधित यंत्रे आणि उपकरणांची खरेदी आणि इतर कामांसाठी करावयास पाहिजे होता. GOM ने ITI मालवणची निवड (२००८-०९) काष्ठकामे आणि निर्मिती व्यवसाय क्षेत्रासाठी (manufacturing Trade Sector) CoE म्हणून केली होती, परंतु IMC ने हे व्यवसाय अभ्यासक्रम सुरु केले नाही. त्याऐवजी, अध्यक्ष IMC यांनी एका हाऊस बोटीचे बांधकाम कार्य (खाजगी एजेन्सी मार्फत) हाती घेहतले (मे २००९ ) आणि जून २०११ पर्यन्त दर्जावाढ निधीतून रुपये ५२ लाख खर्च केले. DVET,मुंबई ने नंतर अध्यक्षांना उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी दर्जावाढ निधीतमन रुपये २५ लाख खर्च करण्याची मंजूरी दिली (सप्टेंबर २०११), ज्यापैकी अध्यक्षांनी ऑक्टोबर २०११ पर्यन्त रुपये ९.९० लाख खर्च केले. प्रमाणित मूल्यांकन कर्त्याद्वारे दिलेल्या (नोव्हेंबर २०१४) मूल्यांकन अहवालानुसार या हाऊस बोटची किंमत फक्त रुपये २० लाख होती. यादरम्यान, अध्यक्षांनी सात आसनी स्पीड बोट खरेदी करण्यासाठी दर्जावाढ निधीतून आणखी रुपये १०.०८ लाख खर्च केले (ऑक्टोबर २०१०) अध्यक्ष, IMC ने स्पीड बोटची नोंदणी त्यांच्या स्वत:च्या नावे केली होती, जे GOI च्या मार्गदर्शक सूचनांचे, ज्यात दर्जावाढ निधीतून निर्मित करण्यात येणाऱ्या संपत्तीचे मालकी हक्क IMC कडे दिले होते, उल्लंघन होते. अपुर्ण राहिलेली हाऊस बोट आणि स्पीड बोट तारकर्ली समुद्र किनारी मागील पाच ते सहा वर्षापासून जीर्णावस्थेत पडून होती. (सोबत:- अपुर्ण हाऊस बोट आणि विनावापर पडून राहिलेली स्पीड बोट छायाचित्रात दाखविलेली आहे.)<br>लेखापरीक्षेस असेही निदर्शनास आले की अध्यक्ष IMC हे २००९ पासून | पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप योजने अंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जावाढ करण्यासाठी मिळालेल्या निधी मधुन औ.प्र.संस्था, मालवण येथे अभ्यासक्रमा बाहेरील बाबीसाठी अनियमित खर्च करण्यात आलेला होता ही वस्तुस्थिती आहे.<br>अभ्यासक्रमा बाहेरील बाबीसाठी अनियमित खर्च ही बाब गंभीर स्वरुपाची असल्यामुळे याबाबतITI,मालवणची संपुर्ण तपासणी करण्यासाठी सहसंचालक,मुंबई क्षेत्र यांचे अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती.सहसंचालक मुंबई यांचे अध्यक्षतेखालील समितीने दिलेला अहवाल राज्य सुकाणू समितीने दि.२०.०१.२०१८ च्या बैठकीत स्विकारला व त्यातील शिफारशी नुसार संस्था व्यवस्थापन समितीने (IMC) केलेल्या सदर अनियमित खर्चाच्या बांबीच्या प्रकरणाची चौकशी करुन आय.एम.सी. ने बांधलेली हाऊसबोट आहे त्या स्थितीत मुल्यमापन (Valuation) करुन त्वरीत लिलाव करण्यात यावा व लिलावातून मिळणा-या रकमेचा भरणा संस्था व्यवस्थापन समिती (IMC) च्या बचत खात्यामध्ये करण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला व त्यानुसार प्रादेशिक कार्यालय स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.<br>शासनाचे झालेले नुकसान संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन वसुल करण्याबाबत SSC ने निर्देश दिलेले असुन त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.<br>अध्यक्ष IMC हे २००९ पासून निर्माण रिएल्टर्स ॲन्ड डेव्हलपर्स लिमिटेड, मुंबई (ITI मालवणसाठी निवडलेल्या IP) मध्ये कोणत्याही पदावर कार्यरत नव्हते. ही बाब निर्माण रिअल्टर्स ॲन्ड डेव्हलपर्स लिमिटेड, मुंबई ने प्राचार्य ITI, मालवण यांना नोव्हेंबर २०१५ मध्येच कळविली ही वस्तुस्थिती आहे. तथापी सदर प्रकरणात पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप योजने अंतर्गत निर्माण रिअल्टर्स ॲन्ड डेव्हलपर्स लिमिटेड यांचेशी MOA केलेला |

| | | |
|---|---|---|
| | निर्माण रिउल्टर्स अँन्ड डेव्हलपर्स लिमिटेड, मुंबई (ITI मालवणसाठी निवडलेल्या IP) मध्ये कोणत्याही पदावर कार्यरत नव्हते. ही बाब निर्माण रिअल्टर्स अँन्ड डेव्हलपर्स लिमिटेड, मुंबई ने प्राचार्य ITI, मालवण यांना नोव्हेंबर २०१५ मध्येच कळविली आणि प्राचार्यांनी याबाबत DVET,मुंबईला कळविले (डिसेंबर २०१५) तथापि, DVET,मुंबई ने अध्यक्ष IMC यांचेविरुध्द ऑक्टोबर २०१६ पर्यंत कोणतीही कारवाई केली नाही.<br>प्राचार्य, ITI,मालवण यांनी मान्य केले (फेब्रुवारी २०१६) की स्पीड बोटची खरेदी आणि हाऊस बोटचे बांधकाम यांचा COE अभ्यासक्रमांत प्रस्तावित व्यवसाय अभ्यासक्रमांशी काहीही संबंध नव्हता. राज्य शासनानेही वस्तुस्थिती मान्य केली आणि नमुद केले की ही बाब गंभीर स्वरुपाची असल्यामुळे याबाबत ITI,मालवणची संपुर्ण तपासणी करण्यासाठी सहसंचालक,मुंबई क्षेत्र यांचे अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती.<br>अशाप्रकारे,अध्यक्ष, IMC मालवण हे अनधिकृतपणे सहा वर्षे (२०१०-१६) पदावर कार्यरत राहिले आणि त्यांनी दर्जावाढ निधीतून रुपये ७१.९८ लाख अनियमितपणे खर्चही केले. शिखर स्तरावर DVET,मुंबई आणि ज्यांच्या अधिपत्याखली ITI,मालवण आहे आणि जे IMC मध्ये राज्याचे प्रतिनिधी आहेत, असे सहसंचालक,मुंबई क्षेत्र हे समयोजित सुधारात्मक कारवाई करु शकले नाही. | असल्याने त्यांनी नियुक्त केलेले IMC अध्यक्ष कार्यरत नसल्यास त्या ऐवजी इतर अधिका-याची नियुक्ती संबंधीत निर्माण रिअल्टर्स अँन्ड डेव्हलपर्स लिमिटेड यांचे कडून अपेक्षित होती. प्राचार्य ITI, मालवण यांना सदर बाब अवगत होताच त्यांनी त्यानंतर झालेल्या राज्य सुकाणू समितीच्या दि.२०.०१.२०१८ च्या बैठकीत पटलावर ठेवल्याने त्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश IMC औ.प्र.संस्था, मालवण यांना देण्यात आले. |
| ३.२.४ | <u>संनियंत्रण</u><br>लेखापरीक्षेस दर्जावाढ कार्यक्रमाच्या संनियंत्रणात खालील अपर्याप्तता आढळल्या:<br>• १४ मार्च २०११ रोजी झालेल्या NSC च्या बैठकीत NSC ने असे ठरविले होते की SSC दोन महिन्यातून एकदा बैठक घेईल आणि SSC बैठकीमध्ये | संचालनालयस्तरावर असलेली मनुष्यबळाची कमतरता व प्रशासकीय कारणास्तव NSC ने ठरविल्यानुसार SSC च्या बैठका होऊ शकल्या |

| | | |
|---|---|---|
| | घेतलेल्या निर्णयांबाबत NSC ला अवगत करेल. तथापि, मार्च २०११ हते मार्च २०१६ (पाच वर्षे) दरम्यान SSC ने विहित ३० बैठकीऐवजी फक्त चार बैठकी घेतल्या. तसेच, २०१३ आणि २०१४ मध्ये बैठक घेण्यात आली नाही. राज्य शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले की नियमितपणे SSC बैठक घेण्यासाठी आवश्यक कारवाई करण्यात येईल. | नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. तसेच राज्य सुकाणु समितीच्या ज्या बैठका सन २०११-२०१६ मध्ये झाल्या त्यांचा तपशिल तसेच त्यानंतर झालेल्या बैठकांचा तपशिल पुढीलप्रमाणे :-<br>१) दि.३ मार्च २०११ २) दि. १५ सप्टेंबर २०११ ३) दि.२४ जाने.२०१२ ४) दि.१५ मे २०१५ |
| | ▪ २६ जुलै २०१० च्या बैठकीत SSC ने जरी काम न करणाऱ्या IMCS चे कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज द्वारे लेखापरीक्षा करावयाचा निर्णय घेतला होता, तरीही अशाप्रकारची कोणतीही लेखापरीक्षा करण्यात आली नव्हती (ऑक्टोबर २०१६) राज्य शासनाने नमूद केले की याबाबत आवश्यक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. | दि. २६ जुलै २०१० रोजीच्या राज्य सुकाणू समितीच्या बैठकीत Non performing IMCs चे Audit CII च्या टीमने करावे व त्याचा खर्च संस्था व्यवस्थापन समितीने दयावे असे सुचीत करण्यात आलेले होते. तसेच पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप योजने अंतर्गत मिळणा-या निधीचा विनीयोग योग्य प्रकारे होणेकरिता CA ची नेमणूक करण्याबाबतचा निर्णय दि. ३ मार्च २०११ रोजी झालेल्या राज्य सुकाणू समितीच्या बैठकीमध्ये घेण्यात आला होता तथापी त्याप्रमाणेची कार्यवाही झाली नाही ही वस्तुस्थिती आहे परंतु त्यानुसारची कार्यवाही संचालनालयस्तरावर सुरु आहे. |
| | ▪ GOI ने जून २०११ मध्ये राज्य शासनांना IMCS द्वारे करण्यात येणाऱ्या कामाच्या भौतिक आणि आर्थिक प्रगतीची पडताळणी करावयाचे आणि पुढील पाठपुराव्यासाठी (FOLLW-UP) एक अहवाल सादर करावयाचे निर्देश दिले होते. तथापि GOM ने याबाबत कोणतीही कारवाई केली नव्हती. | केंद्रशासनाचे पत्र दिनांक २ जून २०११ नुसार दर्जावाढ कार्यक्रमाच्या अंतर्गत असलेल्या औ.प्र.संस्थांच्या कामाची भौतिक व आर्थिक प्रगतीची पडताळणी करण्यासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय स्तरावरुन पथक गठीत करुन कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे. |

| | | |
|---|---|---|
| ३.२.५ | **निष्कर्ष आणि शिफारशी**<br>• ITI:S चे दर्जावाढ करण्यासाठीचे नियोजन अपूरे होते. दर्जावाढ करण्यासाठी ITI:S ची निवड करण्याबाबत कोणतेही धोरण विहित केले नव्हते आणि सहयोगी उद्योजगांच्या निवडी संबंधिच्या धोरणांचे अनुपालन करण्यात आले नव्हते. दर्जावाढ कार्यक्रमांतर्गत विविध कामांची अंमलबजावणी करण्यासाठी जबाबदार असणाऱ्या संस्था व्यवस्थापन समितीचे गठन मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात आले नव्हते. | सहयोगी उद्योजक निवडीबाबत शक्यतो भारत सरकाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांची काटेकोर पणे अंमलबजावणी करून सहयोगी उदयोजक निवडीची प्रक्रिया करण्यात आलेली होती. तथापी काही औ. प्र. संस्थांच्या परिसरात मोठया औद्योगिक आस्थापना उपलब्ध नसल्याने व योजनेची अंमलबजावणी तातडीने करण्याच्या दृष्टीने तसेच औद्योगिक आस्थापनेच्या सहयोगाने विकास करून कौशल्य प्राप्त प्रशिक्षणार्थ्यांना रोजगार उपलब्ध व्हावा व संस्थांचा विकास व्हावा या उद्देशाने तेथील भौगोलिक व आर्थिक परिस्थीतीनुसार सहयोगी उदयोगाची निवड करण्यात आली आहे. |
| | • निधीचा वापर खूप कमी होता, मागील पाच ते नऊ वर्षात २५० ITI:S नी रुपये ६२५ कोटी पैकी रुपये १६७.२७ कोटी खर्च केले हाते,ज्यावरुन उद्दिष्ट साध्यता असमाधानकारक असल्याचे दिसते. एका ITI ने दर्जावाढीसाठी देण्यात आलेल्या निधीस अनियमितरित्या वळती करुन त्याचा वापर हाऊस बोट बांधकाम/स्पीड बोट खरेदी करणेयासाठी केला. | •पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप योजने अंतर्गत २५० औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये सदर योजना टप्याटप्याने सुरु झालेली असल्याने खर्च हा कमी झालेला आहे व नियमित प्राचार्य नसल्यामुळे महसुल प्राप्त करण्याच्या उपाययोजना करण्यात अडचणी आलेल्या आहेत. तसेच संस्था विकास आराखडा (IDP) नुसार प्रस्तावीत व्यवसाय सुरु करणे, त्यासाठी आवश्यक असणारी यंत्रसामुग्री खरेदी करणे, भारत सरकारकडुन संलग्नता प्राप्त करून घेणे, याबाबींना बराच कालावधी लागत असल्यामुळे संस्था व्यवस्थापन समिती (IMC) चा खर्च कमी झालेला आहे. तथापी, दि.२०.१.२०१८ रोजी झालेल्या राज्य सुकाणु समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार खर्चावरील निर्बंध उठविण्यात आले असुन त्याप्रमाणे पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप योजने अंतर्गत २५० औदयोगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये अदययावत Computer Lab व Virtual Class Room विकसित करणे. तसेच संस्थेमध्ये किरकोळ कामे करण्यासाठी मंजुरी देण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | त्याप्रमाणे संचालनालयस्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.<br>एका ITI ने दर्जावाढीसाठी देण्यात आलेल्या निधीस अनियमितरित्या वळती करुन त्याचा वापर हाऊस बोट बांधकाम/स्पीड बोट खरेदी करणेयासाठी केल्या प्रकरणी चौकशी करुन आय.एम.सी. ने बांधलेली हाऊसबोट आहे त्या स्थितीत मुल्यमापन (Valuation) करुन त्वरीत लिलाव करण्यात यावा व लिलावातून मिळणा-या रकमेचा भरणा संस्था व्यवस्थापन समिती (IMC) च्या बचत खात्यामध्ये करण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला व त्यानुसार प्रादेशिक कार्यालय स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.<br>• शासनाचे झालेले नुकसान संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन वसुल करण्याबाबत SSC ने निर्देश दिलेले असुन त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. |
| | • २०५ पैकी एकाही ITI ने राष्ट्रीय अधिस्वीकृति बोर्ड, शिक्षण आणि प्रशिक्षण यांचेकडे अधिस्वीकृति मिळण्याकरीता अर्ज केले नव्हते, परिणामी, ITI-S च्या संस्था विकास आराखडयात प्रस्तावित नवीन व्यवसाय अभ्यासक्रमांचे संलग्नीकरण झाले नाही. | औ. प्र. संस्थेमधील व्यवसाय / तुकडीच्या संलग्नतेसाठी Quality Council of India कडे अर्ज करण्याचे निर्देश DGT नवी दिल्ली यांनी दिले होते. परंतु तांत्रिक अडचणीमुळे QCI कडे Online अर्ज करणे शक्य झाले नव्हते. त्यामुळे नवीन व्यवसाय अभ्यासक्रमाचे संलग्नीकरण झाले नाही. तथापी व्यवसाय/तुकडीच्या संलग्नीकरणाची कार्यवाही केंद्र शासनाने नियुक्ती केलेल्या QCI या एजन्सी मार्फत अधिस्वीकृतीचे काम बंद केल्यामुळे सदयस्थितीत केंद्रशासनामार्फत पुढील आदेशापर्यंत अधिस्वीकृती बाबतचे काम स्थगित करण्यात आलेले आहे. केंद्र शासनामार्फत अधिस्वीकृती बाबत कार्यवाही सुरु होताच औ.प्र.संस्थांच्या अधिस्वीकृती बाबत कार्यवाही त्वरीत करण्यात येईल. |
| | • ITI-S मध्ये प्राचार्य आणि निदेशकांची अनेक पदे रिकामी होती. दर्जावाढ कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार असणाऱ्या राज्य अंमलबजावणी कक्षाची जानेवारी २०१७ पर्यन्त स्थापना झाली नव्हती. | केंद्रशासनाने दिलेल्या निर्देशानुसार पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप योजने अंतर्गत राज्य अंमलबजावणी कक्ष (SIC) स्थापन करण्याचे अभिप्रेत होते. त्या अनुषंगाने शासनाने ७ जूलै २०११ रोजी पदनिर्मितीस मान्यता देणारा |

| | | |
|---|---|---|
| | | शासन निर्णय निर्गमित केला आहे. तथापि, संचालनालय व प्रादेशिक कार्यालय स्तरावर मोठया प्रमाणावर मनुष्यबळाची कमतरता असल्याकारणाने मोठया प्रमाणात अधिकारी व कर्मचारी यांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे राज्य अंमलबजावणी कक्ष SIC करीता पदभरती न झाल्यामूळे सदर योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करणे शक्य झाले नाही. तदनंतर सदयस्थितीत सहायक संचालक (तां) वर्ग १ व वर्ग २तसेच लेखाअधिकारी सहित आवश्यक कर्मचारी वर्ग यांचे मार्फत राज्य अंमलबजावणी कक्षाची कामे करण्यात येत आहेत.या कक्षातील सहाय्यक संचालक (तां) हे योजनेच्या समन्वयकाचे काम पहात असुन त्याच धर्तीवर प्रादेशिक कार्यालयांमध्ये प्रादेशिक स्तरावरील देखरेख तथा नियंत्रणासाठी समन्वय नेमण्यात आलेले आहेत. |
| | राज्य शासनाने i) नियोजनातील उणीवा भरुन काढण्यासाठी, ii) विनावापर पडून राहिलेल्या निधीचा आणि भौतिक पायाभूत सुविधांच्या उचित वापराची खात्री करावयासाठी आणि iii) कौशल्य विकास व रोजगार क्षमतेचे मोठे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी एक भक्कम संनियंत्रण यंत्रणा स्थापित करावयासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या दर्जावाढ कार्यक्रमाचा आढावा घ्यावा. | पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप योजने अंतर्गत राबविण्यात येणा-या कार्यक्रमाचा आढावा घेण्यासाठ शासन निर्णय दि.२१.०२.२०१५ अन्वये श्री. के.एम.गेडाम, माजी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली सदर समितीचा आढावा अहवाल माहे ऑक्टोबर २०१६ मध्ये शिफारशी सहित प्राप्त झाला आहे. समितीच्या अहवालातील शिफारशींवर कार्यवाही करण्यासाठी मा.प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.४.३.२०१७ रोजी राज्य सुकाणू समितीची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार आवश्यककार्यवाही करण्यात येत आहे. वरीलप्रमाणे संचालनालयस्तरावर आवश्यक उपाययोजना सुरु असुन योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याचे प्रयत्न कसोशिने सुरु आहेत. |

३.९ निष्फळ खर्च

**कौशल्य विकास व उद्योजकता विभागाद्वारे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चांदुर रेल्वे, अमरावती येथे मुलांचे वसतीगृह बांधण्यासाठी आवश्यकतेचे निर्धारण न केल्यामुळे रुपये ९२.३९ लाखचा निष्फळ खर्च झाला.**

जिल्हाधिकारी, अमरावती यांनी औ.प्र.संस्था, चांदुर रेल्वे, अमरावती येथील ५० खाटांचे मुलांचे वसतीगृह इमारतीच्या बांधकामास रुपये १०६.३० लाख इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता दिली. (ऑगस्ट २०१०).विधानसभेच्या स्थानिक सदस्यांच्या मागणीवर हे काम जिल्हा वार्षिक योजना २०१०-११ मध्ये समाविष्ट करण्यात आले होते. उक्त काम रुपये ८३.८५ लाख किंमतीवर डिसेंबर २०११ पर्यन्त पूर्ण करण्यासाठी बहाल करण्यात आले (डिसेंबर २०१०). जानेवारी २०१२ मध्ये हे काम रुपये ७८.२७ लाख किंमतीवर पूर्ण झाले आणि त्याच महिन्यात प्राचार्य, औ.प्र.संस्था,चांदुर रेल्वे यांना ते हस्तांतरित करण्यात आले होते.

प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चांदुर रेल्वे यांच्या दस्तावेजांच्या पडताळणीत (फेब्रुवारी २०१६) खालील बाबी आढळल्या :

जरी वसतीगृहाची इमारत जानेवारी २०१२ मध्ये प्राचार्य यांना हस्तांतरीत केली होती. तरीही एकाही निवासी मुलाने या वसतीगृहात प्रवेश न घेतल्यामुळे ही इमारत तशीच विनावापर पडून होती (जानेवारी २०१७). तसेच, मार्च २०१३ मध्ये वसतीगृहासाठी खरेदी केलेल्या रुपये १४.१२ लाख किंमतीच्या फर्निचर वस्तू जसे खाटा,खुर्च्या, बाकं, कपाट सुध्दा विना वापर

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चांदुर रेल्वे जि.अमरावती या संस्थेची स्थापना १९८५ मध्ये झालेली आहे. ही संस्था स्वत:च्या इमारतीत कार्यरत असून या संस्थेमध्ये शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत दहा व्यवसायांसह १५ तुकडयामध्ये पुढील प्रमाणे अभ्यासक्रम सुरु आहे.

| अ.क्र. | व्यवसाय | तुकडया | जागा |
|---|---|---|---|
| १ | संधाता | ०२ | ४२ |
| २ | पत्रेकारागीर | ०१ | २१ |
| ३ | यांत्रिक मोटारगाडी | ०२ | ४२ |
| ४ | तारतंत्री | ०१ | २१ |
| ५ | रंगकाम सामान्य | ०१ | २१ |
| ६ | अभियांत्रिकी आरेखक | ०१ | २१ |
| ७ | जोडारी | ०२ | ४२ |
| ८ | विजतंत्री | ०२ | ४२ |
| ९ | यांत्रिक डिझेल | ०२ | ४२ |
| १० | ड्रेसमेकिंग | ०१ | २१ |

चांदुर रेल्वे हा तालुका शेतकरी बहुल असल्याने या संस्थेत बहुतांशी परिसरातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची मुले प्रशिक्षण घेतात त्यांच्या मुलामुलींना राहण्याची सुविधा व्हावी तसेच संस्थेच्या परिसरात विद्यार्थ्यांनी राहून जास्तीत जास्त कोशल्य आत्मसात करावे व भविष्यात स्वत:च्या पायावर उभे रहावे हा उद्देश ठेवून स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रशिक्षणार्थ्यांसाठी वसतीगृह बांधण्याची मागणी केलेली होती. त्याप्रमाणे मा.जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, अमरावती यांचे दि.१७.०९.२००८ च्या पत्रानुसार जिल्हा

| | | |
|---|---|---|
| | पडून राहिले होते.<br>तत्कालीन प्राचार्य, औ.प्र.संस्था, चांदुर रेल्वे यांनी (जून २००८) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, अमरावती क्षेत्र यांना कळविले की जास्तीत जास्त विद्यार्थी हे औ.प्र.संस्थेच्या आजूबाजूच्या २० ते २५ किमी परिसरात राहत असून ते सहजपणे रोज ये जा करु शकतात आणि<br>त्यामुळे औ.प्र.संस्था, चांदुर रेल्वे येथे मुलांच्या वसतीगृहाची आवश्यकता नाही. तथापि, ऑगस्ट २०१० मध्ये प्रशासकीय मान्यता देतांना प्राचार्याचे मत विचारात घेतेले नव्हते. प्राचार्य, औ.प्र.संस्था, चांदुर रेल्वे यांनी वसतीगृह इमारत रिक्त राहण्याबद्दल पुढील कारणे दिली. (जुलै २०१६)<br>(१) विद्यार्थ्यांना बस व रेल्वे पास (Pass) सहजपणे उपलब्ध होणे ,<br>(२) ज्यामुळे त्यांना रोज ये जा करणे सोयीचे असणे<br>(ब) वसतीगृहामध्ये प्रवेशासाठी विद्यार्थ्यांकडून कोणतेही अर्ज प्राप्त न होणे आणि<br>(क) वसतीगृहासाठी काळजीवाहक आणि कर्मचारी उपलब्ध् नसणे.<br>तथापि, प्राचार्यांनी असेही सांगितले की वसतीगृह इमारतीचा वापर वाचनालय आणि वर्गखोल्या म्हणून होत होता.<br>या उत्तराने जून २००८ मध्ये तत्कालीन प्राचार्यांनी मांडलेल्या मतांना अधिक बळकटी मिळत होती. तसेच, प्राचार्याचे असे म्हणणे की, वसतीगृह इमारतीचा वापर वाचनालय आणि वर्गखोल्यासाठी होत आहे, उचित वाटत नाही, कारण औ.प्र.संस्था, चांदुर रेल्वे मधील विद्यार्थ्यांची नावनोंदणी संख्या घसरत होती. २०१० मध्ये ही संख्या ३५५ होती तर २०१५ मध्ये ती १८९ | वार्षिक योजनेमध्ये समाविष्ठ करुन उपविभागीय सार्वजनिक बांधकाम विभाग, चांदुर रेल्वे यांचेकडे वसतीगृहाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन तसा प्रस्ताव संचालनालयास पाठविण्यात आला होता. व त्यानुसार तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन वसतीगृहाचे बांधकाम पूर्ण करण्यात येऊन दि. १७.०१.२०१२ रोजी रितसर ताबा मिळालेला आहे. तथापि दळणवळणाच्या सुविधा वाढल्यामुळे सन २०१३-१४,२०१४-१५,२०१५-१६ या सत्रात वसतीगृहात प्रवेश झालेले नाहीत. तथापि वसतीगृहात सन २०१६-१७ मध्ये ०६ विद्यार्थी व सन २०१७-१८ मध्ये २० विद्यार्थी प्रवेशित झालेले आहेत. तसेच सद्यस्थितीत वसतीगृहाच्या उर्वरीत इमारतीचा वापर वर्गखोल्यांसाठी व ग्रंथालयासाठी करण्यात येत आहे.ही वस्तस्थिती आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये ऑनलाईन प्रवेश पध्दती सुरु झाल्याने प्रवेश फेरी जिल्हा/ विभागा बाहेरील विद्यार्थ्यांना गुणवता यादी व मागणीनुसार उपलब्ध् होत असल्याने वसतीगृहात १०० टक्के प्रवेश होऊ शकतील आणि भविष्यात या वसतीगृह इमारतीचा विद्यार्थ्यांना निश्चितच फायदा होऊन यावर झालेला बांधकामाचा खर्च भविष्यातील अनेक वर्षासाठी केलेली सामाजिक गुंतवणूक आहे. |

| | | |
|---|---|---|
| | राहिली. याखेरीज वसतीगृह इमारतीचा वापर वाचनालय आणि वर्गखोल्या म्हणून होणे हे प्रकल्पाचे उद्दिष्ट नव्हते.<br>अशाप्रकारे, मुलांसाठी वसतीगृहाची आवश्यकता असण्याचे निर्धारण केल्यामुळे रुपये ९२.३९ लाखाचा खर्च निष्फळ ठरला.<br>ही बाब जून २०१६ मध्ये शासनास कळविण्यात आली. जानेवारी २०१७ पर्यंत त्यांचे उत्तर प्रतीक्षित होते. | |
| ३.१० | ई-विद्या प्रकल्पावरील निष्फळ खर्च | |
| | जिल्हाधिकारी गडचिरोली आणि जिल्हा व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, गडचिरोली यांनी ई-विद्या प्रकल्पाची अंमलबजावणी कार्यासक्तीने न केल्यामुळे रुपये १.०६ कोटीचा खर्च निष्फळ ठरला.<br>जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी गडचिरोली (DVETO) यांनी जिल्हा योजना अंतर्गत ई-विद्या प्रकल्पाची सुरुवात केली, ज्यात विडिओ कॉन्फरन्सिंग सेंटर उभारुन वर्च्युअल (Virtul) वर्ग घेऊन गडचिरोली जिल्हयाच्या १२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या (ITIs) विद्यार्थ्यांना व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण देण्याचे ठरविले. हया १२ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा उपयोग विद्यार्थ्यांना विविध स्पर्धात्मक परीक्षेसाठी आणि त्यांचे संगणकीय कौशल्य (Soft Skills) व रोजगाराभिमुख कौशल्य विकसित करण्यासाठी प्रशिक्षण देण्यासाठी सुध्दा करावयास होता.<br>जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी मार्च २०१० मध्ये प्रकल्पासाठी निविदा मागविल्या होत्या. ऑक्टोबर २०१० मध्ये एका निवडलेल्या अभिकरणाला *३९ कार्यादेश देण्यात आले आणि DVETO यांनी जानेवारी २०११ मध्ये या | जिल्हा नियोजन विकास समिती गडचिरोली यांनी जिल्हा योजनेंतर्गत ई-विद्या प्रकल्पाची सुरुवात केली ज्यामध्ये विडिओ कॉन्फरन्सिंग सेंटर उभारुन वर्च्युअल (Virtul) वर्ग घेऊन गडचिरोली जिल्हयाच्या १२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या (ITIs) विद्यार्थ्यांना व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण देण्याचे ठरविले. याचा उपयोग विद्यार्थ्यांना विविध स्पर्धात्मक परीक्षेसाठी आणि त्यांचे संगणकीय कौशल्य (Soft Skills) व रोजगाराभिमुख कौशल्य विकसित करण्यासाठी तसेच प्रशिक्षण देण्यासाठी सुध्दा करावयाचा होता. त्यानुषंगाने मा.जिल्हा नियोजन विकास समिती, गडचिरोली यांनी त्यांच्या दिनांक १४/१०/२०१० च्या पत्रानुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजनेस तांत्रिक मान्यता देण्याचा प्रस्ताव व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयास प्राप्त झाला होता तथापी संचालनालयाकडुन तांत्रिक मान्यता दिलेली नाही. जिल्हाधिकारी गडचिरोली यांनी मार्च २०१० मध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या व त्यानुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत ०६ ऑक्टोबर २०१० रोजी च्या पत्रान्वये इवरॉन एज्युकेशन लिमिटेड, चेन्नई या अभिकरणास कार्यादेश ३ वर्षाच्या कालावधी करिता देण्यात आलेले होते. तत्कालीन जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, गडचिरोली तसेच |

| | | |
|---|---|---|
| | अभिकरणासोबत एक करार निष्पादित केला. करारानुसार अभिकरणाने गडचिरोली येथील ITI, मुलांच्या वसतिगृह (१२ ITIs पैकी एक) इमारतीत रुपये ४८ लाखाच्या खर्चावर एक केंद्रीकृत टॉवर उभारुन त्यांच्या माध्यमाने प्रति माह ८० तासांची बँड विड्थ (Bandwidth) असलेल्या V-SAT *४० जोडणीद्वारे (Connectivity) १२ वर्च्युअल वर्गाची (Virtual Classes) स्थापना करावयाची होती. याशिवाय, अभिकरणाला १२ वर्च्युअल वर्ग शिकवणी चालविण्यासाठी कार्यक्रम व्यवस्थापन, वर्च्युअल वर्ग (Virtual Session Delivery) बँडविड्थ फी आणि कार्यचालन खर्च म्हणून रुपये ३.४५ लाखाचे आवर्ती मासिक खर्चाचे भुगतान सुध्दा करावयाचे होते. हा प्रकल्प तीन वर्षाच्या कालावधीसाठी (मार्च २०१४) चालवावयाचा होता.<br>DVETO या दस्तऐवजांच्या तपासणीत (ऑगस्ट २०१४) खालील बाबी आढळल्या:<br>अभिकरण कायमस्वरुपी नेटवर्क कनेक्टीविटी ची पूर्ती न करु शकल्यामुळे ०१ एप्रिल, २०११ ला सरु झालेला प्रकल्प अचानकपणे २७ ऑगस्ट २०१२ ला संपला. ०१ एप्रिल २०११ ते २६ ऑगस्ट २०१२ दरम्यान अभिकरणास वर्च्युअल वर्गांच्या स्थापनेसाठी दिलेल्या रुपये ४८ लाखा व्यतिरिक्त रुपये ५८.०९ लाखाचे *४१ आवर्ती मासिक खर्च म्हणून प्रदान करण्यात आले होते. अभिकरणाने अंतिमत: हे काम संपुष्टात आणले आणि डिसेंबर २०१३ मध्ये DVETO ला न कळविता कार्यस्थळ सोडले. लेखापरीक्षेस असे आढळले की १८ मार्च २०१० ला जिल्हाधिका-याद्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या व ०६ ऑक्टोबर २०१० ला कार्यादेश निर्गमित करण्यात आले होते तर १४ | अभिकरण यांचे दरम्यान झालेल्या करारात दंडात्मक कार्यवाही व सेवेच्या हमीबाबत कुठलीही तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयास अभिकरणावर प्रशासकीय कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही. तथापि इवरॉन एज्युकेशन लिमिटेड, चेन्नई व मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा मानव विकास समिती व प्रकल्प संचालक तथा सदस्य सचिव, जिल्हा मानव विकास समिती, गडचिरोली अभिकरणासोबत २०१० रोजी गडचिरोली जिल्हयातील शाळांमध्ये ई-विद्या प्रकल्प राबविण्यासाठी करार झाल्याचे दिसून येत असून त्यामध्ये कार्यसिध्दी व कार्यपूर्तता करण्यास बाध्य होईल असे दंडात्मक कलम करारात अंतर्भूत असल्याचे दिसून येते.<br>जिल्हाधिकारी कार्यालयाने काढलेल्या निविदेच्या अनुषंगाने निवडलेल्या अभिकरणाच्या ई-विद्या प्रकल्पावर सन २०१०-११ मध्ये रु.९१,३९,६६५/- खर्च झाला व त्यापैकी रु.३,३१५/- चलनाद्वारे शासन जमा केले तसेच सन २०११-१२ मध्ये रु.४१,२०,०००/- इतका खर्च झालेला आहे. परंतु ई-विद्या स्टूडीओमधील नेटवर्क कायमस्वरुपी बंद झाल्यामुळे सदर अभिकरणाने प्रशिक्षण देणे बंद केले. याबाबत कंपनीने BSNL वगळून रिलायंन्स कंपनीचे टॉवर उभारले होते. परंतु पर्याप्त कनेटीव्हीटी मिळू न शकल्यामुळे प्रशिक्षण बंद केले. या संदर्भात जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, गडचिरोली यांनी जिल्हाधिकारी गडचिरोली यांना दिनांक ४/१/२०१४ च्या पत्रान्वये कळविले. परंतु संबंधित कंपनीवर कोणतीही कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे उर्वरित रक्कम रु.२४,५०,६४५/- चलनाद्वारे शासन जमा केली आहे. स्टुडीओ कंपनीच्या मालकीचा असल्यामुळे आणि सदर स्टुडीओ व स्टुडीओ मधील साहीत्य विनापरवानगीने इवरॉन एज्युकेशन लिमिटेड, चेन्नई हे घेवून गेलेले आहे. मात्र ई-क्लास रुमची यंत्र सामुग्री व साधन सामुग्री त्या त्या संस्थेतील ई-क्लास रुम मध्ये उपलब्ध असून त्या |

| | | |
|---|---|---|
| | ऑक्टोबर २०१० ला प्रशासकीय मान्यता देण्यात आली. यावरुन असे दिसते की या प्रकल्पाची सुरुवात घाईत करण्यात आली होती. तसेच, प्रकल्पास प्रशासकीय विभागाची *४२ तांत्रिक मंजूरी नव्हती, जे सार्वजनिक वस्तु व सेवा प्रापणासाठी एक अनिवार्य आवश्यकता होती.<br>DVETO ने शासनाच्या हिताचे रक्षण केले नाही, अभिकरणासोबत जानेवारी २०११ मध्ये निष्पादित करण्यात आलेल्या करारात कार्यसिध्दी बाबत हमी दिलेली नव्हती आणि अभिकरणाला करारांतर्गत असलेल्या करारात कार्यसिध्दी बाबत हमी दिलेली नव्हती आणि अभिकरणाला करारांतर्गत असलेल्या कार्यांची पूर्तता करण्यास बाध्य करता येईल असे दंडात्मक कलम करारात अंतर्भूत नव्हते. अशाप्रकारे, जिल्हाधिकारी गडचिरोली आणि जिल्हा व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, गडचिरोली यांनी ई-विद्या प्रकल्पाची अंमलबजावणी कार्यासक्तीने न केल्यामुळे रु.१.०६ कोटीचा खर्च निष्फळ ठरला. ही बाब जून २०१६ मध्ये शासनास कळविण्यात आली, जानेवारी २०१७ पर्यंत त्यांचे उत्तर प्रतीक्षेत होते.<br>(*३९) इवरॉन एज्युकेशन लिमिटेड, चेन्नई.<br>(*४०) VSAT अथवा अति सुक्ष्म अपरचल टर्मिनल (Very Small Aperture Terminal) हे एक सॅटेलाईट कम्युनिकेशन सिस्टम आहे हे घर आणि व्यापारी वापरकर्त्यांना सेवा पुरविते.<br>(*४१) रुपये ३.४५ लाख X१६ महिने आणि २६ दिवस= रुपये ५८.०९ लाख<br>(*४२) संचालक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण मुंबई. | यंत्रसामुग्रीचा वापर प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रशिक्षणाकरिता करण्यात येत आहे. सदर योजना ही पूर्णत: जिल्हा नियोजन विकास समिती, गडचिरोली यांच्या मार्फत राबविण्यात आलेली असून जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, गडचिरोली यांनी केवळ वापरकर्ता अभिकरण म्हणून जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्या निर्देशानुसार कामकाज हाताळले आहे. |

**साक्ष :-**

**परिच्छेद क्रमांक ३.२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जावाढ करणे :**

१.१ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी समितीने कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या सचिवांची तसेच इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विभागास माहिती देण्याबाबत सांगितले असता विभागीय सचिवांनी असे विदित केले की, केंद्र सरकारची आयएमसीची सर्वात मोठी योजना होती. महाराष्ट्रात ४१७ आयटीआय आहेत. २.५४ कोटी रुपये २५० आयटीआयकरिता अनुदान दिले होते. यातील ५० टक्के रक्कम आयटीआयच्या अपग्रेडेशनकरिता वापरावयाचे होते उर्वरित ५० टक्के रक्कम सीड मनी म्हणून बँकेत ठेवायचे होते त्यावर व्याज घ्यायचे होते ३० वर्षाच्या कर्जासारखी ही योजना होती. पहिले १० वर्षे मोराटोरीयम होता उर्वरित २० वर्षात बिनव्याजी ही रक्कम समान हप्त्याने परत करावयाची असून दहावे वर्ष २०१७-२०१८ मध्ये संपत आहे. यामध्ये चांगली एक बाब होती की, निवडलेल्या २५० आयटीआयजवळ एमआयडीसी आहेत. त्या उद्योगांशी संपर्क साधून व्यवस्थापन समितीमध्ये त्यांचा समावेश करुन चेअरमन त्यांचा असावा. आयटीआयचे अभ्यासक्रम तेथील उद्योगाच्या वापराशी मिळतेजुळते असले पाहिजे असा त्याचा उद्देश होता. तेथे प्रशिक्षण घेतलेल्या मुलांची जवळच्या उद्योगांना गरज नाही असे होऊ नये असा उद्देश होता. यातून उद्योगांना कोणते मनुष्यबळ पाहिजे याची आपणास माहिती मिळेल त्या पध्दतीची ही योजना होती. २५० आयटीआयकरिता रक्कमही आली. ५० टक्के रक्कम बँकेत सीड मनी ठेऊन त्याच्या व्याजाचा वापर करावायचा आहे. केंद्र सरकारला १० वर्षानंतर पैसे परत करताना बिनव्याजी २० वर्षाच्या समान हप्त्याने परत करावयाचे आहेत. जनरल स्कीमसारखी ही स्कीम नाही एका आयटीआयला त्यांनी २ कोटी ५४ लाख दिले आहेत त्यापैकी ५० टक्के बँकेत ठेवायचे. उर्वरित ५० टक्के रकमेचा वापर मशीन विकत घेण्यासाठी, अपग्रेडेशन, इमारतीसाठी करायचा होता १० वर्षे परतफेड करण्याची गरज नाही. १० वर्षानंतर २० वर्षे समान हप्त्याने बिनव्याजी ही रक्कम परत करावयाची आहे. सीडमनीवर येणा-या व्याजातून ही रक्कम परत करावयाची असून ही रक्कम शिल्लक राहिली तर त्याचा दुसरा वापर करता येईल परतफेड या वर्षी पासून सुरु होईल. २ कोटी ५४ लाख रुपये खर्च करण्यापूर्वी प्रत्येक आयटीआयकरिता एक औद्योगिक भागीदार निवडायचा आहे. यांच्या सहकार्याने आयटीआय डेव्हलपमेंट प्लॅन तयार करायचा आहे. या प्लॅनप्रमाणे कार्यवाही करण्याची सर्वसाधारणपणे स्कीम होती या योजनेची योग्यरितीने अंमलबजावणी झाली नसल्याची विविध कारणे आहेत. आतापर्यत आवश्यक तेवढा निधी खर्च झाला नाही आयटीआय व्यवस्थापन समिती कार्यक्षम नाही फार प्रकरणामध्ये उद्योगांना बदलावे लागले. निधी देखील खर्च झाला नाही. हे मान्य करण्यास हरकत नाही की, ज्या उद्देशाने ही योजना राबविण्यात आली होती, आतापर्यत तो उद्देश सफल झाल्याचे दिसत नाही. मंत्री महोदयांनी ३ महिन्यांमध्ये ३ बैठका घेतल्या आहेत. त्यांनी सांगितले आहे की या योजनेला कोणत्याही परिस्थितीत या वर्षी चालना द्यावयाची आहे असेही समितीस अवगत केले.

या आय.टी.आय.च्या सद्यःस्थितीबाबत १ ला २५० आयटीआय मध्ये किती निधी गुंतला आहे. असे समितीने विचारले असता, महालेखाकारांनी निवडलेल्या परिच्छेदामध्ये ६६ आयटीआयबाबत सांगितले आहे. २५० पैकी किती आयटीआयमध्ये कामच सुरु झाले नाही. विभागास ६२५ कोटी रुपये मिळाले यापैकी ३१२.५ रुपये आपण सीड मनी म्हणून बँकेत ठेवले आहेत. किती रक्कम खर्च झाली आहे व उर्वरित रक्कम एफडीमध्ये आहे का, तसेच किती टक्के रक्कम विभागाने युटीलायझेशन केली आहे अशी विचारणा समितीने केली असता २५० आयटीआयमध्ये ६२५ कोटी रुपये मिळाले आहेत, त्यापैकी आतापर्यत १७१ कोटी रुपये खर्च केले आहेत. शिल्लक रक्कम व सीडमनीचे डिपॉझीटवर व्याज यातून अल्पकालीन अभ्यासक्रम चालविणे अशा योजना राबविल्या त्यातून ८५० कोटी रुपये जमा असल्याचे संचालक, व्यावसायिक प्रशिक्षण यांनी समितीस सांगितले.

कौशल्य विकासाकरिता केंद्र व राज्य शासनाची काही धोरणे आहेत. सध्या सर्वात जास्त रोजगार आयटीआयच्या विद्यार्थ्यांना मिळतो, बी.ई.ला सुध्दा तेवढा मिळत नाही. अशा परिस्थितीत राज्याचा रोजगार वाढविण्याचे काम विभाग करु शकला नाही. एवढी मोठी रक्कम शिल्लक राहिल्याबाबत पहिल्यांदा जबाबदारी निश्चित केली पाहिजे. आज अशी परिस्थिती आहे की, आयटीआयमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नाही, नवीन अभ्यासक्रमही सुरु केले जात नाही. इमारती नाही, नवीन इस्ट्रुमेंट नाहीत. विभागाने हे सर्व मान्य केले आहे परंतु त्यास जबाबदार कोण आहे, ज्यांची जबाबदारी होती या विभागाकडे एवढा मोठा निधी उपलब्ध असताना निष्काळजीपणा केला आहे. यामुळे राज्याचे नुकसान झाले आहे, यास कोण जबाबदार आहे हे समितीसमोर आले पाहिजे असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता जबाबदार असण्याबाबत दुमत नसून आयएमसीमध्ये इंडस्ट्रीचे लोक आल्यानंतर चालना मिळेल अशी अपेक्षा होती परंतु ब-याच प्रकरणामध्ये इंडस्ट्री बदलावी लागली. काही प्रकरणामध्ये त्या तोलामोलाची इंडस्ट्री मिळाली नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

आज एनएसडीसी म्हणजे नॅशनल स्कील डेव्हलपमेंटमध्ये सुध्दा तीच परिस्थिती आहे. इतर राज्यांनी केंद्र सरकारचा जेवढा निधी घेतला, प्रकल्प घेतले, एनएसडीसीमध्ये रजिस्ट्रेशन केले परंतु आपले राज्य ते करु शकले नाही. आजसुध्दा ही स्थिती असल्याचे समितीने विदित केले असता त्याच धर्तीवर आपल्याकडे स्वर्गीय प्रमोद महाजन यांचे नावाने योजना होती त्यावरही निधी खर्च केला जात होता परंतु यावर्षी २७ कोटी रुपये केंद्र सरकारकडून मंजूर करुन घेतले असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच २५० कोटी रुपये यावर्षी केंद्र सरकारने प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेमध्ये मंजूर केलेले असून २०९ कोटी विशेषतः कृषी करिता मंजूर केले आहेत. कृषीचा विशेष प्रकल्प असून तो यापूर्वी देशामध्ये दुस-या कोणत्याही राज्याला मंजूर केला नव्हता. कारण २ लाख ८० हजारचा मास्क किलींग कृषी विभागाच्या या योजनेमध्ये मंजूर करुन दिला आहे. तेथे महाराष्ट्राचे जे अधिकारी आहेत, त्यांच्यामुळे महाराष्ट्राचा असा फायदा होत आहे. त्यामुळे या वर्षी आपणास भरपूर निधी केंद्र सरकारकडून मिळाला असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

यावर्षी निधी मिळाला ही आनंदाची बाब आहे, परंतु तीन वर्षे विभागाने प्रस्ताव पाठविला नसून काहीच केले नाही असे दिसत आहे असे मत समितीने व्यक्त केले असता मा. मंत्री महोदयांनी ३ महिन्यांपासून बैठका घेतल्या आहेत त्यानंतर सर्व आयटीआयचा अपग्रेडेशनचा एक प्लॅन तयार केलेला आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

बारा ठिकाणी काम देखील सुरु झालेले नाही यामुळे तेथील अधिका-यांना किमान बदलण्यात यावे. तसेच जिल्हानिहाय सेंटर ऑफ एक्सलन्सची यादी देण्यात यावी असे समितीने सूचित केले असता आयटीआय निहाय यादी देण्याचे विभागीय सचिवांनी आश्वासित केले.

सध्या आयटीआयमध्ये जी रक्कम शिल्लक म्हणून पडलेली आहे. ती उचलण्याकरिता व तेथे काही साहित्य पुरवठा करण्याकरिता कंत्राटदार तयार झालेले आहेत. इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट, दर्जा उंचावण्याकरिता ते काय करणार आहेत. टेक्नीकल इन्फ्रास्ट्रक्चरकरिता काय करता येईल अशी विचारणा समितीने केली. तसेच आजही शासकीय आयटीआयमध्ये लेथ मशीन आहेत ४० वर्षे आपण मागे आहोत. ड्रील मशीन, ग्राईंडर, बफर तेच आहेत. हे कोण बघणार आहे ? एस.के.एफ. कंपनीचे नवीन कंत्राटदार आता ठरले आहेत. ते १००-२०० ड्रील मशीन मागविणार, १००-२०० इलेक्ट्रीक वेल्डींग मशीन मागविणार अशी स्थिती आहे याबाबत विभागाने तांत्रिक सल्ला घ्यावा. सध्या ज्या इन्स्ट्रुमेंटची उपयोगीता आजच्या घडीला किंवा भविष्यात इंडस्ट्रीमध्ये आहे त्या स्तरावरील कौशल्य तयार करण्याकरिताचे इंस्ट्रुमेंट तेथे पाहिजेत. मुलांच्या मनामध्ये याबाबतच्या काय कल्पना आहेत हे देखील पहावे. आयटीआयच्या आधुनिकीकरणाकरिता विशेष उपाययोजना करण्यात याव्यात असे मत समितीने व्यक्त केले असता यावर काम सुरु असून प्रत्येक आयटीआयमध्ये सध्या नवीन सिव्हील कन्स्ट्रक्शन न करता हे करावयाचे आहे. एक प्रकरण आहे की, सिव्हील कन्स्ट्रक्शन केल्यानंतर ते उपयोगात आले नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

चांदूर रेल्वे येथील सिव्हील कन्स्ट्रक्शन काही उपयोगात आलेले नसून तेथील हॉस्टेल मध्ये सुरुवातीस वॉर्डन व प्राचार्य नव्हते म्हणून ते तसेच राहिले व तथापि आता मुले आली असल्याचे समितीने अवगत केले असता आता तेथे नवीन बांधकाम न करता दोन शीफ्टमध्ये किती अभ्यासक्रम सुरु करता येतील त्याचे नियोजन केले जाईल. तेथे आज कोणते अभ्यासक्रम चालू आहेत, ते विसरुन जाऊ आता कोणते अभ्यासक्रम केले पाहिजेत प्रत्येक अभ्यासक्रमाकरिता किती ट्रेनर लागतील, त्यापैकी सर्वसाधारपणे ५० टक्के ट्रेनर कायम स्वरुपी तत्वावर घेणार असून ५० टक्के तासिका तत्वावर घेणार आहोत. कारण काळानुरुप ट्रेड बदलणार आहेत. कायमस्वरुपी ट्रेनर केवळ त्याच्याच ट्रेडचे शिक्षण देऊ शकेल. गरज नसेल तेव्हाही या कायमस्वरुपी ट्रेनरला सांभाळावे लागणार आहे. मनुष्यबळ असल्यामुळे त्यांची गरज नसतानाही तशाच प्रकारचे ट्रेड आपण सुरु ठेवतो त्यामुळे ५०-५० टक्के असा निर्णय विभागाने घेतला असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच नवीन ट्रेडही सुरु केले जाणार असून सध्या आपल्याकडे १ लाख ३२ हजार विद्यार्थ्यांची क्षमता आहे. १ लाख ९५ हजारपर्यंत मुलांची क्षमता वाढू शकते. ५० टक्के अधिक संख्या व क्षमता वाढविण्याचे विभागाचे उद्दीष्ट आहे. आयटीआयनिहाय प्रस्ताव तयार केला असून मा. मंत्री महोदयांच्या मंजूरीनंतर त्याबाबत टेंडर काढले जाईल, कारण त्यामध्ये थोडीशी दुरुस्ती करावयाची आहे असेही समितीस अवगत केले.

आता सीएलसी मशीन भारतात येऊन ३० वर्षे झाली आहेत. परंतु आपल्या कोणत्याही आयटीआयमध्ये सीएलसी मशीन नाहीत. अल्ट्रा मॉर्डन सीएलसी १०० टक्के संगणकीकृत मशीन आलेल्या आहेत. प्रोग्राम सीडीप्रमाणे सीएलसी मशीन काम करते परंतु एकही सीएलसी मशीन आयटीआयमध्ये नाही. आयटीआय मधील मॅकेनिकलची मुल कंपन्यांमध्ये घेऊन जातात व त्यांना अकुशल कामगार म्हणून वापरतात अशी परिस्थिती आहे. या मुलांना केवळ प्राथमिक बाबी माहिती असतात, केवळ स्वतःच्या

सुरक्षेबाबत त्यांना माहिती असते. अधिका-यांनी सांगावे की, कोणत्या प्रकारचे तज्ञ व मशीनरी आपण आयटीआयमध्ये आणणार आहात किंवा कशा प्रकारे त्या डिझाईन करणार आहात अशी विचारणा समितीने केली असता विभाग गत दोन महिन्यांपासून एक्सरसाईज करीत असून त्याला अजून एक महिना लागेल आता प्रत्येक आयटीआयमध्ये आम्ही कोणते नवीन ट्रेड सुरु करीत आहे, १ लाख ९५ हजार पर्यंत ही संख्या कशी नेता येईल याचा समितीस प्रकल्प अहवाल देऊ शकतो. त्यानंतर दोन महिन्यांनी टेंडर काढणार आहोत. प्रत्येक नवीन मशीनरी नवीन ट्रेड प्रमाणे असणार आहे. याकरिता १-२ महिन्याचा वेळ लागणार आहे. निधीचा विनियोगही दोन महिन्यात करणार आहोत. प्रत्येक आयटीआयनिहाय गरजेनुसार कोणते नवीन ट्रेड केले पाहिजे, त्यास कोणते मशीन लागेल, कुशल प्रशिक्षकही पहावे लागतील. तासिका तत्वावर ते उपलब्ध होतील का हे देखील पहावे लागेल. तासिका तत्वावर ७५ रुपये प्रत्येक तासिकेस देत असतो, त्यामुळे तेथे कोणी येत नाही ती रक्कम वाढविण्याचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्यात आला होता, विभागाने २५० रुपये प्रती तासिका लिहिले होते, त्यांनी १२५ मंजूर केले आहे. याप्रमाणे पूर्ण प्लॅन दोन महिन्याच्या आत देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

आयटीआयमध्ये पदे रिक्त आहेत १० वर्षात सेंट्रल मॉनीटरींग कमिटीसुध्दा स्थापन केलेली नाही ही सर्व व्यवस्था कशी उभी करणार आहात अशी विचारणा समितीने केली असता दोन महिन्यात आयटीआयचा संपूर्ण मॉर्डनायझेशनाचा प्लॅन समितीस सादर करु शकतो. तसेच खर्च कसा करण्यात येईल हे देखील समितीला सांगू शकतो असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. आयटीआयमध्ये साधारणतः ३.०० लाख उमेदवार अर्ज सादर करतात. त्यापैकी १.३३ लाख जणांना प्रवेश देण्यात येत असून ९० टक्क्यांच्यावर रोजगाराचा दर आहे असेही समितीस अवगत केले.

Employment is not of skilled persons. The employment is only of safety skilled persons. आयटीआयमधून स्कील्ड उमेदवार निघाले पाहिजेत त्यासाठी अत्याधुनिक मशिनरी असणे आवश्यक आहे. या सर्व बाबी कुठेच दिसत नसल्याचे समितीने नमूद केले. तसेच राज्यातील अन्य आयटीआय पेक्षा मुंबईतील आयटीआय चांगली असेल याबद्दल वाद नाही. आटोमोबाईल्सचे वेगवेगळे कोर्स आहेत विंटेज कार ही फार जुनी आहे अशा जुन्या वाहनांवर आजही उमेदवारांना शिकविण्यात येत आहे. आज जग आधुनिकतेच्याबाबतीत प्रगत झाले आहे. आज शहरामध्ये दीड लाख आरपीएमच्या गाड्या फिरत आहेत.तत असे असताना आज आपण त्या उमेदवारांना कोणत्या मशिनरीवर शिकवत आहे हे देखील पाहिले पाहिजे आयटीआय अजूनही डायनामोवर शिकवत असल्याचे समितीने निदर्शनास आणले असता दोन महिन्यामध्ये समितीला आधुनिकीकरणाचा अहवाल सादर करण्यात येईल. आयटीआय पूर्णपणे ऱ्हिदम करणे गरजेचे असल्याचे मत विभागीय सचिवांनी व्यक्त केले.

आयटीआयमध्ये सर्व व्यवस्था ही कालबाह्य झालेली आहे. तेथे मशिनरी नवीन आल्यानंतर प्रशिक्षक देखील चांगले पाहिजेत. विभाग प्रति तासिका रूपये १२५/- वर प्रशिक्षक घेणार आहे अशाने काही साध्य होईल असे वाटत नसल्याचे समितीने नमूद केले असता, विभागाने रूपये २५०/- इतके मानधन देण्याचे प्रस्तावित केले होते पण वित्त विभागाने रूपये १२५/- इतकेच मानधन मंजूर केले असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

प्रशिक्षकांना सात तासापेक्षा जास्त पैसे आठवड्याला विभागाकडून देणार नाहीत. त्याने आठवड्याला दोन तास घेतले तर त्यास जास्तीत जास्त रूपये २५०/- मिळतील. यावर देखील शासनाने मर्यादा घालून दिली असणार असे समितीने मत व्यक्त केले तसेच आयटीआयच्या निदेशकाला सुरूवातीला किती वेतन आहे याबाबत विचारणा केली असता, रूपये ३५ ते ३६ हजार इतके वेतन मिळते असे संचालक, व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण यांनी विदित केले.

प्रति तासिकेसाठी रूपये १२५/- मानधन देणार आहात त्याने आठवड्यात अमूक इतके तास घ्यावे त्याच्यावर तास घेऊ नयेत अशा प्रकारचे देखील बंधन घातले असणार तसेच तासिकेची रक्कम वित्त विभागाकडून मंजूर होऊन आली आहे. एका आठवड्यात एका विषयाच्या ७ तासांपेक्षा जास्त तासिका घ्यायच्या नाहीत असा नियम आहेत. नियम वित्त विभाग किंवा तंत्र शिक्षण विभागाने आटीआयसाठी देखील नमूद केला असेल अशी विचारणा समितीने केली तसेच महिन्याला ते प्रशिक्षक ३० तासिकांपेक्षा जास्त तासिका घेऊ शकत नाही मग त्याला पैसे किती मिळतील याबाबत समितीने विचारले असता, ३० तासिका काम केले तर त्यास रूपये ३७५०/-इतके मानधन मिळेल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागाने १ लाख ९५ हजार एवढी संख्या वाढविण्याचा प्लॅन त्यांना करून दिला. यात ५० टक्के कायम व ५० टक्के तासिकेवर ट्रेनर घेण्याचा रेशिओ त्यांना करून दिला. आज प्रत्येक विद्यार्थ्यामागे रूपये ४५ ते ५० हजार इतका खर्च आहे. पण

प्रायव्हेटसाठी रूपये ३००००/- या प्रमाणे फी मंजूर करण्यात येते. विभागाला कोणत्याही परिस्थितीत हा खर्च कमी करावयाचा आहे. मुलांची संख्या २ लाखा पर्यंत केली तर विभाग देखील रूपये ३००००/- पर्यंत फी घेऊ शकते. त्यास वित्त विभाग अनुकूल होईल. विभागाकडे आता पूर्ण आधुनिकीकरणाचा प्लॅन तयार नसून समिती समोर दोन महिन्यामध्ये हा प्लॅन सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

ज्या जुन्या जबाबदा-या आहेत त्या निश्चित केल्या पाहिजेत लोकलेखा समिती ही भविष्यासाठी नाही. महालेखाकार यांनी ऑडिट पॅरा काढले आहेत. आयटीआयमुळे मुले सेल्फ सफिशियंट होऊ शकतात असे असताना विभागाकडे काहीही मॉडेल नाही. कौशल्य विकास हा दुर्लक्षित आहे असे समितीला वाटत असल्याचे अवगत केले असता अशी परिस्थिती नसून ४-५ मोठ्या गोष्टी झाल्या आहेत आपण रूपये २५७.०० कोटी, रूपये २९०.०० कोटी मंजूर करून घेतले आहेत. नवीन प्रायव्हेट आयटीआय उघडण्याची प्रोसेस पूर्णपणे नवीन करून घेतली आहे. त्यास माननीय मंत्री महोदयांची मंजुरी देखील मिळाली आहे. त्यांसंबंधातील शासननिर्णय देखील निघाला आहे. नवीन व्हीटीआय करण्याची पद्धती चेंज करून घेतली. व्हीटीपी सिस्टीम बंद करून नवीन व्हीटीआय सिस्टीम आणली त्याचा शासननिर्णय दिनांक २७ डिसेंबर, २०१७ रोजी निघाला आहे. आता विधानसभेपुढे स्कील्ड युनिव्हर्सिटीसंबंधातील ड्राफ्ट आणत असून स्कील्डला महत्त्व दिले जात आहे. परंतु, आयटीआयला पूर्ण रिव्हॅम्प करण्याची गरज आहे. त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही.आयटीआयच्या परीक्षेसाठी जे मटेरियल लागते ते घेण्यासाठी देखील अडचण येते. आयटीआय परीक्षेमध्ये कॉपीचे प्रकार होत असल्याचे निदर्शनास आले आहे. मागच्या सहा महिन्यापूर्वी १५०० उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा घेतली ती यशस्वी झाली. आता जिल्हा मुख्यालयीदेखील ऑनलाईन परीक्षा घेणार असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

ऑनलाईन परीक्षा घेण्यात येईल हे मुलांना वेळेवर सांगण्यात आले आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता केंद्र शासनाने विभागाला चार दिवसांपूर्वीच परवानगी दिली. यावेळी जिल्हा मुख्यालयी ऑनलाईन परीक्षा घेणार असून जवळपास ४० हजार मुले ही परीक्षा देतील असे विभागीय सचिवांनी विदित केले.

**परिच्छेद क्र. ३.२.१**

**३.२.१.१. ITI's ची निवड :**

१३ आयटीआय भाडेतत्त्वावरील इमारतीमधून चालविण्यात येत होत्या. ३ आदिवासी संस्थांच्या ऐवजी निवडण्यात यावयाच्या संस्थांबाबत राज्य सुकाणू समितीची बैठक आयोजित करून लवकरच निर्णय घेण्यात येईल असे विभागाने नमूद केले आहे त्यासंबंधातील माहिती समितीला देण्यात यावी असे समितीने सूचित केले असता जेथे स्वतःची इमारती आहे तेथे आयटीआय करावे असा नियम होता. पण १३ आयटीआयच्या इमारती भाड्यावर घेण्यात आल्या होत्या. त्या इमारतींचे बांधकाम सुरू होते त्याचे बांधकाम प्रगतीपथावर होते. त्यामुळे ती भाड्याने घेतलेल्या इमारतीमधून चालविण्यात येत होती. २५० पैकी १७ आयटीआयची दर्जावाढीसाठी निवड करावयाची होती. आम्ही सर्वात चांगले प्रस्ताव करण्याचा प्रयत्न केला व १३ आयटीआयची निवड केली. स्वतःची इमारत असणे हा लेखा आक्षेप होता स्वतःची इमारत नसेल तर निवड करू नये असा नियम असताना देखील १३ संस्थांची निवड केली आहे ही वस्तुस्थिती आहे कारण इमारतींचे बांधकाम सुरू होते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

ज्यांच्याकडे इमारती आहेत अशांचे प्रस्ताव आपल्याकडे नव्हते काय, तसेच निकषामध्ये बसणारे प्रस्ताव आपणास प्राप्त झाले नव्हते का, विभागाकडे एकूण किती प्रस्ताव आले होते, त्यापैकी किती मंजूर करण्यात आले व किती प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली नाही अशी विचारणा समितीने केली असता राज्यात जागतिक बँक प्रकल्प सुरू झाला होता. जिल्हा स्तरावरील, शहर स्तरावरील जास्तीत जास्त संस्था आपण जागतिक बँक प्रकल्पामध्ये कव्हर केल्या होत्या. विभागाकडे ज्या उर्वरित संस्था होत्या त्यासंबंधातीलच पर्याय विभागाकडे उरला होता. त्यामुळे या संस्थांची निवड करावी लागली असे संचालक,व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण यांनी समितीस अवगत केले.

जागतिक बँक प्रकल्प सोडून आपल्याकडे एकूण किती संस्था होत्या अशी विचारणा समितीने केली असता जागतिक बँक प्रकल्पामध्ये एकूण ८७ संस्था होत्या त्यावेळी ४१० संस्था असतील. त्यापैकी ८७ संस्था जागतिक बँक प्रकल्पामध्ये होत्या. ३१०-३२० संस्थांपैकी विभागाला २५० संस्थांची दर्जावाढ करावयाची होती त्यापैकी १३ संस्थाची निवड नियम शिथिल करून करण्यात आली असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

अन्य संस्था उपलब्ध असताना आपण नियमांचे उल्लंघन कशासाठी केले आहे ? आपल्याकडे संस्था उपलब्ध नसतील आणि २५० चे उद्दिष्ट साध्य करावयाचे असेल तर त्यास काहीही हरकत नाही. जे निकषात बसत होते त्यांना सोडून जे निकषात बसत नाही त्यांना निवडण्याचे कारण काय आहे अशी पृच्छा समितीने केली असता ही सन २००७-२००८ मध्ये झालेली ही गोष्ट आहे. यासंबंधातील सुकाणू समितीचे मिनिटस काढावे लागतील आणि कोणत्या कारणामुळे मंजूर केले हे पहावे लागेल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

यासंबंधातील माहिती समितीला कळविण्यात यावी. त्यावेळची पूर्ण प्रक्रिया, अर्ज कसे आले, सुकाणू समितीने कसे निवडले, जे पात्र ठरले आहेत त्यांच्यासाठी निकष काय होते, जे निकषात बसत होते अशा संस्था किती आहेत त्यांच्या यादीसह समितीला तपशीलवार माहिती द्यावी. तसेच ज्या संस्थांवर विभागाने विशेष मेहरबानी केली आहे त्याचे संस्थाचालक कोण होते याची माहिती नावासह कळविण्यात यावी असे समितीने अवगत केले असता या सर्व संस्था शासकीय आहेत. ३२० शासकीय संस्थांपैकी सर्वसाधारणपणे २५० शासकीय संस्थांची निवड करावयाची होती असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३ आदिवासी आयटीआयबद्दल राज्य सुकाणू समितीमध्ये निर्णय घेणार होतात तो केव्हा घेणार आहात अशी पृच्छा समितीने केली असता एक नियम असा होता की, दिनांक १ जानेवारी, २००७ पूर्वीची संस्था असणे आवश्यक होते. ३ संस्था या आदिवासी बहुल भागामध्ये होत्या पण त्या दिनांक १ जानेवारी, २००७ नंतरच्या होत्या. या कालावधीनंतरच्या संस्था का घेण्यात आल्या असा प्रश्न निर्माण झाला होता. आदिवासी बहुल भागातील तरूणांना तातडीने रोजगार निर्माण व्हावा म्हणून सुकाणू समितीने निर्णय घेतला होता. हा निर्णय शासनाच्या नियमाविरूद्ध होता हे विभागाला मान्य असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

तीन आदिवासी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची (नवापाडा, सुकापूर, बिजेपार) निवड करण्यात आली होती. सदर ३ संस्थांच्या ऐवजी निवडण्यात यावयाच्या संस्थांबाबत राज्य सुकाणू समितीची बैठक आयोजित करून लवकरच निर्णय घेण्यात येईल असा उल्लेख लेखी उत्तरामध्ये केलेला आहे यासंबंधी विभागाची भूमिका काय आहे अशी विचारणा समितीने केली असता यात तीन सहयोग उद्योजक आहेत त्यांची निवड झालेली आहे. श्री.राहुल शिंदे, कोरेगाव औ.प्र.संस्था, श्री.प्रफुल पी.वैद, सोलापूर (मु), श्री.एम.पी.देशपांडे, मेढा या उद्योजकांची निवड झालेली आहे. या उद्योजकांच्या आस्थापनेची निवड आयटीआयसाठी करण्यात आली होती. आतापर्यंत या उद्योजकांशी एमओयु झाला नव्हता यासंबंधातील करार आता अंतिम टप्प्यामध्ये असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

सन २०१२ पासून २०१४ पर्यंत उद्योजक निवडीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली परंतु, हेतु साध्य झाला नाही यात त्यांचा काहीही रोल नाही. अधिकारी अतिशय हुशार आहेत त्यांनी केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे सर्व काही केले त्यासंबंधात ऑडिटरचे देखील रिमार्कस् आहेत एमओयु झाले आहेत पण कार्यान्वित झाले नाही. विद्यार्थी प्रतिनिधी, निर्देशक सदस्य, इत्यादी सर्व तयार करून पाच वर्षे झाली आहेत. हे सर्व कार्यान्वित कधी होणार आहे त्याची मर्यादा किती वर्षाची होती? याबाबत समितीने विचारले असता आयएमसी स्थापन करताना हे सर्व प्रतिनिधी होते. इंडस्ट्री पार्टनर, विद्यार्थी प्रतिनिधी यांची आयएमसी स्थापन केली आहे. २५० आयटीआयमध्ये हे कार्यान्वित झाले आहे.ज्या आयटीआयमध्ये राजीनामा दिलेला आहे त्यासंबंधात समितीस अवगत करीत असून दर तीन महिन्यांनी बैठक होते. नियमित लेखापरीक्षण होत आहे. एमओयु साईन झाल्यानंतर कार्यान्वित होईल राज्य सुकाणू समितीने तीन महिन्यांमध्ये कमीतकमी २ बैठका घ्यायला पाहिजेत या समितीचे अध्यक्ष माननीय प्रधान सचिव हे असतात अशी माहिती संचालक,व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण यांनी दिली.तसेच आयएमसीला तीन महिन्यांमध्ये बैठक घ्यावीच लागत असल्याचेही समितीस अवगत केले.

२५० आयटीआयपैकी किती ठिकाणी चेअरपर्सन नाहीत? अशी विचारणा समितीने केली असता २५० आयटीआय पैकी २१२ मध्ये चेअरमनचा ॲक्टीव्ह सहभाग आहे.उर्वरित आयटीआयमध्ये चेअरमनने राजीनामा दिलेला असल्याचे संचालक, व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण यांनी अवगत केले.

२५० आयटीआयपैकी ३८ ठिकाणी चेअरमन किती वर्षापासून नाही या समितीच्या प्रश्नाला सन २०११-२०१२ नंतर हा प्रॉब्लेम आला होता काही ठिकाणी इंडस्ट्रीचा प्रोब्लेम होता चेअरमनने राजीनामा दिला होता. नवीन उद्योजकांचा प्रस्ताव मागवून नियुक्ती केलेली आहे. नवीन उद्योजकांबरोबर विभागाचा एमओयु झालेला असून ३८ संबंधात इंडस्ट्री पार्टनरची निवड केलेली आहे त्यासंबंधात एमओयु झालेला आहे अशी माहिती संचालक,व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण यांनी दिली.

आता सर्वच ३८८ ठिकाणी जॉईंट डायरेक्टरच चेअरमन आहेत काय अशी विचारणा समितीने केली असता नाही, ३८ मध्ये इंडस्ट्री पार्टनर्स आहेत ते चेअरमन आहेत. ज्यांनी ज्यांनी राजीनामा दिला त्यांचा राजीनामा स्वीकृत करून नवीन इंडस्ट्री पार्टनरची राज्य सुकाणू समितीची मान्यता घेऊन निवड केली आहे असा खुलासा संचालक,व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण यांनी केला. तसेच ते ३८ चेअरमन ॲक्टीव्ह नाहीत असे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभागाने पार्टनर नेमले आहेत त्यांची काम करण्याची पद्धत ही प्रायव्हेट असते तर शासनाची काम करण्याची पद्धत ही सरकारी असते त्यामुळे कुठेही कॉम्बीनेशन होऊ शकत नाही असे समितीने अवगत केले असता, एक-दोन उद्योजकांनी सांगितले की, विभागाकडून त्यांना पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नाही असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

एकदा, दोनदा, तीनदा ते विभागीय अधिका-यांशी संपर्क करतात आणि प्रतिसाद मिळाला नाही तर नाद सोडून देतात. तसेच ३८ आयटीआयना गतिमान करावयाचे असेल तर काय करावे लागेल अशी विचारणा समितीने केली असता, इंडस्ट्री पार्टनर समवेत बैठक घेण्याच्या सूचना जॉईंट डायरेक्टना देण्यात आलेल्या आहेत. त्यांचे काही इश्यू असतील ते मार्गी लावण्यात येतील. त्यांनी नवीन सहयोगी उद्योजक घेण्याचे निश्चित केले तर त्याची निवड करून त्यांच्या गरजेप्रमाणे कार्यक्रम आखून त्यांना कार्यान्वित करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे संचालक,व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण यांनी समितीस सांगितले.

नवीन अध्यक्ष निवडण्याचा अधिकार राज्य सुकाणू समितीला आहे काय अशी विचारणा समितीने केली असता नविन अध्यक्ष निवडण्याचा अधिकार राज्य सुकाणू समितीला असून विभाग त्यांचा होकार घेतो ते काम करण्यास तयार आहेत अशा प्रकारची सहमती असणे आवश्यक असल्याचे मत विभागीय सचिवांनी व्यक्त केले.

केंद्र शासनाच्या नॅशनल स्कील्ड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनने काही संस्थांना मान्यता दिलेली आहे. त्यापैकी राज्यातील किती संस्थांना मान्यता देण्यात आलेली आहे अशी पृच्छा समितीने केली असता सदर बाब ही कौशल्य विकास विभागाशी संबंधीत असून एम.एस.एस.डी.सी. यांच्याकडे सदर विषय आहे. महाराष्ट्रामध्ये २३०० ते २४०० व्ही.टी.पी. मंजूर होते. तसेच ९३०० ते ९५०० अर्ज प्रलंबित होते. मागील एक वर्षापासून राज्यामध्ये व्ही.टी.पी. ची निवड करणे बंद केलेले होते. दिनांक २७ डिसेंबर,२०१७ रोजी नवीन शासन निर्णय निर्गमित करुन त्यामध्ये बदल करण्यात आलेले आहेत. व्ही.टी.पी. करण्यासाठी लोक अर्ज भरत असतात. एन.एस.डी.सी.मधील काही कोर्सेस व्ही.टी.पी. साठी देण्यात येत होते. त्यानंतर एन.एस.डी.सी. ने विद्यार्थ्यांची निवड केल्यानंतर टी.बी.एम. मंजूर करण्यासाठी एन.एस.डी.सी. कडून मागणी होत असते. त्यानंतर शासनाने त्यांना टी.बी.एम. मंजूर केल्यानंतर सदरहू संस्था एखादा कोर्स चालवत असत. त्यानंतर तो कोर्स संपल्यानंतर ॲसेसमेंटसाठी मागणी करण्यात येत असे. यामध्ये केंद्र शासनाच्या ॲसेसमेंटच्या ४० टीम यासाठी कार्यान्वीत आहेत. त्यापैकी एका टिमला पाठविण्यात येत असे त्यामध्ये जर विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर व्ही.टी.पी. ला पेमेंट मंजूर करण्यात येत असे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

**परिच्छेद क्रमांक ३.२.१.४ मंजुरीनंतर संस्था विकास आराखड्यात बदल करणे :**

विभागामार्फत अभिप्रायामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, ४५ आय.डी.पी. बदलण्यात आलेल्या आहेत काही ठिकाणी काम सुरु झालेले नाही. तरी याबाबत सद्यःस्थिती समितीला सांगण्यात यावी असे समितीने विदित केले असता या प्रकरणामध्ये ट्रेड बदलण्यात आल्यामुळे दोन बाबी बदलण्यात आलेल्या आहेत. जो पर्यंत अंतिम आय.डी.पी. मंजूर झालेला नाही तो पर्यंत विभागाने मूळ आय.डी.पी. प्रमाणे अंमलबजावणी केलेली आहे. तसेच, राज्य सुकाणु समितीची मान्यता मिळेपर्यंत कोणताही खर्च विभागामार्फत करण्यात आलेला नसल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

या प्रकरणी बदल केल्यानंतर देखील केलेल्या बदलाची अंमलबजावणी विभागामार्फत करण्यात आलेली नसल्याचे समितीने निदर्शनास आणले असता आय.डी.पी. बदलल्यानंतर किती खर्च करण्यात आला याची माहिती सध्या उपलब्ध नसल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.तसेच यामध्ये जो बदल करण्यात आलेला आहे, त्यावेळेस शिवई ही योजना सुरु होती. त्या योजनेमध्ये काही विषयाचे अभ्यासक्रम प्रस्तावित करण्यात आलेले होते. परंतु या योजनेची फलश्रुती झाली नाही. म्हणून शासनाने अशा सूचना दिल्या होत्या की, प्रत्येक आय.टी.आय. चे एक इंटिग्रेटेड डेव्हलपमेंट प्लॅन (आय.डी.पी.) मधून लक्ष द्यावे असे संचालक,व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण यांनी अवगत केले. तसेच नवीन आय.डी.पी. झाल्यानंतर किती खर्च करण्यात आला, याची माहिती सध्या उपलब्ध झालेली नसल्याचे समितीस सांगितले.

आय.टी.आय. निहाय याबाबतची माहिती देण्यात यावी असे समितीने विभागास अवगत केले.

**परिच्छेद क्रमांक ३.२.२ वित्तीय व्यवस्थापन :**

**३.२.२.१ "निधीचा कमी वापर"**

विभागाच्या अभिप्रायामध्ये २५० आय.टी.आय.मध्ये १७१ कोटी रुपये खर्च करण्यात आल्याचे नमूद केले आहे परंतु सदरहू २५० आय.टी.आय.मध्ये २८७ कोटी रुपये खर्च करण्याची विभागाला मुभा आहे. परंतु विभागाने केवळ १७१ कोटी रुपये खर्च केलेले आहेत. त्यामुळे उर्वरित निधी खर्च करण्याचे विभागाने नियोजन केलेले आहे काय अशी विचारणा समितीने केली असता उर्वरित खर्च न केलेला निधी या वर्षी खर्च करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

We need a clarification that the Government of India had released Rs.625 crores. या योजनेमधून ५० टक्के निधी अपग्रेडेशन फंडमध्ये जमा करावयाचे असून उर्वरित निधी खर्च करण्यासाठी आहे. त्यामुळे सदरहू फंडमध्ये ठेवलेल्या निधीमध्ये आणि खर्च करण्यात आलेल्या निधीची स्पष्टता दिसून येत नाही असे मत प्रधान महालेखाकारांनी व्यक्त केले असता ५० टक्के निधी सदरहू फंडमध्ये जमा करण्यात आलेला आहे. उर्वरित निधीपैकी १७१ कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.तसेच ३१२ कोटी पैकी, १७१ कोटी रुपये खर्च करण्यात आलेले असून आता जवळपास १५० कोटी रुपये खर्च करण्याचे प्रलंबित आहे सदर निधी एक वर्षाच्या आत खर्च करण्यात येईल असे समितीस सांगितले.

प्रत्येक आय.टी.आय.साठी सव्वा कोटी रुपये याप्रमाणे ३१२ कोटी रुपये प्रत्येक आय.टी.आय. स्तरावर ठेवण्यात आलेले आहेत की राज्य स्तरावर खर्च करण्याचे ठेवलेले आहेत या समितीच्या प्रश्नाला संचालक,शिक्षण प्रशिक्षण यांनी असे अवगत केले की, हा सर्व निधी आय.टी.आय.स्तरावर आय.एम.सी.च्या खात्यावर ठेवण्यात आलेला आहे.

आय.एम.सी. चा अध्यक्ष आणि आय.टी.आय. चे प्राचार्य यामध्ये सचिव असतात. यामध्ये अध्यक्ष आणि सचिवांमध्ये समन्वय नसल्यामुळे योग्य प्रकारे काम होत नाही, असे समितीला वाटते. त्यामुळे याचा सचिव स्तरावरुन आढावा घेतला पाहिजे केंद्र शासनाकडून यासाठी भरपूर निधी मिळत असून देखील दुर्दैवाने तो निधी खर्च होत नाही. यामध्ये फ्लेक्झीबिलीटी आहे. You can have construction, you can have new trades. यामध्ये मागणी असताना देखील खर्च न करण्याची कारणे काय आहेत अशी विचारणा समितीने केली असता सन २००७-०८ से लेकर अब तब यह क्यों नहीं हुआ इसका कोई डिफेन्डेबल रिजन देना पॉसिबल नहीं है १० साल का कारण तो दे नहीं सकते असे विभागीय सचिवांनी विदित केले.

तर यासंदर्भात जबाबदारी निश्चित करावी असे समितीने मत व्यक्त केले असता यामध्ये उद्योगांना देखील सामावून घेण्यात आले आहे. यामध्ये सात ते आठ कोटी रुपयांचा टर्न ओव्हर असणा-या उद्योगांना देखील यामध्ये सामावून घेण्यात आलेले आहे. आय.एम.सी. सुरु करता आलेली नाही. तसेच, आय.एम.सी.च्या आय.डी.पी.ची अंमलबजावणी करता आलेली नसल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

यामध्ये असलेल्या कन्सेप्टमध्ये अडचण आहे काय अशी पृच्छा समितीने केली असता यामधील कन्सेप्टमध्ये कोणतीही अडचण नसून यामध्ये असा एक विचार करता येणे शक्य आहे की, यामध्ये जर एकाच इंडस्ट्रीला अंतर्भूत करण्यापेक्षा असोसिएशनला अंतर्भूत करणे योग्य आहे का, हे पाहावे लागेल अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

क्या उसमें मिसअ‍ॅप्रोप्रिएशन हुआ है और फंड मिसअ‍ॅप्रोप्रिशन के भी कुछ केसेस थे असे समितीने विचारले असता एक केस में तो ऐसा दिखायी देता है कि माईल इन्टेन्शन ॲक्शन थी असे विभागीय सचिवांनी विदित केले.

आपके स्तर पर कंटीन्यू रिव्हयू लेने की जरुरत है रिव्हयू कंटीन्यू होना चाहिए फंड पड़ा रहता है और काम कुछ नहीं होता असे समितीने निदर्शनास आणले असता २-३ महीने से यह काम शुरु किया है. केवल २५० के लिए ही नहीं तो ४१७ के लिए काम शुरु किया है. अधिकतर कालबाह्य हुए क्या यह सब देखना है. इसको नये से शुरु करने के लिए ट्रेनर्स नहीं है. आज जितनी कपॅसिटी क्रियेटेड है उससे २ लाख बच्चों को ट्रेन्ड कर सकते है लेकिन मैं १ लाख ३० हजार के ऊपर नहीं जाता हूं. डिमांड की कमी नहीं है. ३.५० लाख लोग अप्लाय करते हैं. ऐसी बात नहीं है कि लोग आने के लिए इच्छुक नहीं है. इनका एम्प्लॉयबिलिटी भी ९० प्रतिशत प्लस है. टोटली रिवेम करना यह सोलूशन है और हम पूरा करेंगे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

या प्रकरणामध्ये जबाबदारी निर्धारित करावी लागणार आहे. ३१२ कोटी रुपयांपैकी १७१ कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. परंतु उर्वरित निधी खर्च न करण्यासाठी जबाबदार कोण राहणार? स्ट्राँग रिव्हिव लेकर यह खर्चा किया जाना चाहिए.यामध्ये प्राप्त झालेले ३१२ कोटी रुपये फिक्स्ड डिपॉझिट केलेले आहेत काय अशी विचारणा समितीने केली असता चालू खात्यामध्ये जमा करण्यात आलेले असावेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

ज्या ठिकाणी आय.टी.आय. ची इमारत नाही, त्या ठिकाणी देखील निधी दिलेला असल्यामुळे निधी खर्च करण्यास अडचणी आल्या, तसेच निर्णय प्रक्रियेमध्ये विलंब झालेला असल्यामुळे १५० कोटी रुपये १० वर्षापासून खर्च करण्यात आलेले नाहीत. आता विभागाकडून सांगण्यात येते की,एका वर्षामध्ये १५० कोटी रुपये खर्च करण्यात येतील, त्यामुळे सदर निधी खर्च करण्यासाठी विभागामार्फत कोणते नियोजन करण्यात आलेले आहे अशी विचारणा समितीने केली असता आय.टी.आय. निहाय ठरवावे लागेल की, प्रत्येक आय.टी.आय. मध्ये नवीन इमारत न करता जुन्याच इमारतीमध्ये नवीन मशिन्स घेऊन कोणते नवीन ट्रेड सुरु करता येतील आणि आय.टी.आय. दोन शिफ्टमध्ये सुरु ठेवून किती विद्यार्थ्यांची संख्या वाढविता येईल, हे ठरविण्याचे नियोजन तयार करण्यात आलेले आहे. त्यामुळे यासाठी किती खर्च करावा लागणार आहे, याचे नियोजन करुन त्याबाबतची माहिती समितीला सांगण्यात येईल. तसेच, एप्रिल महिन्याच्या शेवटपर्यंत we will ensure that concerned ITIs takes out tender for everything. नवीन मशिन्स विकत घेणे किंवा मशिन्सची दुरुस्ती करणे. Unless we drive from top वह नीचे नहीं होगा असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

१३ इमारतीबद्दल समितीला माहिती देण्यात यावी. ज्या ठिकाणी आय.टी.आय.साठी इमारत उपलब्ध नव्हत्या त्या ठिकाणी इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आलेले आहे काय अशी विचारणा समितीने केली असता ज्या इमारती भाड्याने घेतलेल्या होत्या त्यांचे आय.एम.सी. करण्यात आलेले होते. काही इमारतीचे बांधकाम अंतिम टप्प्यामध्ये असून काही इमारतींचा ताबा घेण्यात आलेला असल्याचे संचालक, शिक्षण प्रशिक्षण यांनी समितीस अवगत केले.

१३ इमारती कोणत्या जिल्ह्यामधील आहेत अशी पृच्छा प्रधान महालेखाकार यांनी केली तसेच बांधण्यात आलेल्या १३ इमारतींची यादी समितीला सादर करण्यात यावी असे समितीने अवगत केले असता जळगाव (जामोद) येथील इमारती भाड्याने घेण्यात आलेल्या होत्या त्या ठिकाणी इमारतीचे बांधकाम सुरु आहे १३ इमारतीची यादी समितीला सादर करण्यात येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

नांदगाव- खंडेश्वर, चांदूर रेल्वे हे शहरापासून सर्वात जवळचे तालुके असून त्या ठिकाणी इंडस्ट्रीज देखील आहेत. परंतु सेंटर ऑफ एक्सलेंस व्यवस्थित नाही असे समितीने विदित केले. तसेच जो निधी एफ.डी.मध्ये गुंतविण्यात आलेला आहे त्याबाबत कोणता धोरणात्मक निर्णय घेण्यात येणार आहे अशी विचारणा प्रधान महालेखाकार यांनी केली. आणि विभागाकडे ८०० कोटी रुपयांचा निधी असून तो खर्च करण्याचे नियोजन करण्यात येईल असे विभागाने सांगितले असल्याचे समितीने अवगत केले असता As per the scheme we will use the money. The Scheme says we have to refund the money which the Government of India has given us in 20 instalments after 10 years. The Scheme was for 30 years, first 10 years was moratorium, for 20 years we were supposed to give interest free things and now the repayment will start असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

However, this was not the original scheme. The scheme was that these ITIs were to generate some income. याचा अर्थ शासनामार्फत रि-पे करण्यात येत आहे अशी विचारणा प्रधान महालेखाकारांनी केली. तसेच विभागाकडे ८०० कोटी रुपये असून ३१२ कोटी रुपयेदेखील पुढील २० वर्षामध्ये खर्च करावयाचे आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता We have to spend money and we have to increase the revenue sources असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

**परिच्छेद क्रमांक ३.२.२.२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थाव्दारे उत्पन्न निर्मिती (Revenue Generation) :**

Revenue generation बद्दल समितीला माहिती देण्यात यावी, या प्रकरणामध्ये फारच कमी Revenue generation करण्यात आलेला आहे असे समितीने विदित केले असता, यामध्ये रिव्हॅम्प करुन महसूल वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. आतापर्यंत केवळ १ कोटी ७८ लाख रुपयांचे विभागाचे स्वतःचे उत्पन्न मिळालेले असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

यासाठी विभागाने  कोणत्या उपाययोजना तयार केल्या आहेत अशी विचारणा समितीने केली असता आता विभागाने नवीन ट्रेड आणि नवीन मशिन घेऊन त्यामधून तयार केलेल्या वस्तू विकण्याचे नियोजन केलेले आहे. यामध्ये पाच ते दहा टक्क्यापेक्षा जास्त महसूल मिळेल, असे वाटत नाही. परंतु यासाठी पुढील एक वर्षामध्ये प्रलंबित निधी खर्च करावयाचा आहे. ज्या उद्दिष्टासाठी ही योजना सुरू करण्यात आलेली होती, त्या योजनेला चालना देण्याचे काम करण्यात येईल. I will give you a plan for sure, we have been working on it for sometime असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

**परिच्छेद क्रमांक ३.२.३.१  राज्य अंमलबजावणी कक्षाची स्थापना न करणे :**

या परिच्छेदाबद्दल समितीला माहिती देण्यात यावी. अंमलबजावणी कक्षाची स्थापना करण्यात आलेली नसून यामध्ये ४० लाख रुपये अखर्चित आहेत असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता सर्वप्रथम आपण अपग्रेडेशन प्लान तयार करून त्यास चालना द्यावयास पाहिजे. तसेच, यासाठी पुढील दोन महिन्यांमध्ये भरती देखील करता येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

अंमलबजावणी कक्षासाठी मागील दहा वर्षांपासून ४० लाख रुपये मिळालेले आहेत. सदर निधी खर्च करण्यात आलेला नाही, त्याचप्रमाणे तो समर्पित देखील करण्यात आलेला नाही आणि त्याच बरोबर, या निधीमधून अंमलबजावणी कक्षाची स्थापना करण्यात आलेली नसल्याचे समितीने निदर्शनास आणले असता पुढील एक ते दोन महिन्यांमध्ये अंमलबजावणी कक्षासाठी भरती करण्यात येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

Will you start it within a period of 3 months अशी विचारणा समितीने केली असता within a period of 3 months we will start it असे विभागीय सचिवांनी अवगत केले. यावर समितीने  एकूण अकरा पदे मंजूर असून त्यापैकी एकही पद भरण्यात आलेले नाही त्याचप्रमाणे अंमलबजावणी कक्षासाठी मागील दहा वर्षांपासून मिळालेले ४० लाख रुपये खर्च करण्यात आले नसल्याचे विभागास अवगत केले.

**परिच्छेद क्र.३.२.३.२: औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची अधिस्वीकृती :**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या अधिस्वीकृतीबाबत विभागाचे काय म्हणणे आहे अशी विचारणा समितीने केली असता पूर्वी केंद्र सरकारने QCI (Quality Council of India) ला सूचना दिल्या होत्या त्यांनी येऊन इन्स्पेक्शन करावे. परंतु गेल्या एक-दीड वर्षांपासून केंद्र सरकारने QCI ची नेमणूक रद्द केली आहे परंतु अद्याप केंद्रीय स्तरावर नवीन फ्रँकलीन संलग्नतेची नवीन सिस्टीम सुरू झालेली नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या बाबतीत आता ॲफिलेशन कोणाचे आहे अशी समितीने पृच्छा केली असता पूर्वी झालेले ॲफिलेशन अस्तित्वात आहेत. परंतु आता नवीन खाजगी आयटीआयला ॲफिलेशनच्या बाबतीत अडचणी येत आहेत. कारण केंद्र सरकारला QCI च्या संलग्नतेची जी प्रोसेस आहे त्यामध्ये त्यांना काही गैरव्यवहार वा चूक आढळून आली आहे. त्यामुळे गेल्या एक-दीड वर्षांपासून संलग्नतेचे काम बंद आहे. केंद्र सरकारने मागच्या बैठकीत सांगितले होते की, या अनुषंगाने ते नवीन प्रोसेस करीत आहोत. नवीन प्रोसेस झाल्यानंतर नवीन संलग्नतेचे काम सुरू करण्यात येईल परंतु वस्तुस्थिती ही आहे की, सद्यःस्थितीत संपूर्ण खाजगी आयटीआयची संलग्नता बंद असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

याचाच अर्थ दरम्यानच्या काळात राज्य सरकार किंवा खाजगी संस्थांच्या माध्यमातून सुरु झालेल्या आयटीआयना सध्या कोणतीही संलग्नता नाही काय अशी विचारणा समितीने केली असता तसे नसून गेल्या एक वर्षापासून सुरु झालेल्या नवीन आयटीआयना संलग्नता नाही परंतु जुन्या आयटीआयना संलग्नता आहे. आमच्या आयटीआयना या बाबतीत अडचण नाही खाजगी आयटीआयनी गुंतवणूक करुन विभागाची एनओसी घेतलेली आहे परंतु त्यांना गेल्या एक वर्षापासून संलग्नता मिळत नाही. परंतु विभागाच्या सर्व आयटीआयना संलग्नता आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

**परिच्छेद क्र. ३.२.३.३ : सेंटर ऑफ एक्सलन्सचे अपयश :**

सेंटर ऑफ एक्स्लन्स ही योजना इंडस्ट्रीला मल्टीस्कील वर्कर मिळावा म्हणून सुरु झाली होती. परंतु नंतर असे लक्षात आले की, पर्टीक्युलर सेक्टरमध्ये विद्यार्थ्याला पूर्ण स्कील प्राप्त होत नसल्यामुळे त्याच्या रोजगाराची अडचण येते. परंतु

इंडस्ट्रीजमध्ये जे सीओई कोर्सेस होते त्यातून स्पेसिफिक सेक्टरला रिक्रुटमेंट होत नसल्यामुळे खूप अडचणी निर्माण झाल्या. परंतु केंद्र स्तरावर सीओईचे परफॉर्मन्स बरोबर नसल्यामुळे केंद्र सरकारने २०१४ मध्ये ही योजना बंद करण्याचा निर्णय घेतला त्यामुळे ही योजना यशस्वीपणे राबवू शकलो नाही. तद्नंतर जे सीओई सुरु केले होते त्यांना शिल्पकारक योजनेमध्ये (सीटीएस) रुपातरित केले ते युनिट बाय डिफॉल्ट ॲफिलेट असल्यामुळे ते सीटीएसला ॲफिलेट झाले त्यानुसार विभाग ही बाब राबवित असल्याचा खुलासा संचालक, शिक्षण प्रशिक्षण यांनी केला.

COPA ट्रेडला सर्वात जास्त मागणी असल्यामुळे सीटीएसमध्ये COPA ट्रेड सुरु केले काय अशी विचारणा समितीने केली असता, ज्या ठिकाणी पूर्वी COPA ट्रेड होते त्याला सीओई अंतर्गत आयटी केले होते. तद्नंतर आयटीचे कन्व्हर्शन पुन्हा COPA ट्रेडमध्ये केले. COPA ट्रेडध्ये प्रवेश देऊन त्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येते अशी माहिती संचालक,शिक्षण प्रशिक्षण यांनी समितीस दिली.

या अंतर्गत विभागाने किती सेंटर ऑफ एक्सलन्स निवडले आणि त्यातून किती ठिकाणी COPA ट्रेड सुरु केला अशी विचारणा समितीने केली असता सध्या या बाबतची तपशीलवार माहिती उपलब्ध नसून या संदर्भातील माहिती एक आठवड्यात समितीला सादर करण्यात येईल असे संचालक,शिक्षण प्रशिक्षण यांनी समितीस अवगत केले.

**परिच्छेद क्र.३.२.३.४ : प्राचार्य आणि निदेशकांची रिकामी पदे :**

प्राचार्यांच्या रिक्त पदांची काय स्थिती आहे अशी विचारणा समितीने केली असता शासन स्तरावरुन भरती प्रक्रियेला पूर्णतः बंदी आहे. जोपर्यंत आयटीआय मधील पदांचा नवीन आकृतिबंध शासनाला सादर करीत नाही तोपर्यंत भरतीवर बंदी आहे. विभागाने आयटीआयनिहाय पदांचे नियोजन केलेले आहे. नवीन आकृतिबंध तयार झाल्यानंतर एक महिन्यात तासिका बेसिसवरील ५० टक्के पदे किती आणि कायमस्वरुपी ५० टक्के पदे किती या बाबतची माहिती उपलब्ध होईल त्यानंतर वित्त विभागाकडून आकृतिबंध मंजूर करुन घ्यावा लागेल. वित्त विभागाने आकृतिबंध मंजूर केल्यानंतरच पद भरती प्रक्रियेस परवानगी मिळेल असे विभागीय सचिवांनी विदित केले.

सध्या प्राचार्यांची किती पदे भरलेली आहेत व किती पदे रिक्त आहेत अशी विचारणा समितीने केली असता आयटीआय संचालनालयामध्ये प्राचार्यांची एकूण ४०१ पदे मंजूर असून २८५ पदे भरलेली आहेत व ११६ पदे रिक्त आहेत. आयटीआय संचालनालयामध्ये प्राचार्य, इन्स्ट्रक्टर आणि सबऑर्डीनेट यांसह एकूण १२०० पदे रिक्त असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाने दिलेल्या ज्ञापनामध्ये आयटीआयमध्ये कंत्राटी तत्त्वावर १५०० पदे निर्माण करण्यात आली व प्रत्यक्षात ३३८ पदे कंत्राटी तत्त्वावर भरण्यात आलेली असल्याचे नमूद केले आहे याबाबत समितीने पृच्छा केली असता हा विषय वेगळा आहे सन २०१० मध्ये HPC ची परवानगी घेऊन कंत्राटी तत्त्वावर निदेशकांची १५०० पदे निर्माण करण्यात आली होती. यापैकी ३३८ पदे भरण्यात आली होती या पदांना नियमित करण्याचा प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरु आहे. या संदर्भात असा निर्णय घेण्यात आला आहे की, जोपर्यंत पूर्ण आकृतिबंध सादर करीत नाही तोपर्यंत या प्रकरणी निर्णय घेणे योग्य होणार नाही. It had also gone to the Cabinet अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

They are not able to fill the posts because there is ban. They are taking on contractual basis or on clock-hour basis असे समितीने विदित केले असता we are not allowed to fill up the posts now. The Government of Maharashtra has only allowed the posts of Health department to be filled असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

Why your department is not allowed to fill up the posts अशी विचारणा प्रधान महालेखाकार यांनी केली असता On Paper the ban is till you get the new structure sanctioned for every post of every department, filling of the posts would not be allowed. वित्त विभागाने आदेश पारित केलेले आहेत की, नवीन आकृतिबंध मंजूर केल्याशिवाय पद भरती करता कामा नये असे विभागीय सचिवांनी विदित केले.

परंतु नवीन आकृतिबंध मंजूर करण्यात आला तरी शासन निर्णयान्वये भरती करण्यावर बंदी आहे. HPC ने नवीन पदे मंजूर केली तरी ती पदे भरता येत नाहीत. अशी पदे मंजूर केली तरी भरती प्रक्रियेस बंदी असल्याचे सांगितले जाते असे समितीने विदित केले असता HPC ने आता पदे मंजूर केली असून HPC मध्ये वित्त विभाग समाविष्ट असतो HPC ने आरोग्य विभागाची

पदे मंजूर करुन ती भरण्यास परवानगी दिली आहे. त्यानुसार आम्ही आरोग्य विभागाची पदे ऑनलाईन परीक्षा पध्दतीने भरण्याबाबत कार्यवाही करीत आहोत. HPC ने पदे मंजूर केली तर ती पदे भरता येतील. परंतु HPC कडे जाण्यासाठी वित्त विभागाच्या माध्यमातूनच जावे लागते. आता वित्त विभागाकडे प्रत्येक विभाग सुधारित आकृतिबंध सादर करीत आहे कौशल्य विकास व उद्योजकता विभागाने सुध्दा नवीन आकृतिबंध सादर केलेला असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

संपूर्ण राज्यात आयटीआयसाठी किती पदांची आवश्यकता आहे तसेच विभागाकडून नवीन आकृतिबंध तयार करण्यात आलेला आहे काय अशी विचारणा प्रधान महालेखाकार यांनी केली असता माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१७ मध्ये नवीन आकृतिबंध वित्त विभागाकडे सादर केला असून त्या आकृतिबंधामध्ये आम्ही एकूण १५०० पदांची मागणी केली आहे. कंत्राटी पदांचे नियमित पदात रुपांतर केले आहे. तसेच लो डीमांड ट्रेडला हाय डीमांड ट्रेडमध्ये कन्व्हर्ट करुन आम्हाला एकूण जेवढी पदे लागणार आहेत त्याचे नियोजन करुन आकृतिबंध सादर केला आहे. कंत्राटी पदे आणि सीओईएच मध्ये असलेली पदे सुध्दा समर्पित केली आहेत. टिचींग पॅटर्नमध्ये जी पदे मंजूर आहेत त्यापेक्षा जास्त पदे प्रस्तावित केलेली आहेत. तसेच ही पदे वाढविल्यामुळे किती क्षमता वाढणार आहे हे सुध्दा आकृतिबंधामध्ये नमूद केले आहे. वित्त विभागाने उक्त आकृतिबंधामध्ये काही त्रुटी काढल्या होत्या. सदरहू त्रुटींची पूर्तता विभागाकडून करण्यात येत असल्याची माहिती संचालक, शिक्षण प्रशिक्षण यांनी समितीस दिली. यावर समितीने विभागाने वित्त विभागाकडे जो आकृतिबंध सादर केला आहे त्याची प्रत समितीकडे सादर करावी असे निदेश विभागास दिले व विभागीय सचिवांनी माहिती देण्याबाबत आश्वासित केले. तथापि माहिती अप्राप्त आहे.

ज्या आयटीआयच्या माध्यमातून ९० टक्के रोजगाराची संधी उपलब्ध आहे त्या आयटीआयमधील जागा भरल्या जात नाही, त्या ठिकाणी नवीन यंत्रसामुग्री दिली जात नाही, तसेच नवीन कोर्सेस सुरु केले जात नाहीत. अशा परिस्थितीत सरकार खाजगी आयटीआयला परवानगी देते काय, असल्यास, या बाबतीत शासनाचे नेमके धोरण काय आहे ? ज्या खाजगी संस्था आयटीआय सुरु करुन चांगले प्रशिक्षण देण्यासाठी तयार असतील त्यांना परवानगी देण्याच्या बाबतीत शासनाचे धोरण काय आहे  अशी विचारणा समितीने केली असता राज्य सरकारचे अशा संस्थांना परवानगी देण्याचे धोरण आहे. विभागाने या धोरणात थोडासा बदल करुन ते अधिक सुरळीत केले आहे. जे अधिकार पूर्वी विभागाकडे होते ते आता संगणकीकृत करण्यात आले आहेत. सदरहू धोरण मंत्री महोदयांनी मंजूर केले आहे, कारण मंत्री महोदयांच्या मंजुरीने प्रोसेस बदलता येते. त्यानुसार विभागाने या माध्यमातून फक्त पूर्वीची प्रोसेस थोड्याफार प्रमाणात बदलली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

प्रचलित खाजगी आयटीआय आणि नवीन आयटीआयच्या बाबतीत शासनाचे धोरण काय आहे या बाबतची प्रत विभागाने समितीकडे सादर करावी असे समितीने विभागास सांगितले असता विभागीय संचिवांनी यास होकार दर्शविला.

**परिच्छेद क्र.३.२.३.५ : प्लेसमेंट सेल्सची स्थापना न करणे आणि फिडबॅक यंत्रणा नसणे :**

सद्यःस्थितीत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये उपलब्ध असणारे मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र यांचा विनियोग TCPC सेल म्हणून होत आहे असे विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे याबाबत हे कसे शक्य आहे अशी विचारणा समितीने केली असता प्रत्येक आयटीआयमध्ये प्रशिक्षण घेतल्यानंतर मुलांचा एम्प्लॉयमेंट हा ॲप्रेंटीसशिप असतो प्रशिक्षणार्थ्यांच्या जॉबसाठी बेसिक ट्रेनिंग रिडरेशन सेंटर हे इंडस्ट्रीमध्ये कोणकोणत्या व्यवसायात जागा उपलब्ध आहेत याची तपासणी करतात. त्या अनुषंगाने संबंधित उमेदवाराला एन्गेज करुन ते कॉन्टॅक्ट करतात असा खुलासा संचालक, शिक्षण प्रशिक्षण यांनी केला.

Why you are not making arrangements of Placement Cell at your ITI campus? पॉलिटेक्नीक कॉलेजमध्ये जशी कार्यवाही केली जाते तशी कार्यवाही जवळपासच्या सर्व इंडस्ट्रीयल इन्स्टीट्युट मध्ये केली तर चांगले होईल असे समितीने मत व्यक्त केले असता आयटीआयमधील मुलांचे काऊन्सलिंग आणि प्लेसमेंट हा महत्त्वाचा मुद्दा होता. या संदर्भात असे प्रस्तावित होते की, त्या ठिकाणी डेडीकेटेड सेल असावा परंतु त्यासाठी पुरेशा प्रमाणात मनुष्यबळ लागणार होते. परंतु आम्हाला मनुष्यबळाची अडचण असल्यामुळे आम्ही हे काम करु शकलो नाही. तथापि, जो डेडीकेटेड स्टाफ आहे तो ॲप्रेंटीसशीप अंतर्गत केवळ इंडस्ट्रीजसाठी काम करतात. ते अधिकारी/कर्मचारी हे सध्या आयटीआयमधील मुलांच्या प्लेसमेंटच्या अनुषंगाने काम करीत असतात. आम्ही प्लेसमेंटचे इंटीग्रेटेड प्रपोजल तयार केले आहे त्यानुसार आयटीआय प्रवेशापूर्वी ट्रेड कोणता घ्यावा याबाबत विद्यार्थ्यांचे काऊन्सिलिंग केले जाते अशी माहिती संचालक, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण यांनी दिली.

आयटीआय प्रवेशापूर्वी विद्यार्थ्यांचे ट्रेडच्या बाबतीत काऊन्सिलिंग करावे आणि प्रशिक्षणानंतर त्यांच्या प्लेसमेंटसाठी सर्व इंडस्ट्रीजना संस्थेच्या कॅम्पसमध्ये बोलविले तर विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे प्लेसमेंटची व्यवस्था होऊ शकते असे समितीने सूचित केले असता आता प्रत्येक इंजिनियरींग कॉलेज किंवा प्रत्येक ठिकाणी TNP सेल असतो. आयटीआयमधील बरीच मुले ॲप्रेंटीसशीपसाठी जातात. आपल्या अधिका-यांकडे जवळच्या इंडस्ट्रीजमधून मागणी आल्यानंतर कोणत्या ॲप्रेंटसशीपसाठी विद्यार्थ्यांना कोणत्या ट्रेडमधून पाठविता येईल हे बघितले जाते. They are working as TNP cell, but there is no dedicated TNP cell. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

मेकॅनिझिमचा ट्रेड सोडला तर बाकीच्या ट्रेडच्या बाबतीत फारशी मागणी नसते असे समितीने विदित केले असता ज्या ठिकाणी विशिष्ट ट्रेडला मागणी नाही त्या ठिकाणी ट्रेड बदलला पाहिजे असे मत विभागीय सचिवांनी व्यक्त केले.

विभागाने नमूद केले की, आयटीआयमधून प्रशिक्षण घेतलेल्या ९० टक्क्यांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना रोजगार मिळतो. आयटीआयमधून शिक्षण घेतलेल्या ९० टक्के विद्यार्थ्यांना नोकरी वा रोजगार मिळाला हे कशाच्या आधारावर विभागाकडून सांगत आहात असे समितीने विचारले असता आयटीआयमध्ये एकूण विद्यार्थी संख्या १ लाख ३३ हजार आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

१ लाख ३३ हजार विद्यार्थ्यांपैकी ९० टक्केप्रमाणे १ लाख २० हजार विद्यार्थ्यांना नोकरी लागली असेल तर यापेक्षा राज्य सरकारचे मोठे यश नाही असे समितीने विदित केले असता काही इंडस्ट्रीजनी सांगितले की, कारपेंटरच्या अनेक जागा आहेत. त्यांना मासिक १०-१५ हजार रुपये पगाराची ऑफर दिली तरी ते येत नाहीत कारण त्यांना स्वतःचा व्यवसाय केल्याने जास्त पैसे मिळतात. आयटीआयमधून जे विद्यार्थी प्रशिक्षण घेऊन येतात त्यातील ९० टक्के विद्यार्थी स्वतःचा व्यवसाय किंवा नोकरी करतात असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या बाबतीत स्पेसिफिक व्यवस्था असेल तर ती आपले रेकॉर्ड योग्यप्रकारे मेंटेन करु शकते. आयटीआयमधून बाहेर पडल्यानंतर त्यांच्यासाठी अशा प्रकारची व्यवस्था असणे चांगले आहे. आयटीआयमधून बाहेर पडलेले विद्यार्थी काही ना काही काम करीत असतील. उदाहरणार्थ एखादा विद्यार्थी ऑटोमोबाईल ट्रेडचे प्रशिक्षण घेऊन बाहेर पडला आणि त्याच्या वडिलांचा हेअर कटींग सलूनचा व्यवसाय असेल आणि त्याला ट्रेडनुरुप काम मिळाले नाही तर तो विद्यार्थी वडिलांच्या हेअर कंटींग सलून व्यवसायात काम करेल. त्या विद्यार्थ्याने जे प्रशिक्षण घेतले ते काम त्याला घरी मिळणार नाही. जर एखाद्या विद्यार्थ्याने मेकॅनिझम ट्रेडचे प्रशिक्षण घेतले असेल आणि त्याच्या वडिलांचा टेलरिंगचा व्यवसाय असेल, परंतु त्याला ट्रेडनुरुप काम उपलब्ध नसल्यामुळे त्यास नाईलाजाने टेलरचा व्यवसाय करावा लागेल. आयटीआय मधील विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणावर राज्य सरकार कोट्यवधी रुपये खर्च करीत आहेत. या प्रशिक्षणामागील राज्य सरकारचा जो उद्देश आहे तो उद्देश साध्य होणे गरजेचे असल्याचे समितीने विभागास अवगत केले असता या बाबतीत TNP सेलची व्यवस्था असावी ही समितीची सूचना योग्य आहे. आयटीआयनुसार त्या सेलची साईज कमी-जास्त करु शकतो. किमान कोणत्या बाबींची आवश्यकता आहे हे समजण्यासाठी किंवा या संदर्भातील फिडबॅक घेण्यासाठी TNP सेल असावयास पाहिजे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

आयटीआय मधून प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना योग्य रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी सक्षम यंत्रणा असणे आवश्यक आहे असे मत समितीने व्यक्त कले असता TNP सेल स्थापन करण्याच्या बाबतीत विभागाकडून प्रयत्न करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

**परिच्छेद क्र.३.२.३.६ : दर्जावाढ करण्यासाठी मिळालेल्या निधीतून अनियमित खर्च :**

उक्त विषयाच्या अनुषंगाने एवढ्या मोठ्या प्रमाणावर पैसा कसा खर्च केला अशी विचारणा समितीने केली असता मालवण येथील आयटीआयमधील इंडस्ट्रीयल पार्टनरचे सेक्टर होते. परंतु तेथील जे व्यवसाय होते ते प्लाननुसार रिलेटेड नव्हते. त्यांनी आयडीपीमध्ये असे प्रस्तावित केले होते की, मालवण हे पर्यटन स्थळ असल्यामुळे भविष्यात पर्यटनाशी संबंधित व्यवसाय करणे योग्य होईल. परंतु त्यांनी त्या दृष्टीने व्यवसाय सुरु न करता स्पीड बोटचा प्रकल्प हाती घेतला.परंतु त्यांच्याकडून तो प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही अशी माहिती संचालक, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण यांनी समितीस दिली.

समितीच्या माहितीनुसार त्यांनी स्पीड बोटीची नोंदणी देखील स्वतःच्या नावे करुन घेतली असल्याचे समितीने विदित केले असता, त्यांनी बोट IMC च्या माध्यमातून बांधली होती बोट बांधताना त्यांनी अनियमितता केलेली आहे. तसेच या विषयी सर्व

संबंधितांबरोबर बैठक घेतली होती. सध्या त्या ठिकाणी बोट उपलब्ध आहे परंतु त्या बोटीचा वापर न केल्यामुळे त्या बोटीचा घसारा झाला आहे परिणामी त्या बोटीचे मूल्य कमी झाले असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

परंतु गेल्या पाच-सहा वर्षांपासून सदरहू स्पीड बोट विनावापर जीर्णावस्थेत पडून होती याबाबत समितीने विचारणा केली असता सदरहू बोटीचे आहे त्या स्थितीत व्हॅल्यूएशन करुन त्या बोटीचा लिलाव करावा व प्राप्त रक्कम IMC च्या बचत खात्यामध्ये जमा करावी. कारण या प्रकरणी जेवढा विलंब होईल तेवढी त्या बोटीची किंमत कमी कमी होईल. त्यामुळेच या बोटीच्या लिलावातून आलेला पैसा आयएमसीच्या खात्यावर जमा करण्याबाबतचा निर्णय घेतला होता अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

What about the mis-appropriation of this fund? या बोटीच्या लिलावातून विभागाला ५-१० लाख रुपये मिळतील. एका दृष्टीने ही चांगली बाब आहे परंतु ज्यांना हा पैसा खर्च करण्याचा अधिकार नव्हता त्यांनी तो पैसा खर्च केला आहे. असे करणे हे त्या रकमेचा गैरवापर नाही काय, अशा परिस्थितीत आयटीआयचे सदस्य, सचिव आणि प्राचार्य काय करीत होते ? या प्रकरणी दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी सुकाणू समितीची बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये बोट विकून पैसे जमा करण्यास परवानगी देण्यात आली होती. अनियमित खर्च केल्यामुळे शासनाचे ५२ लाख रुपये नुकसान झाले त्या संदर्भात विभागाचे काय म्हणणे आहे अशी पृच्छा समितीने केली असता या प्रकरणी संबंधित असलेल्या व्यक्तीवर जबाबदारी निश्चित करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागाने ऑडिटच्या वेळी असे उत्तर दिले होते की, **"**शासनाने हे सर्व मान्य केले होते. A High Level Committee under Joint Director, Mumbai Region has been ordered for conducting complete inspection of ITI.**"** Was the Committee set-up to enquire into the matter असे प्रधान महालेखाकार यांनी विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता या प्रकरणी चौकशी झाली असून चौकशी समितीने दिलेला अहवाल आम्ही स्वीकारला असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाने निर्णय दिलेला आहे की, ते विकून टाकावे व पैसे जमा करावेत पण त्यांनी कोणावर काही जबाबदारी निश्चित केली आहे का अशी विचारणा समितीने केली असता आयएमसीचे संबंधित चेअरमन, संबंधित प्राचार्य व इतर सदस्यांनी तो निर्णय घेतला होता असे विभागीय सचिवांनी अवगत केले. तसेच विभागाने त्यांचा अहवाल स्वीकारला आहे. This was malafide-intention इस मे कोई शक नही. दोषींवर कारवाई करण्याबाबत सांगितले आहे. सध्या जे मटेरीयल आहे त्याचे ऑक्शन करुन पैसे जमा करावयाचे आहेत असेही समितीस विदित केले.

ही कारवाई किती दिवसात करणार आहात. दिनांक २०.१.२०१८ रोजी याबाबतची बैठक झालेली आहे. ऑडीट पॅरानंतर विभागाकडे समितीचा रिपोर्ट आला आहे. या रिपोर्टच्या अनुषंगाने दिनांक २०.१.२०१८ रोजी त्यांनी बैठक घेतली आहे. ५२ लाख रुपये खर्च झालेले असून आता लिलावातून १० लाख सुध्दा मिळणार नाही अशी परिस्थिती आहे. लिलावाचे आदेश आता दिलेले आहेत. Misappropriation of fund without proper guidelines, the Chairman including your Principal, everybody is responsible for that. What action you have taken असे समितीने विचारले असता विभागाने आदेश दिला आहे की, ज्यांच्यावर जबाबदारी निश्चित केली आहे त्यांच्याविरुध्दही रिकव्हरीची कारवाई सुरु करावी लागेल. तसेच विभागाच्या अधिका-याविरुध्दही विभागीय चौकशी करावी लागेल अशा प्रकारे रिकव्हरीची प्रोसेस आता सुरु होईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

प्राचार्यांना निलंबित करणार आहात की नाही, विभागाने दिलेल्या माहितीमध्ये म्हटले आहे की, २००९ पासून कोणत्याही प्रकारे संस्थेमध्ये कार्यरत नव्हते त्यांना इतके वर्षे तेथे का ठेवले होते तसेच त्यावेळी अध्यक्ष कोण होते अशी विचारणा समितीने केली असता विभागीय चौकशी सुरु झालेली असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभागीय चौकशी व निलंबन यामध्ये काही फरक आहे. This is old matter ६ महीने सस्पेंशन के बाद आप डीई शुरु कर सकते है असे प्रधान महालेखाकारांनी विदित केले असता प्राचार्य श्री.कदरेकर यांची विभागीय चौकशी पॅरलल चालू आहे. विभागीय चौकशी निलंबनानंतर किंवा निलंबनापूर्वी देखील करता येते अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

प्राचार्य श्री.कदरेकर हे निर्माण रिअलेटर्स व डेव्हलपर्समध्ये सन २००९ पासून कोणत्याही पदावर कार्यरत नव्हते. तरीसुध्दा त्यांना आयएमसीचे चेअरमन करुन टाकले आहे ही सर्व चूक प्राचार्यांची आहे. त्यांनी सन २०१६ पर्यत कोणतीही कारवाई केलेली

नाही. प्राचार्य आयएमटी यांनी मान्य केले आहे की, स्पीड बोटीची खरेदी व हाऊस बोटचे बांधकाम यांचे यांचा या अभ्यासक्रमात प्रस्तावित व्यवसायाशी कोणताही संबंध नाही. ही बाब राज्य शासनानेसुध्दा मान्य केली आहे. ही बाब गंभीर स्वरुपाची असल्यामुळे आयटीआय मालवणची संपूर्ण तपासणी करण्यासाठी समिती गठीत केली आहे. त्यामुळे ७१.९८ रुपये अनियमितपणे खर्च झाले आहे. याला प्रथमदर्शनी प्राचार्य मालवण आयटीआय हे जबाबदार आहेत. बाकीचे सर्व लोक अशासकीय आहेत. ज्या व्यक्तीला आपण चेअरमन केले आहे, तो कोणत्याही कंपनीचा डायरेक्टर नव्हता त्यांना तुम्ही आयएमसी चेअरमन कसे केले आहे अशी पृच्छा समितीने केली असता इंडस्ट्री पार्टनर रेकॉर्डला त्या कंपनीमध्ये होते, त्या कंपनीच्या प्रस्तावाप्रमाणे त्यांची नियुक्ती केली होती. परंतु ते कंपनीमध्ये नव्हते असे कंपनीने आम्हाला सन२०१५ मध्ये सांगितले. तत्कालीन प्राचार्याची सन २०१५ मध्ये दुस-या प्राचार्यांद्वारे चौकशी करुन अहवाल दिला हा अहवाल आल्यानंतर कारवाई सुरु केली असल्याची माहिती संचालक, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण यांनी समितीस दिली.

शासन मोठया प्रमाणावर विभागाला निधी देत असते. परंतु त्यांनी हाऊसबोटची खरेदी केली असून त्यांनी ७१.९८ लाख रुपये हाऊसबोट खरेदीवर खर्च केले आहे. सन २०१५ मध्ये समजले म्हणून त्यांना काढून टाकले. ही कोणाची खाजगी कंपनी आहे काय, हाऊस बोट खरेदीचा चुकीचा निर्णय घेण्यात आला आहे. प्राचार्यांवर कारवाई करावी तसेच अध्यक्षांवरसुध्दा महसूल रिकव्हरीची कारवाई करण्यात यावी असे समितीने मत व्यक्त केले. तसेच शासनाची फसवणूक केली म्हणून त्यांच्यावर एफआयआर करण्यात यावा. From २००९, he was not president of that company. Without any confirmation from the company, how he has been deputed on २००९ असे समितीने विचारले असता जेव्हा कंपनीने त्यांना प्रपोज केले असेल त्यावेळी ते कंपनीमध्ये असतील. नंतर २०१५ पूर्वी कधी तरी त्यांना कंपनीने काढून टाकले आहे. परंतु त्या व्यक्तीची जबाबदारी होती, त्यांना काढून टाकल्यानंतर स्वतःहून आयटीआयला माहिती द्यावयास पाहिजे होती ती माहिती कंपनीने सन २०१५ मध्ये दिली आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

अध्यक्ष आयएमसी हे २००९ पासून निर्माण रिॲलीटी व डेव्हलपर्स मुंबईमध्ये कोणत्याही पदावर कार्यरत नव्हते असे विभागाच्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात म्हटले आहे असे समितीने विचारले असता ही बाब त्यांनी सन २०१५ मध्ये सांगितली असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

आईएमसी के तौर पर अपॉईंट कब किया गया असे समितीने विचारले तसेच २००९ मध्ये कोणत्या कागदपत्राच्या आधारावर त्यांची नेमणूक केली आहे. जेव्हा सन २०१५ मध्ये तुम्हाला कळले तेव्हा तुम्ही कोणती कारवाई केली. त्यांनी सुध्दा तुम्हाला कळविले पाहिजे होते शासन यावर मोठा निधी खर्च करीत आहे. जी बाब आपल्या अभ्यासक्रमात किंवा प्लॅनमध्ये नव्हती सव्वा कोटी रुपये कोठे तरी बुडवायचे, तसे ७१ लाख रुपये बुडवून टाकले आहेत. आता लिलाव केला तरी ५-१० लाख रुपयापेक्षा जास्त रक्कम मिळणार नाही. या सर्व निधीच्या वसुलीची जबाबदारी रेव्हेन्यू रिकव्हरी म्हणून करावी. प्राचार्यांवरसुध्दा रिकव्हरीची जबाबदारी निश्चित करावी त्यांना त्वरीत निलंबित करण्यात यावे, याबाबत विभागाची काय भूमिका आहे अशी विचारणा समितीने केली असता समितीच्या आदेशाप्रमाणे अगोदर त्यांच्याकडून पैशाची रिकव्हरी करावी लागेल. यामध्ये कंपनीने देखील त्यांनी कंपनी सोडल्यानंतर सांगण्याची गरज होती. प्राचार्यांनी ७१.९८ लाखाची हाऊसबोट खरेदी करताना विरोध करावयास पाहिजे होता. गरज नसताना आपल्या निधीतून ही हाऊसबोट विकत घेतली आहे, याबाबत फौजदारी कसा होईल याबाबत विभाग विचार करीत आहे. ती व्यक्ती, कंपनी व प्राचार्य यांच्याकडून रेव्हेन्यू रिकव्हरीकरीता कार्यवाही सुरु केली जाईल. चालू असलेली विभागीय चौकशी २-३ महिन्यात संपविण्याचा प्रयत्न केला जाईल. या प्रकरणात त्यांनी मोठी चूक केली आहे, सेक्रेटरी म्हणून त्यांनी विरोध दर्शविणे आवश्यक होते सर्व बाबी पासून त्यांच्या निलंबनाबाबत निर्णय घेण्यात येईल अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

What about the Director, Technical Education? The Chairman was allowed to incur 25 lakhs from the Up gradation fund. The DVT gave this sanction.Do you think this can happen at ITI level, without the approval of Directorate? असे प्रधान महालेखाकार यांनी विदित केले असता He was not involved असे विभागीय सचिवांनी अवगत केले तसेच अहवालामध्ये डायरेक्टरला जबाबदार धरले नसले तरी डायरेक्टरच्या रोलची पुन्हा तपासणी करण्यात येईल असेही समितीस अवगत केले.

**परिच्छेद क्रमांक ३.२.४ सनियंत्रण :**

यामध्ये काही प्रगती आहे का अशी विचारणा समितीने केली असता, राज्य सुकाणू समितीची बैठक मागील महिन्यात घेतली आहे. आता नियमितपणे बैठक घेणार असून अपग्रेडेशनवर आता खर्च करण्यात येईल. या प्रकरणी आता १०० टक्के सुधारणा दिसतील असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

सन २०१४ नंतर एसएससीच्या दोन वेळा बैठका झाल्या आहेत, सन २०१५ व २०१८ मध्ये झाल्या आहेत. २०१५ मधील बैठकीत निदेशकांचा पगार व भत्ते व इतर खर्च देण्याबाबतचा विषय होता. इतर कोणताही खर्च करायचा नाही असे निर्देश त्यावेळी दिले होते. २०१८ च्या बैठकीत हे निदेश उठविले अपग्रेडेशन झाले असेल तर त्यासंबंधी निर्णय घ्यावयाचा आहे अशा प्रकारे दोन बैठका झाल्या असल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता आता नियमित बैठका घेतल्या जातील असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

हाऊसबोटची चौकशी समितीचा अहवाल आमच्या समितीकडे पाठविण्यात यावा. सचिव हे राज्य सुकाणू समितीचे अध्यक्ष असतात सन २०१४ पासून दोन बैठका झाल्या आहेत. समिती शिफारस करीत आहे की, राज्य सुकाणू समितीची बैठक नियमित होत नाही. या सर्व बाबी शासनाच्या लक्षात आणून देण्याचे काम आपली समिती करु शकते. त्याबाबत नियम आहे की, किमान तीन महिन्यामध्ये एक बैठक सुकाणू समितीची झाली पाहिजेत. म्हणजे एका वर्षात चार बैठका झाल्या पाहिजेत. दर तीन महिन्यातून आयएमसीची बैठक झाली पाहिजे. २०१४ पासून सुकाणू समितीच्या बैठका खूप कमी झालेल्या आहेत. यामुळे विभागाच्या कार्यपध्दतीबाबत समितीला चिंता वाटते, याबाबत शासनाने लक्ष द्यावे असे समितीने विदित केले असता समितीकी चिंता विभाग के लिए ठपका है. We take it seriously असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

मागे झालेल्या सुकाणू समितीच्या बैठकीची नोटीस निघाल्यानंतर बैठक होईपर्यंत तीन प्रधान सचिव बदलले असल्याचे समितीने नमूद केले. तसेच २०५ पैकी एकाही आयटीआयने राष्ट्रीय अधिस्वीकृती शिक्षा बोर्ड यांच्याकडे अधिस्वीकृती मिळण्याकरिता अर्ज केलेला नव्हता त्याचबरोबर अनेक पदे रिकामी आहेत. नियोजनातील उणीवा भरुन काढण्यासाठी विनावापर पडून राहिलेल्या निधीची, निधी व भौतिक पायाभूत सुविधांचा उचित वापराची खात्री करण्यासाठी कौशल्य विकास व रोजगार क्षमतेचे मोठे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी भक्कम नियंत्रण यंत्रणा स्थापीत करण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा दर्जावाढ कार्यक्रमाचा आढावा आपण घेतला पाहिजे. या प्रकारच्या अनेक शिफारशी आपण केलेल्या आहेत. विभागाने त्याबाबत उत्तरही दिलेले आहे त्यात आणखी सुधारणा करण्याची समितीची अपेक्षा आहे असे समितीने विभागास अवगत केले.

**परिच्छेद क्रमांक ३.९ निष्फळ खर्च :**

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, इमारतीचा वापर सुरु असून मध्यंतरी ३-४ वर्षे विनावापर होती. आता सतत वापर सुरु राहिल याची काळजी घेण्यात येत आहे.

तेथे वॉर्डन कंत्राटी पध्दतीने देणे योग्य होणार नाही नियमित वार्डन नसेल तर मुलांवर नियंत्रण कसे राहील अशी पृच्छा समितीने केली असता सध्या कंत्राटी तत्वावर नेमणूक करण्यात येईल. तसेच त्यावेळी मुले नव्हती इमारत बांधून पडून होती तसेच वॉर्डनही नव्हता असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

पीपीपी मॉडेलमध्ये गेडाम समिती स्थापन केली होती अहवाल सुकाणू समितीसमोर आल्यावर अंमलबजावणीबाबत समितीने कोणता निर्णय घेतला आहे अशी विचारणा समितीने केली असता गेडाम समितीचा संपूर्ण अहवाल सुकाणू समितीने मान्य केलेला आहे समितीच्या शिफारशीप्रमाणे कार्यवाही सुरु केलेली आहे. या अहवालाची प्रत समितीकडे सादर करीत असल्याचे संचालक, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण यांनी सांगितले.

**परिच्छेद क्रमांक ३.१०: ई -विद्या प्रकल्पावरील निष्फळ खर्च :**

गडचिरोली जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांच्याकडून योजनेच्या अंमलबजावणीमध्ये १ कोटी ६ लाख रुपयांचा निष्फळ खर्च झालेला आहे याबाबत समितीला अवगत करण्यास सांगितले असता, १२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये सोयीसुविधा पुरविण्यासाठी ई-विद्या प्रकल्प राबविण्यात आला होता. सदर प्रकल्प जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली डीपीडीसीच्या माध्यमातून प्रशासकीय मान्यता देऊन निविदा प्रक्रिया त्यांच्या स्तरावर राबविण्यात आली होती. डी.ओ. कार्यालयाने आयटीआयकरिता वापरकर्ता म्हणून तेथे काम केले होते. तो प्रकल्प १७ महिने चालला. परंतु कनेक्टीव्हीटीचा प्रॉब्लेम असल्यामुळे तो प्रकल्प पुढे चालू शकला नाही. कंत्राटाच्या अटी व शर्तीनुसार त्यामध्ये ज्या कार्यालयाने पुरवठा आदेश दिले होते, त्यांनी कारवाई करणे अपेक्षीत होते. संबंधित जिल्हाधिकारी यांनी सर्व वस्तुस्थिती त्यावेळी कळविली होती. त्याप्रमाणे अपेक्षीत कारवाई पुरवठादारावर झालेली नाही. जिल्हाधिकारी कार्यालयाने पुरवठा आदेश दिले होते, निविदा त्यांनी प्रकाशित केल्या होत्या. त्याच्या स्तरावर ती कारवाई होणे अपेक्षीत होते. डी.ओ. कार्यालयामध्ये कन्साईनी म्हणून त्यांनी तो ऑर्डरप्रमाणे रिसीव्ह केला होता असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

डीपीडीसी च्या निधीला जिल्हाधिकारी कसे ऑर्डर देऊ शकतात. जिल्हाधिकारी प्रशासकीय मान्यता देतात. जिल्हाधिकारी संबंधित विभागाला निधी देतात. येथे १२ आयटीआयमध्ये व्हॅर्च्युअल क्लासरुमवर निधी खर्च झाला आहे, याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिलेले दिसत नाहीत अशी विचारणा समितीने केली असता, याची निविदा जिल्हाधिकारी कार्यालयाने काढली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयाने निविदा प्रकाशित केली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने त्यांच्या स्तरावर करारनामा केला होता. डी.ओ. हे कन्साईनी म्हणून होते. त्यांच्याकडून तो निधी डी.ओ. कार्यालयाला आला आहे. निधी देताना त्यांच्या स्तरावर तो करारनामा केला होता. मुळ निविदेचे अनुषंगाने कंत्राट हे जिल्हाधिकारी स्तरावरील होते असे विभागीय प्रतिनिधींने समितीस सांगितले.

जिल्हाधिकारी यांनी काढलेल्या निविदेमध्ये दंडात्मक कार्यवाहीची तरतूद होती. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिका-यांनी केलेल्या करारामध्ये दंडात्मक कार्यवाहीची तरतूद नव्हती. त्यामुळे त्यांनी करार पाळला नाही म्हणून त्यांच्यावर विभागाला कारवाई करता आली नाही. दंडात्मक कार्यवाहीचा क्लॉज न टाकण्याची जबाबदारी कोणावर आहे अशी विचारणा समितीने केली असता, प्रत्येक निविदा व कार्यादेशामध्ये एक ओळ असते की, निविदेमधील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील, करारमध्ये नसेल तर ती बंधनकारक आहे, कारण निविदा कागदपत्रावर त्यांनी स्वाक्षरी केलेली आहे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

तत्कालीन जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, गडचिरोली तसेच अभिकरण यांच्या दरम्यान झालेल्या करारात दंडात्मक कार्यवाही व सेवेच्या हमीबाबत कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयास अभिकरणावर प्रशासकीय कारवाई करता येणे शक्य झाले नाही, असे स्पष्ट नमूद आहे. त्यामुळे त्यांच्यावर देखील कारवाई करण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, ड्रॉप क्यों किया इसके बारे में भी कार्रवाई की जानी चाहिए और वह ड्रॉप करने से फरक नहीं पड़ता, क्योंकि उसने टेंडर भरते समय टेंडर डाक्युमेंट पर साईन किया है. एक महीने के अंदर इसके बारे में साधकबाधक बताता हूँ. वह कार्यान्वीत हुआ लेकिन बीच में ही उसकी कनेक्टीव्हीटी खत्म हो गई. बाकी की जो सामग्री थी उसका युज कर रहे है असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

३४ लाख रुपये खर्च किये है और २४ लाख की सेविंग थी वह आपके पास जमा किया है अशी विचारणा समितीने केली असता, एकूण २४.५०लाख रुपये चलनाद्वारे शासनास जमा केलेले आहेत असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

एकूण ९२ लक्ष ३९ हजार ६६५ रुपये खर्च झाले आहेत. ३३१५ रुपये शासन जमा केले आहेत. ११-१२ लाख रुपये जमा केले. असे एकूण १ कोटी ३२ लाख रुपये आहेत.त्यावेळी जिल्हाधिकारी कोण होते? Whether the Agreement was made between the Principal & amp; Supplier or the Collector & amp; Supplier? अशी विचारणा समितीने केली असता, चौकशी करण्यासाठी एक महिन्याचा कालावधी द्यावा अशी विनंती विभागीय सचिवांनी समितीस केली.

उपरोक्त मुद्याबाबत विभागाकडून प्राप्त झालेला चौकशी अहवाल (**विवरण पत्र क्र.१**) मध्ये जोडण्यात आला आहे.

आप कह रहे है कि इसमें डीव्हीटी का कोई रोल नहीं है. ॲक्च्युअली एक रिक्वायरमेंट थी कि कोई भी प्रॉक्युरमेंट ऑफ पब्लिक वूड्स अँड सर्विसेस के लिए ॲडमिनिस्ट्रेटीव विभाग की मंजूरी जरुरी थी. आप कह रहे है कि कलेक्टर ने किया, इसमें हमारा कोई रोल नहीं है. अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता, याबाबत एक महिन्यात पूर्ण चौकशी करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

व्हर्च्युअल वर्गाच्या माध्यमातून एक स्टुडिओ स्थापन करुन विभागाने तेथे व्हर्च्युअल वर्ग सुरु करण्याचे काम केले. संचालकाकडून त्याला कोणतीही तांत्रिक मान्यता घेण्यात आली नाही. कोणत्याही जिल्हा नियोजन व विकास समितीच्या कार्यक्रमामध्ये तांत्रिक मंजूरी शिवाय कोणतीही निविदा काढता येत नाही. तथापि जिल्हाधिकारी गडचिरोली यांनी निविदा काढली. कार्यादेश दिनांक ६ ऑक्टोबर, २०१० रोजी निर्गमित केले आणि प्रशासकीय मान्यता दिनांक १४ ऑक्टोबर, २०१० रोजी देण्यात आली असे समितीने निदर्शनास आणले असता, सर्वप्रथम शाळेसाठी सदर प्रकल्प सुरु केला. तो प्रकल्प शाळांसाठी सुरु करताना त्याचा आय.टी.आय.शी काही संबंध नव्हता. शाळांसाठी जिल्हाधिकारी यांनी वर्क ऑर्डर दिली. शाळांसाठी व्हर्च्युअल क्लासरुमला शिकविण्यासाठी जो नियंत्रण कक्ष बनवायचा होता, त्यासाठी त्यांना कुठे जागा मिळाली नाही म्हणून त्यांनी तो आय.टी.आय. मध्ये तयार केला. ती पूर्ण यंत्रणा शाळांसाठी सुरु झाली. ते झाल्यानंतर याच प्रकारची सुविधा आय.टी.आय. मध्ये का निर्माण करु नये कारण विशेषतः ज्या नियंत्रण कक्षामधून सर्व बिम करतो तो नियंत्रण कक्ष आय.टी.आय. मध्ये होता म्हणून आय.टी.आय.ला का एक्स्टेंड करु नये म्हणून १२ आय.टी.आय.लाही व्हर्च्युअल वर्ग करण्याची बाब समोर आली. सर्वप्रथम अभिकरणाने जे काम केले त्याच्याशी आय.टी.आय. चा काही संबंध नव्हता. सदर प्रकल्प शाळांसाठी सुरु केले असा खुलासा विभागीय सचिवांनी समितीसमोर केला.

त्यावर सदर प्रकल्प शाळांसाठी सुरु केला होता परंतु, शाळांमध्ये तो सुरुच झाला नाही. व्हर्च्युअल वर्ग फक्त १२ आय.टी.आय.मध्ये सुरु झाले असे मत समितीने व्यक्त केले असता, शाळांसाठी पूर्णपणे झाले. फक्त त्याचा नियंत्रण कक्ष आय.टी.आय. मध्ये असल्यामुळे त्यानंतर असा विचार करण्यात आला की, आय.टी.आय.चा देखील त्यामध्ये समावेश करु, तेव्हा १२ आय.टी.आय. समाविष्ट करण्यात आले. त्या १२ आय.टी.आय.साठी भांडवली खर्चाकरिता ४८ लक्ष रुपये खर्च करण्यात आले. त्यानंतर प्रत्येक महिन्याला जवळपास ३ लाख ४५ हजार रुपये खर्च करण्यात आले. जो पूर्ण प्रकल्प सुरुवातीला होता तो शाळांसाठी होता. तो पूर्णपणे अंमलात आला. त्याचे पूर्णपणे पेमेंटही झाले. परंतु, हे प्रकल्प सुरु असताना त्यांचा नियंत्रण कक्ष आय.टी.आय. मध्ये असल्याने १२ आय.टी.आय. समाविष्ट करण्याचा निर्णय जिल्हा स्तरावर घेण्यात आला. या १२ आय.टी.आय. करिता भांडवली खर्च म्हणून त्यांनी ४८ लक्ष रुपये खर्च केले. तसेच, १७ महिन्यांसाठी दरमहा जी काही किंमत होती ती त्यांनी खर्च केली. त्यांना सदर प्रकल्प पूर्ण ३ वर्षासाठी करायचा होता परंतु, १७ महिन्यांच्या नंतर हा प्रकल्प बंद पडला. कारण शाळेचा प्रकल्प संपला होता त्यामुळे १७ महिन्यांच्या नंतर आय.टी.आय.चा ही प्रकल्प बंद झाला. विभागाने सुरुवातीला भांडवली खर्च म्हणून ४८ लक्ष रुपयांचा खर्च केला आणि दरमहाचा खर्च विभागाने फक्त १७ महिन्यांसाठी केला. भांडवली खर्च म्हणून केलेला ४८ लक्ष रुपयांचा खर्च हा ३ वर्षांपर्यंत कामी येईल अशी अपेक्षा होती. परंतु, त्याच्या ऐवजी १७ महिन्यांनंतर हा प्रकल्प विभागासाठी बंद पडला, ही वस्तुस्थिती आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाला सदर प्रकल्प ३ वर्ष सुरु राहण्याची अपेक्षा होती. मात्र १७ महिन्यांमध्ये प्रकल्प बंद पडला याचा अर्थ नियोजनाचा अभाव आहे हे मान्य करता काय ? यामध्ये नियोजनाचा अभाव आहे. महालेखाकारांनी जे आक्षेप काढले की, १ कोटी रुपयांचा जो निधी खर्च केला, त्याचा जो उपयोग व्हायला पाहिजे होता तो पूर्णतः झाला नाही. मग महालेखाकारांचा आक्षेप समितीने मान्य करावा काय ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर प्रकल्प बंद होऊ द्यायला नको होता. महालेखाकारांचा जो आक्षेप आहे की, १ कोटी ६ लक्ष रुपयांचा खर्च निष्फळ झाला त्या खर्चाचे २ हिस्से आहेत. १ हिस्सा असा आहे की, ३ लाख ४५ हजार रुपये हा प्रत्येक महिन्याला जो काही चालू खर्च करतात तो खर्च आहे. तो १७ महिन्यांसाठी खर्च केला, त्याच्या अगेन्स्ट ६-७ हजार मुलांना शिकविले. तो १७ महिन्यांचा चालू खर्च निष्फळ झाला असे म्हणणे योग्य होणार नाही असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

समितीचे ते म्हणणे नाही. ज्यावेळेस एखाद्या गोष्टीचे ३६ महिन्यांसाठी नियोजन करतो व ते १७ महिन्यात बंद पडते याचा अर्थ त्याचा पूर्णतः उपयोग झाला नाही, ही वस्तुस्थिती आहे. ही जर वस्तुस्थिती असेल तर याचा अर्थ असा आहे की, केलेल्या खर्चाचा सदुपयोग झाला नाही. त्यामुळे या पैशाचा अपव्यय झाला किंवा या पैशाचा पूर्णतः उपयोग झाला नाही, ही वस्तुस्थिती आहे हे मान्य कराल काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभाग मान्य करतो की, यामध्ये जे ४८ लाख रुपयांचा भांडवली खर्च केला त्याच्या अगेन्स्ट ३ वर्षांपर्यंत ही सुविधा हवी होती परंतु, त्या ऐवजी ती फक्त १७ महिने मिळाली. १९ महिने ती मिळाली नाही त्यामुळे ४८ लाख रुपयांपैकी प्रपोर्शनेट जवळपास पंचविस-साडेपंचविस लक्ष रुपयांचा खर्च निष्फळ झाला असे विभागाला वाटते असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

डी.पी.डी.सी.चे पैसे डी.पी.डी.सी. ने मंजूर केले असतील परंतु, डी.पी.डी.सी. चे पैसे देताना कोणत्या तरी विभागाची तांत्रिक मान्यता असली पाहिजे. जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील त्या विभागाकडून तांत्रिक मान्यता करुन घेतली पाहिजे होती. ही निविदा काढण्याची जबाबदारी युजिंग डिपार्टमेंटवरच असते. जिल्हाधिकारी यांना असा विचार कसा आला की, त्यांनी स्वतः निविदा काढायची, त्यांनी तांत्रिक मान्यता घ्यायचीच नाही फक्त कोटेशनच्या आधारावर त्याला काम देऊन टाकायचे, हा सर्व काय इंटरेस्ट होता ? त्यावेळेस कोण जिल्हाधिकारी होते ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यावेळेस श्री. अतुल पाटणे हे जिल्हाधिकारी होते. हा प्रकल्प आय.टी.आय. साठी मंजूर करण्याच्या पूर्वी यासारखाच प्रकल्प १८४ शाळांसाठी अगोदरच मंजूर झाला होता, त्याची निविदा काढण्यात आली होती, ते अभिकरणाला देण्यात आले होते असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

तो प्रकल्प किती वर्ष चालला ? अशी विचारणा समितीने केली असता, तो प्रकल्प ३ वर्ष चालला. त्याची पूर्ण अंमलबजावणी झाली. त्याच्या पूर्वी अशी संकल्पना होती की, एका केंद्रीत ठिकाणी शिकवणी होणार व सर्व मुलांना व्हर्च्युअल वर्गामध्ये शिकविले जाणार जेणेकरुन चांगल्या क्षमता असलेला शिक्षकांचा फायदा जास्त मुलांना होऊ शकेल. ही संकल्पना त्यांनी प्रथम १८४ शाळांसाठी वापरली. तो प्रकल्प मंजूर केला, त्याची निविदा काढली, कार्यादेश दिला व तो प्रकल्प ३ वर्ष चाललासुध्दा. जेव्हा हा प्रकल्प सुरु होत होता त्यावेळेस जो केंद्रीत नियंत्रण कक्ष आहे जेथून हे क्लासेस बिम करतो तो आय.टी.आय.मध्ये सुरु करण्यात आला कारण आय.टी.आय. मध्ये त्यासाठी योग्य जागा होती आणि १८४ शाळांसाठी हे लाँग डिस्टन्स एज्युकेशन सुरु झाले. जेव्हा हे सुरु झाले तेव्हा दुसरे टेंडर नाही झाले ते टेंडर काढण्यात आले. १८४ शाळा समाविष्ट केल्या, तेथे प्रकल्पाची अंमलबजावणी झाली व तो प्रकल्प ३ वर्षे पूर्णपणे चालला. हे सुरु असताना नियंत्रण कक्ष विभागाकडे होता त्यामुळे त्याचा फायदा आय.टी.आय. ला का होऊ नये, एकाच नियंत्रण कक्षाचा फायदा सर्वांना करता येईल कारण तो अगोदरच तयार झालेला आहे, विभागाला भांडवली खर्च फक्त १२ आय.टी.आय.ला लागेल. नियंत्रण कक्षाचा खर्च वाचेल म्हणून १२ आय.टी.आय. साठी त्यांनी हे समाविष्ट केले. त्यांनी तेथे प्रत्येक व्हर्च्युअल वर्गामध्ये जी यंत्रणा बसविली ती शाळेच्या समांतरच यंत्रणा असणार असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीचा मुद्दा असा आहे की, ३ वर्षे काम होण्याची हमी नसताना एवढा मोठा भांडवली खर्च विभागाने केला. शाळांना ३ वर्षे प्रशिक्षण दिले मात्र आय.टी.आय.ला देता आले नाही. तो खर्च पूर्ण निष्फळ ठरला. ही सर्व प्रक्रिया करताना त्यावेळेच्या जिल्हाधिका-यांनी जी तत्परता दाखविली ती योग्य नव्हती. ही निविदा काढण्याची प्रक्रिया करण्याचे अधिकार कोणत्याही स्तरावर आतापर्यंत कधी पाहिले नाही की, जिल्हाधिकारी निविदा काढतात. युजिंग ऑथॉरिटी, युजिंग बॉडी निविदा काढत असते. येथे जिल्हाधिका-यांनी स्वतः त्यांना ऑनगोईंग वर्कला कोटेशनवर दिले की विनानिविदा स्वतः काढून घेतले? विभागाच्या माहितीमध्ये निविदा काढली असे नमूद केले आहे. कोणत्या सिस्टिमवर हे काम केले आणि हे करण्याची गरज काय होती की, जिल्हाधिका-यांने स्वतः सर्व सुमोटो कोणाची मागणी नसताना स्वतःच करुन दिले ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने पूर्ण चौकशी केली त्यानुसार निश्चित काय घडले त्याबाबत समितीला अवगत करतो. तेथे टेली एज्युकेशनने लाँग डिस्टन्स मुलांना शिकविण्याची संकल्पना आली त्या आधारे अभिकरणाने १८४ शाळांकरिता सदर प्रकल्प सुरु केला याचा नियंत्रण कक्ष आय.टी.आय.मध्ये स्थापित केला. मूळ योजनेमध्ये आय.टी.आय. समाविष्ट नव्हती. फक्त १८४ शाळा समाविष्ट होत्या व १ नियंत्रण कक्ष होता. त्यांनी नियंत्रण कक्ष आय.टी.आय. मध्ये केला कारण अभिकरणास ती सर्वात उपयुक्त जागा

दिसली. जेव्हा हे सुरु झाले त्यावेळेस असे दिसले की, अगोदरच नियंत्रण कक्ष आहे, नियंत्रण कक्षाचा खर्च अगोदरच झालेला आहे, भलेही तो प्रकल्प शाळेसाठी झाला असेल परंतु, तो अगोदरच झालेला आहे मग त्याचा वापर १२ आय.टी.आय. साठी का करु नये ? म्हणून विभागाने १२ आय.टी.आय. त्यात समाविष्ट केले. १२ आय.टी.आय. समाविष्ट करताना प्रत्येक आय.टी.आय.मध्ये व्हर्च्युअल वर्ग करण्यासाठी जी संगणकीय यंत्रणा लागली त्यासाठी ४ लाख रुपयांप्रमाणे ४८ लाख रुपयांचा भांडवली खर्च झाला. या व्यतिरिक्त १२ आय.टी.आय.साठी बँडविथचा दरमहा ३ लाख ४५ हजार रुपयांचा खर्च विभागाने १७ महिन्यांसाठी केला आणि १७ महिन्यांसाठी यंत्रणा चालली. १७ महिन्यांच्या नंतर ही यंत्रणा बंद पडली म्हणून प्रत्येक महिन्याचा जो चालू खर्च होता तो १७ महिन्यांसाठीच दिला व त्याच्या अगेन्स्टमध्ये सर्व्हीसही मिळाली कारण ६-७ हजार आय.टी.आय. च्या मुलांना विभागाने लाँग डिस्टन्स ट्रेनिंग दिली. सुरुवातीला प्रत्येक आय.टी.आय.ला ४ लाख याप्रमाणे ४८ लाख रुपयांचा विभागाने खर्च केला त्यावेळेस अशी अपेक्षा होती की, हा प्रकल्प ३६ महिन्यांपर्यंत सुरु राहणार. ४८ लाख रुपये खर्च केले ते ३६ महिने काम करणार होते त्याच्या ऐवजी १७ महिन्यांनंतर यंत्रणा बंद पडली व त्या कंपनीने तो नियंत्रण कक्षही नेला कारण त्यांचा शाळेचा प्रकल्प संपला होता. विभागाचा ४८ लाख रुपयांचा भांडवली खर्च होता, मात्र सदर प्रकल्प ३६ महिन्यांऐवजी १७ महिने चालल्याने जवळपास २५ लाख रुपयांचा निम्मा खर्च निष्फळ ठरला असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने हे स्वीकारले की, हा २५ लाखांचा खर्च निष्फळ झाला आहे अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

विभाग समितीला जो अहवाल सादर करणार होता त्याबाबत अवगत करण्यास समितीने सांगितले असता, विभागाचा जो डी.व्ही. अधिकारी होता ज्यांनी हे केले ते आता मयत झालेले आहेत असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

जो करार केला तोही सदोष होता. त्यामध्ये दंडात्मक कार्यवाहीची तरतूद नव्हती. त्याचीही चर्चा समितीने त्यावेळेस केली होती अशी विचारणा समितीने केली असता, जो डी.व्ही. अधिकारी होता ज्याने हे केले होते ती व्यक्ती आता जिवंत नाही. त्यांच्यावर कारवाई करण्याची आता काही शक्यता नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जिल्हाधिका-यांनी स्वतः निविदा आदेश कोणत्याही मागणीशिवाय करण्याची गरज काय होती, याबाबत विभागाने तत्कालीन जिल्हाधिका-यांकडून स्पष्टीकरण मागावे. ही पध्दत कोणीही वापरु नये. कधी कोणताही जिल्हाधिकारी डी.पी.डी.सी. च्या निधीतून निविदा काढतो ही बाब समितीच्या आजतागायत निदर्शनास आली नाही. जिल्हाधिका-यांनी डीपीडीसीच्या निधीचे नियंत्रण करावे. प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांना आहेत. परंतु, तांत्रिक मान्यता घेतली पाहिजे. त्यानंतर युझिंग बॉडीला निविदा काढण्याचे अधिकार असतात. जिल्हाधिका-यांनी निविदा काढायची, १७ महिने प्रकल्प चालवायचा हे काय आहे ? जिल्हाधिकारी यांनी त्यावेळी कोटेशनवर काम दिले होते का निविदेवर दिलेले होते ? अशी विचारणा समितीने केली असता, कोटेशनवर काम दिले होते का निविदेवर दिले होते याची खात्री करावी लागेल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

कोटेशनवरच काम दिले गेले असेल. समिती समोर साक्षीसाठी आल्यानंतर संपूर्ण माहिती घेऊन विभागीय प्रतिनिधी येत नसतील तर ते बरोबर नाही. एक व्यक्ती मयत झालेली आहे, दुस-या व्यक्तीची पदोन्नती झालेली आहे आणि तिस-या व्यक्तीला माहिती नाही. या संदर्भातसुद्धा समितीला माहिती उपलब्ध करुन द्यावी असे निदेश समितीने दिले असता, एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट कॉल करण्यात आले होते. परंतु, कोटेशनवर काम दिले होते का निविदेवर दिले होते याबाबतची माहिती आता उपलब्ध नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट कॉल करण्यात आले म्हणजेच कोटेशनवर काम झालेले आहे. एक्सप्रेस ऑफ इंटरेस्ट वर्तमानपत्रात देण्यात आले होते का सूचना फलकावर लावण्यात आले होते ? जिल्हाधिकारी यांच्यापेक्षा कनिष्ठ अधिकारी किंवा डायरेक्टर यांनी हे केले असते तर समजू शकलो असतो. परंतु, जिल्हाधिकारी स्वतः अशा प्रकारे नियमाला डावलत असतील तर ते योग्य नाही. जिल्हाधिकारी यांच्याकडे या संदर्भात जी माहिती आहे ती त्यांनी समितीला द्यावी असे समितीने सूचित केले

असता, शाळांमध्ये जो प्रकल्प होता तो दिनांक ३० सप्टेंबर, २००९ रोजी मानव विकास मधून मान्य करण्यात आला होता. हा प्रकल्प जुलै, २०१० पासून सुरु करण्यात आला. तो प्रकल्प ३ वर्षे चालला असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

समितीचा शाळेच्या संदर्भात कोणताही आक्षेप नाही. जो आक्षेप आहे त्याबाबत समितीला माहिती द्यावी. लेखी माहितीमध्ये निविदा काढली असे नमूद केलेले आहे अशी विचारणा समितीने केली असता, पत्रामध्ये निविदा शब्द वापरण्यात आलेला आहे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

निविदा आहे का कोटेशन आहे हे विभागाने तपासून घ्यावे. निविदा प्रक्रिया कशी राबविण्यात आली हे सुद्धा समितीला कळले पाहिजे. समितीकडे वर्तमानपत्राची प्रत आहे. एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट कॉल करण्यात आलेले आहे. नागपूर येथील इतवार वर्तमानपत्रात एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट कॉल करण्यात आलेले आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागाला ही चूक मान्य आहे. शाळेचा सदरील प्रकल्प संपला. परंतु, विभागाचा प्रकल्प सुरु होता. आय.टी.आय.कडे नियंत्रण कक्ष असल्यामुळे १२ आयटीआय त्यामध्ये समाविष्ट केल्या. त्यामुळे नियंत्रण कक्षाची कॅपिटल कॉस्ट वाचली. त्याच नियंत्रण कक्षाचा वापर का करण्यात येऊ नये म्हणून १२ आयटीआय त्यामध्ये समाविष्ठ केले असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१२ आयटीआय समाविष्ट का केले याबद्दल समितीचे काहीही म्हणणे नाही. समितीचा मुद्दा एवढाच आहे की, ४८ लाख रुपयांचा पूर्ण वापर झाला नाही. विभागाने मान्य केलेले आहे की, २५ लाख रुपयांवरील खर्च निष्फळ झालेला आहे. मग या संदर्भात जबाबदारी निश्चित केली पाहिजे. कंत्राटदाराने पूर्ण काम करावे अशा प्रकारच्या अटी व शर्ती करारामध्ये नमूद करण्यात आलेल्या नाहीत. करारामध्ये अटी व शर्ती नमूद केल्या नाहीत येथपर्यंत ठीक आहे. जोपर्यंत ते पुढील काम करीत नाही तोपर्यंत मागील पेमेंट हेल्डअप केले पाहिजे. परंतु, तेही केले नाही. सिस्टीम कोणासाठी चालवित आहोत ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यांनी प्रत्येक आयटीआय मध्ये कॅपिटल सिस्टीम बसवून घेतल्यानंतर त्यांना ४८ लाख रुपये दिले गेले. त्यानंतर प्रत्येक महिन्याचा जो चालू खर्च होता तो दिला गेला. १७ महिन्यानंतर तो खर्च देण्याचे बंद झाले. खरे म्हणजे शासनाकडून पैसे आले होते. परंतु, विभागाने ते दिले नाहीत. कारण, ते बंद पडले होते. त्यामुळे त्यांनी शासनाकडून प्राप्त झालेले पैसे परत केले. विभागाने १७ महिन्यांचाच चालू खर्च दिलेला आहे. त्यांनी कॅपिटल सिस्टीम बसविल्यामुळे कॅपिटल कॉस्ट देण्यात आलेली आहे. परंतु, विभागाने जो भांडवली खर्च केला त्याचा १९ महिन्यापर्यंत वापर झाला नाही. त्याचा वापर करणे त्यांच्यावर बंधनकारक होते. त्याचा वापर केला असता तर विभागाने १९ महिन्यांचे प्रती माह ३ लाख रुपये दिले असते. ती सिस्टीम आणखी १९ महिने चालली असती तर हा प्रश्न उद्‌भवला नसता. त्या कंपनीला नियंत्रण कक्ष बंद करु द्यावयास नको होता. कारण भौतिक स्वरुपात तो नियंत्रण कक्ष आय.टी.आय.च्या प्रसीमेत होता. परंतु, त्या कंपनीच्या अशा प्रकारच्या कार्यवाहीमुळे १९ महिन्यांचा वापर होऊ शकला नाही. ते एक्स्पेंडिचर इन्फ्लक्च्युअस झाले असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कंपनी प्रकल्प सोडून गेल्यानंतर प्रशासनाने कंपनी विरुद्ध कारवाई केलेली आहे काय ? कंपनी प्रकल्प सोडून गेल्यामुळे शासनाने त्या कंपनीचे इतर ठिकाणी काम सुरु असेल तर त्यांना अडकविण्याचा प्रयत्न केला काय किंवा हा प्रकल्प चालला पाहिजे यासाठी शासनाने काही प्रयत्न केलेले आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यांनी विभागाला कॅपिटल ॲसेट्स दिले. म्हणजे कंपनीने व्ही-सॅट टर्मिनल वगैरे जे कॅपिटल ॲसेट्स दिले त्याच्या अगेन्स्ट ते मिळाले. परंतु, विभागाला १९ महिन्यांसाठी त्याचा फायदा झाला नाही. कारण, नियंत्रण कक्ष नसेल तर काही करता येत नाही. म्हणून तो खर्च निष्फळ झालेला आहे. विभागाने कंपनीला कोणत्याही प्रकारची नोटीस दिलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शासनाला यासंदर्भात शिफारस करु. मागील बैठकीमध्ये आश्वासन दिल्याप्रमाणे एका आठवड्याच्या आत सर्व कागदपत्रे समितीला उपलब्ध करुन द्यावीत असे समितीने निदेश दिले असता, या संदर्भात समितीला पूर्ण अहवाल देतो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :**

**परिच्छेद क्र. ३.२ “औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जावाढ करणे”**

**परिच्छेद क्र. ३.२.१ “नियोजन”**

**परिच्छेद क्र. ३.२.१.१ “औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची निवड”**

**अभिप्राय**

१.२ केंद्र शासनाने सन २००८ मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये दर्जावाढ करावयाच्या असलेल्या ITIs ची निवड करण्यासाठी धोरण विहित केले नव्हते. तसेच, दर्जावाढीसाठी निवडलेल्या २५० ITIs च्या निवड पद्धतीचे दस्तावेजीकरण केले नव्हते. फेब्रुवारी, २०१६ मध्ये लेखापरीक्षेस दर्जावाढीसाठी ITIs निवडण्यासाठी अवलंबिलेले तीन धोरण लेखापरीक्षेस कळविले. जे पुढीलप्रमाणे होते. (अ) ०१ जानेवारी, २००७ पूर्वी स्थापित झालेल्या ITIs, (ब) स्वतःची इमारत असणे आणि (क) ज्या ITIs चा जागातिक बँक योजनेअंतर्गत अंतर्भाव नव्हता. हे धोरण एप्रिल,२०११ मध्ये केंद्र शासनाद्वारे अधिघोषित करण्यात आले होते. तथापि, २५० पैकी ४४ ITIs, ज्या २०११-१२ मध्ये दर्जावाढीसाठी निवडण्यात आल्या होत्या. त्यापैकी तीन १ जानेवारी, २००७ नंतर स्थापित करण्यात आल्या होत्या आणि १३ ITIs भाडेतत्वावरील इमारतींमधून चालविण्यात येत होत्या.

१.३ याशिवाय राज्य सुकाणू समितीने तीन आदिवासी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे संस्था विकास आराखडे मंजूर केले आणि केंद्र शासनाने रु.७.५० कोटी निधी पुरविला. परंतु मंजुरीच्या एक ते दोन महिन्यातच, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालय, मुंबई ने आदिवासी ITIs ना निधी खर्च न करण्याबाबत सूचना जारी केल्या (जानेवारी २०१२) कारण त्यांच्याकडे त्यांची स्वतःची जमीन व इमारती नव्हत्या आणि पुरविलेला निधी दुस-या ITIs ला देण्यासंबंधी शिफारस केली. तथापि, ऑक्टोबर २०१६ पर्यंत आदिवासी ITIs नी निधी प्रत्यार्पित केला नव्हता आणि निधीच्या पुनर्वाटपासाठी दुसरे ITIs पण शोधले नव्हते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केलेले आहेत.

१.४ प्रशिक्षणाच्या संकल्पनेस आणि पद्धतीस अधिक मागणी प्रतिक्रियाशील करुन व्यवसाय प्रशिक्षण घेतलेल्या स्नातकांचे रोजगार स्तर उंचावण्यासाठी भारत सरकारने भारतातील १,८९६ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा (ITI) दर्जा उंचावून त्यांना सेंटर्स ऑफ एक्सलन्स (Centers of Excellence) मध्ये रुपांतरित करण्याचा निर्णय (ऑक्टोबर २००७) घेतला. त्यापैकी ५०० ITIs चे आधीच सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये दर्जावाढ करण्यात आले आणि उर्वरित १३९६ ITIs चे टप्प्याटप्प्याने दर्जावाढीसाठी करण्याचे ठरविण्यात आले केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दर्जावाढीसाठी प्रस्तावित प्रत्येक ITIs साठी राज्य शासनाने सहयोगी उद्योजकांची नेमणूक करावयाची होती, ज्यांनी ITIs मधील अभ्यास क्रमांमध्ये त्यांना सहाय्य, मार्गदर्शन करुन पुढे वाढण्यास मदत करावयाची होती. त्यांच्या अध्यक्षतेखाली एक संस्था व्यवस्थापन समिती (IMC) स्थापन करावयाची होती. ज्यात ITI चे प्राचार्य सदस्य सचिव होते. IMC ची संस्था नोंदणी अधिनियमांतर्गत नोंदणी करावयाची होती आणि ITI च्या व्यवहारांच्या व्यवस्थापनेसाठी IMC जबाबदार होती. विविध पक्षांच्या भूमिका आणि जबाबदा-या विहित असलेला एक सामंजस्य करार मांडावयाचा असून त्यावर केंद्र शासन, राज्य शासन आणि प्रत्येक संस्था व्यवस्थापन समिती अध्यक्षाने स्वाक्षरी करावयाची होती.

१.५ तसेच, प्रत्येक IMC ने संस्था विकास आराखडा तयार करुन त्यात संस्थेचे कार्य साध्यता आणि आर्थिक मुख्य निदर्शकांचे दीर्घकालीन लक्ष्य आणि वर्ष-निहाय विच्छेदन विहित करणे आवश्यक होते व उक्त संस्था विकास आराखडा राज्य सुकाणू समितीकडे त्यांच्या तपासणीसाठी पाठवावयास पाहिजे होते आणि नंतर निधी पुरविण्यासाठी त्यास राष्ट्रीय सुकाणू समितीकडे पाठवावयाचे होते. संस्था विकास आराखड्याच्या मंजुरीनंतर केंद्र शासनाने रु.२.५० कोटी बिन व्याजी कर्ज मंजूर करुन थेट प्रत्येक IMC ला द्यावयाचे होते. ज्याची परतफेड ३० वर्षांत करावयाची असून त्यात १० वर्षे अधिस्थगन कालावधी अंतर्भूत होता व त्यानंतर समान वार्षिक हप्त्यांमध्ये २० वर्षात त्याची परतफेड करावयाची होती.

१.६ महाराष्ट्रात राज्य सुकाणू समितीच्या (SSC) शिफारसींवर राष्ट्रीय सुकाणू समितीने (NSC) २५० ITIs चा टप्प्याटप्प्याने दर्जावाढ करण्याचे मंजूर केले. दर्जावाढ करण्यासाठी ITIs ची निवड योग्य व पारदर्शकरित्या करण्यात आली आहे किंवा कसे, पुरविलेला निधी यथोचितरित्या वापरण्यात आला आणि दर्जावाढीमुळे कौशल्ययुक्त मनुष्यबळ विकसित झाले याबाबतची खातरजमा करण्याच्यादृष्टीने, काही औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या दस्तावेजाची नमूना तपासणी केली असता निश्चित आराखड्याप्रमाणे योजनेची अंमलबजावणी झाली नसल्याचे निदर्शनास आले, यासाठी आवश्यक तेवढा निधी खर्च

झाला नाही, संस्था व्यवस्थापन समिती कार्यरत नसणे, अनेक प्रकरणांमध्ये उद्योगात बदल करावे लागले. परिणामी ज्या उद्देशाने ही योजना राबविण्यात आली तो उद्देश सफल झालेला नाही. या बाबी विभागीय सचिवांनी समितीसमोर मान्य केल्या.

१.७ याअंतर्गत महाराष्ट्रात २५० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी रु.६२५ कोटी प्राप्त झाले असून त्यापैकी आतापर्यंत रु.१७१ कोटी खर्च झालेले आहेत. तसेच शिल्लक रक्कम व सीडमनीचे डिपॉझीटवरील व्याज यातून अल्प मुदतीचे अभ्यासक्रम चालविण्यात येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. सद्यःस्थितीत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नाही, नविन अभ्यासक्रम सुरु केले जात नाहीत, नविन इमारती व यांत्रिकी उपकरणे नाहीत या सर्व बाबी विभागाने एकीकडे मान्य केल्या परंतु दुसरीकडे इतक्या मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला असताना त्याचा वापर करण्यात आला नाही. यात विभागाचा निश्चितच निष्काळजीपणा व नियोजनाचा अभाव दिसून येतो. अशाचप्रकारे इतर राज्यांना केंद्र शासनाकडून यासाठी जो निधी मिळाला त्याचा पुरेपूर फायदा त्या राज्यांनी केलेला असल्याची अनेक उदाहरणे असताना महाराष्ट्रात मात्र प्राप्त निधी देखील पुर्ण खर्च होवू नये यावरुनच प्राप्त निधी खर्च करण्याचे कोणतेही नियोजन विभागाकडे नव्हते हे सिध्द होते. जगात अत्याधुनिक व अद्ययावत यंत्रसामुग्रीच्या माध्यमातून कौशल्य विकासाचे अभ्यासक्रम व विशेष उपाययोजना राबविण्यात येत असताना महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जा पाहता आजही वर्षानुवर्षे जुन्या व कालबाह्य झालेल्या तंत्रज्ञानाच्याआधारे हे अभ्यासक्रम राबविण्यात येतात. परिणामी यातून तयार करण्यात आलेले विद्यार्थी हे तांत्रिकदृष्ट्या पुर्णपणे सक्षम न होता ते केवळ अकुशल कामगार म्हणून कार्यरत राहतात. सद्यःस्थितीत राज्यातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अभ्यासक्रम व त्यासाठी आवश्यक असणारी अद्ययावत यंत्रसामुग्री यांचा विभागाने आढावा घेवून या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे आधुनिकीकरणाचे धोरण निश्चित करुन विशेष उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने दोन महिन्यात या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या आधुनिकीकरणाचा प्रस्ताव तयार करुन उपलब्ध निधी खर्च करण्याची रुपरेषा समितीला सादर करण्याबाबत विभागीय प्रतिनिधींनी समितीला आश्वासित केले. परंतु अद्यापही असा प्रस्ताव समितीस सादर करण्यात आला नाही. परिणामी राज्यात कौशल्य विकास हा अतिशय दुर्लक्षित झाला आहे.

१.८ महालेखाकारांनी सदरहु परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप हे गंभीर स्वरुपाचे असून या उल्लंघनाबाबत समितीने विचारणा केली असता या १३ इमारतींचे बांधकाम सुरु होते त्यामुळे त्यांची निवड करण्यात आली असे समितीला सांगण्यात आले. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची स्वतःची इमारत नसेल तर त्यांची निवडच करु नये अशी स्पष्ट तरतूद असताना हे उल्लंघन करण्याची कारणे काय ? निकषामध्ये बसणारे प्रस्ताव त्यावेळी विचारार्थ नव्हते काय ? याबाबत समितीने विचारणा केली असता जिल्हा व शहर स्तरावरील जास्तीत जास्त संस्था या जागतिक बँक प्रकल्पामध्ये समाविष्ट असल्यामुळे ज्या उर्वरित संस्था होत्या त्यांच्यातूनच निवड करण्याचा पर्याय शिल्लक असल्यामुळे अशा संस्थांची निवड करावी लागल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. ज्या संस्था निकषातच बसत नाहीत त्यांना निवडण्याची विभागाची ही कारणमिमांसा निश्चितच समर्थनीय नाही. निश्चित केलेल्या धोरणांची अंमलबजावणी करणे विभागावर बंधनकारक आहे. एवढेच नव्हे तर ज्या तीन आदिवासी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची निवड करण्यात आली त्यांची स्वतःची जमीन व इमारती नव्हत्या आणि पुरविलेला निधी दुस-या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस देण्यासंबंधी शिफारस केली. तरीही तो निधी प्रत्यार्पित केला नव्हता. या तीन संस्थांच्या ऐवजी अन्य संस्थांची निवड करण्याबाबत निर्णय घेण्यात येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. त्याअनुषंगाने तीन उद्योजकांच्या आस्थापनेची निवड औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी करण्यात आली असून त्यांच्यासोबत करावयाचा करार आता अंतिम टप्प्यात असल्याचे समितीस सांगण्यात आले. तीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था दि.१ जानेवारी, २००७ पुर्वीची संस्था असणे आवश्यक असताना त्या नंतरच्या दिनांकास स्थापित करण्यात आलेल्या असताना त्यांचा समावेश करण्यात आला. या मागील कारणे समितीने विचारली असता हा निर्णय शासनाच्या नियमाविरुध्द होता हे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्य केले. परंतु आदिवासी बहुल भागातील तरुणांना तातडीने रोजगार उपलब्ध व्हावा म्हणुन सुकाणू समितीने हा निर्णय घेतला असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. याचाच अर्थ राज्यात ही योजना राबविताना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन झाल्याचे निश्चितच दिसून येते. अशाप्रकारे आयटीआयची निवड केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार व विहित निकषानुसार झाली नाही हे स्पष्टपणे दिसून येते. तर काही MoU तर कार्यान्वित देखील झाले नाहीत व यासाठी सुकाणू समितीच्या नियमित बैठका देखील घेण्यात आल्या नाही. या सर्व बाबी गंभीर स्वरुपाच्या असून योजनेच्या नियोजनातील व अंमलबजावणीतील त्रुटी व अभाव दर्शविणा-या आहेत. याअनुषंगाने साध्य करावयाचा हेतू साध्य होऊ शकला नाही.

**शिफारस–**

**१.९ महालेखाकारांनी नोंदविलेले उपरोक्त गंभीर आक्षेप पाहता औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे दर्जावाढ करण्यासाठीचे निधीचे व कामाचे नियोजन अपुरे होते हे सिध्द होते. दर्जावाढ करण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची निवड करण्याबाबत राज्य शासनाने कोणतेही धोरण विहित केले नव्हते. परिणामी केंद्र शासनाकडून प्राप्त निधी मोठ्या प्रमाणात अखर्चित राहिला आणि निधी असून देखील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या आधुनिकीकरणाचा व दर्जावाढीचा उद्देश सफल होवू शकला नाही. एवढेच नव्हेतर प्राप्त निधीच अखर्चित राहिल्यामुळे वाढीव निधी देखील केंद्र शासनाकडे मागता आला नाही. देशातील अन्य राज्यांनी या योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात निधी मिळवून घेतला असतानाही व महाराष्ट्रात औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची परिस्थिती अत्यंत सुमार दर्जाची असताना प्राप्त निधीचा गुणवत्तेवर विनियोग या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या आधुनिकीकरणासाठी व दर्जावाढीसाठी विभागाला करता आला नाही. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जावाढ करण्यासाठी संस्थांची निवड करण्यासाठी धोरण विहित न केल्यामुळे तात्पुरत्या स्वरुपात विहित अटी शर्तीनुसार ही निवड करण्यात आली. त्यातही काही ठिकाणी या अटी शर्तींचे देखील पालन न केल्यामुळे योजनेची अंमलबजावणी दोषपूर्णरित्या झाली. विभागाला प्राप्त रु.३१२.५ कोटीपैकी फक्त १७१ कोटी खर्च करता आला. एवढेच नव्हे तर हा निधी सन २०११-१२ मध्ये प्राप्त होऊनसुध्दा ६ वर्षे खर्च करता आला नाही. हा पुर्णतः नियोजनाचा अभाव असून समिती याबाबत तिव्र नापसंती व्यक्त करीत आहे. अतः या परिच्छेदात आक्षेपित बाबी संदर्भात सखोल चौकशी करण्यात यावी व गुणवत्तेनुसार निवड न झालेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसंदर्भात शासनस्तरावरुन योग्य ती कडक कारवाई करण्यात यावी. तसेच यात जबाबदार असणा-या अधिका-यांवर देखील कारवाई करण्यात यावी. तसेच विभागाने या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या दर्जावाढीच्या कामाच्या नियोजनातील उणिवा भरुन काढाव्यात व विनावापर पडून राहिलेल्या निधीचा आणि भौतिक पायाभूत सुविधांच्या उचित वापरासाठी उपाययोजना करावी. तसेच कौशल्य विकास व रोजगार क्षमतेचे मोठे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी एक भक्कम संनियंत्रण यंत्रणा स्थापित करावी. राज्यातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या आधुनिकीकरणासंदर्भात व्यापक धोरण निश्चित करावे व या औद्योगिक संस्थांमध्ये अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह अद्ययावत स्वरुपाचे अभ्यासक्रम राबवून विद्यार्थ्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी कुशल व सक्षम करणे संदर्भात आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावीत व या योजनेची अंमलबजावणी राज्यात प्रभावीपणे करण्यात यावी त्यासाठी निकष विहीत करण्यात यावे व त्याची अंमलबजावणी गुणवत्तेवर करण्यात यावी. यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.२.१.२ “सहयोगी उद्योजकांची निवड ”**

**अभिप्राय**

१.१० एप्रिल २००८ च्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दर्जावाढीची प्रक्रिया पुढे वाढविण्यासाठी प्रत्येक ITI सोबत एक सहयोगी उद्योजक (Industry Partner) असावयास पाहिजे होते. परंतु या विहीत प्रमाणाचे पालन करण्यात आले नव्हते.

१.११ याशिवाय, केंद्र शासनाने विहित केल्याप्रमाणे सहयोगी उद्योजक हे एक उत्पादन घटक किंवा मूलभूत सुविधा (Infrastructure) कंपनी किंवा माहिती तंत्रज्ञान कंपनी असणे आवश्यक असून जिची वार्षिक उलाढाल कमीतकमी रु.१० कोटी असावयास पाहिजे. तसेच ITI हे सहयोगी उद्योजक पासून १०० किमी त्रिज्या अंतराच्या आत स्थित असावयास पाहिजे. तसेच कमीत कमी पाच वर्षापासून क्रियाशील असावयास पाहिजे आणि (ड) तिने कमीतकमी २५ लोकांना रोजगार द्यावयास पाहिजे. अशा सर्व अटींचे पालन करणे आवश्यक होते. परंतु राज्य सुकाणु समितीने निवडलेल्या सहयोगी उद्योजकांपैकी १३ उद्योजकांची वार्षिक उलाढाल फक्त रु. २.५० कोटी ते रु.७.५० कोटी दरम्यान होती

**शिफारस–**

**१.१२ सदरहू उल्लंघनाबाबतची वस्तुस्थिती विभागाने मान्य केली व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या आजूबाजूला जास्त औद्योगिक आस्थापना उपलब्ध नसल्यामुळे ज्या औद्योगिक आस्थापनांनी दर्जावाढ योजनेत रुची दर्शविली त्यांची वार्षिक उलाढाल विचारात न घेता सहयोगी उद्योजक म्हणून त्यांची निवड करण्यात आली ही बाब निश्चितच समर्थनीय नाही. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा सध्या अस्तित्वात असलेला दर्जा उंचावण्यासाठी ही योजना राबविण्यात येत असताना केवळ प्राप्त निधी खर्च करण्यासाठी थातूरमातूर पद्धतीने व विहीत निकष न पाळता सहयोगी उद्योजकांच्या निवडीचे सोपस्कार विभागाने पार पाडणे निश्चितच या योजनेंतर्गत अभिप्रेत नाही. वार्षिक उलाढाल कमीत कमी रु.१० कोटी ठेवण्यामागील उद्देश हा गुणवत्ताधारक सहयोगी उद्योजकाची निवड करणे व त्यांच्या अनुभवाचा लाभ या आयटीआयच्या दर्जावाढीसाठी होणे अभिप्रेत**

**असताना ती अटच शिथील केल्यामुळे ही अट समाविष्ट करण्याचा हेतूच सफल होऊ शकला नाही. सहयोगी उद्योजकांच्या कामाच्या गुणवत्तेबाबत अशी तडजोड करण्याची कोणतीही आवश्यकता विभागाला नव्हती. परिणामी सन २०१२ पासून ते २०१४ पर्यंत सहयोगी उद्योजकाच्या निवडीची केवळ तांत्रिक प्रक्रिया पार पाडण्यात आली परंतु त्यातून कोणताही हेतू साध्य झाला नाही. काही ठिकाणी सहयोगी उद्योजकांसमवेत केवळ कागदोपत्री एमओयु करुन केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन झाल्याचे दर्शविण्यात आले. परंतु हे एमओयु कार्यान्वित देखील झाले नाहीत अथवा ते कार्यान्वित करण्यासाठी विभागाने कोणतेही प्रयत्न केले नाहीत. अनेक औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये कागदोपत्री निवड केलेल्या सहयोगी उद्योजकांचा कामकाजात प्रत्यक्ष सहभाग नव्हता. सहयोगी उद्योजकाची निवड करण्यासाठी केंद्र शासनाने जे निकष विहित केले होते त्याचे उल्लंघन करुन ही निवड करण्याची कोणतीही आवश्यकता नव्हती असे समितीचे स्पष्ट मत आहे. तसेच ज्या सहयोगी उद्योजकांची निवड केली जाते त्यांची काम करण्याची व निर्णय घेण्याची पध्दत आणि शासनाची काम करण्याची पध्दत याचा कोठेही ताळमेळ नसल्यामुळे देखील अनेक अडचणी उद्भवतात. कित्येक सहयोगी उद्योजकांनी त्यांना विभागाकडून पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नसल्याचे देखील कळविले आहे. या सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना गतीमान अद्ययावत व अत्याधुनिक करावयाचे झाल्यास सहयोगी उद्योजकांची विहित निकषानुसार गुणवत्तेवर निवड करण्यात यावी, त्यांचे समवेत नियमित बैठका घेऊन कामकाजाचा योग्य तो ताळमेळ ठेवण्यात यावा. केवळ प्राप्त निधी कसेही करुन खर्च करण्याची भूमिका न ठेवता या निधीचे गुणवत्तापुर्वक विनियोग करुन आयटीआयचा दर्जावाढ करण्यात यावा व सहयोगी उद्योजकांच्या निवडीसंबंधीच्या धोरणाचे अनुपालन करण्यात यावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.२.१.३ "संस्था व्यवस्थापन समितीचे गठन"**

**अभिप्राय**

१.१३ केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार एक ११ सदस्यीय संस्था व्यवस्थापन समिती (IMC) गठित करावयाची होती ज्यात सहयोगी उद्योजक किंवा त्यांचे प्रतिनिधी अध्यक्षपदी आणि प्राचार्य ITI सदस्य सचिव, तसेच सहयोगी उद्योजकाने नजिकच्या उद्योगधंद्याचे असे चार सदस्य नामनिर्देशित करावयास पाहिजे ज्यामुळे संस्था व्यवस्थापन समिती ची व्यापकता वाढेल आणि तसेच राज्य शासनाद्वारे नामनिर्देशित पाच सदस्य अशा सर्व सदस्यांचा समावेश असणे आवश्यक आहे.

१.१४ परंतु ७ आटीआयमध्ये सहयोगी उद्योजकाने नामनिर्देशित केलेले चार सदस्य त्याच उद्योगधंद्यांचे होते किंवा त्यांचे कुटुंबीय सदस्य होते अथवा ब्युटी पार्लर, शिकवणी वर्ग (ट्युटोरिअल्स) इत्यादि सेवा पुरवठादार होते. तसेच राज्य सुकाणू समितीद्वारे सहयोगी उद्योजक बदलण्याची मंजुरी प्रलंबित असल्यामुळे सहसंचालक, पुणे हे चार ITIs च्या संस्था व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष म्हणून तीन महिने ते चार वर्ष (जून २०१६ पर्यंत) एवढ्या कालावधीसाठी कार्यरत होते. या सर्व बाबी अतिशय गंभीर असून आयटीआयच्या दर्जावाढीसाठी अत्यंत महत्वपुर्ण असतानाही त्याची अंमलबजावणी योग्य रित्या करण्यात आली नाही ही बाब निश्चितच गंभीर आहे.

१.१५ राज्य शासनाने देखिल वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले की, संस्था व्यवस्थापन समितीने त्यागपत्र दिल्यामुळे, सहसंचालक, पुणे यांची संस्था व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी नेमणूक करण्यात आली होती. अतः हे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे निश्चितच उल्लंघन आहे कारण सहसंचालकांचे कोणत्याही उद्योगासोबत काहीही संबंध नव्हते त्यामुळे या समितीमध्ये समाविष्ट करावयाच्या सदस्यांच्या पात्रतेमध्ये तडजोड करण्यात आली. ही बाब निश्चितच निकषांचे उल्लंघन करणारी असून विहित उद्देश साध्य करण्यात अडथळा आणणारी आहे.

**शिफारस–**

**१.१६ महालेखाकारांनी नोंदविलेले सदरहु आक्षेप अत्यंत गंभीर असून मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करणारे आहेत. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जावाढ उत्कृष्टरित्या होण्यासाठी दर्जावाढ कार्यक्रमांतर्गत विविध कामांची अंमलबजावणी करण्यासाठी जबाबदार असणा-या संस्था व्यवस्थापन समितीमध्ये समाविष्ट करावयाच्या सदस्यांची अर्हता व निकष विशिष्ट उद्देश देऊनच निश्चित करण्यात आलेले असून त्याचे पालन करणे विभागावर बंधनकारक आहे. अतः अशा समितीचे गठन मार्गदर्शक तत्वांनुसारच करण्यात यावे व कोणत्याही परिस्थितीत त्याचे ज्या ठिकाणी समितीच्या अध्यक्ष पदाच्या राजीनाम्यामुळे पदे रिक्त असतील त्या ठिकाणी मार्गदर्शक सूचनेनुसार संस्थानिहाय नविन सहयोगी उद्योजक निवडण्याचा निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.२.१.४ “मंजुरीनंतर संस्था विकास आराखड्यात बदल करणे”**

**अभिप्राय**

१.१७ महालेखाकारांनी केलेल्या तपासणीत ४५ ITIs नी त्यांच्या संस्था विकास आराखड्यात मध्ये केंद्रशासनाद्वारे निधी वितरीत केल्यानंतर एकदा किंवा एक पेक्षा जास्त वेळा बदल केले होते.

याशिवाय ITIs द्वारे बदल करण्यासाठी सादर केलेल्या ४५ संस्था विकास आराखड्याच्या सादर करण्याच्या तारखेपासून एक ते चार वर्षे एवढ्या कालावधीच्या विलंबाने, मंजुरी प्रदान केली. परिणामी, ITIs संलग्नीकरणाची प्रक्रिया, सुधारित संस्था विकास आराखड्यामध्ये प्रस्तावित व्यवसाय अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण आणि त्या व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी साधन, यंत्रे आणि उपकरणांवरील खर्च या संबंधात पुढे कार्य करु शकले नाही परिणामी आराखड्यातील बदलामुळे उद्दिष्ट साध्य होण्यास विलंब झाला.

१.१८ संस्था विकास आराखड्यामध्ये सुधारणेतील विलंबासाठी व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालय, मुंबई आणि राज्य सुकाणू समिती स्तरावर वेळेची आणि मनुष्यबळाची कमतरता जबाबदार असल्याचे विभागाचे मत समिती ग्राह्य धरु शकत नाही. अशाप्रकारे विभागाला केलेल्या कृतीचे वा उल्लंघनाचे समर्थन करता येणार नाही. ४५ संस्था विकास आराखड्यामध्ये बदल करण्यात आला परंतु काही ठिकाणी काम देखील सुरु झालेले नाही. आक्षेपित ४५ संस्थांमधील मुळ आराखड्यामध्ये प्रस्तावित केलेल्या अभ्यासक्रमांपेक्षा इतर अभ्यासक्रमांना संस्थेच्या क्षेत्रामध्ये मागणी असल्याचे निदर्शनास आल्यामुळे संबंधित संस्थांनी सुधारीत संस्था विकास आराखडे सादर केले. या सुधारीत आराखड्यास सुकाणू समितीची मंजूरी आवश्यक असल्यामुळे उपलब्ध मनुष्यबळाच्या आधारे ती करण्यात विलंब झाला. परंतु त्या कालावधीत मुळ आराखड्यानुसार कार्यक्रम योजनेची अंमलबजावणी करण्यात आली. तसेच राज्य सुकाणू समितीची मान्यता मिळेपर्यंत कोणताही खर्च विभागामार्फत करण्यात आलेला नसल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले ही विभागाची भूमिका समर्पक नसून महालेखाकारांच्या आक्षेपांचे अशाप्रकारे खंडन विभागाला करता येणार नाही.

**शिफारस–**

**१.१९ महालेखाकारांनी नोंदविलेले सदरहू आक्षेप हे अत्यंत मुलभूत स्वरुपाचे व महत्त्वाचे असून त्याची अंमलबजावणी करणे विभागावर बंधनकारक असताना त्यात बदल करण्यात आले. याचाच अर्थ मुळ तयार केलेले संस्था विकास आराखडे हे दोषपुर्ण होते तसेच अद्ययावत अभ्यासक्रमांवर आधारीत नव्हते असाच होतो. मुळ आराखडा तयार करतानाच संपुर्ण विचारपूर्वक, प्रचलित अभ्यासक्रम, भविष्यात त्या अभ्यासक्रमाची मागणी व उपयोगिता या सर्व बाबींचा परिपूर्ण विचार करुनच हे विकास आराखडे तयार करणे अभिप्रेत असताना विभागाने या बाबींचा सारासार विचार न करता ते तयार करणे व नंतर त्यात सुधारणा प्रस्तावित करणे हे कदापि योग्य व समर्थनीय नाही. तसेच सुधारीत आराखड्यास मंजूरी मिळेपर्यंत मुळ आराखड्यानुसार कार्यक्रम योजनांची अंमलबजावणीमध्ये कोणतीही कमतरता नव्हती असे विभागाचे म्हणणे देखील अतिशय आक्षेपार्ह आहे व झालेल्या विलंबाचे केवळ समर्थन करणारी आहे. सुधारीत विकास आराखडा जर प्रस्तावित करण्यात आला असल्यास एक तर त्यास विहित मुदतीत मान्यता घेवून त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक व अभिप्रेत आहे. परंतु तोपर्यंत जुन्या विकास आराखड्याची अंमलबजावणी करणे हे कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नाही. तसेच मुनष्यबळाचा अभाव हे कारण देखील विलंबासाठी निश्चितच समर्थनीय नाही. संस्था विकास आराखडा तयार करताना तो अतिशय काळजीपूर्वक व दोष विरहित करणे अभिप्रेत आहे. त्यात सुधारणा व बदल केल्यास अंमलबजावणीत मोठ्या प्रमाणात अडचणी येतात हे विभागांना ज्ञात असताना या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात विलंब झालेला आहे. समिती या कार्यपध्दतीबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. भविष्यात विभागाने अशा कार्यपध्दतीचा अवलंब टाळावा. तसेच संस्था विकास आराखड्याच्या प्रस्तावित बदलास राज्य सुकाणू समितीची मान्यता मिळेपर्यंत किती खर्च करण्यात आला याबाबतची आयटीआयनिहाय माहिती समितीने विचारली असता ती देण्याबाबत समितीस आश्वासित करण्यात आले. परंतु अद्यापही ती माहिती समितीस सादर करण्यात आली नाही. ही अत्यंत गंभीर बाब आहे. अतः ही माहिती १ महिन्याच्या आत समितीस सादर करण्यात यावी व माहिती देण्यास झालेल्या विलंबाची कारणे व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस २ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.२.२ "वित्तीय व्यवस्थापन"**

**परिच्छेद क्र. ३.२.२.१ "निधीचा कमी वापर"**

**अभिप्राय**

१.२० दर्जावाढ कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाने २५० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना रु.६२५ कोटी संवितरित केले. एप्रिल २००८ च्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सहभागी होणा-या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना दर्जावाढ निधीच्या ५० टक्के (रु.३१२.५०) सीड मनी (Seed Money) म्हणून राखण्याची मुभा होती. २५० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी पाच ते नऊ वर्षाच्या कालावधीत एकूण उपलब्ध निधी रु.३१२.५० कोटी मधून फक्त रु.१६७.२७ कोटी खर्च केले. याशिवाय, काही औद्योगिक प्रशिक्षण संस्था भाड्याच्या इमारतीमधून कार्यरत असणे, जागेचा अभाव, व्यवसायाचे संलग्नीकरण न करणे, संस्था विकास आराखडेकार्यान्वित करण्याकरिता संस्था व्यवस्थापन समिती तयार नसणे इत्यादी कारणांमुळे सन २००९-१२ दरम्यान मंजूर केलेल्या १२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी माहे जून, २०१६ पर्यंत काहीही खर्च केला नाही. तसेच सन २००७-१२ दरम्यान मंजूर केलेल्या ५६ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी मोठा कालावधी लोटल्यानंतरही माहे, जून २०१६ पर्यंत फक्त रु.१० लाखापेक्षा कमी खर्च केला या बाबी निश्चितच वित्तीय शिस्तीला अनुसरुन नाही. हा सर्व निधी विभागाला केंद्र शासनामधून प्राप्त होत असतांनाही त्याचा गुणवत्तापुर्वक विनियोग विभागाला करता आला नाही.

१.२१ विभागाने २५० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांद्वारे दर्जा उंचावण्यासाठी करण्यात आलेला खर्च कमी असल्याची वस्तुस्थिती समितीसमोर मान्य केली. या कमी खर्चासाठी कारणीभूत असलेल्या बाबींची समितीने तपासणी केली असता संस्था विकास आराखड्यातून काही अभ्यासक्रम बंद झाल्याने, संस्था विकास आराखड्याची सहयोगी उद्योजक व संस्था व्यवस्थापन समिती यांची योजनेप्रती असलेली अनास्था, परिणामी आराखड्याची प्रभावीपणे अंमलबजावणी न होणे, राज्य सुकाणू समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार जोपर्यंत योजनेचा आढावा होत नाही तोपर्यंत फक्त निदेशकांचे मानधन व लेखापरिक्षणाचे शुल्क या व्यतिरिक्त कोणताही खर्च करण्यात येवू नये असा निर्णय घेण्यात येणे, पदांची मान्यता असताना पदभरती न करणे, नविन अभ्यासक्रमास शासनाकडून पदनिर्मिती केली जाणार नसल्यामुळे नविन व्यवसाय किंवा तुकडी सुरु करण्यात न येणे. या उपरोक्त कारणांस्तव हा खर्च कमी झाल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले. तसेच विभागाने निश्चित केल्याचे उर्वरित अखर्चित निधी या वर्षी खर्च करण्याबाबत समितीस सांगण्यात आले. हा सर्व अखर्चित निधी आयटीआय स्तरावर संस्था व्यवस्थापन समितीच्या खात्यावर ठेवण्यात आलेला असून तो एक वर्षाच्या आत खर्च करण्यात येईल असे समितीस आश्वासित करण्यात आले.

**शिफारस–**

**१.२२ महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नमूद आक्षेपासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी निधी कमी खर्च होण्यासाठी दिलेली कारणमिमांसा निश्चितच समर्थनीय नाही. केंद्र व राज्य शासनाकडून कित्येक योजनांना निधी देखील प्राप्त होत नाही. त्यामुळे योजनांचे काम प्रलंबित राहते अथवा सुरुच होऊ शकत नाही. परंतु या ठिकाणी केंद्र शासनाकडून या दर्जावाढीच्या कामाकरीता मोठ्या प्रमाणात निधी मिळत असूनही तो विभागाला गुणवत्तेनुसार विहित प्रयोजनासाठी खर्च करता आला नाही हे दुर्देवच आहे. विभागाने निधी कमी खर्च करण्याची दिलेली कारणमिमांसा ही संपुर्णतः प्रशासकीय स्वरुपाची असून प्राप्त निधीचा विनियोग गुणवत्तेनुसार करण्यासाठी विभागाने योग्य नियोजन करुन हा निधी वापरणे व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जावाढ करणे आवश्यक व अभिप्रेत होते. परंतु यासाठी विभाग अपयशी ठरला. त्याचप्रमाणे काही प्रकरणी निधीचा गैरव्यवहार देखील झाल्याचे समितीसमोर आले असून त्यास विभागीय प्रतिनिधींनी मान्य देखील केले. केवळ केंद्र शासनाकडून प्राप्त निधी खर्च करणे एवढाच उद्देश विभागाने ठेवला. निधी कोणत्या कामांवर, किती प्रमाणात व गुणवत्तेनुसार खर्च होतो आहे किंवा कसे याचा नियमित आढावा देखील विभागीय प्रतिनिधींनी घेतला नाही. नियमितरित्या या बाबींचा आढावा घेतला असता तर निश्चितच हा निधी इतक्या मोठ्या प्रमाणात अखर्चित राहिला नसता. आता समितीसमोर विभागीय प्रतिनिधी हा निधी १ वर्षात खर्च करण्याबाबत आश्वासित करतात परंतु आगामी वर्षभरात या निधीचा उपयोग व विनियोग करण्याचे कोणते नियोजन वा रुपरेषा विभागाकडे आहे अशी समितीने विचारणा केली असता याची कुठलीही रुपरेषा विभागाकडे उपलब्ध नव्हती. विभागाच्या या अनियोजनबध्द कामामुळे निधीचा विनियोग होऊ शकला नाही त्यामुळे संस्थांचे उत्पन्नदेखील सुरू होऊ शकले नाही व यातच तर या कर्जाची परतफेड करण्याचा कालावधी मात्र आता सुरु होण्याच्या मार्गावर आहे. या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी केंद्र शासनाद्वारे प्राप्त निधीचा विनियोग योग्य ठिकाणी करुन त्यातून प्राप्त होणा-या उत्पन्नातून ही कर्जाची परतफेड करणे**

**अभिप्रेत असताना निधी देखील खर्च झाला नाही, त्यातून उत्पन्न देखील होवू शकले नाही व निधी परतफेड करणे क्रमप्राप्त ठरले या सर्व बाबी अतिशय आक्षेपार्ह असून कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नाही. विभागाने या प्रकरणी जबाबदारी निश्चित करुन संबंधितांवर कारवाई करावी. तसेच अखर्चित निधीचे योग्य नियोजन तात्काळ करुन हा निधी गुणवत्तेनुसार खर्च करण्यासाठी बृहत आराखडा तयार करुन त्याची कालबध्द पध्दतीने अंमलबजावणी करावी. यासाठी येणा-या प्रशासकीय अडचणींचे कालबध्दरित्या निराकरण करुन योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.२.२.२ "औद्योगिक प्रशिक्षण संस्थांद्वारे उत्पन्न निर्मिती <u>(Revenue Generation)</u>"**

**अभिप्राय-**

१.२३ केंद्र शासन, राज्य शासन आणि संस्था व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यांच्यात संपादित झालेल्या सामंजस्य करारानुसार प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने न केवळ संस्था कायमस्वरुपी चालविण्यासाठी पुरेसे उत्पन्न निर्मित करावयास पाहिजे तर त्या उत्पन्नातूनच दर्जावाढ कार्यक्रमांतर्गत देण्यात आलेल्या कर्जाची परतफेड ही करता येईल, यासाठीही पुरेसे उत्पन्न निर्मित करावयास पाहिजे. परंतु संस्था व्यवस्थापन समितींनी उत्पादनाभिमुख प्रशिक्षण योजना (Production-Oriented Training Scheme - POTS) जसे संगणक जॉब वर्क, विद्युतीकरण, वेल्डींग काम, मशीन जॉब वर्क आणि अल्पावधी कोर्सेस चालविणे अशा कार्य योजना आखून त्यातून उत्पन्न निर्मिती केली होती. तथापि, ६६ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांपैकी कोणतेही औद्योगिक प्रशिक्षण संस्था पडताळणीसाठी लेखापरीक्षेस या कार्य योजनांचे दस्तावेज सादर करु शकले नाही.

याशिवाय, ६३ संस्था व्यवस्थापन समितींनी DVET मुंबई ला सादर केलेल्या तिमाही प्रगती अहवालांच्या (QPRs) पडताळणीत असे आढळले की, माहे मार्च, २०१६ पर्यंत ३० IMCs द्वारे POTS सुरु करण्यात आले नव्हते आणि उर्वरित ३३ IMCs मध्ये सन २००७-०८ ते २०१५-१६ (९ वर्षे) दरम्यान अल्पावधी प्रशिक्षण कोर्सेसच्या माध्यमातून एकूण रु.१.७८ कोटी उत्पन्न निर्मिती केली. जे रु.६२५० (औद्योगिक प्रशिक्षण संस्था, देवगड) ते रु.७९.७८ लाख (औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नाशिक मुली) दरम्यान होते. अशाप्रकारे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची दीर्घावधीसाठी कायम राखण्यासाठी ही उत्पन्न निर्मिती खूप कमी होती. हे नमूद करणे समर्पक आहे की, या ६३ संस्था व्यवस्थापन समितींनी

सन २००७-०८ ते २०१५-१६ दरम्यान केंद्र शासन अनुदान नियत ठेव म्हणून ठेवल्यामुळे मिळणा-या व्याजाच्या स्वरुपात एकूण रु.७४.३९ कोटी अर्जित केले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नोंदविलेले आहेत.

**शिफारस–**

**१.२४ केंद्र शासनाने राबविलेल्या सदरहू योजनेंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जावाढ करण्यासाठी केंद्र शासनाने निधी उपलब्ध करुन दिला असून यातून औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना उत्पन्न निर्मिती करुन कर्जाची परतफेड करणे अभिप्रेत असताना या माध्यमातून अद्यापही समाधानकारक उत्पन्न निर्मिती झाली नाही. तसेच नजिकच्या काळात उत्पन्न वाढविण्यासाठी देखील विभागाकडे प्रभावी उपाययोजना व उद्दिष्ट समितीला दिसून आले नाही. उत्पन्न निर्मिती समाधानकारक होवू शकली नाही ही वस्तुस्थिती विभागीय प्रतिनिधींनी मान्यच केली. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये नियमित प्राचार्य नसल्यामुळे व नविन अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी संलग्नीकरण प्राप्त न झाल्यामुळे उत्पन्न निर्मितीवर विपरित परिणाम झाला हे विभागाचे म्हणणे समिती कदापि मान्य करु शकत नाही. या सर्व प्रशासकीय बाबीसंदर्भात योग्यवेळी निर्णय घेवून योजनेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही विभागीय प्रतिनिधींचीच होती व ते करण्यास विभाग अपयशी ठरला असून समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची सद्यःस्थितीतील अवस्था पाहता विभाग हा विषय गांभीर्याने हाताळत नसल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. केंद्र शासनाच्या अनुदानाच्या नियत ठेव मध्ये गुंतवणुक व्याजाच्या उत्पन्नापासून ही कर्जाची परतफेड करणे व उत्पन्न निर्मिती करणे अभिप्रेत असताना विभाग त्यात कमकुवत ठरला व ही बाब कदापी समर्थनीय नाही. अतः विभागाने या संदर्भात जबाबदारी निश्चित करावी तसेच भविष्यात उत्पन्न निर्मिती करण्यासाठी व योजनेला चालना देण्यासाठी प्रभावी उपाययोजना करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस २ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.२.३ "अंमलबजावणी "**

**परिच्छेद क्र. ३.२.३.१ "राज्य अंमलबजावणी कक्षाची स्थापना न करणे"**

**अभिप्राय**

१.२५ राज्य स्तरावर या कार्यक्रमाचे व्यवस्थापन, संनियंत्रण आणि मूल्यमापन करण्यासाठी दोन सहाय्यक संचालक (तांत्रिक), एक लेखाधिकारी (वित्त), एक कार्यालय अधीक्षक आणि सहायक कर्मचारी कार्यरत असलेले एक राज्य अंमलबजावणी कक्ष सन २००७-०८ ते सन २०११-१२ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी स्थापित करावयाचे होते. राज्य अंमलबजावणी कक्ष हे राज्य सुकाणू समितीच्या मार्गदर्शनाखाली दर्जावाढ कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार होते. परंतु केंद्र शासनाने जरी राज्य अंमलबजावणी कक्षाच्या स्थापनेसाठी सन २००९-११ मध्येच रु.४०.७५ लाख वितरित केले होते तरीही माहे जानेवारी,२०१७ पर्यंत राज्य अंमलबजावणी कक्षाची स्थापना झाली नव्हती. तसेच राज्य सरकारने निधी हा देखील प्रत्यार्पित केला नव्हता आणि माहे जानेवारी,२०१७ पर्यंत केंद्र शासनाकडे उपयोगिता प्रमाणपत्रही पाठविले नव्हते.

१.२६ राज्य अंमलबजावणी कक्ष नसल्यामुळे संस्था विकास आराखड्याची अपूरी पडताळणी झाली. सुधारित आराखड्याच्या मंजूरीसाठी विलंब झाला. उभारलेल्या नवीन इमारती तशाच विनावापर पडून राहिल्या. राज्य सुकाणु समितीद्वारे राज्य अंमलबजावणी कक्षांवर नियंत्रण अपूरे राहिले. ज्यामुळे कार्यक्रमाच्या एकूण अंमलबजावणीवर आणि संनियंत्रणावर प्रतिकूल परिणाम झाला असे समितीचे स्पष्ट मत आहे.

**शिफारस–**

**१.२७ महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदांतर्गत नमूद केलेले आक्षेप अत्यंत गंभीर व महत्त्वाचे असून या आक्षेपाबाबतची वस्तुस्थिती विभागीय प्रतिनिधींनी मान्य केली असून कर्मचारी वर्गाच्या कमतरतेमुळे राज्य अंमलबजावणी कक्षाची स्थापना होवू शकली नाही असे समितीसमोर सांगण्यात आले. ही बाब अतिशय आक्षेपाई असून विभागाने या सर्वच परिच्छेदांसंदर्भात केवळ अशाप्रकारच्या प्रशासकीय कारणास्तव योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे झाली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. अंमलबजावणी कक्षासाठी गत १० वर्षापासून विभागाला रु.४० लक्ष मिळालेले असताना हा निधी देखील अखर्चित राहणे ही देखील बाब गंभीर आहे. अतः विभागाने राज्य अंमलबजावणी कक्षाची स्थापना तात्काळ करावी व त्यासाठी आवश्यक असलेला कर्मचारी वर्ग तात्काळ नियुक्त करावा. तसेच विभागाने उत्पन्नाभिमूख प्रशिक्षण योजना राबवाव्यात व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस २ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.२.३.२ "औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची अधिस्वीकृती "**

**अभिप्राय–**

१.२८ राष्ट्रीय अधिस्वीकृति बोर्ड, शिक्षण आणि प्रशिक्षण द्वारे जाहिर अधिस्वीकृति धोरणानुसार सर्व ITIs (शासकीय आणि खाजगी), ज्यांना राष्ट्रीय परिषद, व्यवसाय प्रशिक्षण (National Council for Vocational Training -NCVT) अंतर्गत त्यांच्या द्वारे चालविण्यात येणा-या व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी संलग्नीकरण करावयाचे होते. त्यांनी आधी भारतीय गुणवत्ता परिषदे (Quality Council of India-QCI) कडून अधिस्वीकृति प्राप्त करावयास पाहिजे. २०१२ पासून कामगार व रोजगार मंत्रालय, केंद्र शासनाने NCVT संलग्नीकरण करावयाचे असलेल्या ITs साठी राष्ट्रीय अधिस्वीकृति बोर्ड, शिक्षण आणि प्रशिक्षणद्वारे अधिस्वीकृति अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला. परंतु दर्जावाढीसाठी निवडलेल्या २५० ITs पैकी एकाही ITI ने जानेवारी २०१७ पर्यंत अधिस्वीकृति साठी अर्ज केले नव्हते.

१.२९ तसेच ६२ ITIs नी २०१२ पूर्वी २२७ नवीन व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी NCVT कडे संलग्नीकरणासाठी प्रस्ताव मांडला होता. ज्यापैकी ६४ व्यवसाय अभ्यासक्रमांना संलग्नीकरण प्राप्त झाले होते. परंतु आता २०१२ पासून जेव्हा केंद्र शासनाने ITIs ची अधिस्वीकृति अनिवार्य केली होती, उर्वरित १६३ नवीन व्यवसाय अभ्यासक्रमांना NCVT कडून संलग्नीकरण मिळण्यात लक्षणीयरित्या विलंब झाला. या बाबी निश्चितच आक्षेपार्ह आहे.

**शिफारस–**

**१.३० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या अधिस्वीकृतीबाबत केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या भारतीय गुणवत्ता परिषदेमार्फत ही अधिस्वीकृती प्राप्त करुन घेणे विभागाला आवश्यक होते. परंतु गत एक ते दीड वर्षापासून भारतीय गुणवत्ता परिषदेची नेमणूक रद्द केली व अद्यापही केंद्रीय स्तरावर नविन फ्रँकलीन संलग्नतेची पध्दत सुरु होवू शकली नाही. अशा परिस्थितीत**

**पुर्वी प्राप्त झालेली अधिस्वीकृती फक्त अस्तित्वात आहे परंतु नविन खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अधिस्वीकृती देण्यात येत नाही व हे काम बंद असून नविन कार्यपध्दतीचा अवलंब झाल्यानंतर हे संलग्नतेचे काम सुरु करण्यात येईल असे समितीसमोर सांगण्यात आले. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अधिस्वीकृती मिळण्यासंदर्भात राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आवश्यक तो पाठपुरावा करुन संलग्नतेचा निर्णय तातडीने होणेबाबत केंद्र शासनाकडे प्रयत्न करावेत तसेच आयटीआय मधिल रिकामी पदे भरण्याचा, गरजेनुसार उपकरणे/साधन खरेदी करण्याचा, आटीआयच्या अधिस्विकृतीसठी आणि नवीन व्यवसाय अभ्यासक्रमांच्या संलग्नीकरणासाठी शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा. यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस २ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.२.३.३ "सेंटर ऑफ एक्सलन्सचे <u>(Centers of Excellence - CoE)</u> अपयश"**

**अभिप्राय**

**१.३१** सेंटर ऑफ एक्सलन्स हे बहुकौशल्यपुर्ण अभ्यासक्रम आहेत. ज्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी व्यापक तत्वावर मूलभूत प्रशिक्षण मॉड्युल्स (प्रथम वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी) आणि एडवान्स मॉड्युल्स (द्वितीय वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी) चालविण्यासाठी नवीन पायाभूत सुविधा निर्माण करणे क्रमप्राप्त होते. विद्यमान संलग्नीकरण पध्दतीनुसार सेंटर ऑफ एक्सलन्स अभ्यासक्रम सुरु करण्यापूर्वी राष्ट्रीय परिषद, व्यवसाय प्रशिक्षणचे संलग्नीकरण आवश्यक होते. २५० पैकी ७५ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा सेंटर ऑफ एक्सलन्स म्हणून दर्जावाढ करावयाचे ठरविण्यात आले होते. सेंटर ऑफ एक्सलन्स म्हणून नामांकित करण्यात आलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या दस्तावेजांच्या लेखापरिक्षा पडताळणीत आढळून आले की, नमुना तपासणी केलेल्या संस्थांमधील २५ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांपैकी फक्त ११ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी प्रत्यक्षात सेंटर ऑफ एक्सलन्स अभ्यासक्रम सुरु केले होते. उर्वरित १४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी माहे जानेवारी, २०१७ पर्यंत सेंटर ऑफ एक्सलन्स अभ्यासक्रम सुरु केले नव्हते. ११ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांपैकी आठ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी अनिवार्य असलेले राष्ट्रीय परिषद, व्यवसाय प्रशिक्षणसंलग्नीकरण प्राप्त न करताच, सेंटर ऑफ एक्सलन्स अभ्यासक्रम सुरु केले होते आणि विद्यार्थ्यांना प्रवेश दिला होता. तथापि, ही वस्तुस्थिती विद्यार्थ्यांना प्रिंट/इलेक्ट्रॉनिक माध्यमातून कळविण्यात आली नव्हती.

**१.३२** कामगार व रोजगार मंत्रालय, केंद्र शासन यांच्या असे निदर्शनास आले की, सेंटर ऑफ एक्सलन्स अंतर्गत असलेल्या बहुकौशल्य अभ्यासक्रमांना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागत होते, जसे शासकीय क्षेत्रात पदभरतीसाठी योग्य त्या क्षमतेत सेंटर ऑफ एक्सलन्सचा अंतर्भाव नव्हता, मूलभूत आणि प्रगत (Advance) मॉड्युल्ससाठी एकत्रित प्रमाणपत्र नव्हते, सेंटर ऑफ एक्सलन्स अभ्यासक्रम आणि शिल्प कारागिर प्रशिक्षण योजना यांच्या अभ्यासक्रमांच्या कालावधीच्या फरकामुळे त्यांच्यात समतोल साधण्यात येणा-या अडचणी, सेंटर ऑफ एक्सलन्स अभ्यासक्रमांना उद्योगधंद्याची मान्यता प्राप्त न होणे इत्यादी. म्हणूनच केंद्र शासनाने माहे ऑगस्ट,२०१५ पासून सेंटर ऑफ एक्सलन्स अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश देण्याची प्रक्रिया बंद करावयाची आणि सेंटर ऑफ एक्सलन्सला संबंधित शिल्प कारागिर प्रशिक्षण योजना अभ्यासक्रमांमध्ये रुपांतरीत करावयाची शिफारस केली होती. परंतु काही विशिष्ट प्रकरणांत जेथे सेंटर ऑफ एक्सलन्स प्रशिक्षणार्थ्यांची रोजगार मिळण्याची क्षमता ठळकपणे उंचावली होती अशा प्रकरणांत राज्य शासनास सेंटर ऑफ एक्सलन्स अभ्यासक्रमांत सन २०१५ नंतरही प्रवेश देण्याची मुभा देण्यात आली होती.

तथापि, केंद्र शासनाच्या शिफारशी जारी होण्याच्या एक महिन्यातच राज्य शासनाने सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना सेंटर ऑफ एक्सलन्स अभ्यासक्रमांमध्ये माहे ऑगस्ट, २०१५ पासून प्रवेश देणे बंद करण्याचे निर्देश दिले (जुलै, २०१४). परिणामी, सेंटर ऑफ एक्सलन्स म्हणून नामांकित असलेल्या सर्व २५ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी शिक्षण सत्र २०१५-१६ पासून प्रवेश देणे बंद केले. २५ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांपैकी १४ संस्थांनी सेंटर ऑफ एक्सलन्स अभ्यासक्रम चालविण्यासाठी रु.८.७० कोटी खर्चून भौतिक पायाभूत संरचना (इमारती) आधीच तयार केल्या होत्या, ज्या माहे ऑगस्ट,२०१५ पासून विनावापर पडून होत्या. तसेच २५ पैकी १० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी सन २००८-०९ ते २०१४-१५ दरम्यान खरेदी केलेली रु.७.२८ कोटी किंमतीची यंत्रे व उपकरणे सुध्दा माहे ऑगस्ट,२०१५ पासून विनावापर पडून होती या सर्व बाबी निर्णय प्रक्रिया व त्याच्या अंमलबजावणीतील नियोजनाचा अभाव दर्शविणारी आहे.

**शिफारस-**

**१.३३ उद्योग समूहाला बहुकौशल्यपुर्ण (मल्टी स्कील) कारागीर मिळावा म्हणून ही सेंटर ऑफ एक्सलन्सची योजना अस्तित्वात आली. परंतु यात प्रशिक्षणार्थ्यांना संपुर्ण कौशल्य प्राप्त नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर ही योजना बंद करुन त्याचे**

**रुपांतर शिल्प कारागिर प्रशिक्षण योजनेत करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. परंतु त्यावेळी राज्यातील विविध आस्थापनांमध्ये तसेच शासकीय, निमशासकीय आस्थापनांमध्ये उमेदवारांची भरती करताना सदर आस्थापनांच्या सेवाप्रवेश नियमात सेंटर ऑफ एक्सलन्स योजनेंतर्गत प्रशिक्षण पुर्ण करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांचा समावेश नव्हता. त्यामुळे सेंटर ऑफ एक्सलन्स योजनेंतर्गत प्रशिक्षण पुर्ण केलेल्या उमेदवारांना रोजगाराची समस्या निर्माण झाली. यावर तोडगा काढण्यासाठी या उमेदवारांना शिल्प कारागिर प्रशिक्षणांतर्गत समाविष्ट अभ्यासक्रमांशी समकक्षता निर्धारीत करण्यात आली व सेंटर ऑफ एक्सलन्स योजनेंतर्गत भौतिक पायाभूत संरचना व खरेदी करण्यात आलेली यंत्रे व उपकरणे यांचा वापर आजतागायत शिल्प कारागिर प्रशिक्षण योजनेंतर्गत करण्यात येत आहे व त्याअनुषंगाने कार्यवाही सुरु असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. अतः याअंतर्गत विभागाने किती सेंटर ऑफ एक्सलन्स निवडले व त्यातून किती ठिकाणी नविन अभ्यासक्रम सुरु केले याबाबतची तपशिलवार माहिती १ आठवड्यात समितीला सादर करण्याबाबत आश्वासित करण्यात आले परंतु अद्यापही ही माहिती समितीला प्राप्त होवू शकली नाही. अतः सदरहू सर्व माहिती समितीला १ महिन्याच्या आत देण्यात यावी तसेच हे सेंटर ऑफ एक्सलन्स सुरू असण्याच्या कालावधीतील संस्थांसंदर्भात शासनाने योग्य ती भूमिका स्विकारुन त्या कालावधीतील उमेदवारांबाबत योग्य तो निर्णय विभागाने घ्यावा. यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस २ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.२.३.४ "प्राचार्य आणि निदेशकांची (Instructor) रिकामी पदे"**

**अभिप्राय–**

**१.३४** राष्ट्रीय अंमलबजावणी कक्ष केंद्र शासनाने माहे मे, २०१३ मध्ये प्राचार्यांनी एकापेक्षा जास्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा कार्यभार सांभाळणे, प्राचार्यांच्या वारंवार होणा-या बदल्या आणि निदेशकांची रिकामी पदे या बाबींमुळे औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जावाढ करण्यासाठी प्रतिकूल परिणाम झाला. नमूना तपासणी केलेल्या ६६ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (संस्था व्यवस्थापन समितीच्या मंजुरीनंतर) प्राचार्यांच्या बदल्या दीड वर्षे ते सहा वर्षाच्या कालावधीत तीन ते नऊ वेळा करण्यात आल्या. परिणामी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या दर्जावाढीच्या प्रगतीवर प्रतिकूल परिणाम झाला. याशिवाय, दर्जावाढ कार्यक्रमांतर्गत २५० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या प्रभावी कार्यचालनासाठी राज्य शासनाने २२९९ निदेशकांची गरज असल्याचे परिगणित केले. त्यापैकी फक्त २० पदे भरण्यात आली. निदेशकांची कमतरता कंत्राटी पध्दतीने निदेशकांची नियुक्ती करुन भरण्यात आली जे निश्चितच योजनेच्या उद्दिष्ट पुर्तीसाठी समर्थनीय नव्हते.

**शिफारस–**

**१.३५ समितीच्या साक्षीदरम्यान ही पदे रिक्त असल्याची बाब विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्यच केली. आयटीआय मधील पदांचा नवीन आकृतीबंध शासनाला सादर होत नाही तोपर्यंत भरतीवर बंदी असल्यामुळे त्याअनुषंगाने पदांचे नियोजन विभागाने केलेले आहे. त्यातील किती पदे तासिका तत्वावर व किती पदे कायमस्वरुपी भरण्यात यावीत याबाबतचे वर्गीकरण केलेले असून वित्त विभागाकडून या आकृतीबंधास मंजूरी घेतल्यानंतरच पदभरती प्रक्रियेस परवानगी मिळेल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. सद्यःस्थितीत आयटीआय संचालनालयामध्ये प्राचार्यांची एकूण ४०१ पदे मंजूर असून त्यातील ११६ पदे रिक्त आहेत. तसेच प्राचार्यासह निदेशक आणि त्याखालील अन्य पदे यासह एकूण १२०० पदे रिक्त आहेत. उच्चाधिकार समितीची परवानगी घेवून कंत्राटी तत्वावर निदेशकांची १५०० पदे निर्माण करण्यात आली असून त्यापैकी ३३८ पदे सन २०१० मध्ये भरण्यात आली होती. त्या पदांना नियमित करण्याचा प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरु असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. नवीन आकृतीबंध मंजूर केल्याशिवाय पद भरती करु नये असे वित्त विभागाने आदेश पारित केल्याच्या अनुषंगाने ऑक्टोबर व नोंव्हेंबर, २०१७ मध्ये नवीन आकृतीबंध वित्त विभागाकडे सादर करण्यात आला असून त्यात १५०० पदांची मागणी करण्यात आली आहे. कंत्राटी पदांचे नियमित पदात रुपांतर प्रस्तावित केले आहे. तसेच कमी मागणी असलेल्या अभ्यासक्रम जास्त मागणी असलेल्या अभ्यासक्रमामध्ये रुपांतरीत करुन जेवढ्या पदांची आवश्यकता आहे त्यादृष्टीने मागणी करण्यात आली असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. या आकृतीबंधात वित्त विभागाने काही त्रुटी काढलेल्या असून त्याची पूर्तता विभागाकडून करण्यात येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. केंद्र शासनाकडून प्राप्त निधीचा योग्य विनियोग करण्यासाठी व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जा जास्तीत जास्त उंचाविण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ आयटीआयला देणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे त्यासाठी आवश्यक असणारी पदसंख्या मंजूर करुन ती भरल्यास हे उद्दिष्ट साध्य होणे शक्य आहे. अतः विभागाने वित्त विभागाकडे सादर केलेला पदांचा आकृतीबंध तात्काळ मंजूर करुन घ्यावा व आयटीआयसाठी**

**अत्यावश्यक असलेली पदे भरण्यात यावीत तसेच निदेशकांना तासिका तत्त्वावर देण्यात येणारे कमी मानधन देखील वादाचाच विषय आहे. कमी मानधनात निदेशक आयटीआयमध्ये काम करण्यास इच्छुक नसतात. यासाठी विभागाने निश्चित केलेल्या मानधनाच्या रकमेस वित्त विभागाने कपात केली. त्यातही कायम व तासिकेवर घ्यावयाच्या प्रमाणाची टक्केवारीदेखील निश्चित करण्याची आवश्यकता आहे. या अनुषंगाने निदेशक, प्रशिक्षण यांचे कायम व तासिका तत्त्वावरील टक्केवारी व त्यांना द्यावयाचे मानधन यासंदर्भात शासनाने सकारात्मक विचार करुन योग्य तो निर्णय घ्यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.२.३.५ "प्लेसमेंट सेल्स (Placement Cells) ची स्थापना न करणे आणि फिडबॅक (Feedback) यंत्रणा नसणे"**

**अभिप्राय**

**१.३६** सामंजस्य करारानुसार संस्था व्यवस्थापन समितीने औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये स्नातकांना रोजगार/स्वयंरोजगार मिळविण्यासाठी मार्गदर्शन/मदत करण्यासाठी प्लेसमेंट सेल्सची स्थापना करावयास पाहिजे होती आणि स्नातकांचे करिअर कसे घडले आहे. याबाबत कमीत कमी तीन वर्षासाठी माग घेण्यासाठी एक यंत्रणा विकसित करावयास पाहिजे होती. परंतु १९ संस्थांनी असे प्लेसमेंट सेल्स स्थापित केले नव्हते. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या प्राचार्यांनी सांगितले की, प्रत्येक व्यवसाय अभ्यासक्रमाचे निदेशक एक स्वतंत्र वही ठेवतात, ज्यास फॉलोअप रजिस्टर (Follow-up Register) असे संबोधले जाते. त्यात अभ्यासक्रम पुर्ण करुन गेलेल्या विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंटचे तपशील राखले जातात. परंतु अभ्यासक्रमनिहाय ठेवलेल्या वह्या अपूर्ण होत्या. कारण त्यात महत्वपूर्ण माहिती जसे अभ्यासक्रम पूर्ण होण्याची तारीख, विद्यार्थ्यांचा संपर्क क्रमांक, पत्ता आणि छायाचित्र, नियोत्यांचे तपशील इ. नमूद केले नव्हते. तसेच व्यवसाय, शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालय, मुंबईला तिमाही अहवाल सादर करताना औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंटची टक्केवारी आणि त्यांना मिळणा-या उत्पन्नाची मर्यादा नोंद करणे क्रम प्राप्त होते. तथापि, २१ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी प्लेसमेंट संबंधी निरंक अहवाल सादर केला होता आणि ४० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी प्लेसमेंटची टक्केवारी ४७ ते १०० दरम्यान दर्शविली होती. तथापि, या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी त्यांच्या दाव्यांच्या समर्थनार्थ कोणतेही दस्तावेज सादर केले नव्हते.

**१.३७** याशिवाय, सामंजस्य करारानुसार संस्था व्यवस्थापन समितीने प्रशिक्षणाच्या दर्जाबाबत प्रशिक्षणार्थ्यांकडून आणि उद्योग समूहांकडून फीडबॅक प्राप्त करण्यासाठी एक उपयुक्त यंत्रणा तयार करावयास पाहिजे होती आणि या फीडबॅकचा औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी उपयोग करावयास पाहिजे होता. परंतु औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांसाठी आणि उद्योग समूहांसाठी अशी कोणतीही फीडबॅक यंत्रणा नव्हती ज्यामुळे योजनेची फलनिष्पत्ती निश्चित करता येणे शक्य नव्हते.

**शिफारस-**

**१.३८ उपरोक्त आक्षेपांच्या अनुषंगाने औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये ट्रेनिंग कम प्लेसमेंट सेलची स्थापना करण्यात आलेली नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्य केले. तथापि, सद्यःस्थितीत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये उपलब्ध असणारे मूलभूत प्रशिक्षण तथापि अनुषंगिक सूचना केंद्र यांचा विनियोग ट्रेनिंग कम प्लेसमेंट सेल म्हणून होत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. ही विभागाची भूमिका निश्चितच समर्थनीय नाही. आयटीआयच्या माध्यमातून ज्या प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण दिले जाते त्यांना चांगल्या ठिकाणी नोकरी मिळण्याच्या उद्देशाने हे प्लेसमेंट सेल काम करीत असतात. आयटीआय मधील मुलांचे समुपदेशन आणि प्लेसमेंट हा महत्वाचा मुद्दा असून त्यासाठी पूर्णवेळ याच कामासाठी उपलब्ध असणारा सेल असणे आवश्यक आहे. आयटीआय प्रवेशापुर्वी घेण्यात येणा-या ट्रेडच्या बाबतीत विद्यार्थ्यांचे समुपदेशन केल्यास तसेच प्रशिक्षणानंतर त्यांना प्लेसमेंटसाठी संधी उपलब्ध करुन दिल्यास विद्यार्थ्यांचे हे हिताचे ठरेल. त्यादृष्टीने या ट्रेनिंग कम प्लेसमेंट सेलचे महत्व अधिक आहे व हा सेल स्वतंत्ररित्या असणे आवश्यक असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. अतः स्वतंत्र प्लेसमेंट सेलची स्थापना करुन फीडबॅक यंत्रणा बसविण्याबाबत विभागाने आवश्यक ती कारवाई करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.२.३.६ "दर्जावाढ करण्यासाठी मिळालेल्या निधीतून अनियमित खर्च"**

**अभिप्राय**

**१.३९** सन २००८ च्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दर्जावाढ करण्यासाठी मिळालेल्या निधीचा वापर औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये अतिरिक्त नागरी बांधकामे (Civil Works) करण्यासाठी, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी संबंधित यंत्रे आणि उपकरणांची खरेदी आणि इतर कामांसाठी करावयास पाहिजे होता.

राज्य शासनाने औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मालवण ची निवड (२००८-०९) काष्ठकामे आणि निर्मिती व्यवसाय क्षेत्रासाठी (Manufacturing Trade Sector) सेंटर ऑफ एक्सलन्स म्हणून केली होती. परंतु संस्था व्यवस्थापन समितीने हे व्यवसाय अभ्यासक्रम सुरु केले नाही. त्याऐवजी अध्यक्ष, संस्था व्यवस्थापन समिती यांनी एका हाऊस बोटीचे बांधकाम कार्य (खाजगी एजन्सीमार्फत) हाती घेतले आणि दर्जावाढ निधीतून रु.५२ लाख खर्च केले. व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालय, मुंबई ने नंतर अध्यक्षांना उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी दर्जावाढ निधीतून रु.२५ लाख खर्च करण्याची मंजुरी दिली ज्यापैकी अध्यक्षांनी ऑक्टोबर रु.९.९० लाख खर्च केले. प्रमाणित मूल्यांकनकर्त्याद्वारे दिलेल्या मूल्यांकन अहवालानुसार या हाऊस बोटची किंमत फक्त रु.२० लाख होती. यादरम्यान अध्यक्षांनी सात आसनी स्पीड बोट खरेदी करण्यासाठी दर्जावाढ निधीतून आणखी रु.१०.०८ लाख खर्च केले. अध्यक्ष, संस्था व्यवस्थापन समिती यांनी स्पीड बोटची नोंदणी त्यांच्या स्वतःच्या नावे केली होती, जे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे, ज्यात दर्जावाढ निधीतून निर्मित करण्यात येणा-या संपत्तीचे मालकी हक्क संस्था व्यवस्थापन समितीकडे दिले होते, उल्लंघन होते. अपूर्ण राहिलेली हाऊस बोट आणि स्पीड बोट तारकर्ली समुद्र किनारी मागील पाच ते सहा वर्षापासून जीर्णावस्थेत पडून होती. लेखापरिक्षेस असेही निदर्शनास आले की, अध्यक्ष, संस्था व्यवस्थापन समिती हे सन २००९ पासून निर्माण रिअल्टर्स ॲण्ड डेव्हलपर्स लि.,मुंबई (औद्योगिक प्रशिक्षण संस्था मालवणसाठी निवडलेल्या आयपी) मध्ये कोणत्याही पदावर कार्यरत नव्हते. ही बाब निर्माण रिअल्टर्स ॲण्ड डेव्हलपर्स लि., मुंबई ने प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मालवण यांना नोव्हेंबर, २०१५ मध्येच कळविली आणि प्राचार्यांनी याबाबत व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालय, मुंबई ला कळविले. तथापि, DVET, मुंबई ने अध्यक्ष, संस्था व्यवस्थापन समिती यांचेविरुध्द ऑक्टोबर,२०१६ पर्यंत कोणतीही कारवाई केली नाही या सर्व बाबी अत्यंत गंभीर व आक्षेपार्ह आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे.

**शिफारस-**

**१.४० महालेखाकारांनी सदरहू नोंदविलेले आक्षेप हे अतिशय गंभीर स्वरुपाचे असून स्पीड बोटची खरेदी आणि हाऊस बोटचे बांधकाम यांचा सेंटर ऑफ एक्सलन्स अभ्यासक्रमात प्रस्तावित अभ्यासक्रमांशी काहीही संबंध नव्हता हे विभागाने मान्य देखील केले. तसेच स्पीड बोट संस्था व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून खरेदी केली असतानाही त्याची नोंदणी मात्र अध्यक्षांनी स्वतःच्या नावाने करुन घेतली. अशाप्रकारे त्यांनी बोट खरेदीमध्ये अनियमितता केली असून सध्या त्या ठिकाणी बोट उपलब्ध आहे परंतु त्याचा वापर न केल्यामुळे व घसारामुळे त्याचे मुल्य कमी झाले आहे. सदरहू स्पीड बोट विनावापर जीर्णावस्थेत पडून असल्यामुळे त्या बोटीचा लिलाव करुन प्राप्त रक्कम संस्था व्यवस्थापन समितीच्या बचत खात्यामध्ये जमा करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. परंतु अध्यक्षांना हा निधी खर्च करण्याचे अधिकारच नसल्यामुळे शासनाचे रु.५२ लक्ष एवढे नुकसान झाले आहे. त्यामुळे या प्रकरणी संबंधित असलेल्या व्यक्तीवर जबाबदारी निश्चित करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. विभागाने या सर्व अनियमितता मान्य केल्या असून याच्या चौकशीसाठी उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचे आदेश देण्यात आले होते. अतः या प्रकरणी चौकशी झाली असून चौकशी समितीने दिलेला अहवाल विभागाने स्विकारला असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. या बोटीवर एकूण रु.५२ लक्ष खर्च झालेले आहेत. परंतु बोटीच्या लिलावातून रु.१० लक्ष सुध्दा मिळणार नाहीत अशी परिस्थिती आहे व जबाबदार अधिका-यांविरुध्द विभागीय चौकशी व वसुलीची कारवाई सुरु करणेबाबतही विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर आश्वासित केले. त्याचप्रमाणे अध्यक्ष, संस्था व्यवस्थापन समिती, मालवण हे अनधिकृतपणे ६ वर्षे पदावर कार्यरत राहिले आणि त्यांनी दर्जावाढ निधीतून रु.७१.९८ लाख अनियमितपणे खर्चही केले. सन २००९ पासून हे अध्यक्ष कोणत्याही संस्थेत कार्यरत नव्हते त्यांना इतके वर्षे विभागाने कायम ठेवले तसेच प्राचार्यांवर देखील कारवाई करण्याची नितांत आवश्यकता आहे. अतः या प्रकरणी झालेल्या अनियमिततेबाबत व झालेल्या नुकसानीसंदर्भात प्राचार्यांवर व अध्यक्षांवर कारवाई करुन महसूली वसुलीची कारवाई करण्यात यावी तसेच शासनाची फसवणूक केल्या प्रकरणी त्यांच्यावर फौजदारी गुन्हा (एफआयआर) दाखल करण्यात यावा. प्राचार्यांनी रु.७१.९८ लाखाची हाऊस बोट खरेदी करताना विरोध करावयास पाहिजे होता वरिष्ठांच्या लक्षात ही अनियमितता आणून दिली पाहिजे होती. त्यामुळे त्यांना निलंबित करुन कालबध्द पध्दतीने ही विभागीय चौकशी करण्यात यावी व यास विभागीय सचिवांनी सहमती देखील दर्शविली. तसेच या प्रकरणात संचालनालयाचा देखील सहभाग किती आहे याची चौकशी करुन देखील जबाबदारी निश्चित करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस २ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.२.४ "संनियंत्रण"**

**अभिप्राय–**

**१.४१** दि. १४ मार्च,२०११ रोजी झालेल्या राष्ट्रीय सुकाणु समितीच्या बैठकीत निश्चित करण्यात आले होते की, राज्य सुकाणू समिती दोन महिन्यातून एकदा बैठक घेईल आणि या बैठकींमध्ये घेतलेल्या निर्णयांबाबत राष्ट्रीय सुकाणू समितीला

अवगत करेल. तथापि, गत पाच वर्षात राज्य सुकाणू समितीने विहित ३० बैठकींऐवजी फक्त चार बैठकी घेतल्या. तसेच सन २०१३ आणि २०१४ मध्ये बैठक घेण्यात आली नाही. राज्य शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले की, नियमितपणे राज्य सुकाणु समितीची बैठक घेण्यासाठी आवश्यक कारवाई करण्यात येईल.

दि.२६ जुलै, २०१० च्या बैठकीत राज्य सुकाणू समितीने जरी काम न करणा-या संस्था व्यवस्थापन समितीने कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीजद्वारे लेखापरिक्षा करावयाचा निर्णय घेतला होता, तरीही अशाप्रकारची कोणतीही लेखापरिक्षा करण्यात आली नव्हती. राज्य शासनाने नमूद केले की, याबाबत आवश्यक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

केंद्र शासनाने जून,२०११ मध्ये राज्य शासनांना संस्था व्यवस्थापन समितीद्वारे करण्यात येणा-या कामाच्या भौतिक आणि आर्थिक प्रगतीची पडताळणी करावयाचे आणि पुढील पाठपुराव्यासाठी एक अहवाल तयार करावयाचे निर्देश दिले होते. तथापि, राज्य शासनाने याबाबत कोणतीही कारवाई केली नव्हती. या बाबी गंभीर असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे.

**शिफारस–**

**१.४२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या दर्जावाढीसाठी आवश्यक असलेल्या संनियंत्रणाचा निश्चितच अभाव असल्यामुळे हे सर्व आक्षेप या परिच्छेदांतर्गत नोंदविण्यात आलेले आहेत. राज्य सुकाणू समितीची बैठक नियमितरित्या न घेतल्यामुळे देखील हे संनियंत्रण राहू शकले नाही. बैठकीसाठी उपस्थितांचे पगार व भत्त्यांसाठी कोणताही खर्च करावयाचा नाही असे त्यावेळी निर्देश असल्यामुळे या बैठका होवू शकल्या नाहीत. परंतु हे निदेश आता उठविलेले असल्यामुळे आता नियमित बैठका घेतल्या जातील असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. राज्य सुकाणू समितीच्या विहित बैठका नियमित स्वरुपात घेवून औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या दर्जावाढीच्या योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्यात यावी व योग्य संनियंत्रण ठेवण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.९ "निष्फळ खर्च"**

**अभिप्राय–**

१.४३ जिल्हाधिकारी, अमरावती यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), चांदूर रेल्वे, अमरावती येथील ५० खाटांचे मुलांचे वसतिगृह इमारतीच्या बांधकामास रु.१०६.३० लाख इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता दिली. उक्त काम सन २०१२ मध्ये पूर्ण झाले आणि त्याच महिन्यात प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चांदूर रेल्वे यांना ते हस्तांतरीत करण्यात आले होते. परंतु जरी वसतिगृहाची इमारत जानेवारी,२०१२ मध्ये प्राचार्य यांना हस्तांतरीत केली होती, तरीही एकाही निवासी मुलाने या वसतिगृहात प्रवेश न घेतल्यामुळे ही इमारत तशीच विनावापर पडून होती (जानेवारी,२०१७). तसेच मार्च,२०१३ मध्ये वसतिगृहासाठी खरेदी केलेल्या रु.१४.१२ लाख किंमतीच्या फर्निचर, वस्तू जसे खाटा, खुर्च्या, बाक, कपाट सुध्दा विनावापर पडून राहिले होते. तत्कालिन प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चांदूर रेल्वे यांनी (जून,२००८) सह संचालक, व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण, अमरावती क्षेत्र यांना कळविले होते की, जास्तीत जास्त विद्यार्थी हे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या आजूबाजूच्या २० ते २५ कि.मी. परिसरात राहत असून ते सहजपणे रोज ये-जा करु शकतात आणि त्यामुळे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चांदूर रेल्वे येथे मुलांच्या वसतिगृहाची आवश्यकता नाही. तथापि, ऑगस्ट, २०१० मध्ये प्रशासकीय मान्यता देताना प्राचार्यांचे मत विचारात घेतले गेले नव्हते.

अशाप्रकारे मुलांसाठी वसतिगृहाची आवश्यकता असण्याचे निर्धारण न केल्यामुळे रु.९२.३९ लाखाचा खर्च निष्फळ ठरला ही बाब निश्चितच गंभीर असून शासकीय निधीचा अपव्यय करणारी आहे.

**शिफारस–**

**१.४४ कौशल्य विकास व उद्योजकता विभागाद्वारे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चांदूर रेल्वे, अमरावती येथे मुलांचे वसतिगृह बांधण्यासाठी आवश्यकतेचे निर्धारण न केल्यामुळे रु.९२.३९ लाखाचा खर्च निष्फळ ठरला.**

**१.४५ महालेखाकारांनी उपरोक्त परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप हे अतिशय गंभीर असून शासकीय निधीचा अपव्यय करणारे आहे. वसतिगृहाची गरज, उपयोगिता, अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांची प्रवेश संख्या, अन्य दळणवळणाची उपलब्ध असलेली साधने याचा कोणताही विचार न करता निवासी वसतिगृहाच्या इमारतीस मान्यता देणे, ती बांधून पुर्ण करणे व लाखो रुपयांचा निधी त्यावर खर्च करणे, परंतु त्याचा कोणताही उपयोग न होणे या सर्व बाबी अतिशय गंभीर असून विभागांतर्गत नियोजनाचा अभाव दर्शविणा-या आहेत. जास्तीत जास्त विद्यार्थी आयटीआयच्या आजूबाजूच्या परिसरात राहत असून व तेथे**

**दळणवळणाच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध असल्यामुळे ते विद्यार्थी सहज ये-जा करु शकत असतानाही व अशा परिस्थतीत वसतिगृहासाठी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांकडून कोणतेही अर्ज प्राप्त होण्याची शक्यता नसतानाही या वसतिगृहाची कोणतीही उपयोगिता न तपासता ते मंजूर करुन त्याच्या बांधकामावर निधी देखील खर्च करणे, तसेच या वसतिगृहासाठी काळजीवाहक आणि कर्मचारी देखील उपलब्ध नव्हते ही देखील गंभीर बाब आहे. एवढेच नव्हेतर तत्कालिन प्राचार्य, आयटीआय, चांदूर रेल्वे यांनी या सर्व बाबी मंजूरीआधीच विभागाच्या निदर्शनास आणलेल्या असतानाही तसेच या मुलांच्या वसतिगृहाची आवश्यकता नाही असे स्पष्टपणे नमूद केले असतानाही प्रशासकीय मान्यता देताना प्राचार्यांचे सदरहू मत विचारात घेण्यात आले नाही. परिणामी लाखो रुपयांचा झालेला खर्च निष्फळ ठरला. विभागाने शासकीय निधी अशापध्दतीने निष्फळ खर्च करणे व निधीचे, कामाचे व त्याच्या उपयोगितेचे कोणतेही नियोजन न करणे या बाबी अत्यंत आक्षेपार्ह आहेत. केलेल्या चूकांचे समर्थन करण्यासाठी त्या इमारतीचा उपयोग आता वर्ग खोल्यांसाठी व ग्रंथालयासाठी करण्यात येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. परंतु हे निश्चितच प्रकल्पाचे उद्दिष्ट नव्हते. ज्या प्रयोजनार्थ इमारत बांधण्यात आली त्याच प्रयोजनासाठी त्याचा वापर करणे अभिप्रेत होते. तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये ऑनलाईन प्रवेश पध्दती सुरु झाल्याने बाहेरील विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादी व मागणीनुसार प्रवेश झाल्यास या वसतिगृहात १०० टक्के प्रवेश होवू शकतील व भविष्यात या वसतिगृह इमारतीचा विद्यार्थ्यांना निश्चितच फायदा होवू शकेल हे विभागाचे म्हणणे तर अतिशय आक्षेपार्ह आहे. भविष्यातील उपयोगिता गृहीत धरुन केलेल्या चुकांचे विभागाने अशा पध्दतीने समर्थन करणे अपेक्षित नाही. समिती या संपुर्ण कार्यपध्दतीवर तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. या संपुर्ण प्रकरणात जबाबदार असणा-या अधिकारी/कर्मचा-यांवर कडक कारवाई करण्यात यावी व सद्यःस्थितीत अस्तित्वात असलेल्या इमारतीचा योग्य व गुणवत्तापूर्वक वापर करणेबाबत शासनस्तरावरुन तातडीने कार्यवाही करण्यात यावी. तसेच इमारतीची उपयोगिता निश्चित झाल्यावर आवश्यक असलेले मनुष्यबळ देखील देण्यात यावे व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.१०  "ई-विद्या प्रकल्पावरील निष्फळ खर्च "**

**अभिप्राय**

१.४६  जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, गडचिरोली (DVETO) यांनी जिल्हा योजना अंतर्गत ई-विद्या प्रकल्पाची सुरुवात केली, ज्यात विडिओ कॉन्फरन्सिंग सेंटर उभारुन वर्च्युअल वर्ग घेऊन गडचिरोली जिल्ह्याच्या १२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या विद्यार्थ्यांना व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण देण्याचे ठरविले. ह्या १२ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा उपयोग विद्यार्थ्यांना विविध स्पर्धात्मक परिक्षेंसाठी आणि त्यांचे संगणकीय कौशल्य व रोजगाराभिमुख कौशल्य विकसित करण्यासाठी प्रशिक्षण देण्यासाठी सुध्दा करावयाचा होता.

१.४७  जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी प्रकल्पासाठी निविदा मागविल्या व एका निवडलेल्या अभिकरणाला कार्यादेश देऊन करार निष्पादित केला. करारानुसार अभिकरणाने गडचिरोली येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलांच्या वसतिगृह (१२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांपैकी एक) इमारतीत रु.४८ लाखाच्या खर्चावर एक केंद्रीकृत टॉवर उभारुन त्यांच्या माध्यमाने प्रतिमाह ८० तासांची बॅड विड्थ असलेल्या अति सुक्ष्म अपरचर टर्मिनल (V-SAT) जोडणीद्वारे १२ वर्च्युअल वर्गाची स्थापना करावयाची होती. याशिवाय, अभिकरणाला १२ वर्च्युअल वर्ग शिकवणी चालविण्यासाठी कार्यक्रम व्यवस्थापन, वर्च्युअल वर्ग, बॅड विड्थ फी आणि कार्यचालन खर्च म्हणून रु.३.४५ लाखाचे आवर्ती मासिक खर्चाचे भुगतान सुध्दा करावयाचे होते. हा प्रकल्प तीन वर्षाच्या कालावधीसाठी होता परंतु अभिकरण कायमस्वरुपी नेटवर्क कनेक्टीवीटीची पूर्ती न करु शकल्यामुळे दि.१ एप्रिल,२०११ ला सुरु झालेला प्रकल्प अचानकपणे दि.२७ ऑगस्ट,२०१२ ला संपला. दि.१ एप्रिल,२०११ ते २६ ऑगस्ट,२०१२ दरम्यान अभिकरणास वर्च्युअल वर्गाच्या स्थापनेसाठी दिलेल्या रु. ४८ लाख व्यतिरिक्त रु.५८.०९ लाखाचे आवर्ती मासिक खर्च म्हणून प्रदान करण्यात आले होते. अभिकरणाने अंतिमतः हे काम संपुष्टात आणले आणि डिसेंबर,२०१३ मध्ये DVETO ला न कळविता कार्यस्थळ सोडले. लेखापरिक्षेत असे आढळले की, दि.१८ मार्च,२०१० ला जिल्हाधिका-यांद्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या व दि.६ ऑक्टोबर,२०१० ला कार्यादेश निर्गमित करण्यात आले होते तर दि.१४ ऑक्टोबर,२०१० ला प्रशासकीय मान्यता देण्यात आली. यावरुन असे दिसते की, ह्या प्रकल्पाची सुरुवात घाईत करण्यात आली होती. तसेच, प्रकल्पास प्रशासकीय विभागाची तांत्रिक मंजूरी नव्हती, जी सार्वजनिक वस्तु व सेवा प्रापणासाठी एक अनिवार्य आवश्यकता होती. तसेच, DVETO ने शासनाच्या हिताचे रक्षण केले नाही, अभिकरणासोबत जानेवारी,२०११ मध्ये निष्पादित करण्यात आलेल्या करारात कार्यसिध्दीबाबत हमी दिलेली नव्हती आणि अभिकरणाला करारांतर्गत असलेल्या कार्यांची पूर्तता करण्यास बाध्य करता येईल असे दंडात्मक कलम करारात

अंतर्भूत नव्हते. अशाप्रकारे जिल्हाधिकारी, गडचिरोली आणि जिल्हा व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण अधिकारी, गडचिरोली यांनी ई-विद्या प्रकल्पाची अंमलबजावणी कार्यासक्तीने न केल्यामुळे रु.१.०६ कोटीचा खर्च निष्फळ ठरला. हा संपुर्ण घटनाक्रम पाहता अवलंबविण्यात आलेली कार्यपद्धती व कंत्राटदार कंपनीसोबत निश्चित केलेल्या करारातील अटी व शर्ती या दोषपुर्ण व शासनाच्या व विद्यार्थ्यांच्या हिताच्या नव्हत्या हे स्पष्टपणे दिसून येते.

**शिफारस–**

**१.४८ जिल्हाधिकारी, गडचिरोली व जिल्हा व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण अधिकारी, गडचिरोली यांनी ई-विद्या प्रकल्पाची अंमलबजावणी कार्यासक्तीने न केल्यामुळे रु.१.०६ कोटीचा खर्च निष्फळ ठरला.**

**१.४९ उपरोक्त आक्षेप हे अत्यंत गंभीर असून अवलंबविण्यात आलेल्या कार्यपद्धतीबाबत प्रश्नचिन्ह उभ्या करणा-या आहेत गडचिरोली सारख्या ग्रामीण, दुर्गम, आदिवासी व नक्षलग्रस्त भागात विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण व प्रशिक्षण मिळण्याच्या उद्दात्त हेतूने वर्च्युअल वर्गाची योजना अवलंबिण्याचा निर्णय त्यावेळी घेण्यात आला. प्रथम १८४ शाळांसाठी ही योजना सुरु करण्यात आली. मानव विकास कार्यक्रमांतर्गत यास मान्यता देण्यात आली होती. याअनुषंगाने एका केंद्रीकृत स्थानावरुन विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यात येवून त्या भागातील सर्व वर्गातील विद्यार्थ्यांना वर्च्युअल वर्गाच्या माध्यमातून हे शिक्षण देण्याचे निश्चित झाले. चांगल्या शिक्षकांचा लाभ जास्तीत जास्त मुलांना होण्याचा यामागील उद्देश होता व या अंतर्गत जवळजवळ १८४ शाळा जोडल्या गेल्या. परंतु हे सर्व एकमेकांना जोडण्यासाठी जो नियंत्रण कक्ष आवश्यक होता त्यासाठी सोयीची जागा उपलब्ध होत नसल्यामुळे ती कंट्रोल रुमची जागा आयटीआयच्या इमारतीत देण्यात आली. त्यामुळेच्या वर्च्युअल क्लासरुममध्ये १२ आयटीआयचा समावेश करण्याबाबत देखील निर्णय घेण्यात आला. निश्चितच उद्देश चांगला होता याबाबत दुमत नाही. परंतु यासाठी अवलंबिण्यात आलेली कार्यपध्दती व कंत्राटदार कंपनीसोबत निश्चित करण्यात आलेल्या अटी शर्ती या शासनाच्या नियमानुसार व हिताच्या नव्हत्या हे कालान्वयाने सिध्द झाले. यासाठी डीपीडीसीचा निधी देण्यात आलेला असताना व या कामासाठी संबंधीत विभागाकडून प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असताना जिल्हाधिका-यांनी थेट डीपीडीसीच्या निधीतूनही निविदा प्रक्रिया राबविणे ही कार्यपध्दती अत्यंत आक्षेपार्ह आहे. यात अधिक गंभीर बाब म्हणजे पुर्ण ३ वर्षे हा प्रकल्प न राबविता केवळ १७ महिन्यांमध्ये हा प्रकल्प बंद पडला. शाळांचा प्रकल्प पुर्ण झाल्यामुळे व नेटवर्कच्या कनेक्टीव्हीटीमुळे निवड केलेल्या अभिकरणाने कंट्रोलरुमची संपुर्ण आस्थापना काढून घेतली. परिणामी १७ महिन्यानंतर या १२ आयटीआयचे काम थांबविण्यात आले. परिणामी झालेला संपुर्ण खर्च निष्फळ ठरला ही वस्तुस्थिती आहे व विभागीय प्रतिनिधींनीदेखील हा खर्च निष्फळ ठरल्याचे समिती समोर मान्य केले. तसेच ३६ महिन्यांऐवजी १७ महिन्यातही योजना बंद करता कामा नये हे देखील समितीसमोर मान्य केले. परंतु १७ महिन्यांच्या मासिक खर्चाचा विद्यार्थ्यांना उपयोग झालेला असल्यामुळे तो निष्फळ म्हणता येणार नाही असेही समितीसमोर सांगितले. वास्तविकतः डीपीडीसीच्या निधीची निविदा जिल्हाधिकारी मागवू शकत नाहीत. त्यातही या कामास प्रशासकीय मान्यताही कार्योत्तर घेण्यात आली याबाबी देखील आक्षेपार्ह आहेत. जिल्हाधिका-यांसारख्या वरिष्ठ अधिका-यांनी अशाप्रकारे नियमांना बगल देवून कार्यपध्दती राबविणे अत्यंत आक्षेपार्ह आहे. त्यामुळे निश्चितच महालेखाकारांनी नोंदविलेल्या आक्षेपात तथ्य असून हा संपुर्ण रु.४८ लाख रुपयांचा खर्च निष्फळ ठरला आहे.**

**१.५० याही उपर अधिक गंभीर बाब म्हणजे ज्या कंत्राटदाराने हे काम पूर्ण केले नाही या उल्लंघनाबाबत त्या कंत्राटदारासोबत केलेल्या करारातील अटी शर्ती मध्ये कार्यसिध्दीबाबत कोणतीही हमी नमूद करण्यात आलेली नव्हती. तसेच दंडात्मक कारवाईचे कलम देखील त्यात अंतर्भुत करण्यात आले नव्हते, ही तर अधिकच गंभीर बाब आहे. परिणामी त्या कंत्राटदार कंपनी विरुध्द कोणतीही कारवाई शासन करु शकले नाही. तसेच कंत्राटदारास काम करण्यास बाध्य करता येईल अशा कलमांचा देखील करारनाम्यात समावेश नव्हता या सर्व बाबी विभागाने समितीला सादर केलेल्या आश्वासीत माहितीमध्ये मान्यच केलेल्या आहेत. परंतु कोणावरही यासंदर्भात कारवाई केली नाही, ही अधिक गंभीर बाब आहे. संपुर्ण घटनाक्रम पाहता समिती याप्रकरणी झालेल्या निष्फळ खर्चाबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत असून या संपुर्ण प्रकरणी जबाबदार अधिका-यांवर कारवाई करण्यात यावी. तसेच अस्तित्वात असलेल्या अटी व शर्तीनुसार त्या कंत्राटदारावर शक्य असलेली दंडात्मक कारवाई करण्यात यावी व त्या कंपनीला संचालक मंडळाच्या नावांसह कायमस्वरुपी काळ्या यादीत टाकण्यात यावे व शासन स्तरावरील कोणत्याही विभागाचे काम या कंपनीला देण्यात येवू नये व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

# विधी व न्याय विभाग

**२.** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-१६ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.३ **"न्यायालयांच्या इमारतींमध्ये स्थापत्य कामांची अंमलबजावणी"** यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

**परिच्छेद क्र. ३.३.१ नियोजन :-**

जिल्हा न्यायालयांमधील मुख्य जिल्हा न्यायाधिश नवीन न्यायालय संकूल/शासकीय निवासस्थानांच्या बांधकामांसाठी प्रस्ताव मांडतात. संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागांकडून (PW विभाग) आरेखने व अंदाजपत्रके तयार केली जातात आणि जिल्ह्यांच्या मुख्य जिल्हा न्यायाधीशांकडून ती उच्च न्यायालयाच्या इमारत समितीला तिच्या मंजूरी साठी सादर केली जातात. इमारत समितीने मंजूरी दिलेले प्रस्ताव नंतर विभागाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी आणि संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागांना काम सुरु करण्यासाठी निधी मुक्त करण्यासाठी पाठविले जातात.

उच्च न्यायालयाने लेखापरीक्षकांना सादर केलेल्या माहितीवरुन असे आढळून आले की राज्यातील ४६४ सरकारी मालकीच्या न्यायालयीन इमारतींपैकी, १३ इमारती मोडकळीस आलेल्या स्थितीत होत्या (सप्टेंबर २०१६) लेखापरीक्षकांच्या असेही निदर्शनास आले की, १३ पैकी तीन इमारतींचे बांधकाम सुरु करण्यात आले होते आणि उच्च न्यायालयाच्या इमारती समितीकडून तीन कामांचा प्रस्ताव विभागाकडे प्रशासकीय मंजूरीसाठी पाठविण्यात आले होते. तरी मोडकळीस आलेल्या उर्वरित सात इमारतींच्या बांधकामासाठी मुख्य जिल्हा न्यायाधीशांनी उच्च न्यायालयाला प्रस्ताव पाठविले नव्हते. दुय्यम न्यायालयांकडून सर्वसमावेशक प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे उच्च न्यायालय पुनर्विकास/बांधकामे यांच्यासंबंधीची योजना आखू शकले नाही. बांधकाम प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी मध्यम/दिर्घकालीन योजना आखण्याची गरज असल्याचे यामधून अधोरेखित होते.

विधि व न्याय विभागाच्या सह सचिवांनी सांगितले की, (ऑक्टोबर २०१६) ऑक्टोबर २०१६ मध्ये न्यायालयीन पायाभूत सुविधा धोरण लागू केले गेले ज्यामध्ये प्रलंबित तसेच भविष्यात हाती घ्यावयाच्या प्रकल्पांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी आणि ते त्वरेने पूर्ण करण्यासाठी त्यांचा प्राधान्यक्रम ठरविण्यावर भर देण्यात आला होता.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

राज्यातील एकूण ४६४ न्यायालयीन इमारतींपैकी ज्या १३ इमारती मोडकळीस आलेल्या आहेत, त्यापैकी २ इमारतींची कामे सुरु असून एका इमारतीचे काम पूर्णत्वास आलेले आहे. उर्वरित ७ इमारतींच्या प्रस्तावांची सद्यःस्थिती खालीलप्रमाणे आहे :-

(१) नाशिक जिल्हा :- प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधिश, जिल्हा नाशिक यांनी नवीन इमारती बांधण्यासाठी आराखडे तयार करण्याकरीता मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई यांना विनंती केली आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मा.उच्च न्यायालय व तद्नंतर शासनाकडे सादर करण्यात येतील.

(२) नांदेड :- सदर इमारतीच्या बांधकामाचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालय, मुंबई यांना अद्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही.

३) रायगड :- प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधिश, रायगड यांनी अलिबाग, जि.रायगड येथे न्यायालयीन इमारत बांधण्याकरीता आराखडे तयार केले असून, सदर प्रस्ताव मा.उच्च न्यायालयाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे. तद्नंतर सदर प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येईल.

(४) नंदूरबार :- सदर इमारतीच्या एकूण रु.९.४८ कोटी इतक्या अंदाजित किंमतीच्या बांधकामाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून, सदर प्रस्ताव मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील सचिव समितीच्या मान्यतेकरीता सादर करण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागास सादर करण्यात आला आहे.

(५) परभणी :- सदर इमारतीच्या बांधकामाचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालय, मुंबई यांना अद्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही.

(६) वाशिम:- सदर ठिकाणी नवीन न्यायालयीन इमारती बांधण्याकरीता भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे.

(७) मुंबई :- दादर, मुंबई येथील न्यायालयीन इमारतीची दुरुस्ती करण्यात आली असून, नवीन इमारत बांधण्याकरीताची कार्यवाही सुरु आहे.

तसेच विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१६१५/प्र.क्र.२२०/भाग-१/का-१३, दिनांक १० ऑक्टोबर २०१६ अन्वये न्यायालयीन पायाभूत सुविधा धोरण लागू केले आहे. त्यामध्ये प्रलंबित तसेच भविष्यात हाती घ्यावयाच्या प्रकल्पांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी आणि प्रकल्प त्वरेने पूर्ण करण्यासाठी त्यांचा प्राधान्यक्रम ठरविण्यावर भर देण्यात आला आहे. त्यानुसार चालू असलेल्या कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्याचे काम मा.उच्च न्यायालयामार्फत सुरु आहे. सदर कामांचा प्राधान्यक्रम निश्चित झाल्यानंतर सदर कामांचे विवरणपत्र मा.उच्च न्यायालयाच्या पायाभूत सुविधा समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल व तद्नंतर शासनास सादर करण्यात येणार आहे.

**परिच्छेद क्र. ३.३.२.२ प्रशासकीय मान्यता देण्यास विलंब .—**

लेखापरीक्षा तपासणीत निदर्शनास आले की, चाचणी तपासणी केलेल्या ३८ पैकी २५ कामांमध्ये (६६ टक्के) उच्च न्यायालयांच्या इमारत समितीकडून प्रस्ताव प्राप्त झाल्याची तारीख आणि विभागाने दिलेली प्रशासकीय मान्यता यांचा कालावधी हा सहा महिन्यांपेक्षा जास्त होता.

**तक्ता ३.३.१ः प्रशासकीय मान्यता देण्यात विलंब.—**

(काम संख्येत)

| कामाचे स्वरुप | उच्च न्यायालयाच्या इमारत समितीने प्रस्ताव पाठविल्याच्या तारखेपासून विभागाने दिलेली प्रशासकीय मान्यता यांचा कालावधी | | | |
|---|---|---|---|---|
| न्यायालयीन इमारती | ६ ते १२ महिने | १ ते ४ वर्षे | ४ वर्षापेक्षा अधिक | (एकूण |
| (एकूण) ३८ कामे, | ११ | १३ | १ | २५ |

ठाणे जिल्हयातील पालघर येथे न्यायालयाच्या इमारतीच्या बांधकामाचा प्रस्ताव जरी उच्च न्यायालयाने डिसेंबर १९९७ मध्ये विभागाला पाठविला होता तरी प्रशासकीय मान्यता मात्र १६ वर्षापेक्षा जास्त काळाच्या विलंबाने जुलै २०१४ मध्ये देण्यात आली होती आणि २०१५-१६ मध्ये रु.८२.१७ लक्ष निधी मुक्त करण्यात आला होता. या दरम्यानच्या कालावधीत पावसाळ्यामध्ये मोठया प्रमाणात पाणी तुंबण्या-या जागेत न्यायालयाचे कामकाज चालविले जात होते.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

न्यायालयीन इमारतींच्या बांधकामाचे प्रस्ताव मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर शासनामार्फत प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे करण्यात येते :-

**(अ) रु.५.०० कोटी पेक्षा जास्त किंमतीचे प्रस्ताव :-** नियोजन विभाग, शासन परिपत्रक दिनांक ३० जानेवारी २०१२ अन्वये रु.५.०० कोटीपेक्षा जास्त असलेले किंमतीचे प्रस्ताव मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील सचिव समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येतात. सदर प्रस्ताव प्रथम सार्वजनिक बांधकाम विभाग, नियोजन विभाग, वित्त विभाग व तद्नंतर सचिव समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येतात.

**(ब) रु.५.०० कोटीपेक्षा कमी किंमतीचे प्रस्ताव :-** सदर प्रस्ताव प्रथम सार्वजनिक बांधकाम विभागास तपासणीसाठी व प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास सहमतीसाठी पाठविले जातात. सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दर्शविल्यानंतर सदर प्रस्ताव मा.मुख्यमंत्री यांच्या अंतिम मान्यतेनंतर प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येते.

सबब, सदर प्रस्ताव विविध टप्प्यावर तपासले जात असताना प्रस्तावनिहाय त्रुटी काढल्या जातात. सदर त्रुटींची पूर्तता मा.उच्च न्यायालय, मुंबई, संबंधित प्रधान जिल्हा व सत्र न्यायालय व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेमार्फत करण्यात येते. सबब, प्रस्ताव विविध स्तरावरुन मंजूर होतांना कालापव्यय होतो. विधि व न्याय विभागाने विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१६१५/प्र.क्र.२२०/भाग-१/का-१३, दिनांक १० ऑक्टोबर २०१६ अन्वये न्यायालयीन पायाभूत सुविधा धोरण लागू केले आहे. त्यानुसार प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही सहा महिन्यामध्ये पूर्ण करण्याकरीता सूचित करण्यात आले आहे.त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

ठाणे जिल्ह्यातील पालघर येथे न्यायालयाच्या इमारतीच्या बांधकामाकरीता मा. उच्च न्यायालयाने डिसेंबर १९९७ मध्ये विभागास पाठविलेल्या प्रस्तावाची नस्ती कार्यासनात शोध घेऊनही उपलब्ध झालेली नाही. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून दिनांक २८/२/२००७ च्या पत्रान्वये पाठविलेले अंदाजपत्रके सन २००५-०६ च्या दरसूचीवर आधारीत होती. त्यानंतर प्रस्तावाची अंदाजपत्रके अद्ययावत दरसूचीवर आधारीत असणे आवश्यक असल्याने, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांना शासन पत्र क्र.सीसीबी-३३९९/८५७ /का-१३, दिनांक १ मार्च २०१२ अन्वये परत करण्यात आली. तसेच यानुषंगाने सन २०१२-१३ च्या दरसूचीवर आधारीत अंदाजपत्रके तयार करुन कार्यवाहीसाठी शासनास पाठविण्यात यावी, असे कळविले. त्यानंतर मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र दिनांक ३०/७/२०१३ नुसार अंदाजपत्रके प्राप्त झाली असून, त्यास शासन निर्णय क्रमांक सीसीबी-१११३/८४८/ प्र.क्र.१८२/का-१३, दिनांक १४ जुलै २०१४ नुसार रु.३,६८,५८,८६४/- इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सन २०१५-१६ मध्ये रु.८२.१७ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

**परिच्छेद क्र. ३.३.३.१ इमारतींची संरचनात्मक लेखापरीक्षा न करणे.—**

महाराष्ट्र शासनाच्या जानेवारी २००९ च्या अधिसूचनेनुसार, ज्या इमारतींच्या बाबतीत (१) पूर्तता प्रमाणपत्र प्राप्त होणे; किंवा (२) इमारतीचा ताबा घेण्याची परवानगी प्राप्त होणे; किंवा (३) तिच्या एकूण बांधिव ((built-up)) क्षेत्रापैकी किमान ५० टक्के क्षेत्राचा ताबा प्राप्त होणे यापैकी जी घटना आधी घडली असेल त्या तारखेपासून ३० वर्षे झाली असतील तर अशा इमारतींच्या प्रत्येक मालकाने किंवा भोगवटदाराने सदर इमारती मानवी वस्तीसाठी योग्य असल्याविषयी प्रमाणित करण्यासाठी महानगरपालिका/नगर परिषद यांचेकडून नोंदणीकृत असलेल्या संरचना अभियंत्याकडून अशा इमारतींची तपासणी करुन घ्यावी.

लेखापरीक्षणांत असे निदर्शनास आले की, राज्यातील सरकारी मालकीच्या न्यायालयाच्या ४६४ इमारतींपैकी २१८ इमारती ३० वर्षापेक्षा अधिक जुन्या होत्या परंतु जुलै २०१६ पर्यंत PW विभागाने १४२ इमारतींची (६५टक्के) संरचनात्मक लेखापरीक्षा केली नव्हती.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

राज्यामध्ये एकूण शासनाच्या मालकीच्या ४६४ न्यायालयीन इमारती असून, संरचनात्मक लेखापरीक्षा करावयाच्या १४२ न्यायालयीन इमारती आहेत. त्यापैकी ८५ न्यायालयीन इमारतींची संरचनात्मक लेखारीक्षा पूर्ण करण्यात आली असून, ५७ न्यायालयीन इमारतींची संचनात्मक लेखापरीक्षा करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

**परिच्छेद क्र. ३.३.३.२ अग्नी सुरक्षा उपाययोजना न करणे.—**

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने (UDD) जून २०१२ मध्ये एका परिपत्रकाद्वारे इमारतींच्या मालकांना किंवा भोगवटाधारकांनी वर्षातून दोनदा परवाना प्राप्त संस्थांकडून जागांची अग्नी लेखापरीक्षा करणे आणि संबंधित मुख्य अग्निशमन अधिका-यांना अग्नी लेखापरीक्षा अहवाल सादर करणे अनिवार्य केले आहे. वर्ष २०१५ मध्ये उच्च न्यायालयाने यामध्ये हस्तक्षेप करुन मुख्य जिल्हा न्यायाधीशांना PW विभागांमार्फत अग्नी लेखापरीक्षा करण्याचे निर्देश देईपर्यंत कोणतीही अग्नी लेखापरीखा

करण्यात आली नव्हती. त्यानुसार PW विभागांनी ऑगस्ट, २०१५ ते जून, २०१६ दरम्यान परवानाप्राप्त संस्थांकडून न्यायालयांच्या इमारतींची अग्नी लेखापरीक्षा केली आणि अग्नी सुरक्षा कामे जशी अग्नी सूचके (Smoke detectors) इत्यादी बसविण्यासाठी रु.१३०.३८ कोटी अंदाजपत्रक तयार केले. ऑगस्ट, २०१५ ते ऑक्टोबर, २०१६ दरम्यान उच्च न्यायालयाने विभागाला अंदाजपत्रके सादर केली. परंतु, विभागाने तांत्रिक बाजू तपासण्यासाठी UDD च्या कार्यकक्षेत कामकाज करणा-या अग्निशमन विभागाकडे ही अंदाजपत्रके पाठविली, ज्याची तपासणी डिसेंबर, २०१६ पर्यंत करण्यात आली नव्हती. अशाप्रकारे, केवळ अग्नी लेखापरीक्षा करण्यातच विलंब झाला होता असे नाही तर अग्नी सुरक्षा कामे पार पाडण्यासाठीच्या अंदाजपत्रकांना मंजूरी देखील प्राप्त झालेली नव्हती.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र.२१६/२०१० वरील निर्णय देतांना राज्यातील न्यायालयीन इमारतींचे अग्नी लेखापरीक्षा करण्याचे आदेश दिले होते. सदर आदेशानुसार जिल्हा न्यायालयांनी न्यायालयीन इमारतींचे अग्नी लेखापरीक्षा व उपायोजना संबंधीची अंदाजपत्रके शासनास सादर केली होती. सदर अंदाजपत्रके तांत्रिक तपासणीकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविण्यात होती.

तथापि सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर अंदाजपत्रकांची तांत्रिक तपासणी संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा, कलिना, मुंबई यांचेकडून करुन घेण्यात यावी' असे अभिप्राय दिले आहेत.

त्यानुसार नगर विकास विभागास विनंती करण्यात आली असता नगरविकास विभागाने सदर प्रस्तावाची तपासणी संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा, कलिना, मुंबई यांचेकडून विधि व न्याय विभागाने परस्पर करून घेणेबाबत कळविण्यात आले.

त्यानुषंगाने विधि व न्याय विभागाकडून संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा, कलिना, मुंबई यांना अंदाजपत्रकांची तपासणी / vetting करुन अहवालासह सादर करणेबाबत कळविण्यात आले.

संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा, कलिना, मुंबई यांनी दि.१८/०१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये असे कळविलेले आहे की,

सदर प्रस्तावांची तांत्रिकदृष्टया छाननी केली असता काही न्यायालयांची अग्नीशमन यंत्रणा व्यवस्थेचे परीक्षण स्थानिक अग्नीशमन अधिकारी यांनी केले असून काही न्यायालयांचे अग्नीशमन यंत्रणा व्यवस्थेचे परीक्षण हे अनुज्ञप्तीधारक अभिकरणे (License Agencies) तसेच सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आले आहे.

ज्या न्यायालयांच्या इमारतींचे अग्नीप्रतिबंधक यंत्रणा तपासणी स्थानिक अग्नीशमन अधिका-यांकडून करण्यात आली आहे अशा न्यायालयांच्या ईमारतींमध्ये अग्नीशमन यंत्रणा बसविण्याचे काम अंदाजपत्रके मागवून विहित शासकीय निविदा पध्दती अवलंबून प्रथम टप्प्यात करण्यात यावे. तसेच, ज्या न्यायालयांच्या इमारतींची अग्नीप्रतिबंधक यंत्रणा परीक्षण हे अनुज्ञप्तीधारक अभिकरणे (License Agencies) तसेच, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आलेले आहे. त्या अहवालांची तपासणी अग्नीशमन सेवेतील नामनिर्देशित अधिका-यांकडून करुन घ्यावी व संबंधित न्यायालयांच्या ईमारतींमध्ये अग्नीशमन यंत्रणा बसविण्याचे काम अंदाजपत्रके मागवून विहीत शासकीय निविदा पध्दती अवलंबून करण्यात यावे असेही कळविण्यात आले आहे.

त्यानुसार अग्नीशमन यंत्रणा बसविण्याची अंदाजपत्रके स्थानिक अग्नीशमन अधिका-यांकडून तपासून सादर करण्याबाबत जिल्हा न्यायालयांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार खालील न्यायालयीन इमारतींमध्ये अग्नीशमन यंत्रणा बसविण्याचे प्रस्ताव

संबंधित अग्नीशमन अधिका-यांकडून तपासणी करण्यात येऊन रु.१०.३२ कोटी इतक्या किंमतीच्या प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्याचे विवरण खालीलप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| (१) | जिल्हा व सत्र न्यायालय अकोला | रु.१.१० कोटी |
| (२) | जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती | रु.१.८५ कोटी |
| (३) | जिल्हा व सत्र न्यायालय, बुलढाणा | रु.२.०० कोटी |
| (४) | जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ | रु.३.८५ कोटी |
| (५) | जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर | रु.१.४४ कोटी |
| (६) | नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई | रु.०.०५ कोटी |
| (७) | लघुवाद न्यायालय, मुंबई | रु.०.०३ कोटी |
| | एकूण | रु.१०.३२ कोटी |

**परिच्छेद क्र. ३.३.२.३**

**कार्यादेश जारी करण्यातील विलंबः-**

लेखापरीक्षेत असे आढळून आले की चाचणी तपासणी केलेल्या ३८ कामांपैकी तीन कामे निविदेच्या टप्प्यावर होती (जानेवारी २०१७) ३५ कामांपैकी ३३ कामांमध्ये (९४ टक्के) प्रशासकीय मंजूरी प्राप्त होण्यापासून कार्यादेश जारी करण्यामध्ये सहा महिन्यांपेक्षा जास्त विलंब होता. तक्ता ३.३.२ मध्ये तपशील दर्शविला आहे.

तक्ता ३.३.२: कार्यादेश जारी करण्यातील विलंब

(काम संख्येत)

| कामाचे स्वरुप | प्रशासकीय मंजूरी देण्यापासून कार्यादेश जारी करेपर्यंत लागलेला कालावधी | | | |
|---|---|---|---|---|
| न्यायालयीन इमारती | ६ ते १२ महिने | १ ते २ वर्षे | २ वर्षापेक्षा अधिक | एकूण |
| (एकूण) ३८ कामे | ११ | १४ | ८ | ३३ |

अहमदनगर जिल्ह्यातील नव्या न्यायालयीन इमारतीच्या बांधकामात कार्यादेश जारी करण्यात ६ १/२ वर्षाचा विलंब झाला होता.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

| अ.क्र. | कामाचे नांव | प्रशासकिय मान्यता | | प्रारुप निविदा मसुदा मंजूर | | निविदा उघडण्याचा दिनांक | कार्यारंभ आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रक्कम रूपये (लक्ष) | दिनांक | रक्कम रूपये (लक्ष) | दिनांक | | |
| ४ | रत्नागिरी जिल्हा न्यायालय इमारतीचे बांधकाम करणे | ७३९.५९ | ०२-१०-२०११ | ७२३.५१ | ०३-०३-२०१२ | २५/९/२०१२ द्वितीय आवाहन (अल्प प्रतिसाद मिळाल्याने फेर निविदा) | २३/०४/२०१३ |

**ज्ञापन**—चालू

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | राजापूर न्यायालय इमारतीचे बांधकाम करणे. | ३२९.११ | १६/०६/२०१० | २८६.३८ | २०/१०/२०११ | १६/०८/२०१२ द्वितीय आवाहन (अल्प प्रतिसाद मिळाल्याने फेर निविदा) | १७/१२/२०१२ |
| ६ | देवरूख न्यायालय इमारतीचे बांधकाम करणे. | ३१९.४१ | ३१/०८/२०१० | २३९.१५ | ०४/१०/२०१२ | १/०६/२०१२ प्रथम आवाहन | ११/९/२०१२ |
| ७ | दापोली न्यायालय इमारतीचे बांधकाम करणे | ३३१.५८ | २५/०६/२०१० | २५०.३४ | १२-१-२०१२ | २/१/२०१२ प्रथम आवाहन | २७-०२-२०१३ |
| ८ | गुहागार न्यायालय इमारतीचे बांधकाम करणे. | ३१९.७० | २०/०६/२०१२ | ३०४.३६ | ०४/०६/२०१३ | २४/०५/२०१३ प्रथम आवाहन | २९/०८/२०१३ |
| ९ | अस्तित्वातील असलेल्या न्यायालयीन इमारतीच्या गच्चीवर दिवाणी न्यायालय वरिष्ठ विभागीय न्यायालयाचे बांधकाम करणे ता. खेड जि. रत्नागिरी | ७२.२५ | ११/०६/२०१० | ३८.९६ | १३-१२-२०१० | ०५/०१/२०११ प्रथम आवाहन | ०७-०१-२०११ काम विहित मुदतीपूर्वी पूर्ण करण्यात आले आहे. |

**४. रत्नागिरी जिल्हा न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणे.**

सदर कामाच्या रुपये ७३९.५९ लक्ष इतक्या रक्कमेस दिनांक ०२/१०/२०१० रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर मुख्य वास्तुशास्त्रज्ञ मुंबई यांचेकडुन सविस्तर वास्तु मांडणी नकाशे प्राप्त करणे, त्याचे सविस्तर संकलन करणेस कालावधी लागला. सदरचे कामाच्या सविस्तर अंदाजपत्रके तयार करुन त्यास मुख्य अभियंता मुबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, मुंबई यांनी दिनांक ३१/१/२०१२ रोजी तांत्रिक मान्यता दिली. तद्नंतर सदर कामाच्या निविदा मसुदा तयार करुन तो मा.मुख्य अभियंता मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आला व त्यास दिनांक ०३.०३.२०१२ रोजी रु. ७२३.५१ लक्ष रक्कम मंजूरी देण्यात आली, तद्नंतर सदर कामाची निविदा सूचना प्रसिध्द करुन २८/३/२०१२ रोजी निविदा उघडण्यात आल्या. प्रथम लघुत्तम निविदाकाराची निविदा मंजूरीकरीता प्रादेशिक कार्यालयास सादर करण्यात आली होती. तथापी कंत्राटदाराने दर कमी करण्यास कोणताही प्रतिसाद दिला नसल्याने तसेच कंत्राटदाराचा या मंडळाकडील कामांची प्रगती समाधानकारक नसल्याने फेर निविदा बोलाविण्यात आल्या. सदर फेर निविदेकरीता प्राप्त प्रतिसादानुसार निविदा प्रक्रिया पुर्ण करुन दिनांक २३/४/२०१३ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला. सदर कामाकरीता प्रथम आवाहनास कंत्राटदाराकडून पुरेसा प्रतिसाद नसल्याने फेर निविदा बोलाविल्याने कालापव्यय झाल्याचे दिसून येते.

**५. राजापूर न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणे.**

सदर कामाच्या रुपये ३२९.११ लक्ष इतक्या रक्कमेस दिनांक १६.०६.२०१० रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर मुख्य वास्तु शास्त्रज्ञ मुंबई यांचेकडुन सविस्तर वास्तु मांडणी नकाशे प्राप्त करणे , त्याचे सविस्तर संकलन करणेस कालावधी लागला सदर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन त्यास मुख्य अभियंता मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, मुंबई यांनी दिनांक १६/६/२०११ रोजी तांत्रिक मान्यता दिली. तद्नंतर सदर कामाच्या प्रारुन निविदा मसुदा तयार करुन तो मुख्यं अभियंता मुंबई (सा. बा.) प्रादेशिक विभाग, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आला व त्यास दिनांक २०/१०/२०११ रोजी रु. २८६.३९ लक्ष रक्कम मंजूरी देण्यात आली, तद्नंतर सदर कामाची निवदा सूचना प्रसिध्द करुन दिनांक ९/१/२०१२ रोजी निविदा उघडण्यात आल्या. प्रथम लघुत्तम निविदाकाराची निविदा मंजूरीनंतर सुरक्षा अनामत रक्कम भरणेस कंत्राटदाराकडून कोणतही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने सदर कामाकरीता फेर निविदा बोलविण्यात आल्या. सदर फेर निविदेकरीता प्रप्त प्रतिसादानुसार निविदा प्रक्रिया पूर्ण करुन दिनांक १७/१२/२०१२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला. सदर कामाकरीता फेरनिविदा बोलविल्यने कालापव्य झाल्याचे दिसून येतो.

**१०. शिरपूर जि.धुळे येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधणे :-**

सदर कामाची प्रशासकीय मान्यता विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र.सीसीबी-१८०१/८४३/प्र.क्र.१२०/का-१३, दि.०९.११.२०१० अन्वये दिलेली आहे. सदर कामाचे कार्यारंभ आदेश हया कार्यालयाचे पत्र क्र.रोहयो/निविदा/२५२४, दि.०२.०७.२०१२ नुसार श्री.व्ही.आय.राजपूत, ठेकेदार शिरपूर यांना देण्यात आलेले आहेत. सदर कार्यारंभ आदेश प्रशासकीय मंजूरीच्या दिनांकानंतर १९ महिन्यात देण्यात आलेली आहे. सदर कामाची तांत्रिक मंजूरी माहे १/२०१२ रोजी प्राप्त झालेली असून कार्यारंभ आदेश जारी करणेस विलंब झालेला नाही.

**११. धुळे जिल्हा न्यायालय आवारात नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणे :-** सदर कामाची प्रशासकीय मान्यता विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र.एलएबी-२०११/६६४/प्र.क्र.१११/का-२२, दि.२७.०२.२०१२ अन्वये देण्यात आलेली आहे. वरील कामास मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी सविस्तर अंदाजपत्रक क्र.मूळ कामे-१ माहे ०७/२०१३ अन्वये रु.६८२.२८ लक्ष रक्कमेस तांत्रिक मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानंतर सदरील कामास कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.लेखा शाखा/निविदा/१४७३, सन २०१४, दि.१०.०२.२०१४ अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. वरील क्रमप्राप्त कार्यवाहीमुळे कार्यारंभ आदेश जारी करण्यास विलंब झालेला आहे.

**१२. ता.साक्री, जि.धुळे येथील नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणे :-** सदरील कामास मंडळ कार्यालयाचे पत्र क्र.मूळ कामे-३ माहे ०७/२००९ अन्वये रु.९४.३७ लक्ष किंमतीस तांत्रिक मान्यतेस मंजूरी देण्यात आली. सदर कामाची निविदा प्रसिध्दी दि.१८.०७.२००९ रोजी करण्यात आली असून निविदा स्विकृत करुन मा.मुख्य अभियंता यांची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर या विभागाचे पत्र क्र.लेखा/निविदा/६१२५/२००९, दि.२४.०८.२००९ रोजी कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर कामाच्या कार्यारंभ आदेशास विलंब झालेला नाही.

**१३. शहापुर जि. ठाणे येथे न्यायालयीन इमारतींचे बांधकाम करणे**

सदर कामाच्या रु. ४२६.४६ लक्ष इतक्या कामास दिनांक ६-११-२००९ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर मुख्य वास्तु शास्त्रज्ञ मुंबई यांचेकडून सविस्तर वास्तु मांडणी नकाशे प्राप्त करणे, त्याचे सविस्तर संकलन करणे कालावधी लागला नसेच नियोजित जागेचे भुमि अभिलेख कार्यालयाकडून संयुक्त मोजणी करुण सिमांकित करणेस देखिल विलंब झाला. सदरचे कामाच्या सविस्तर अंदाजपत्रके तयार करुन त्योस मुख्य अभियंता मुंबई (सा. बा.) प्रादेशिक विभाग, मुंबई यांनी दिनांक ३०-९-२०१० रोजी तांत्रिक मान्यता दिली तद्नंतर सदर कामाच्या निविदेचा (डिटीपी) कच्चा मसुदा तयार करुन तो मुख्य अभियंता मुंबई (सा. बा.) प्रादेशिक विभाग, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आला व त्यास दिनांक १३-१०-२०१० रोजी रु. २८४.८४ लक्ष रक्कम मंजूरी देण्यात आली, तद्नंतर सदर कामांचे निविदा नोटीस काढून ठेकेदाराचे निविदा प्रक्रिया पुर्ण करुन दिनांक ११-३-२०११ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला त्यामुळे सदर कामास विलंब झाल्याचे दिसून येत नाही.

**१४. वाडा जि. ठाणे येथे न्यायालयीन इमारतींचे बांधकाम करणे**

सदर कामाच्या रु. २६५.३२ लक्ष इतक्या कामास दि. २०.११.२०११ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तांत्रिक मान्यता प्राप्त करण्याकरिता नविन दर सुचीनूसार अंदाजपत्रक तयार करावे लागल्यामुळे व निविदेचा कच्चा मसुदा मंजूर करुन

निविदा प्रक्रिया पार पाडणे व निविदा सुचना प्रसिध्द करुन दि.२३.२.२०१२ रोजी कार्यारंभ आदेश देणे अश्या आवश्यक प्रक्रिया पार पाडण्यात आल्याने विलंब झाल्याचे दिसून येत नाही.

**१५. कल्याण जि. ठाणे येथे जलदगती न्यायलय इमारतीवर २ अतिरिक्त मजल्याचे बांधकाम करणे**

सदर कामाच्या रु.२७१.०६ लक्ष इतक्या कामास दि.२५.१०.२०१२ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच कामाचे कार्यारंभ आदेश दि. ३०.११.२०१३ रोजी देण्यात आले आहेत. प्र.मा. चे कार्यारंभ आदेश १ वर्ष, सविस्तर अंदाजपत्रक तयार करणे, प्रारुप निविदा, मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांचेकडून नकाशे मुजूर करणे तसेच कल्याण डांबिवली महानगरपालिकेकडून परवानगी घेणे, इत्यादी आवश्यक कामे पार पाडण्यात आले त्यामुळे सदर कामास अनावश्यक विलंब झाल्याचे आढळत नाही.

**१६. सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई जि. ठाणे येथे न्यायालीन इमारत (स्टिल्ट+५) चे बांधकाम**

सदर कामाच्या रु. २८०७.०२ लक्ष इतक्या कामास दि. ४.६.२०१२ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच कामाचे कार्यारंभ आदेश दि.२८.८.२०१३ रोजी देण्यात आले आहेत. १ वर्षे २ महिने उपभोक्ता खात्याच्या मागणीनुसार प्रस्तावित स्टिल्ट+ ऐवजी स्टिल्ट+ ६ च्या मागणीनुसार इमरतीच्या नकाशामध्ये झालेल्या बदलामुळे मा. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांचेकडून नकाशे व आराखडे प्राप्त करुन घेणे आवश्यक असल्याने सदर कामास अनावश्यक विलंब झाल्याचे आढळत नाही.

**१७. मिरा भाइंदर जि. ठाणे येथे दिवाणी व फौजदारी न्यायालयाची इमारत (G+3) बांधण्याबाबत**

सदर कामाच्या रु.७६३.८६ लक्ष इतक्या कामास दि.११.३.२०१३ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच कामाचे कार्यारंभ आदेश दि.२८.२.२०१४ रोजी देण्यात आले आहेत. प्रशासकीय मान्यतेपासून, सविस्तर अंदाजपत्रक तयार करणे, प्रारुप निविदा तयार करणे यामूळे कालावधी व्यतित झालेला आहे.

**१८. जव्हार जि. ठाणे येथे न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणे.**

सदर कामाच्या रु.३२७.४१ लक्ष इतक्या किंमतीस दि.१२.२.२०१४ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच कामाचे कार्यारंभ आदेश दि.११.३.२०१६ रोजी देण्यात आले आहेत. तांत्रिक मान्यता प्राप्त करण्याकरीता नवीन दरसूचीनुसार अंदाजपत्रक तयार करावे लागल्यामुळे व निविदेचा कच्चा मसुदा मंजूर करुन प्रक्रीया पार पाडणे व निविदा सूचना प्रसिध्द करुन कार्यारंभ आदेश देणे अशा आवश्यक प्रक्रीया पार पाडण्यात आल्याने विलंब झाल्याचे दिसून येत नाही.

**१९. पालघर जि. पालघर येथे विस्तारीत न्यायालयीन (G+2) इमारतीचे बांधकामकरणे**

सदर कामाच्या रु.३६८.५९ लक्ष किंमतीस दि.१४.७.२०१४ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामास विधि व न्याय विभागाकडून छाननी समितीची मंजूरी दि.१६.७.२०१५, मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांनी सुधारीत नकाशास मंजूरी दि.२३.१२.२०१५, तांत्रिक मंजूरी दि.६.१.२०१६, कार्यारंभ आदेश ४.६.२०१६ रोजी देण्यात आले आहेत. सदर काम मार्च २०१८ रोजी पूर्ण करण्यात येईल. सदर कामास विलंब झालेला नाही.

**२०. उत्तन जि. ठाणे येथे महाराष्ट्र ज्युडीशियल ॲकाडमी आणि मॅडिएशन सेंटर व ट्रेनिंग इन्स्टीट्युटच्या इमारतीचे बांधकामकरणे :-**

सदर कामाच्या रु.६८६५.५५ लक्ष इतक्या कामास दि.२१.२.२००८ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच कामाचे कार्यारंभ आदेश दि.२६.६.२००८ रोजी देण्यात आले आहेत. तांत्रिक व निविदा प्रक्रीया पार पाडण्यास विलंब झालेला दिसून येत नाही.

**२१. कसबा बावडा, कोल्हापूर येथे नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणे :-** सदर कामाची मूळ प्रशासकीय मान्यता विधी व न्याय विभाग यांनी त्यांचे पत्र दि.०९.०७.२००७ अन्वये दिली आहे. तद्‌नंतर सदर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करणेत आले. सदर अंदाजपत्रकात भौगोलिक परिस्थितीनुसार, बेसमेंटमध्ये २३५६ चौ.मी. वाढ झाली. त्यानुसार उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ, पुणे यांनी दि.१८.०२.२००९ रोजी दिलेल्या सविस्तर नकाशानुसार व सन २००८-०९ चे दरसूचीवर आधारित नकाशे व अंदाजपत्रकास मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, पुणे यांनी दि.१७.०२.२००९ अन्वये तांत्रिक मान्यता दिली व नंतर प्रारुप निविदा तयार करणे त्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेणे व प्रारुप निविदा मंजूरीनंतर सदर कामाची जाहीर निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र.७, कोल्हापूर यांनी सदर कामाचा कार्यारंभ आदेश दि.१४.०८.२००९ रोजीच्या पत्रान्वये मे.प्रतिभा कंन्स्ट्रक्शन, इजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रक्टर्स प्रा.लि.कोल्हापूर यांना देणेत आला.

**२२. गडहिंग्लज येथे न्यायालयीन इमारत बांधणे :-** सदर कामास विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय दि.०६.०६.२०११ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. तद्नंतर सविस्तर अंदाजपत्रक, नकाशे व निविदा प्रक्रियेची कार्यवाही झालेनंतर सदर कामाचे कार्यारंभ आदेश दि.१४.१२.२०११ रोजी न्यू दत्त बिल्डर्स, कोल्हापूर यांना देणेत आले. प्रशासकीय मान्यता दिनांकानंतर कार्यारभ आदेश ६ महिन्यांमध्ये दिलेला असल्यामुळे विलंब झालेला नाही.

**२३. गडहिंग्लज येथे न्यायालयीन इमारतीचे अतिरिक्त बांधकाम करणे:-** सदर कामास विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय दि.१६.०७.२०१४ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. अतिरिक्त कामांमध्ये मुख्यत्वे करुन फर्निचर कामाचा समावेश होता. मूळ इमारतीचे काम पूर्ण झालेनंतर दि.१६.०४.२०१६ मध्ये फर्निचर कामास काळे ॲन्ड सुदाम असोसिएट्स, कुर्ला, मुंबई यांचे नांवे कार्यारंभ आदेश देणेत आले. सद्यःस्थितीत दि.११.०१.२०१७ रोजी सदर काम हस्तांतरीत केलेले आहे.

**२४. आजरा येथे न्यायालयीन इमारत बांधणे:-** सदर कामास विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय दि.१६.०३.२००५ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. तद्नंतर जुलै २००५ मध्ये सदरचे काम अर्थसंकल्पात समाविष्ट झालेनंतर सविस्तर अंदाजपत्रक, नकाशे व निविदा प्रक्रियेची कार्यवाही झालेनंतर सदर कामाचे कार्यारंभ आदेश दि.०७.०२.२००६ रोजी केदार कंन्स्ट्रक्शन, कोल्हापूर यांना देणेत आले. सदरचे काम अर्थसंकल्पात समाविष्ट झालेनंतर कार्यारंभ आदेश ७ महिन्यामध्ये दिलेला असल्यामुळे विलंब झालेला नाही.

**२५. म्हसवड येथे न्यायालयीन इमारत बांधणे:-** सदर कामाची प्रशासकीय मान्यता विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय दि.०८.१०.२००७ अन्वये दिलेली आहे. उपभोक्ता विभागाच्या मागणीनुसार सदर इमारतीच्या मूळ आराखडा मांडणीमध्ये बदल सुचवण्यात आले. त्यामुळे सदर कामाचा नवीन मांडणी नकाशा तयार करुन त्यास मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांची मंजूरी घेऊन दि.०२.०१.२००९ अन्वये रु.११८.०६ लक्ष किंमतीस तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आली. दि.२७.०२.२००९ अन्वये मे.ओंकार कंन्स्ट्रक्शन, वडूज यांना काम देण्यात आले. तथापि सदर कालावधीत वाळू उपशावर बंदी असल्याने मे.ओंकार कंन्स्ट्रक्शन, वडूज यांचेकडून कामामध्ये प्रगती होऊ न शकल्याने हे काम मूळ ठेकेदाराच्या रिस्क ॲन्ड कॉस्ट वर मे.एवरेस्ट कंन्स्ट्रक्शन, पुणे यांना देण्यात आले व सदर काम त्यांनी मूळ मुदतीत म्हणजे दि.२१.०८.२०१२ रोजी पूर्ण केले.

**२६. कराड येथे अतिरिक्त न्यायालय इमारतीचे बांधकाम करणे :-** सदर कामाची प्रशासकीय मान्यता विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय दि.१५.१०.२००८ अन्वये दिलेली आहे. उपभोक्ता विभागाच्या मागणीनुसार अस्तित्वातील जागीच सदर नवीन इमारत बांधकाम करणे आवश्यक होते. त्यामुळे अस्तित्वातील इमारत पाडणे, तसेच या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व परवानगी घेणे या सर्व बाबींमध्ये जवळपास ७ ते ८ महिन्यांच्या कालावधीचा अपव्यय झाला. त्यामुळे प्रशासकीय मान्यतेनंतर ८ महिन्यांनी उपभोक्ता विभागाकडून जागा उपलब्ध करुन देण्यात आली. तद्नंतर इमारतीच्या सदर कामाचे कार्यारंभ आदेश कार्यकारी अभियंता, सा.बां.(प.) विभाग, सातारा यांनी त्यांचे पत्र दि.२६.०३.२०१० श्री.सत्यसाईबाबा कंन्स्टक्शन, लातूर यांना दिलेले आहेत.

**२७. मेंढा येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाची इमारत बांधणे :-** सदर कामाची प्रशासकीय मान्यता विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय दि.१९.०३.२०१२ अन्वये दिलेली आहे. सदर कामाच्या उपलब्ध जागेमध्ये टाईप नकाशाप्रमाणे इमारत बांधणे शक्य नसलेने या कामासाठी मा.मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांचेकडून जागेनुसार नवीन नकाशे बनविणे आवश्यक होते. सदर नकाशे प्राप्त झालेनंतर तांत्रिक मान्यतेचे अंदाजपत्रक बनविणेत आले. तद्नंतर सदर कामास प्रादेशिक स्तरावरुन तांत्रिक मान्यता घेवून प्रारुप निविदा देखील प्रादेशिक स्तरावरुन मान्य करुन घेणेत आली. सदर कामाचे कार्यारंभ आदेश कार्यकारी अभियंता, सा.बां.(प.) विभाग, सातारा यांनी त्यांचे पत्र दि.१७.०६.२०१३ मे.एवरेस्ट कंपनी, पुणे यांना दिलेले आहेत. नवीन नकाशा प्राप्त करुन घेणे व प्रादेशिक स्तरावरील तांत्रिक मान्यता तसेच प्रारुप निविदा मान्यता यामुळे सदर कार्यारंभ आदेश प्रशासकीय मंजूरीच्या दिनांकानंतर १५ महिन्याने देण्यात आली आहे.

**२८. अ.क्र.२८ ते ३३ वरील कामे अनुक्रमे श्रीगोंदा न्यायालयीन इमारतीच्या पहिल्या मजल्याचे काम करणे व कर्जत येथे न्यायालयीन इमारत बांधणे :-** सदरील दोन्ही कामास प्रशासकीय मंजूरी मिळाल्यापासून कार्यादेश जारी करण्यासाठी विलंब झालेला नाही.

**२९. अहमदनगर जिल्हयातील नव्या न्यायालयीन इमारतीच्या बांधकामात कार्यादेश जारी करण्यात साडेसहा वर्षाचा विलंब झाला होता :-** सदर कामास कार्यादेश जारी करण्यात जागा बदलामुळे साडे सहा वर्षाचा विलंब झाल्याचे कागदपत्रावरुन दिसून येते. सदर कामासाठी मूळ प्रशासकीय मंजूरी महाराष्ट्र शासन संदर्भ क्र.सीसीबी-१००५/३७७/प्र.क्र.२२/का-१३, दि.२५.०५.२००५ अन्वये मिळाली होती. सदरचे बांधकाम जुनी न्यायालयीन इमारत पाडून त्याठिकाणी करणे प्रस्तावित होते. तथापि जुने न्यायालयीन इमारतीच्या भूखंडाच्या मालकीच्या कागदपत्रावरुन सदरची जागा वक्फ बोर्डाची असल्याचे दिसून आल्याने सदर कामास वक्फ बोर्डाने हरकत घेतली होती. त्यामुळे सदर नवीन न्यायालयाची जागा बदलून सदरचे बांधकाम न्यायनगर परिसरात प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांच्या निवासस्थानाच्या ठिकाणी निवासाचे जुने बांधकाम पाडून करण्याचे निश्चित झाले व त्यानुसार सदर कामास शासन निर्णय क्र.सीसीबी-२०१०/५८४/प्र.क्र.१६८/का-१३, दि.०८.०४.२०११ अन्वये सुधारित प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली. त्यानंतर सदर कामाच्या अंदाजपत्रकास मंजूरी होऊन निविदा कार्यवाही पूर्ण केली व कामास पत्र क्र.लेखा/निविदा/१००८२/२०११, दि.११.११.२०११ अन्वये कार्यारंभ आदेश दिला. तथापि नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम न्यायनगर परिसरातील प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांच्या जुन्या बंगल्याच्या भूखंडावर करावयाचे होते. त्यामुळे सदरचा बंगला पाडून मोकळा भूखंड सा.बां.खात्याकडून विधी व न्याय विभागाकडून हस्तांतरीत होणे आवश्यक होते. तथापि सदर बाबत सा.बां.खात्याकडून वेळोवेळी पत्रव्यवहार होऊनही कार्यवाही होत नव्हती. पत्रव्यवहाराच्या प्रती सोबत सादर करण्यात येत आहे. सदरचा बंगला पाडून मोकळा भूखंड सार्वजनिक बांधकाम खात्याकडे दि.१७.१२.२०१२ अन्वये हस्तांतरीत झाला. त्यानंतर प्रत्यक्षात बांधकामास सुरुवात झाली. त्यासाठी ११ महिन्याचा कालावधीचा विलंब झाला असा मूळ प्रशासकीय मंजूरी मिळाल्यापासून ते प्रत्यक्ष काम सुरु होईपर्यंत ११ महिने कालावधीचा विलंब झाला आहे.

**३०. संगमनेर येथे न्यायालयीन इमारतीच्या बांधकाम करणे (तळमजला ३ मजले) ता.संगमनेर, जि.अहमदनगर :-** सदर कामाची प्रशासकीय मान्यता विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्र.सीसीबी-२०१२/४३४/प्र.क्र.८५/का-१३, दि.०४.०७.२०१२ अन्वये दिलेली आहे. सदर कामाचे तांत्रिक मान्यता आदेश क्र.अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, अहमदनगर यांचे पत्र क्र.प्रशा-२/ई.मा./२९०/२०१३ अन्वये प्राप्त झाली असून कार्यारंभ आदेश कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, संगमनेर जा.क्र.लेखा/निविदा/३१२/२०१३, दि.२८.०३.२०१३ रोजीची श्री.के.के.थोरात यांना दिली आहे. सदर कामाच्या प्रशासकीय मान्यतेया दिनाकापासून ८ महिन्यांचा कालावधी कार्यादेश देण्यात आला आहे.

**३१. राहाता, जिल्हा अहमदनगर येथे न्यायालयीन इमारत बांधणे :-** सदर कामाची प्रशासकीय मान्यता विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्र.सीसीबी-१००९/५७२/प्र.क्र.७२/का-१३, दि.२८.०१.२०१० अन्वये दिलेली आहे. सदर कामाचे तांत्रिक मान्यता आदेश क्र.अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, अहमदनगर यांचे पत्र क्र.प्रशा-१/ई.मा./७३७७/२०१०, दि.२७.१२.२०१० अन्वये प्राप्त झाली असून कार्यारंभ आदेश कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, संगमनेर जा.क्र.लेखा/निविदा/६७८४/२०११, दि.२५.०५.२०११ रोजीचे मे.डायमंड कंन्स्ट्रक्शन कंपनी, लोणी यांना दिले आहे. सदर कामाच्या प्रशासकीय मान्यतेच्या दिनांकापासून १६ महिन्यांचा कालावधी कार्यादेश देण्यात विलंब झाला आहे, असे दिसून येत आहे. कारण सदर कामाची प्रशासकीय मान्यता विधी व न्याय विभाग यांनी त्याचे पत्र दि.२८.०१.२०१० अन्वये दिलेले आहे. प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर काम योजनेत प्राप्त निधीच्या अनुषंगाने सदरील कामाचे सविस्तर अंदाजपत्रके करण्यास्तव नकाशे यासाठी अपेक्षित कालावधी लागल्याने व त्यानंतर जाहिर निविदा प्रक्रिया करुन कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे.

**३२. तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर येथे न्यायालयीन इमारत बांधणे :-** सदर कामांची प्रशासकीय मान्यता विधी व न्याय विभाग यांनी त्यांचे पत्र क्र.सीबीसी-१००६/१२००/प्र.क्र.९४/का-१३, दि.३१ ऑक्टोंबर, २०१७ रक्कम रु.१,३१,५३,५००.०० सदर कामाचे

**तांत्रिक मान्यता -** आदेश क्र.अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, अहमदनगर यांचे पत्र क्र.प्रशा/ई.मा./५७६३/२००९, दि.१६.१०.२००९ रक्कम रु.१,१५,९३,५६८.००

**कार्यारंभ आदेश -** कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, संगमनेर जा.क्र.लेखा/निविदा/०९/२०१०, दि.०१.०१.२०१७ रक्कम रु.९६,४९,९९२.०० निविदा रक्कम रु.१,००,४४,६७७.०० इतकी ४.०९ टक्के जादा दराने.

कामाचा कालावधी व काम पूर्ण करण्याचा दिनांक १२ महिने, दि.३१.१२.२०१०. प्रत्यक्ष काम पूर्ण केल्याचा दिनांक व रक्कम रुपये दि.३०.०९.२०११ रक्कम रु.१४४.१६ लक्ष रोजीचे काम मे.आर.एस.भूतडा, इजि. ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स धारणगांव रोड कोपरगाव यांना दिले आहे. सदर कामाच्या प्रशासकीय मान्यतेच्या दिनांकापासून सव्वीस (२६) महिन्यांचा कालावधी कार्यारंभ आदेश देण्यास विलंब झाला आहे, असे दिसून येत आहे. कारण सदर कामाची प्रशासकीय मान्यता विधी व न्याय विभाग यांनी त्यांचे पत्र क्र.३१.१०.२००७ अन्वये दिलेले आहे. प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर काम योजनेत प्राप्त निधीच्या अनुषंगाने सदरील कामाचे सविस्तर अंदाजपत्रक करण्यास्तव नकाशे यासाठी अपेक्षित कालावधी लागल्याने व त्यानंतर जाहीर निविदा प्रक्रिया करुन कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे.

**३४. अकोला येथे अतिरिक्त न्यायालयाची इमारत बांधणे :-** सदर कामांची प्रशासकीय मान्यता विधी व न्याय विभाग यांनी त्यांचे पत्र क्र.सीबीसी-१११०/प्र.क्र.१/का-१३, दि.०८ जुलै, २०११ अन्वये दिलेली आहे. सदर कामाचे कार्यारंभ आदेश कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, अकोला यांनी त्यांचे पत्र क्र.४०९/निली/२०१२-१३, दि.११.०६.२०१२ अन्वये मे.ईगल कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर, जि.ठाणे यांना दिलेली आहेत. सदर कामाच्या मूळ संकल्पनामध्ये बदल झाल्याने या कामाची सविस्तर अंदाजपत्रके तयार करणे व नव्याने मंजूरी प्राप्त होण्यास बराच कालावधी लागल्यामुळे विहीत मुदतीत कार्यारंभ आदेश निर्गमित करणे शक्य झाले नाही. करिता कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यास ११ महिन्याचा कालावधी लागलेला आहे.

**३५. पातुर, जिल्हा अकोला येथे दिवाणी व फौजदारी न्यायाधीशाची (तळ मजला व पहिला मजला) इमारत बांधकाम करणे :-** सदर कामांची प्रशासकीय मान्यता विधी व न्याय विभाग यांनी त्यांचे पत्र क्र.सीबीसी-२०११/प्र.क्र.१२६/का-१३, दि.२५ जानेवारी, २०१२ अन्वये दिलेली आहे. सदर कामाचे कार्यारंभ आदेश कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, अकोला यांनी त्यांचे पत्र क्र.७२३/निली, दि.२१.१२.२०१२ अन्वये मे.एस.पी.अग्रवाल, अकोला यांना दिलेली आहेत. सदर कामाकरिता उपभोक्ता खात्याकडून जागा वेळेवर उपलब्ध करुन न दिल्यामुळे कार्यारंभ आदेश प्रशासकीय मंजूरीच्या दिनांकानंतर ११ महिन्यात कार्यारंभ आदेश जारी करण्यात विलंब झालेला आहे.

**३६. विक्रोळी येथील न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणे :-** सदर कामाची प्रशासकीय मान्यता विधी व न्याय विभाग यांनी त्यांचे पत्र दिनांक २२/५/२०१५ अन्वये दिलेली आहे.सदर कामाचे कार्यारंभ आदेश कार्यकारी अभियंता,उत्तर मुंबई (सा.बां.)विभाग,अंधेरी,मुंबई यांनी त्यांचे पत्र दिनांक ३०/९/२०१५ मे.निरकॉन कन्स्ट्रक्शन मुंबई यांना दिलेले आहेत. सदर कार्यारंभ आदेश प्रशासकीय मंजूरीच्या दिनांकानंतर केवळ ४ महिन्यात देण्यांत आलेअसल्यामुळे कार्यारंभ आदेश जारी करण्यास विलंब झालेला नाही.

**३७. माझगांव येथील नवीन महानगर दंडाधिकारी न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणे. :-** सदर कामाची प्रशासकीय मान्यता विधी व न्याय विभाग यांनी त्यांचे पत्र दिनांक ५/११/२०१५ अन्वये दिलेली आहे. प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर काम योजनेत अंतर्भूत प्राप्त निधीच्या अनुषंगाने सदरील कामाचे सविस्तर अंदाजपत्रक करण्यास्तव नकाशे व संकल्पने यासाठी अपेक्षित कालावधी लागल्याने व त्यानुसार तांत्रिक मान्यता मुख्य अभियंता,मुंबई (सा.बां.)प्रादेशिक विभाग,मुंबई यांनी

त्यांचे दिनांक ११/११/२०१६ रोजीच्या पत्रान्वये प्रदान केलेली आहे.त्यानंतर प्रारुप निविदा मंजूर प्रादेशिक कार्यालयाने दि.१५.११.२०१६ रोजी दिली आहे. सदर कामाची निविदा शासन सा.बां.विभागाचे पत्र क्र.निविदा २०१७/प्र.क्र.७/इमारती-२, दि.१८.१.२०१७ अन्वये मंजूर करण्यात आली आहे व तद्नंतर कार्यकारी अभियंता,मध्य मुंबई (सा.बां.)विभाग,वरळी,मुंबई यांनी त्यांचे पत्र दिनांक १/२/२०१७ अन्वये मे.किंजल कन्स्ट्रक्शन कंपनी मुंबई यांना कार्यारंभ आदेश दिलेले आहेत.कार्यारंभ आदेश देण्यास्तव लागलेला कालावधी हा अपेक्षित असल्यामुळे टाळता येण्याजोगे नाही.

**३८. कुर्ला येथील न्यायालयीन इमारतीवर अतिरिक्त ३ -या मजल्याचे बांधकाम करणे :-** सदर कामाची प्रशासकीय मान्यता विधी व न्याय विभाग यांनी त्यांचे पत्र दिनांक १४/७/२०१४ अन्वये दिलेली आहे. सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात निधीची तरतूद झाल्यानंतर या कामास मुख्य अभियंता,मुंबई (सा.बां)प्रादेशिक विभाग,मुंबई यांनी त्यांचे दिनांक ४/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.या कामाची प्रारुप निविदा मंजूरीनंतर सदर कामाची जाहीर निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कार्यकारी अभियंता,उत्तर मुंबई (सा.बां.)विभाग,अंधेरी,मुंबई यांनी त्यांचे दिनांक १७/३/२०१६ रोजीच्या पत्रान्वये मे.समर्थ आर्केड प्रा.लि.यांना कार्यारंभ आदेश दिलेले आहेत.

**परिच्छेद क्र.३.३.२.४**

**पूर्ण झालेल्या आणि बांधकाम प्रगतीपथावर असलेल्या कामांसाठी लागलेल्या अतिरिक़्त वेळ व वाढीव खर्च**

डिसेंबर २०१६ पर्यत, ३५ पैकी पाच (१४ टक्के) कामांमध्ये सहा महिन्यापर्यंत वाढीव कालावधी लागला होता तर २५ कामाध्ये (७१ टक्के) कर्यादेशात नमूद केलेल्या तारखेपेक्षा सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधी लागला होता. उर्वरित पाच कामे वेळेवर पूर्ण झाली होती. तक्ता ३.३.३ मध्ये तपशील दिला आहे.

**तक्ता ३.३.३** कामे पूर्ण होण्यातील विलंब

(काम संख्येत)

| कामाचे स्वरुप | कामांची स्थिती | कार्यादेशात काम पुर्ण होण्यासाठी विहीत केलेल्या तारखेपासून लागलेला अतिरिक्त कालावधी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ६ महिन्यांपर्यंत | ६-१२ महिने | १२ महिन्यांपेक्षा अधिक | एकूण |
| न्यायालयीन इमारत (एकूण कामे ३८) | पूर्ण झालेली | ५ | १ | ९ | १५ |
| | प्रगतीपथावर | ० | ४ | ११ | १५ |

लेखापरीक्षा तपासणीत पुढे असे आढळून आले की मे २०१६ पर्यंत ३५ बांधकामांवरील प्रत्यक्ष खर्च मंजूर खर्चापेक्षा रु.११२.२० कोटीने वाढला होता ज्यापैकी १७ पूर्ण झालेल्याआणि १८ प्रगतीपथावर असलेल्या कामांवर अनुक्रमे रु. ९६.९४ कोटी आणि रु.१५.२६ कोटी वाढीव खर्च झाला होता. इमारतीच्या पायामध्ये केलेला बदल न्यायालयाच्या इमारतीमध्ये अतिरिक्त मजल्यांची तरतूद अतिरिक्त सुविधा उपलब्ध करणे अपु-या सर्वेक्षणांमुळे निविदेतील बाबीच्या संख्येत/नगांत वाढ होणे असे काम सोपविल्या नंतर आरेखनांमध्ये केलेले बदल हे वाढीव खर्चामागचे महत्त्वाचे कारणे होते जे कामाचे योग्य नियोजन केले गेले असते आणि काम सोपविण्याआधी त्याची व्याप्ती निश्चित केली असती तर मोठया प्रमाणात टाळता आले असते.

**ज्ञापन** :—

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

| अ.क्र. | कामाचे नांव | प्रशासकिय मान्यता रक्कम रूपये (लक्ष) | सुधारित प्रशासकिय मान्यता रक्कम रूपये (लक्ष) | प्रारुप निविद मसुदा मंजूर रक्कम रूपये (लक्ष) | मंजूर निविदा रक्कम रक्कम रूपये (लक्ष) | झालेला खर्च रक्कम रूपये (लक्ष) |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| ४ | रत्नागिरी जिल्हा न्यायालय इमारतीचे बांधकाम करणे | ७३९.५९ | १७०२.६९ | ७२३.५१ | ७५०.११ | १६६४.०८ |
| ५ | राजापूर न्यायालय इमारतीचे बांधकाम करणे | ३२९.११ | ४०१.७० | २८६.३८ | २८६.३८ | ४२३.०१ |
| ६ | देवरूख न्यायालय इमारतीचे बांधकाम करणे. | ३१९.४१ | ० ०० | २३९.१५ | २५४.५८ | ३४८.३९ |
| ७ | दापोली न्यायालय इमारतीचे बांधकाम करणे | ३३१.५८ | ० ०० | २५०.३४ | २८९.६३ | ३६४.१८ |
| ८ | गुहागार न्यायालय इमारतीचे बांधकाम करणे. | ३१९.७० | ० ०० | ३०४.३६ | ३०१.४१ | ४९०.७२ |
| ९ | अस्तित्वातील असलेल्या न्यायालयीन इमारतीच्या गच्चीवर दिवाणी न्यायालय वरिष्ठ विभागीय न्यायालयाचे बांधकाम करणे ता. खेड जि. रत्नागिरी | ७२.२५ | ० ०० | ३८.९६ | ३८.९६ | ७४.४३ |

वरील इमारतींच्या बांधकामाकरीता झालेला खर्च हा प्रशासकीय मान्यता रकमेच्या १० टक्क्यापर्यंत सिमित आहे.

**१०. शिरपूर जि.धुळे येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधणे :-** सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी १८ महिन्याचा कालावधी म्हणजेच दि.०२.०७.२०१२ ते दि.०१.०१.२०१४ पर्यंत देण्यात आलेला होता. सदर इमारतीचे बांधकाम ठेकेदाराने विहीत मुदतीत पूर्ण केले असून सदरची इमारत न्यायालयास हस्तांतर करण्यात आलेली आहे. सद्यःस्थितीत फेब्रुवारी २०१८ पर्यंत रु.४१६.९७ लक्ष इतका खर्च झालेला आहे. सदर इमारतीच्या बांधकामास रु.४९९.५४ लक्ष इतक्या किंमतीस सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, निविदा प्रक्रीया प्रगतीत आहे.

**११. धुळे जिल्हा न्यायालय आवारात नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणे :-** सदरील काम G+१ इतकीच प्रशासकीय मान्यता होती. परंतु उपभोक्ता विभागाची मागणी असल्यामुळे G+3 साठी सुधारित प्रशासकीय मान्यता घेऊन कामाच्या वावात वाढ करण्यात आली व सुधारित प्रशासकीय मान्यता मिळालेले काम हे आधीच्या कामाशी संलग्न असल्यामुळे वरील कामास अतिरिक्त वेळ लागलेला आहे. त्यानुसार सदरील काम हे प्रगतीत असून कामावर एकूण रु.२८२.७२ लक्ष खर्च झालेला असून तो मंजूर निविदेच्या मर्यादेत आहे. त्यामुळे वाढीव खर्च झालेला नाही.

**१२. ता.साक्री, जि.धुळे येथील नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणे :-** वरील कामास कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.लेखा/निविदा/६१२५/२००९, दि.२४.०८.२००९ अन्वये ते दि.२३.०५.२०१० पर्यंत (९ महिने) मुदत देण्यात आली होती व यापुढे कामास दि.३०.०९.२०१० पर्यंत (४ महिने) मुदतवाढ देण्यात आली होती व सदरील काम दि.३०.०९.२०१० या वाढीव मुदतीत पूर्ण झालेले आहे. कामाच्या वावात वाढ झाल्यामुळे व भाववाढीतील फरकामुळे सदर कामावर निविदेपेक्षा जास्तीचा खर्च झालेला आहे. परंतु एकूण खर्च पाहता तो प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत आहे. तसेच वरील काम पुणे झालेले असून तो हस्तांतरीत करण्यात आलेले आहे.

**१३. शहापुर जि. ठाणे येथे न्यायालयीन इमारतींचे बांधकाम करणे.—** सदर कामास १८ महिने (१०/०९/२०१२) मुदत देण्यांत आली होती. जागे अभावी सदर कामास दि. ३१.१२.२०१३ पर्यंत मुदत वाढ देण्यांत आली असुन, सदरचे काम हे दि ३१.१२.२०१३ पर्यत काम करण्यांत आले आहे. त्यामुळे सदर कामास अनावश्यक विलंब झाल्याचे आढळत नाही. सदर कामावर एकूण ५४९.१८ लक्ष खर्च झालेला आहे.

**१४ वाडा जि. ठाणे येथे न्यायालयीन इमारतींचे बांधकाम करणे.—**सदर कमाचे कार्यारंभ आदेश दि.२३.२.२०१२ रोजी देण्यात आले असून सदरचे काम दि.६.४.२०१४ रोजी पूर्ण करण्यात आले असून कामावर एकूण खर्च ४.६६ लक्ष इतका झालेला आहे. अस्तित्वातील बांधकामाच्या जागेवर जुनी इमारत असल्याने ती न तोडता पर्यायी बांधकाम होई पर्यत नवी इमारत दोन टप्यात पुर्ण करण्याचे नियोजन करण्यास विलंब झाला.

**१५. कल्याण जि. ठाणे येथे जलदगती न्यायालय इमारतीवर २ अतिरीक्त मजल्याचे बांधकाम करणे.—**सदर कामाचे कार्यारंभ आदेश दि.३०.११.२०१३ रोजी देण्यात आले असून सदरचे काम दि.३०.६.२०१५ रोजी पूर्ण करण्यात आले असून कामावर एकूण खर्च २७१.०६ लक्ष इतका झालेला आहे. कार्यारंभ आदेश ३०.११.२०१३ ते ३०.६.२०१५ -१ वर्ष सात महिने मध्ये कोर्टाच्या कामाच्या वेळेस काम करण्यास प्रतिबंध असल्याने काम करण्यास मर्यादित वेळ उपलब्ध झालेला आहे.

**१६. सी.बी. डी. बेलापुर, नवी मुंबई जि. ठाणे येथे न्यायालयीन इमारत (स्टिल्ट +5) बांधकाम.—**सदर कामाचे कार्यारंभ आदेश दि.२८.८३.२०१३ रोजी देण्यात आले असून सदरचे काम दि.१.४.२०१७ रोजी पूर्ण करण्यात आले असून कामावर एकूण खर्च २८०८.३० लक्ष इतका झालेला आहे. कामाचा कार्यारंभ आदेश दि. २८.०८.२०१३ ला देण्यात आले होते तसेच नवी मुंबई महानगरपालिका यांनी बांधकाम करण्याची परवानगी दि. २७.१२.२०१३ ला दिल्यानंतर संकल्पचित्र मंडळाकडुन नकाशे प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष काम फेब्रुवारी २०१४ मध्ये सुरु करण्यात आले होते. कामाची मुदत २४ महिने म्हणजे दि. २७.०८.२०१५ पर्यंत होती. प्रथम मुदतवाढ दि. २७.०८.२०१५ ते ३१.०३.२०१६ पर्यत मंजुर करण्यात आली होती. त्तसेच दुसरी मुदतवाढ दि. ०१.०४.२०१६ ते ३०.११.२०१६ पर्यंत मंजूर करण्यात आली होती. मुख्य इमारतीचे काम मुदतीत पुर्ण करण्यात आले आहे. या नंतर रस्ते बांधणे, कंपाऊंड वॉल तसेच फर्निचरची कामे करुन इमारत मे-२०१७ मध्ये हस्तांतरीत करण्यात आलेली आहे.

**१७. मिरा भाईंदर जि. ठाणे येथे दिवाणी व फौजदारी न्यायालयाची इमारत (G+3) बांधण्याबाबत .—**सदर कामाचे कार्यारंभ आदेश दि. २८.२.२०१४ रोजी देण्यात आले असून सदर काम अपूर्ण अवस्थेत असून कामावर एकूण खर्च ७६३.८६ लक्ष इतका झालेला आहे. कार्यारंभ आदेशापासुन मिरा भाईंदर महानगरपालिकेकडुन बांधकाम परवानगी मिळणेसाठी ४ महिन्याचा

विलंब. त्याचप्रमाणे बांधकामाचे संकल्पन मिळणेसाठी विलंब, त्याचप्रमाणे सुधारित प्रशासकीय मान्यता अप्राप्त असल्यामुळे ठेकेदाराने कामाची गती संथगतीने ठेवली होती. त्याच कारणाने ठेकेदाराने काम काढुन घेण्याबाबत विनंती केल्यामुळे सदर काम ठेकेदाराकडुन काढुन घेण्यात आले असुन सद्यःस्थितीत काम अर्धवट स्थितीत बंद आहे.

**१८. जव्हार जि. ठाणे येथे न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणे.**

सदर कामाचे कार्यारंभ आदेश दि.११.०३.२०१६ रोजी देण्यात आले असून सदरचे काम प्रगतीपथावर असून कामावर एकूण खर्च २२१.३७ लक्ष इतका झालेला आहे. सदर जागेवर अतिक्रमण होते उपभोक्त खात्या कडुन जागा वेळेत न मिळाल्याने कामांस विलंब झालेला आहे.

**१९. पालघर जि. पालघर येथे विस्तारीत न्यायालयीन (G+2) इमारतीचे बांधकाम करणे**

सदर कामाचे कार्यारंभ आदेश दि.४.६.२०१६ रोजी देण्यात आले असून सदरचे काम प्रगतीपथावर असून कामावर एकूण खर्च २४१.१७ लक्ष इतका झालेला आहे. कार्यारंभ आदेश दि. ०४.०६.२०१६ देवुन मार्च-२०१८ अखेर काम पुर्ण करण्यात येईल. सदर कामास विलंब झालेला नाही.

**२०. उत्तन जि. ठाणे येथे महाराष्ट्र ज्युडीशियल ॲकाडमी आणि मॅडिएशन सेंटर व ट्रेनिंग इन्स्टीट्युटच्या इमारतीचे बांधकाम करणे**

सदर कामाचे कार्यारंभ आदेश दि.२६.८.२००८ रोजी देण्यात आले असून सदरचे काम दि.२८.२.२०१२ रोजी पूर्ण करण्यात आले असून कामावर एकूण खर्च ८५६६.२५ लक्ष इतका झालेला आहे. मुख्य इमारतीचे काम २००९ रोजी पुर्ण झाले असुन मा.राष्ट्रपती यांचे हस्ते उद्‌घाटन होऊन इमारत हस्तांतरीत केली आहे. त्यामुळे कामास विलंब झालेला नाही, किरकोळ कामे नंतर पूर्ण झाली.

**२१. कसबा बावडा, कोल्हापूर येथे नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणे** :-सदर काम करणेसाठी काम पूर्ण करणेचा कालावधी २४ महिने म्हणजेच दि.१३.८.२०११ पर्यंत होता. सदर इमारत बेसमेंट + तळमजला + ४ मजले अशी असून या इमारतीचे एकूण ५ भाग करण्यात आलेले आहेत. त्यानुसार “उपलब्ध अनुदानाचा विचार” करुन त्यापैकी प्रथम टप्प्यात भाग १,३ व ५ या तीन भागाचे काम ऑगस्ट २००९ सुरु करण्यात आले. त्यानंतर दुस-या टप्प्यात ऑगस्ट २०११ मध्ये उर्वरित दोन भागाचे काम (भाग-२ व ४) सुरु करण्यात आले. भाग-१, ३ व ५ चे काम डिसेंबर २०१२ अखेर व भाग २ व ४ चे काम त्यानंतर पूर्ण करण्याचे नियोजन होते. निधी अभावि कामास वेळोवेळी मुदतवाढ देणेत आली असून काम दि.१५.८.२०१५ अखेर पूर्ण करणेत आले.

सदरचे कामासाठी लागलेला अतिरिक्त वेळ व वाढीव खर्च याची कारणे खालीलप्रमाणे आहेत :-

१) सन २००५-०६ च्या दरसूचीवर आधारित ढोबळ अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळाली व त्यानंतर सन २००८-०९ च्या दरसूचीवर आधारित सविस्तर अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता मिळालेली आहे. तसेच तांत्रिक मान्यतेवेळी बेसमेंटच्या क्षेत्रफळामध्ये २३५६ चौ.मी. वाढ झालेली आहे. त्यामुळे दरसूचीतील फरकामुळे व क्षेत्रफळ वाढल्याने ९६३.०० लक्ष इतकी वाढ झाली आहे.

२) प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकामध्ये फर्निचरसाठी रु.३३४.५३ लक्ष इतकी तरतूद होती. सदर अंदाजपत्रक हे २००५-०६ चे दरसूचीवर आधारित होते. सविस्तर अंदाजपत्रक हे सन २०११-१२ दरसूचीवर आधारित होते व त्यामध्ये रु.२२९.२९ लक्ष रुपयाच्या कॉम्पक्टरचा समावेश होता. त्यामुळे दर सूचीतील फरकामुळे व कॉम्पक्टरमुळे रु.७६३.०० लक्ष इतकी वाढ झाली.

३) मुख्य इमारतीच्या निविदा ४.७६ टक्के जादा दराने स्विकारल्याने रु.१३१.०० लक्ष इतकी वाढ झाली.

४) अंतर्गत रस्ते, मोरी व पार्किंग व कुंपन भिंत या कामामुळे रु.१३८.०० लक्ष इतकी वाढ झाली आहे. सदर वाढ दरसूचीमुळे झाली आहे.

५) इमारतींअंतर्गत विद्युतीकरण व रस्त्यावरील दिवाबत्ती यामुळे दरसूचीतील वाढीमुळे रु.२०३.०० लक्ष वाढ झाली आहे.

६) उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ, पुणे यांचेकडून प्राप्त झालेल्या नकाशानुसार काही अतिरिक्त बाबींचे कामामुळे रु.१४८.०० लक्ष इतकी वाढ झाली आहे.

७) बागबागीचा व अत्याधुनिक अग्निप्रतिबंधक उपाययोजनेमुळे रु.१०३.०० लक्ष इतकी वाढ झाली आहे. वाढीव खर्चासाठी शासन निर्णय क्र.विधी व न्याय विभाग क्र.सीसीबी १११३/३२१/प्र.क्र.५१/का.१३, दि.१२.२.२०१७ अन्वये सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली आहे व सदरच्या कामावर आज अखेर रु.५५३४.०२ लक्ष इतका खर्च झाला आहे व प्रकल्पावर होणारा एकूण खर्च हा सुधारित प्रशासकीय मान्यता किंमतीचे सिमित आहे.

**२२. गडहिंग्लज येथे न्यायालयीन इमारत बांधणे :-** सदर कामासाठी काम पूर्ण करणेचा कालावधी १८ महिने म्हणजे १३.६.२०१३ अखेर होता. सन २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये आवश्यकतेपेक्षा कमी निधी प्राप्त झाल्यामुळे कामाच्या गतीवर परिणाम झाला आहे. अतिरिक्त कामास प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर फर्निचर व इतर अनुषंगिक सुविधांसह दि.११.१.२०१७ रोजी काम उपभोक्ता खात्यास हस्तांतरित केले आहे. सदर कामावर आजअखेर रु.९१८.४८ लक्ष इतका खर्च झालेला असून सुधारित प्रशासकीय मंजूरीचे रु.९३०.३० लक्षचे अंदाजपत्रक या कार्यालयाचे पत्र क्र.प्रशा/इमारती/६९४, दि.११.२.२०१६ अन्वये जिल्हा न्यायालयास सादर केले असून जिल्हा न्यायालयाकडून उच्च न्यायालय, मुंबई यांना दि.६.१०.२०१७ रोजी मंजूरीसाठी सादर केले आहे.

**२३. गडहिंग्लज येथे न्यायालयीन इमारतीचे अतिरिक्त बांधकाम करणे:-**अतिरिक्त कामांमध्ये मुख्यत्वे करुन फर्निचर कामाचा समोवश असून त्याची मुदत ६ महिने म्हणजे दि.१५.१०.२०१६ अखेर होती. मूळ इमारतीचे काम पूर्ण झाल्यानंतर दि.१६.४.२०१६ मध्ये फर्निचर कामास प्रारंभ केलेनंतर सद्यःस्थितीत दि.११.१.२०१७ रोजी सदर काम हस्तांतरित केलेले आहे. कामावर आज अखेर रु.५०६.५४ लक्ष इतका खर्च झालेला आहे.

**२४. आजरा येथे न्यायालयीन इमारत बांधणे:-**सदर कामासाठी काम पूर्ण करणेचा कालावधी १२ महिने म्हणजे दि.५.२.२००७ अखेर होता. सद्यःस्थितीत दि.३१.३.२००९ रोजी काम पूर्ण झाले असून दि.६.३.२०१० रोजी इमारत उपभोक्ता खात्यास हस्तांतरित केली आहे. कामावर आजअखेर रु.२०४.५१ लक्ष इतका खर्च झालेला आहे.

**२५. म्हसवड येथे न्यायालयीन इमारत बांधणे:-**सदर काम पुर्ण करण्याचा विहीत कालावधी १२ महिने म्हणजेच दि.२१.८.२०१२ पर्यंत आहे. सदर काम विहित मुदतीत पूर्ण केले असल्याने मुदतवाढ देण्यात आलेली नाही. सद्यःस्थितीत सदर काम पूर्ण करुन दि.२१.८.२०१२ रोजी उपभोक्ता विभागास हस्तांतरित केले आहे. या कामावर अंतिम देयकानुसार रु.९८.७८ लक्ष एवढा खर्च झालेला आहे.

**२६. कराड येथे अतिरिक्त न्यायालय इमारतीचे बांधकाम करणे :-**सदर काम पूर्ण करण्याचा विहित कालावधी १८ महिने म्हणजेच दि.२५.९.२०१२ पर्यंत आहे. सदर कामास दि.३१.२.२०१३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सद्यःस्थितीत सदर काम पूर्ण करुन दि.२.१२.२०१३ रोजी उपभोक्ता विभागास हस्तांतरित केले आहे. सदर कामावरील खर्च सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत असल्याने व काम वेळेत पूर्ण केल्याने सदर कामास अतिरिक्त वेळ व वाढीव खर्चाचा मुद्दा लागू होत नाही.

**२७. मेंढा येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाची इमारत बांधणे :-**सदर काम पूर्ण करण्याचा विहीत कालावधी १८ महिने म्हणजेच दि.१६.१२.२०१४ पर्यंत आहे. तद्नंतर सदर कामावर दि.३१.५.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सद्यःस्थितीत काम पूर्ण झाले असून आर्थिक वर्ष २०१६-१७ पर्यंत सदर कामावर एकूण रु.४१०.२४ लक्ष इतका खर्च झालेला आहे. सदर कामावरील खर्च प्रशासकीय मान्यतेच्या १० टक्केच्या मर्यादेतच करण्यात आले आहे.

**२८. अ.क्र.२८ ते ३३ वरील कामे अनुक्रमे श्रीगोंदा न्यायालयीन इमारतीच्या पहिल्या मजल्याचे काम करणे व कर्जत येथे न्यायालयीन इमारत बांधणे :-** श्रीगोंदा न्यायालयीन इमारतीच्या पहिल्या मजल्याचे बांधकाम करणे हे काम टेस्ट ऑडीच्या वेळी पूर्ण झालेले होते. सदर कामास अतिरिक्त वेळ लागलेला नाही व त्यावर वाढीव खर्च झालेला नाही तसेच कर्जत येथील न्यायालयीन इमारत बांधणे हे काम प्रगतीत असून त्या कामास अतिरिक्त वेळ लागलेला नाही व वाढीव खर्च झालेला नाही.

**२९. अहमदनगर जिल्ह्यातील नव्या न्यायालयीन इमारतीच्या बांधकामात कार्यादेश जारी करण्यात साडेसहा वर्षाचा विलंब झाला होता :-** सदरचे काम करण्यासाठी अतिरिक्त वेळ लागला व त्यावर वाढीव खर्च झालेला आहे. त्याबाबतची वस्तुस्थितीवर आधारित कारणमिमांसा वरील ३.३.२.३ या मुद्याच्या अनु.क्र.१ च्या अनुपालनामध्ये नमूद आहे. सदर कामाच्या

झालेल्या वाढीव खर्चास वस्तुस्थितीवरील आधारित कारणमिमांसा देऊन शासनाकडून शासन निर्णय क्र.सीसीबी-१११४/७२७/ प्र.क्र.१४२/का-१३, दि.२१.०७.२०१५ अन्वये सुधारित प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली आहे. त्यामुळे शासन स्तरावर विलंबाची व वाढीव खर्चाची कारणे सादर झालेली आहेत.

**३०. संगमनेर येथे न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणे (तळमजला ३ मजले) ता.संगमनेर, जि.अहमदनगर :-** सदर कामासाठी काम पूर्ण करण्याचा कालावधी २४ महिने (दि.२७.०३.२०१५) पर्यंत होता. सदरील कामाचे तळमजला व तीन मजल्याचे काम पूर्ण झालेले असून, उपभोक्ता विभागाच्या मागणीनुसार अंतर्गत काँक्रीटचे रस्ते तयार करणे, इमारतीत फर्निचर तयार करणे, ड्रेनेज लाईन, बाह्य पाणीपुरवठा, परिसर विकास, बागबगीचा व लॅन्ड डेव्हलपमेंट व अनेक कामे अपूर्ण आहेत. सदर कामाच्या पूर्वीच्या प्रशासकीय मान्यता रु.१७२१.४१ लक्ष (इलेक्ट्रिकल) होती व उपभोक्ता विभागाच्या मागणीनुसार रु.२७४८.०० लक्ष इतकी आहे. तसेच या संदर्भातील सुधारित अंदाजपत्रक सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविलेली आहे. उपरोक्त उपभोक्ता विभागाने सुचविलेल्या बाबी न्यायालयीन प्रकल्प संपूर्ण बाबींना परिपूर्ण करावयाच्या झाल्यास त्यास रु.८,८४,८८,५३०/- इतका वाढीव खर्च अपेक्षित आहे. तसेच सविस्तर अंदाजपत्रके स्वतंत्र मंजूरी करिता सादर केले आहे. वरील कागदपत्रे सोबत जोडण्यात येत आहेत. उपसचिव विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पत्र क्र.९०४५/२०१६ रोजीचे पत्र सादर केले आहे.

**३१. राहाता जिल्हा अहमदनगर येथे न्यायालयीन इमारत बांधणे :-** सदर कामासाठी काम पूर्ण करण्याचा कालावधी १५ महिने (दि.२४.०८.२०१२) पर्यंत होता. दि.३१.१२.२०१२ रोजी भूमीपूजनास विलंब झाल्याकारणाने काम हे उशिराने सुरु झाले व कामाचा कालावधी मुदतीत पूर्ण करण्यास आला नाही. मदतवाढीचा प्रस्ताव मंजूर करुन काम हस्तांतरीत दि.०७.०३.२०१३ रोजी केले आहे. तसेच न्यायालयीन इमारत आज रोजी वापरात आहे.

**३२. तालुका कोपरगांव जिल्हा अहमदनगर येथे न्यायालयीन इमारत बांधणे :-** सदर कामासाठी काम पूर्ण करण्याचा कालावधी १२ महिने (दि.३१.१२.२०१०) पर्यंत होता. त्यानंतर नियमित मुदतवाढ दि.३०.१०.२०११ पर्यंत देऊन काम दि.३०.०९.२०११ पर्यंत विहीत मुदतीत पूर्ण करण्यात आले आहे.

**३४. अकोला येथे अतिरिक्त न्यायालयाची इमारत बांधणे :-** या कामाच्या मूळ संकल्पनेमध्ये फार मोठ्या प्रमाणात बदल झाल्याने या कामाचे सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त करण्यासाठी नव्याने अंदाजपत्रक तयार करणे व त्याकरिता मंजूरी मिळविणे या कामासाठी वेळ लागल्यामुळे हे काम नियोजित वेळेत पूर्ण होऊ शकले नाही. या कामाकरिता सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी बराच कालावधी लागल्याने व संबंधीत कंत्राटदाराचे देयकाचे प्रदान न झाल्याने दरम्यानच्या कालावधीत काम कंत्राटदाराने प्रलंबित ठेवले होते. विधी व न्याय विभागाकडून या कामास नव्याने सुधारित प्रशासकीय मान्यात दि.२१.०३.२०१६ रोजी रु.२१.०३ कोटी रुपयास मंजूर केली असून, सद्यःस्थितीमध्ये या इमारतीचे विद्युतीकरणाचे काम वगळता मूळ इमारतीचे काम पूर्ण झालेले आहे.

**३५. पातुर जिल्हा अकोला येथे दिवाणी व फौजदारी न्यायाधीशाची (तळ मजला व पहिला मजला) इमारत बांधकाम करणे :-** ह्या इमारतीचे काम दि.२०.०६.२०१३ रोजी पूर्ण करण्यात आले असून, सद्यःस्थितीमध्ये ही इमारत उपभोक्ता खात्यास हस्तांतरीत करण्यात आली आहे. या इमारतीमध्ये सद्यःस्थितीमध्ये न्यायालयाचे कामकाज सुरु आहे. या कामाची मूळ किंमत रु.३७७.१० लक्ष असून या कामावर रु.३९५.३६ लक्ष खर्च झालेला आहे. सदर खर्च हा प्रशासकीय मान्यतेपेक्षा १०% पेक्षा कमी असल्याने याकरिता सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता भासली नाही.

**३६. विक्रोळी येथील न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणे :-** सदर कामासाठी काम पूर्ण करण्याचा कालावधी २४ महिने म्हणजेच दिनांक ३०/९/२०१७ पर्यत आहे.सदर कामाचा प्रस्तावित भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिका सन २०३४ चे सुधारीत प्रारुप विकास आराखड्यानुसार सदर भूखंडावर बहूउददेशीय सभागृहाकरिता आरक्षित असल्याचे दर्शविते व याबाबत मुंबई उच्च न्यायालय येथे जनहित याचिका क्र.५८/२०१२ सुध्दा दाखल आहे.सदर कारणास्तव बांधकामाकरिता भूखंड संबंधीत कंत्राटदारास उपलब्ध होवू शकला नाही.सद्यःस्थिती भूखंडावरील बहुउद्देशीय सभागृहाचे आरक्षण दि.९/११/२०१७ रोजी उठविण्यात आले आहे. तसेच मा.उच्च न्यायालयाने इमारत बांधकामाचे काम त्वरित सुरु करण्याचे आदेश दि.२४.१.२०१८ रोजी दिलेले आहेत.

त्यामुळे कामास दि.३०.९.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. या कामावर मार्च २०१७ पर्यंत कामावर रु.८९.३४लक्ष इतका खर्च सर्वेक्षण,आवारभिंत व विद्युतकाम इत्यादी करिता झालेला आहे. सद्यःस्थितीत काम प्रगतीपथावर आहे.

**३७. माझगांव येथील नवीन महानगर दंडाधिकारी न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणे. :-** सदर काम पूर्ण करण्याचा विहीत कालावधी ३० महिने म्हणजेच दिनांक ३१/७/२०१९ पर्यंत आहे.काम प्रगतीपथावर असून,माहे ३/२०१७ पर्यत सदर कामावर रु.३३४.६४लक्ष इतका खर्च झालेला आहे.सदर कामाचे संपूर्ण संकल्पन व नकाशे उपलब्ध न झाल्यामुळे कामाची सुरुवात करण्यास अल्पशः विलंब झाला आहे. मात्र काम निविदा कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे अतिरिक्त वेळ व वाढीव खर्चाची बाब या कामासाठी लागू नाही.

**३८. कुर्ला येथील न्यायालयीन इमारतीवर अतिरिक्त ३ -या मजल्याचे बांधकाम करणे.:-** सदर कामाच्या अंदाजपत्रकात इमारतीवर ३ रा मजला बांधणे तसेच तळमजला ते २ -या मजल्याचे नुतनीकरण करण्याच्या कामाचा समावेश करण्यांत आलेला आहे. कार्यादेश प्राप्त होताच तळमजला ते दुस-या मजल्यावरील अंतर्गत प्रसाधनगृहाचे नुतनीकरण,पहिला व दुस-या मजल्यावरील खिडक्यांचे नुतनीकरण,अंतर्गत लादी नुतनीकरण व रंगरंगोटीची कामे,आवार सुधारणा करणे इत्यादी नुतनीकरणाची कामे पूर्ण केलेली आहेत त्याकरिता मार्च २०१७ पर्यंत कामावर रु.३०.००लक्ष इतका खर्च झालेला आहे. तिस-या मजल्याच्या बांधकामाचे सविस्तर नकाशे मा.वास्तुशास्त्रज्ञ,महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाने तयार करुन दिनांक २२/१२/२०१६ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे मंजूरीकरिता सादर केलेले आहेत. त्यांच्या स्तरावर मंजूरी देण्याची कार्यवाही करण्यांत येत आहे.मंजूरी प्राप्त झाल्यावर तिस-या मजल्याचे बांधकाम पूर्ण करण्यात येईल.

विधि व न्याय विभागाने, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१६१५/ प्र.क्र.२२०/भाग-१/का-१३, दिनांक १० ऑक्टोबर २०१६ अन्वये राज्यातील न्यायालयांना सोयी-सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने पायाभूत सुविधा धोरण निर्गमित केले आहे. सदर धोरणाच्या परिच्छेद २.६ मध्ये नमूद केल्यानुसार न्यायालयीन इमारती व न्यायधिश निवासस्थाने यांच्याकरीता प्रमाणित नमुना नकाशा तयार करण्यात यावा ज्यामध्ये आवश्यक घटक, सोयी-सुविधाचा समावेश असेल. त्यास नियोजन व वित्त विभागाची मान्यता घेता येईल. तसेच प्रस्तावित इमारतीचा नकाशा हा प्रमाणित नकाशाशी सुसंगत आहे असे प्रमाणपत्र प्रधान न्यायाधिश यांनी प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक केले आहे. एखाद्या ठिकाणी प्रमाणबध्द नमुना नकाशानुसार इमारतीचे काम करणे शक्य नसल्यास त्या ठिकाणच्या विशेष गरजा लक्षात घेऊन नमूना नकाशे तयार करण्याबाबत नमूद केले आहे. तसेच प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर मा.उच्च न्यायालय व राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय त्यासंबंधित कामाच्या व्याप्तीमध्ये असा बदल करु नये की, ज्यामुळे मूळ प्रशासकीय मान्यतेच्या १० टक्केपेक्षा जास्त खर्च होईल. सदर पायाभूत सुविधा धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत सर्व प्रधान न्यायाधिश, सर्व जिल्हे यांना कळविण्यात आले आहे.

**परिच्छेद क्र. ३.३.३.१**

**इमारतींची संरचनात्मक लेखापरीक्षा न करणे**

महाराष्ट्र शासनाच्या जानेवारी, २००९ च्या अधिसूचनेनुसार, ज्या इमारतींच्या बाबतीत (१) पूर्तता प्रमाणपत्र प्राप्त होणे; किंवा (२) इमारतीचा ताबा घेण्याची परवानगी प्राप्त होणे; किंवा (३) तिच्या एकूण बांधिव (build-up) क्षेत्रापैकी किमान ५० टक्के क्षेत्राचा ताबा प्राप्त होणे यापैकी जी घटना आधी घडली असेल त्या तारखेपासून ३० वर्षे झाली असतील तर अशा इमारतींच्या प्रत्येक मालकाने किंवा भोगवटदाराने सदर इमारती मानवी वस्तीसाठी योग्य असल्याविषयी प्रमाणित करण्यास महानगरपालिका/नगर परिषद यांचेकडून नोंदणीकृत असलेल्या संरचना अभियंत्याकडून अशा इमारतींची तपासणी करुन घ्यावी.

लेखापरीक्षणांत असे निदर्शनास आले की, राज्यातील सरकारी मालकीच्या न्यायालयाच्या ४६४ इमारतींपैकी २१८ इमारती ३० वर्षापेक्षा अधिक जुन्या होत्या परंतु जुलै २०१६ पर्यंत PW विभागाने १४२ इमारतींची (६५ टक्के) संरचनात्मक लेखापरीक्षा केली नव्हती.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

राज्यामध्ये एकूण शासनाच्या मालकीच्या ४६४ न्यायालयीन इमारती असून, संरचनात्मक लेखापरीक्षा करावयाच्या १४२

न्यायालयीन इमारती आहे. त्यापैकी ८५ न्यायालयीन इमारतींची संरचनात्मक लेखापरीक्षा पूर्ण करण्यात आली असून, ५७ न्यायालयीन इमारतींची संरचनात्मक लेखापरीक्षा करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

**साक्ष :-**

**परिच्छेद क्र. ३.३ "न्यायालयाच्या इमारतींमध्ये स्थापत्य कामांची अंमलबजावणी" :-**

**परिच्छेद क्र. ३.३.१ 'नियोजन'**

**२.१** राज्यामध्ये ४७५ न्यायालयीन इमारती आहेत. भारतामध्ये सर्वात जास्त न्यायालयीन इमारती महाराष्ट्र राज्यामध्ये आहेत. भारतातील सर्वात मोठे राज्य उत्तर प्रदेश आहे. या राज्यात देखील महाराष्ट्र राज्यापेक्षा कमी न्यायालयीन इमारती आहेत. महाराष्ट्रातील न्यायिक अधिका-यांची संख्या जवळपास २१०० इतकी आहे. राज्यातील एकूण ४६४ न्यायालयीन इमारतींपैकी १३ इमारती मोडकळीस आलेल्या होत्या. त्यापैकी २ नवीन इमारतींचे बांधकाम सुरु आहे. अजून ७ नवीन इमारती बांधण्यासंदर्भातील प्रस्ताव पाठविलेला आहे. यातील नांदेड येथील न्यायालयीन इमारती संदर्भात प्रस्ताव आलेला आहे. सदर प्रस्ताव नियोजन विभागाकडे व्हेंटींग करिता पाठविण्यात आले आहे. नाशिक, नांदेड, रायगड व नंदुरबार येथील न्यायालयीन इमारतीच्या स्थिती व जागेच्या उपलब्धतेबाबतची विचारणा समितीने केली असता सचिवांनी खुलासा केला की, नाशिक येथे पोलीस आयुक्तालयाची जागा फक्त २ एकर एवढीच आहे. तेथे खूप मोठे न्यायालयीन इमारत उभी राहणार आहे. या इमारतीमध्ये जवळपास ६० न्यायिक अधिकारी आहेत. नाशिक शहरालगत पोलीस आयुक्तालय आहे. या पोलीस आयुक्तालयाची अडीच एकर जागा विधी व न्याय विभागास देऊ केलेली आहे. सदर जागेवरील प्लॅन, इस्टीमेट आणि डिझाईन करण्याचे काम सुरु आहे. नांदेड येथील प्लॅनींग प्रपोजल आलेले आहे. पीडब्ल्यूडीकडून व्हेटींग करुन घेतलेले आहे. सदर प्रपोजल प्लॅनींग डिपार्टमेंकडे व्हेटींग करण्यासाठी पाठविलेले आहे. सदर प्रपोजल ९५ कोटी रुपयांचे आहे.

प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, रायगड यांनी अलिबाग, जि. रायगड येथे न्यायालयीन इमारत बांधण्याकरिता आराखडे तयार केले असून, सदर प्रस्ताव माननीय उच्च न्यायालयाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे. तद्नंतर सदर प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येईल. नंदूरबार येथील न्यायालयीन इमारतीचे बांधकाम ५ कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. सदर कामाचे बजेट ५ कोटी पेक्षा जास्त होत असेल तर त्यासाठी माननीय मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी आहे. त्या कमिटीची परवानगी घ्यावी लागते. सदर प्रस्ताव मुख्य सचिवाकडे प्रलंबित आहे.

न्यायालयीन इमारतीचे बांधकाम यामध्ये तीन मुद्दे आहेत. त्यातील पहिला मुद्दा असा की, सदर प्रस्ताव जिल्हा सत्र न्यायालयाकडून माननीय उच्च न्यायालयाकडे आला पाहिजे. माननीय उच्च न्यायालयाच्या इन्फ्रास्ट्रक्चर कमिटीने प्राधान्य क्रम ठरवून दिला पाहिजे. काही जिल्ह्यातील न्यायालयीन इमारत बांधण्यासंदर्भातील प्रस्ताव जिल्हा सत्र न्यायालयानी पाठविले नाही, काही प्रस्ताव माननीय उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित आहे. काही-काही ठिकाणाचे प्रस्ताव गेल्या १० वर्षापासून प्रलंबित आहेत. राज्यातील पूर्ण न्यायालयीन इमारती बांधण्यासंदर्भातील प्राधान्य क्रम ठरविण्यात आलेला होता. या समितीच्या माहितीबाबत सचिवांनी खुलासा केला की, यामध्ये ब-याच वेळा मल्टिपलस्टेजला डिले होतो. त्यामुळे वित्त विभाग, नियोजन विभाग आणि मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन ऑक्टोंबर २०१६ मध्ये कोर्टाने इन्फ्रास्ट्रक्चरचे राज्यव्यापी पॉलीसी निश्चित केलेली आहे. या पॉलीसीनुसार काम केले तर सदर कामामध्ये कोणत्याही प्रकारच्या अडचणी निर्माण होणार नाहीत. पूर्वी ५ कोटी रुपयांमध्ये जिल्हा स्तरावरील न्यायालयीन इमारतीचे बांधकाम पूर्ण होत होते आता मात्र ५ कोटी रुपयांमध्ये तालुका स्तरावरील न्यायालयीन इमारतीचे बांधकाम होत नाही. ५ कोटी रुपयांपेक्षा जास्त निधीचा प्रस्ताव असेल तर तो वित्त विभाग, नियोजन विभाग आणि माननीय मुख्य सचिवांच्या कमिटीकडे सादर करावा लागतो. त्यामुळे सदर प्रस्ताव या सर्व विभागाकडून मान्य होऊन येण्यात ब-याच दिवसांचा कालावधी जात आहे. ५ कोटींची मर्यादा वाढवून ती १५ कोटी करावी अशी मागणी विधी व न्याय विभागाने केलेली आहे.

न्यायालयीन इमारतीमधील जागेसंदर्भात समितीने विचारणा केली की, ज्या चेंबरसाठी २०० चौरस फुटांच्या जागेची आवश्यकता आहे तेथे शासनाने १२०० चौरस फुटांची जागा दिलेली आहे आणि कोर्टामध्ये १२०० ते १५०० वकील आहेत त्यांना मात्र तेथे साधे बसण्यासाठी सुध्दा जागा नाही. त्या प्रमाणात खुर्च्या देखील उपलब्ध नाहीत. त्यावर सचिवांनी खुलासा केला की, न्यायालयीन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर काही रुम्स वकीलांना देण्यात येतील. या अनुषंगाने समितीने असेही

सुचित केले की, सदर इमारतीमध्ये न्यायाधीशांना कक्ष उपलब्ध करून दिले त्याबद्दल समितीचा कोणताही आक्षेप नाही. परंतु बार रुमसाठी खूप कमी जागा दिली जाते. पुढील १० ते २० वर्षाच्या वाढीव जनसंख्येच्या आधारावर त्या बार रुमचे बांधकाम केले पाहिजे. राज्यातील कोणत्याही न्यायालयामध्ये बार रुमसाठी जास्त जागा दिली जात नाही. तसेच तालुका स्तरावरील न्यायालयामध्ये वकीलांना देखील बसण्यास जागा नाही. परिस्थती बिकट आहे. ठाणे न्यायालयामध्ये आमदार निधीतून खूर्च्या, टेबल आणि इतर साहित्य दिलेले आहे. रत्नागिरी येथील बार रुमची परिस्थती सुध्दा अत्यंत बिकट आहे.

या संदर्भातील लवकरात लवकर निर्णय घेण्याचे सचिवांनी मान्य केले. जालना जिल्ह्यातील आंबड तालुक्यामध्ये अतिरिक्त न्यायालय मंजूर झालेले आहे. सदर न्यायालयांच्या इमारतीचे काम पूर्ण झालेले आहे. परंतु तेथील न्यायाधीशांच्या शासकीय निवास स्थानाची सोय झालेली नाही. जर शासकीय निवासस्थानाची सोय नसेल तर त्या ठिकाणी किरायाने निवासस्थान घेता येते. त्यामुळे तेथील रेंटेड क्वॅाटर्स् आयडिन्टीफाय केलेल्या आहेत. ते चालू करण्यासंदर्भात माननीय उच्च न्यायालयाने व विधी व न्याय विभागाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. सदर क्वॅाटर्स् लवकरात लवकर सुरु करण्यात यावे, अशी समितीची सूचना आहे.

इन्फ्रास्ट्रक्चर कमिटीमार्फत राज्यातील सर्व न्यायालयीन इमारतीचे प्राधान्य क्रम ठरविण्यात आले आहे का ? सदर कमिटीची स्थापना सन २०१६ मध्ये करण्यात आली आहे. आता सन २०१८ वर्ष सुरु आहे. जर प्राधान्य क्रमाची यादी तयार झाली असेल तर त्याची एक प्रत समितीस सादर करावी असे समितीने सुचित केले असता, राज्यातील न्यायालयीन इमारतीचे प्राधान्य क्रमाच्या यादीचे काम माननीय उच्च न्यायालय स्तरावर सुरु आहे. सदर कमिटीच्या सहा ते सात बैठका झालेल्या आहेत. सदर यादीचे काम अंतिम टप्प्यात आलेले आहे. सदर यादी लवकारात लवकर तयार करण्यासंदर्भातील विनंती विधी व न्याय विभाग माननीय उच्च न्यायालयाकडे करेल असे सचिवांनी सांगितले. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, दीड वर्षापासून प्राधान्य यादी तयार करण्यात आली नाही. तसेच महालेखाकारांनी माहिती दिली की, मोडकळीस आलेल्या ज्या १३ इमारती आहेत त्या सर्व प्राधान्य यादीमध्ये येणे आवश्यक आहे. यावर सचिवांनी खुलासा केला की, या बाबतची विनंती माननीय उच्च न्यायालयाकडे करण्यात येईल.

**परिच्छेद क्रमांक ३.३.२.२ "प्रशासकीय मान्यता देण्यास विलंब" :-**

प्रशासकीय मान्यता देण्यासाठी १ ते ४ वर्षापर्यंत विलंब झालेला आहे. तसेच पालघर येथील इमारतीस प्रशासकीय मान्यता देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर विलंब झालेला आहे. सदर मान्यतेची फाईल गायब झाली, अशी समितीकडे माहिती आलेली आहे. यावर सचिवांनी खुलासा केला की, पालघर येथील न्यायालयीन इमारतीचे प्रपोजल सन १९९७ मध्ये आले होते असे लेखा परीक्षणामध्ये नमूद केले आहे. पण विधी व न्याय विभागाकडे सन २००७ मध्ये प्रथम प्रपोजल आलेले होते. सदर प्रपोजल सन २०१२ मध्ये प्रोसेससाठी घेण्यात आले त्यावेळी ते प्रपोजल कालबाह्य झालेले होते. त्यावर समितीने सुचित केले की, सदर प्रस्ताव सन २००७ मध्ये माननीय उच्च न्यायालयाकडे पाठविण्यात आला होता. सदर प्रस्ताव माननीय उच्च न्यायालयाने दिनांक १ मार्च, २०१२ रोजी शासनास सादर केलेला आहे. सदर प्रक्रियेस ५ वर्षाचा कालावधी लागलेला आहे. अति विलंबामुळे सदर अंदाजपत्रक कालबाह्य झालेले आहे. त्यामुळे पुन्हा त्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता घ्यावी लागली. सदर मान्यता ही सन २०१४ मध्ये देण्यात आली आहे. सदर कामाचा निधी मंजूर झालेला आहे. पण अद्याप त्या कामाच्या निविदा काढण्यात आलेल्या नाहीत. याबाबत सचिवांनी खुलासा केला की, सदर कामासाठी सन २०१५-१६ मध्ये ८२ लाख, सन २०१६-१७ मध्ये ११९ लाख रुपयांचा निधी मंजूर झालेला आहे. व सदर इमारतीचे ९२ टक्के काम पूर्ण झालेले आहे.

पालघर येथील न्यायालयीन इमारतीचा प्रस्ताव सन २००७ ते सन २०१२ पर्यंत प्रलंबित होता. सन २०१२ ते सन २०१४ पर्यंत सदर प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसाठी प्रलंबित होता सन २०१४ मध्ये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर कामास उशीर झालेला असून ? सदर इमारतीस मान्यता देण्यात विलंब झालेला असल्याचेही सचिवांनी मान्य केले.

समितीची अशी भुमिका आहे की, विलंबास कारणीभूत असलेल्या संबंधित अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करावी. सदर चूक माननीय उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात यावी. सदर प्रस्ताव ५ वर्ष प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत. तसेच राज्यातील सर्व न्यायालयीन इमारतीचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे व त्यासाठी शासनाने व अधिकारी वर्गाने देखील विशेष लक्ष द्यावे यास सचिवांनी सहमती दर्शविली व सदर काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल. सन २०१५-१६ मध्ये

४१, सन २०१६-१७ मध्ये ७३, आणि सन २०१७-१८ मध्ये ५६ अशा एकूण १७० प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या १७० प्रस्तावांची एकूण किंमत १ हजार ६८८ कोटी रुपये आहे. विधी व न्याय विभागाचे एकूण बजेट ६५० कोटी रुपयांचे असताना १६०० कोटी रुपयांचे काम सुरु केले आहे त्यामुळे तर सदर कामासाठी प्राधान्य क्रम यादी तयार करण्याचे सचिवांनी मान्य केले. प्राधान्य क्रम यादीसाठी माननीय उच्च न्यायालयाकडे विनंती करण्यात येईल. तसेच सदर कामासाठी निधीत वाढ करण्याची देखील विनंती करण्यात येणार असल्याचे सचिवांनी सांगितले.

**परिच्छेद क्रमांक ३.३.२.३ "कार्यादेश जारी करण्यातील विलंब" :-**

कार्यादेश जारी करण्यातील विलंब या अंतर्गत ३८ कामांपैकी तीन कामे निविदेच्या टप्प्यावर होती. ३५ कामांपैकी ३३ कामांमध्ये प्रशासकीय मंजूरी प्राप्त होण्यापासून कार्यादेश जारी करण्यामध्ये सहा महिन्यापेक्षा जास्त विलंब होता. अहमदनगर जिल्ह्यातील नव्या न्यायालयीन इमारतीच्या बांधकामात कार्यादेश जारी करण्यात ६ १/२ वर्षाचा विलंब झाला होता.

यावर समितीने अशी विचारणा केली की, प्रस्तुत प्रकरणी प्रशासकीय मान्यतेनंतर तांत्रिक मान्यता घेऊन निविदा काढणे, हे एवढेच काम होते. सदर कामासाठी किती दिवसांचा कालावधी लागतो?सदर कार्यवाहीसाठी २ वर्ष विलंबाची कारणे काय आहेत? सरासरी १ वर्षाचा कालावधी लागला असता तर ते समितीने मान्य केले असते. काही ठिकाणाची कार्यवाही ६ महिन्यात पूर्ण केलेली आहे. पण काही ठिकाणी मात्र दोन ते अडीच वर्षाचा कालावधी घेतलेला आहे. सदर प्रकरणी दोषी अधिका-यांवर काय कारवाई केलेली आहे? अहमदनगर येथील न्यायालयीन इमारतीचे बांधकाम सुरु करण्यासाठी ६ वर्षे विलंब होण्याची कारणे काय आहेत? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही ६ महिन्यामध्ये पूर्ण होणे आवश्यक आहे.अहमदनगर येथील प्रशासकीय इमारतीस मान्यता दिली असल्याचे सांगताना सचिवांनी खुलासा केला की, सदर इमारतीसाठी जी जमीन निश्चित केली होती ती वक्फची प्रॉपर्टी होती. त्यामुळे ती जागा बदलण्यात आली होती. अहमदनगर येथील जिल्हा न्यायाधीश यांची इमारत पाडून त्या ठिकाणी न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे. या सर्व प्रोसेससाठी ६ वर्षाचा विलंब झालेला आहे.

रत्नागिरीला दिनांक ०२ ऑक्टोबर, २०११ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे आणि दोन वर्षानंतर सन २०१३ ला वर्कऑर्डर दिलेली आहे. राजापूर येथे दिनांक १६ जून, २०१० रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असताना दिनांक १७ डिसेंबर, २०१२ ला वर्कऑर्डर दिलेली आहे. देवरुख येथे दिनांक ३१ ऑगस्ट, २०१० रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असताना दिनांक ११ सप्टेंबर, २०१२ रोजी वर्कऑर्डर दिलेली आहे. दापोली येथे दिनांक २५ जून, २०१० रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असताना दिनांक २७ फेब्रुवारी, २०१३ रोजी वर्कऑर्डर दिलेली आहे. गुहागर येथील परिस्थिती ठीक आहे कारण सन २०१३ ला प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर एक वर्षात सन २०१३ ला वर्कऑर्डर दिलेली आहे. तसेच खेड येथील परिस्थिती पण अशीच आहे सन २०१० ला प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर लगेच एक वर्षात सन २०११ ला वर्कऑर्डर दिलेली आहे. शिरपूर, जि. धुळे येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधण्यासाठी उशिर झालेला आहे. या ठिकाणी दोन वर्षानंतर कार्यारंभ आदेश दिलेले आहेत. जव्हार येथील परिस्थिती देखील तशीच आहे की, सन २०१४ ची प्रशासकीय मान्यता असताना सन २०१६ ला वर्कऑर्डर दिलेली आहे.. त्यानंतर पालघर येथील परिस्थिती देखील तशीच आहे. कसबा बावडा, कोल्हापूर येथे नकाशामध्ये बदल करण्यात आल्यामुळे काही विलंब झालेला आहे. त्यानंतर गडहिंग्लज येथील सन २०१४ ची प्रशासकीय मान्यता असताना सन २०१६ मध्ये वर्कऑर्डर दिलेली आहे. कराड येथील अतिरिक्त न्यायालय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी सन २००८ ची प्रशासकीय मान्यता असताना सन २०१० ला आपण वर्कऑर्डर दिलेली आहे. कोपरगावच्या न्यायालयीन इमारतीचे प्रशासकीय मान्यतेची तारीख दिनांक ३१ ऑक्टोबर, २००७ आहे. आणि तांत्रिक मान्यता सन २००९ ची असे दिलेले आहे.

कोपरगावची प्रशासकीय मान्यता दिनांक ३१ ऑक्टोबर, २००७ ची आहे आणि दिनांक ०१ जानेवारी, २०१० रोजी वर्कऑर्डर दिलेली आहे. या कामामध्ये त्या वर्षीच्या बजेट प्रोव्हिजनचा उल्लेख दिसत आहे. कदाचित त्या वर्षी निधिची अडचण असावी. निधी प्राप्त झाल्यानंतर याचा नकाशा केलेला आहे. त्यामुळे त्यात दोन वर्षाच्या कालावधीचा फरक दिसत आहे. डिसेंबर, २०१० मध्ये प्रत्यक्षात काम पूर्ण केलेले आहे. कुर्ला येथील न्यायालयीन इमारतीवर अतिरिक्त तिस-या मजल्याचे बांधकाम करणे याबाबत वर्कऑर्डर देण्यासाठी दोन वर्ष उशिर झालेला आहे.

इमारतीच्या बांधकामाकरिता तांत्रिक मान्यता कोण देते ? असे महालेखाकारांनी विचारले असता सचिवांनी खुलासा केला की, मुख्य अभियंता स्तरावर तांत्रिक मान्यता देण्यात येते.

विभागाने तांत्रिक मान्यतेमध्येच विलंब केला असल्यामुळे या कामांमध्ये विलंब होत आहे. कारण त्यानंतरच टेंडर करुन इस्टिमेट तयार करण्यात येते. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी विविध ठिकाणी न्यायालयीन इमारतीस मान्यता देताना झालेल्या विलंबाबात नमूद केले की, प्रशासकीय मान्यतेनंतर नकाशामध्ये बदल झालेल्या काही केसेस आहेत. बेलापूर, पालघर, कसबा बावडा, म्हसवड, मेंढा, अकोला या ठिकाणी इन्फ्रास्ट्रक्चर समिती कडून प्रशासकीय मान्यता झाल्यानंतर सुद्धा नकाशात बदल करण्यात आले आहेत. इन्फ्रास्ट्रक्चर समितीकडून प्रशासकीय मान्यता झाल्यानंतर सुद्धा बदल करण्यात येतात. त्यामुळे आताचे रॉकील चे उदाहरण देतो की, तिथे १४ मजली इमारत बजेटसाठी आलेली आहे. त्यानंतर त्याच्या नकाशामध्ये संबंधीत विभागाला काही बदल हवे होते ते बदल आता अंतिम होत आहेत. त्यामुळे तांत्रिक मान्यता देताना सुद्धा थांबावे लागते.यासाठी कालमर्यादा ठरविली पाहिजे अशी समितीची सूचना आहे. यावर सचिवांनी खुलासा केला की, माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये इन्फ्रास्ट्रक्चर पॉलिसी तयार केलेली आहे. यामध्ये बजेटला आल्यापासून ६ महिन्याच्या कालावधीचा आपण उल्लेख केलेला आहे. मागच्या ७ ते ८ महिन्याची सद्यःस्थिती बघितली तर काही वर्कऑर्डर झालेल्या आहेत. दुसरा मुद्दा असा आहे की, आधी ५ कोटी रुपयांच्या वरच्या कामांना ४५ दिवसाची मर्यादा असायची. ती मर्यादा निविदा सूचनेची २५ दिवसाची केलेली आहे. आता ६ महिन्यात नाहीतर ४ ते ५ महिन्यात वर्कऑर्डर निघतात. परंतु ही पॉलिसी इम्प्लीमेंट झालेली नाही आणि प्रायरिटी लिस्ट पण तयार झालेली नाही. जी प्रोसिजर विभाग सांगत आहे ती या पुढची बाब आहे.

कोणत्या इमारतीचे काम करायचे ते इन्फ्रास्ट्रक्चर समितीची प्रायरिटीची आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाची भूमिका आहे की, एकदा प्रशासकीय मान्यता झाल्यानंतर त्याला टीएस करुन टेंडरींग करायचे. ते म्हणतात की, ते काम आता ५ महिन्याच्या आत करण्याचे आम्ही नियोजित केले आहे. या व्यतिरिक्त गेल्या महिन्यात विभागाने एक सर्क्युलर इश्यु केलेले आहे. प्रशासकीय मान्यतेच्या विषयात केवळ न्यायालयाचे म्हणून नाहीतर प्रत्येक विभागाच्या इमारतीसाठी हाच आराखडा तयार केलेला आहे. तांत्रिक मान्यता किती दिवसात देणार, निविदा सूचना किती दिवसात देणार आणि निविदा प्राप्त झाल्यानंतर मंजुरी किती दिवसात देणार हे वेळापत्रक सुद्धा आता आपण तयार केलेले आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

**परिच्छेद क्र. ३.३.२.४'पूर्ण झालेल्या आणि बांधकाम प्रगतीपथावर असलेल्या कामांसाठी लागलेल्या अतिरिक्त वेळ व वाढीव खर्च' :-**

पूर्ण झालेल्या आणि बांधकाम प्रगतीपथावर असलेल्या कामांसाठी लागलेल्या अतिरिक्त वेळ व वाढीव खर्च याअंतर्गत डिसेंबर २०१६ पर्यंत ३५ पैकी पाच कामांमध्ये सहा महिन्यापर्यंत वाढीव कालावधी लागला होता तर २५ कामामध्ये कार्यादेशात नमूद केलेल्या तारखेपेक्षा सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधी लागला होता. उर्वरीत पाच कामे वेळेवर पूर्ण झाली होती.

यामध्ये मे, २०१६ पर्यंत ३५ बांधकामावरील प्रत्यक्ष खर्च मंजूर खर्चापेक्षा ११२.२० कोटी रुपये वाढले होता. ज्यापैकी १७ कामे पूर्ण झाले आहेत आणि १८ कामे प्रगती पथावर आहेत. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, मोठे कारण आहे की, प्रशासकीय मान्यता देण्यासाठी उशिर झाला याबाबत उदाहरण देताना नमूद केले की, सन २०१५-१६ चा डीएसआर असेल आणि त्याच्या बेसिसवर विभागाने प्रोसेस केले तर ज्या दिवशी प्रशासकीय मान्यता दिली त्याच दिवशी कॉस्ट एक्सलेट होते.

त्याबद्दल समितीचा आक्षेप नाही. पण २ वर्षामध्ये इमारत पूर्ण करायची आहे. सन २०१४ ची प्रशासकीय मान्यता असेल आणि सन २०१६ मध्ये टेंडर काढले असेल आणि सन २०१४ ते सन २०१६ पर्यंत जी काही एक्सलेशन कॉस्ट असेल त्यामध्ये वाढ तर होणारच आहे. दोन ते तीन वर्षामध्ये काम नाही केले तर त्याची भरपाई सुद्धा शासनाला द्यावी लागते. याबद्दल समिति चर्चा करीत आहेत. प्रशासकीय मान्यता किंवा टेंडरमध्ये विलंब झाला याबाबत मागच्या परिच्छेदात चर्चा केलेली आहे. तर त्यासाठी होणारा विलंब टाळावा. २ वर्षाच्या कालावधीमध्ये इमारत जर पूर्ण नाही झाली तर त्याच्या विलंबाचा जो बोजा शासनावर पडतो त्याची चर्चा समिती करु इच्छिते.

त्यावर विधी व न्याय विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, टाईम ओव्हररनमुळे कॉस्ट वाढली असेल तर त्याला ॲडिशनल दोन कारणे आहेत. एक सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव यांनी सांगितल्याप्रमाणे युजर डिपार्टमेंट म्हणून संबंधित विभागाकडून रिक्वायरमेंट वाढते. स्कोप ऑफ वर्क थोडासा वाढवला जातो किंवा ॲडिशनल ॲमिनिटीज मागितल्या जातात. सुरवातीला ४ वर्षाच्या ॲडमिनिस्ट्रेटीव ॲप्रुव्हलचे जे प्रपोजल दिलेले होते ते स्केलेटन दिलेले होते म्हणजे एक इमारत

आणि चार ते पाच आयटम. त्यामध्ये फर्निचर नाही किंवा गार्डनिंगची प्रोव्हिजन नाही. ॲडिशनल रिक्वायरमेंट आल्यामुळे ती कॉस्ट वाढत जाते. मागच्या तीन वर्षात एकाही प्रकल्पाला निधी मिळाला नाही म्हणून टाईम ओव्हररन झालेला नाही. याची प्रोव्हिजन शासनाने केलेली आहे. ॲडिशनल रिक्वायरमेंट काही सांगितली किंवा डीएसआरमध्ये खूप फरक पडला तर हे झालेले आहे. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, ॲडिशनल रिक्वायरमेंटमुळे बांधकामाला उशिर झाला तरी चालेल. परंतु कंत्राटदारांनी विलंब केल्यामुळे किती कामांना विलंब झाला आणि त्यामुळे सरकारवर ओव्हरबर्डन झाले व वर्कऑर्डर दिल्यानंतर २ वर्षामध्ये त्यांनी काम पूर्ण करायला पाहिजे ते केले नाही.

यामध्ये कॉस्ट एक्सलेशनचा क्लॉज आहे काय ? जुन्या ॲग्रीमेंटमध्ये कॉस्ट एक्सलेशनचा क्लॉज होता. सन २०१६-१७ या वर्षीपासून हा क्लॉज पूर्णपणे काढून घेतेलेला आहे. कॉस्ट एक्सलेशनचा क्लॉज काढून घेणे योग्य नाही. कारण प्रशासकीय मान्यतेसाठी २ वर्ष उशिर झाला, २ वर्ष वर्कऑर्डर देण्यासाठी उशिर झाला आणि अशा प्रकारे ४ वर्ष विलंब झाल्यानंतर एक्सलेशनचा क्लॉज जर काढून टाकला तर ठेकेदार काम कसे करु शकतील. विभागाला इमारतीच्या कामासाठी काही रिस्पॉन्सच मिळणार नाही. पहिल्या किंवा दुस-या निविदेला प्रतिसाद नाही आणि तिस-या निविदेला प्रतिसाद आला आहे असे आपण स्पष्टीकरण दिलेले आहे.

याबाबत सचिवांनी खुलासा केला की, एक्सलेशन क्लॉज जरी काढला तरी सिमेंट, स्टील आणि रस्त्यांच्या कामासाठी जशी डांबराची गरज पडते तसा यासाठी स्टार रेटचा उल्लेख केलेला आहे. या मटेरियलमुळेच मुख्य वाढ होते. एक्सलेशन जरी काढले तरी स्टार रेटचा अंतर्भाव त्यामध्ये केलेला आहे. त्यामुळे सिमेंट आणि स्टीलची भाववाढ झाली तरी विभाग ठेकेदाराला त्याची भाववाढ देणार. कारण त्याच्या स्टार रेटचा उल्लेख करारामध्ये केला आहे त्यामुळे त्याची जी भाववाढ होणार आहे त्याचा डायरेक्ट प्रपोर्चुनेट त्याला मिळेल. एक्सलेशन काढल्यानंतर त्यासाठी ६ महिन्याचा कालावधी होता आणि त्यामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांच्या अनुमतीने एक शासन निर्णय इश्यु केलेला आहे की, प्रत्येक विभागाने त्याला ३ वर्ष लागणारा निधी द्यायचा आणि त्यामध्ये पहिल्या वर्षी ३३ टक्के तरतूद करायची. या कारणामुळे एक्सलेशन काढले आहे. कारण निधी जर पूर्ण असेल तर ठराविक वेळेच्या पलिकडे काही काम जात नाही. त्यामुळे एक्सलेशनची गरज नाही.

ठेकेदारांनी विलंब केल्यामुळे किती इमारतीच्या कामाला उशिर झाला आणि शासनावर किती बोजा पडलेला आहे ? याबाबतची स्पेसिफिक माहिती सचिवांनी स्वतंत्रपणे सादर करण्याचे समितीस आश्वाक्षित केले. तसेच दोन ते तीन कामे अशी आहेत की त्यांच्यावर फाईन लावण्याची कार्यवाही विभागाने केलेली आहे. फाईन लावल्यानंतर तिथे एक्सलेशन फ्री होते.

मिरा-भाईंदरच्या इमारतीची काय परिस्थिती आहे ? अशी विचारणा समितीने केली की, यामध्ये कार्यारंभ इश्यु केल्यानंतर बांधकामासाठी परवानगी घेण्यासाठी कमेसमेंट सर्टिफिकेट लागते त्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून ४ महिन्याचा कालावधी लागला आहे. सदर काम अजूनपर्यंत पूर्ण का झालेले नाही. याबाबत सचिवांनी खुलासा केला की, मिरा-भाईंदर येथे दोन फेजमध्ये काम होते. पहिल्यांदा फेज १ चे काम आले होते ते पूर्ण झालेले आहे आणि त्याचे पूर्ण पैसे ही दिलेले आहेत. फेज २ चे जे प्रपोजल आहे जे रिवाईज ॲडमिनिस्ट्रेटीव ॲप्रुव्हलसाठी सचिव समितीकडे प्रलंबित आहे. ते पूर्ण झाल्यानंतर इमारत पूर्ण होईल. परंतु यासाठी प्रशासकीय मान्यता दिली नसल्याचे सचिवांनी सांगितले.

मिरा-भाईंदरच्या विषयामध्ये कार्पोरेशनकडून परवानगी घेण्यासाठी ४ महिने लागले आहेत. याबाबत पाठपुरावा सार्वजनिक बांधकाम विभागाने करायचा होता की कॉन्ट्रॅक्टरने करायचा होता. अशी विचारणा महालेखाकारांनी केली असता सचिवांनी असे सांगितले की, ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडूनच फॉलोअप करण्याची आवश्यकता होते व याचा पाठपुरावा केला होता पण त्यासाठी ४ महिन्याचा कालावधी लागला ही वस्तुस्थिती सचिवांनी मान्य केली.

जव्हार जि. ठाणे येथे न्यायालयीन इमारतीच्या बांधकामाची काय परिस्थिती आहे ? तसेच सदर जागेवर अतिक्रमण झालेले आहे आणि न्यायालयाने जागा उपलब्ध करुन दिलेली नाही तर ही काय परिस्थिती आहे. अशी विचारणा समितीने केली असता सचिवांनी खुलासा केला की, जव्हारची लॅन्ड फ्री झाली नव्हती त्यामुळे अडचण आलेली होती.आता हे सर्व स्पष्ट झालेले आहे आणि ते काम सुरु आहे.

"निधी अभावी कामास वेळोवेळी मुदत वाढ देण्यात आली असून काम दिनांक १५ ऑगस्ट, २०१५ रोजी पूर्ण करावे लागले." निधी नसेल तर कंत्राटदारांनी काम करु नये असे कार्यारंभ आदेशाच्या अटी व शर्तीमध्ये नमूद होते काय ? किंवा रनिंग बिले तुम्हाला देऊ असे काही करारामध्ये असते काय ? याबाबत सचिवांनी खुलासा केला की, रनिंग बिले दर महिन्याला

पेमेंट करण्याचे करारामध्ये आहे परंतु निधीअभावी पेमेंटच झाले नाही तर तेवढ्या कालावधीसाठी मुदत वाढ देण्यात येते. ९० दिवसापर्यंत निधी किंवा इतर अडचणी असतील आणि त्या तशाच राहिल्या तर त्याला विड्रॉ करण्याची संधी दिलेली आहे. परंतु कंत्राटदार ते स्वतःहून विड्रॉ करीत नाही. प्रॅक्टकली असे होते की, निधीच्या अभावी पेमेंट झाले नाही तर त्याला व्हॅलीड एक्सटेंशन देण्यात येते.

कसबा बावडा, जि. कोल्हापूर येथे नवीन न्यायालयीन इमारतीच्या बांधकामाची काय परिस्थिती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता याबाबत सचिवांनी खुलासा केला की, कसबा बावडाचे काम पूर्ण झालेले आहे. या ठिकाणी महाराष्ट्रातील सर्वात चांगली इमारत तयार झालेली आहे.

कसबा बावडाची इमारत फेब्रुवारी, २०१६ मध्ये पूर्ण झालेली आहे. परंतु याची सुधारीत प्रशासकीय मान्यता सन २०१७ ला मिळाली कारण त्यामध्ये काही ॲडिशनल कंपोनंट होते. त्याची सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. जसे एडीआर सेंटरची पूर्वी प्रोव्हिजन नव्हती तर त्यांनी नवीन केले होते.

विभागाने सन २००५-०६ पासून सन २०११-१२ पर्यंत आणि नंतर सन २०१७ मध्ये वारंवार बदल केले आहेत. हे प्रपोजल खूप जुने होते असे समितीस सांगण्यात आले. त्यामुळे वेळोवेळी एक्सटेंशन दिले आणि डीएसआर पण बदलत गेलेले आहेत. आता याची पूर्ण कॉस्ट ५५ करोड रुपयांच्या वर गेलेली आहे. त्या इमारतीमध्ये न्यायालयाचे ४५ हॉल आहेत. महाराष्ट्रातील सर्वात चांगली सार्वजनिक इमारत कोल्हापूर येथे उभी आहे.

आजरा येथे न्यायालयीन इमारतीच्या बांधकामाची वस्तुस्थिती सांगताना सचिवांनी सांगितले की, आजरा येथील न्यायालयीन इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. मेंढा येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयास मुदतवाढ देण्यात आली आहे. परंतु सदरहू ठिकाणचे बांधकाम आता पूर्ण करण्यात आलेले आहे.

अहमदनगर जिल्ह्यामधील संगमनेर येथील न्यायालयीन इमातीच्या बांधकामाची सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता सचिवांनी खुलासा केला की, संगमनेर येथील न्यायालयाची इमारत पूर्ण झालेली आहे. परंतु तेथील इमारत ही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीमध्ये नसल्यामुळे स्थानिक प्रशासनाने सदरहू इमारतीस पाणी पुरवठा करण्यासाठी विरोध दर्शविला आहे.

शासकीय इमारतीला पाणी पुरवठा करण्यास नकार देता येऊ शकतो काय ? या संदर्भात विधी व न्याय विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, नगर विकास विभागामार्फत सदरहू स्थानिक स्वराज्य संस्थेला निदेश देण्यात आलेले असून सध्या त्या ठिकाणचे काम सुरु आहे.

अकोला जिल्ह्यातील इमारतीचे बांधकाम कंत्राटदाराने पूर्ण केलेले नव्हते. परंतु आता अकोला येथील न्यायालयाच्या इमारतीचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे तेथील फर्निचरच्या प्रस्तावाला मंजूरी देण्यात आलेली आहे.

विक्रोळी येथील न्यायालयाच्या इमारतीची सद्यःस्थिती काय आहे ?या संदर्भात सचिवांनी खुलासा केला की, शासनाकडून म्हाडाने सदरहू जागा विकत घेतली होती. सदरहू जागेवर बहूउद्देशीय सभागृहाचे आरक्षण होते. सद्यःस्थितीमध्ये तेथे न्यायालयाचे काम प्रगतीपथावर आहे.

माझगाव येथील नवीन महानगर दंडाधिकारी यांच्या न्यायालयीन इमारतीच्या बांधकामाचे नकाशे तयार केले नाहीत. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, नकाशांचे संकल्पन विभागाकडे उपलब्ध आहे. जुलै, २०१९ पूर्वी सदरहू इमारतीचे बांधकाम पूर्ण होईल. तसेच यासाठी बार चार्ट तयार करण्यात आलेला आहे. माननीय उच्च न्यायालयास बार चार्ट सादर केला आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.३.३.१ "इमारतींची संरचनात्मक लेखापरीक्षा न करणे" :-**

इमारतींचे संरचनात्मक लेखापरीक्षा न करणे या महालेखाकारांच्या आक्षेपाबाबत सचिवांनी खुलासा केला की, ज्या वेळेस इमारतीचे ऑडीट करण्यात आले होते, त्यावेळेस १४२ इमारतींचे लेखा परीक्षण झालेले नाही, असे सांगण्यात आले होते. १४२ इमारतींपैकी सर्वांना सूचना देण्यात आलेली आहे. त्यामध्ये ८५ कोर्टाच्या इमारतींचे लेखापरीक्षण करण्यात आलेले असून ५७ इमारतींचे लेखापरीक्षण सुरु आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, सदरहू इमारतींचे लेखा परीक्षण केव्हा पूर्ण होईल ? यासंदर्भात सचिवांनी खुलासा केला की, सदरहू ५७ इमारतींचे लेखा परीक्षण पुढील चार महिन्यामध्ये पूर्ण होईल.

**परिच्छेद क्रमांक ३.३.३.२ 'अग्नी सुरक्षा उपाययोजना न करणे ' :-**

न्यायालयीन इमारती संदर्भात अग्नी सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या नसल्याचे आक्षेप महालेखाकारांनी काढला असता सचिवांनी खुलासा केला की, फायर ऑडीटचे काम दोन टप्प्यामध्ये पूर्ण करण्यात आलेले आहे. सर्व प्रथम फायर ऑडीट करण्यासाठी सर्व जिल्हा न्यायालयांना सांगण्यात आले होते. त्याप्रमाणे विदर्भ आणि मराठवाडयामध्ये १४ जिल्ह्यांमधील न्यायालयाचे फायर ऑडीट करुन अहवाल सादर केला आहे. तसेच, मुंबई आणि जळगाव शहरामधील सर्व न्यायालयांचे फायर ऑडीट पूर्ण करण्यात आलेले आहे. तसेच, पाच जिल्ह्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. काही ठिकाणचे फायर ऑडीट स्थानिक एजन्सीकडून करण्यात आलेले आहे. त्यावेळेस डायरेक्टर ऑफ फायर सेफ्टी यांच्यासोबत एक बैठक घेण्यात आली होती. त्यावेळेस असे लक्षात आले की, स्थानिक एजन्सीकडून करावयाच्या फायर ऑडीटसाठी २५० ते ३०० कोटी रुपये खर्च लागणार होता. त्यामुळे सदरहू बैठकीमध्ये असे सांगण्यात आले होते की, डायरेक्टर ऑफ फायर सेफ्टी यांच्या ॲथोराईज फायर ऑफिसरकडून सर्व इमारतींचे फायर ऑडीट करुन घेण्यात यावे. त्यासाठी वेटींग सुरु आहे. त्याचप्रमाणे ज्या पाच इमारतींसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे, त्यांच्यासाठी निधीची तरतूद डिसेंबर महिन्याच्या पुरवणी मागण्यात करण्यात आली आहे.

शासकीय इमारतीचे फायर ऑडीट संबंधीत विभागाकडून ऑडीट करण्याचे बंधन का नाही ? त्याचप्रमाणे जुन्या इमारतींसाठी फायर सेफ्टीची साधने बसविण्यासाठी प्राधान्य दिले पाहिजे. यावर सचिवांनी खुलासा केला की, नवीन इमारतीमध्ये फायर सेफ्टीची साधने बसविण्यात येतात. परंतु जुन्या इमारतीमध्ये जर नवीन इमारतींप्रमाणे फायर सेफ्टी इक्वीपमेंट बसवावयाची असतील तर जुन्या इमारतींची जी किंमत आहे, त्यापेक्षा जास्त फायर सेफ्टी इक्वीपमेंट बसविण्याची किंमत येत होती.

राज्यातील सर्व न्यायालयीन इमारतींमध्ये फायर ऑडीट करण्यासंदर्भात कोणत्या उपाययोजना तयार करण्यात आलेल्या आहेत. यासंदर्भात सचिवांनी खुलासा केला की, राज्यामधील २० जिल्ह्यामध्ये फायर ऑडीटचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. तसेच मागील महिन्यामध्ये पाच जिल्ह्यामधील देण्यात आलेल्या न्यायालयीन इमारतींच्या प्रशासकीय मंजूरीसाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. विभागाचे एकूण बजेट ६५० कोटी रुपयांचे आहे. यावर समितीने अशी सूचना केली की, राज्यातील न्यायालयांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने लागणारा खर्च प्राधान्याने करावा.समितीच्या सुचनेची नोंद सचिवांनी घेतली.

**परिच्छेद क्रमांक ३.३.२.३'कार्यादेश जारी करण्यातील विलंब' :-**

कार्यादेश जारी करण्यातील विलंब याअंतर्गत ३८ कामांपैकी तीन कामे निविदेच्या टप्प्यावर होती. ३३ कामांमध्ये प्रशासकीय मंजूरी प्राप्त होण्यापासून कार्यादेश जारी करण्यामध्ये सहा महिन्यापेक्षा जास्त विलंब होता. अहमदनगर जिल्ह्यातील नव्या न्यायालयीन इमारतीच्या बांधकामात कार्यादेश जारी करण्यात ६ १/२ वर्षाचा विलंब झाला होता.

यावर समितीने अशी विचारणा केली की, प्रस्तुत प्रकरणी प्रशासकीय मान्यतेनंतर तांत्रिक मान्यता घेऊन निविदा काढणे, हे एवढेच काम होते. सदर कामासाठी किती दिवसांचा कालावधी लागतो? सदर कार्यवाहीसाठी २ वर्ष विलंबाची कारणे काय आहेत? सरासरी १ वर्षाचा कालावधी लागला असता तर ते समितीने मान्य केले असते. काही ठिकाणाची कार्यवाही ६ महिन्यात पूर्ण केलेली आहे. पण काही ठिकाणी मात्र दोन ते अडीच वर्षाचा कालावधी घेतलेला आहे. सदर प्रकरणी दोषी अधिका-यांवर काय कारवाई केलेली आहे?

अहमदनगर येथील न्यायालयीन इमारतीचे बांधकाम सुरु करण्यासाठी ६ वर्षे विलंब होण्याची कारणे काय आहेत? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही ६ महिन्यामध्ये पूर्ण होणे आवश्यक आहे.अहमदनगर येथील प्रशासकीय इमारतीस मान्यता दिली असल्याचे सांगताना सचिवांनी खुलासा केला की, सदर इमारतीसाठी जी जमीन निश्चित केली होती ती वक्फची प्रॉपर्टी होती. त्यामुळे ती जागा बदलण्यात आली होती. अहमदनगर येथील जिल्हा न्यायाधीश यांची इमारत पाडून त्या ठिकाणी न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे. या सर्व प्रोसेससाठी ६ वर्षाचा विलंब झालेला आहे.

रत्नागिरीला दिनांक ०२ ऑक्टोबर, २०११ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे आणि दोन वर्षानंतर सन २०१३ ला वर्कऑर्डर दिलेली आहे. राजापूर येथे दिनांक १६ जून, २०१० रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असताना दिनांक १७ डिसेंबर, २०१२ ला वर्कऑर्डर दिलेली आहे. देवरुख येथे दिनांक ३१ ऑगस्ट, २०१० रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असताना दिनांक ११ सप्टेंबर, २०१२ रोजी वर्कऑर्डर दिलेली आहे. दापोली येथे दिनांक २५ जून, २०१० रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असताना दिनांक २७ फेब्रुवारी, २०१३ रोजी वर्कऑर्डर दिलेली आहे. गुहागर येथील परिस्थिती ठीक आहे कारण सन २०१३ ला प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर एक वर्षात सन २०१३ ला वर्कऑर्डर दिलेली आहे. तसेच खेड येथील परिस्थिती पण अशीच आहे सन २०१० ला प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर लगेच एक वर्षात सन २०११ ला वर्कऑर्डर दिलेली आहे. शिरपूर, जि. धुळे येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधण्यासाठी उशिर झालेला आहे. या ठिकाणी दोन वर्षानंतर कार्यारंभ आदेश दिलेले आहेत. जव्हार येथील परिस्थिती देखील तशीच आहे की, सन २०१४ ची प्रशासकीय मान्यता असताना सन २०१६ ला वर्कऑर्डर दिलेली आहे. त्यानंतर पालघर येथील परिस्थिती देखील तशीच आहे. कसबा बावडा, कोल्हापूर येथे नकाशामध्ये बदल करण्यात आल्यामुळे काही विलंब झालेला आहे.त्यानंतर गडहिंग्लज येथील सन २०१४ ची प्रशासकीय मान्यता असताना सन २०१६ मध्ये वर्कऑर्डर दिलेली आहे  कराड येथील अतिरिक्त न्यायालय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी सन २००८ ची प्रशासकीय मान्यता असताना सन २०१० ला आपण वर्कऑर्डर दिलेली आहे. कोपरगावच्या न्यायालयीन इमारतीचे प्रशासकीय मान्यतेची तारीख दिनांक ३१ ऑक्टोबर, २००७ आहे. आणि तांत्रिक मान्यता सन २००९ ची असे दिलेले आहे.

कोपरगावची प्रशासकीय मान्यता दिनांक ३१ ऑक्टोबर, २००७ ची आहे आणि दिनांक ०१ जानेवारी, २०१० रोजी वर्कऑर्डर दिलेली आहे.या कामामध्ये त्या वर्षीच्या बजेट प्रोव्हिजनचा उल्लेख दिसत आहे. कदाचित त्या वर्षी निधिची अडचण असावी. निधी प्राप्त झाल्यानंतर याचा नकाशा केलेला आहे. त्यामुळे त्यात दोन वर्षाच्या कालावधीचा फरक दिसत आहे. डिसेंबर, २०१० मध्ये प्रत्यक्षात काम पूर्ण केलेले आहे. कुर्ला येथील न्यायालयीन इमारतीवर अतिरिक्त तिस-या मजल्याचे बांधकाम करणे याबाबत वर्कऑर्डर देण्यासाठी दोन वर्ष उशिर झालेला आहे.

इमारतीच्या बांधकामाकरिता तांत्रिक मान्यता कोण देते ? असे महालेखाकारांनी विचारले असता सचिवांनी खुलासा केला की, मुख्य अभियंता स्तरावर तांत्रिक मान्यता देण्यात येते.

विभागाने तांत्रिक मान्यतेमध्येच विलंब केला असल्यामुळे या कामांमध्ये विलंब होत आहे. कारण त्यानंतरच आपण टेंडर करुन इस्टिमेट बनवता. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी विविध ठिकाणी न्यायालयीन इमारतीस तांत्रिक मान्यता देताना झालेल्या विलंबाबाबत नमूद केले की, प्रशासकीय मान्यतेनंतर नकाशामध्ये बदल झालेल्या काही केसेस आहेत. बेलापूर, पालघर, कसबा बावडा, म्हसवड, मेंढा, अकोला या ठिकाणी इन्फ्रास्ट्रक्चर समिती कडून प्रशासकीय मान्यता झाल्यानंतर सुद्धा नकाशात बदल करण्यात आले आहेत.इन्फ्रास्ट्रक्चर समितीकडून प्रशासकीय मान्यता झाल्यानंतर सुद्धा बदल करण्यात येतात. त्यामुळे आताचे रॉकील चे उदाहरण देतो की, तिथे १४ मजली इमारत बजेटसाठी आलेली आहे. त्यानंतर त्याच्या नकाशामध्ये संबंधीत विभागाला काही बदल हवे होते ते बदल आता अंतिम होत आहेत. त्यामुळे तांत्रिक मान्यता देताना सुद्धा थांबावे लागते.यासाठी कालमर्यादा ठरविली पाहिजे अशी समितीची सूचना आहे. यावर सचिवांनी खुलासा केला की, माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये इन्फ्रास्ट्रक्चर पॉलिसी तयार केलेली आहे. यामध्ये बजेटला आल्यापासून ६ महिन्याच्या कालावधीचा आपण उल्लेख केलेला आहे. मागच्या ७ ते ८ महिन्याची सद्यःस्थिती बघितली तर काही वर्कऑर्डर झालेल्या आहेत. दुसरा मुद्दा असा आहे की, आधी ५ कोटी रुपयांच्या वरच्या कामांना ४५ दिवसांची मर्यादा असायची. ती मर्यादा निविदा सूचनेची २५ दिवसांची केलेली आहे. आता ६ महिन्यात नाहीतर ४ ते ५ महिन्यात वर्कऑर्डर निघतात. परंतु  ही पॉलिसी इम्प्लीमेंट झालेली नाही आणि प्रायरिटी लिस्ट पण तयार झालेली नाही. जी प्रोसिजर विभाग सांगत आहे ती या पुढची बाब आहे.

कोणत्या इमारतीचे काम करायचे ते इन्फ्रास्ट्रक्चर समितीची प्रायरिटीची आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाची भूमिका आहे की, एकदा प्रशासकीय मान्यता झाल्यानंतर त्याला टीएस करुन टेंडरींग करायचे. ते म्हणतात की, ते काम आता ५ महिन्याच्या आत करण्याचे आम्ही नियोजित केले आहे.या व्यतिरिक्त गेल्या महिन्यात विभागाने एक सर्क्युलर इश्यु केलेले आहे. प्रशासकीय मान्यतेच्या विषयात केवळ न्यायालयाचे म्हणून नाहीतर प्रत्येक विभागाच्या इमारतीसाठी हाच आराखडा तयार केलेला आहे.

**अभिप्राय व शिफारशी :-**

**परिच्छेद क्र. ३.३ "न्यायालयांच्या इमारतींमध्ये स्थापत्य कामांची अंमलबजावणी"**

**परिच्छेद क्र. ३.३.१ "नियोजन"**

**अभिप्राय**

**२.२** महाराष्ट्र राज्याच्या न्यायविषयक संरचनेत मुंबई उच्च न्यायालय व त्याच्या कार्यकक्षेतील मुंबई शहरातील तीन दुय्यम न्यायालये, ३२ इतर जिल्हा न्यायालये आणि त्याअंतर्गत ३५२ तालुका न्यायालये यांचा समावेश आहे. ५२६ न्यायालयीन इमारतीमधून १,८११ न्यायालये चालविली जात होती. महाराष्ट्र शासनाचा विधी व न्याय विभाग हा राज्यात कार्यरत असलेल्या सर्व दुय्यम न्यायालयांसाठी प्रशासकिय विभाग म्हणून कार्य करतो. जिल्हा न्यायालयांमधील मुख्य जिल्हा न्यायाधीश नवीन न्यायालय संकूल/शासकीय निवासस्थानांच्या बांधकामांसाठी प्रस्ताव मांडतात. संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागांकडून आरेखने व अंदाजपत्रके तयार केली जातात आणि जिल्ह्यांच्या मुख्य जिल्हा न्यायाधीशांकडून ती उच्च न्यायालयाच्या इमारत समितीला तिच्या मंजूरीसाठी सादर केली जातात. इमारत समितीने मंजूरी दिलेले प्रस्ताव नंतर विभागाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी आणि संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागांना काम सुरु करण्यासाठी निधी मुक्त करण्यासाठी पाठविले जातात.

**२.३** परंतु राज्यातील ४६४ सरकारी मालकीच्या न्यायालयीन इमारतीपैकी, १३ इमारती मोडकळीस आलेल्या स्थितीत होत्या. सदर १३ इमारती पैकी तीन इमारतींचे बांधकाम सुरु करण्यात आले होते आणि उच्च न्यायालयाच्या इमारत समितीकडून तीन कामांचे प्रस्ताव विभागाकडे प्रशासकीय मंजूरी साठी पाठविण्यात आले होते तरी मोडकळीस आलेल्या उर्वरित सात इमारतींच्या बांधकामासाठी मुख्य जिल्हा न्यायधीशांनी उच्च न्यायालयाला प्रस्ताव पाठविले नव्हते. दुय्यम न्यायालयांकडून सर्वसमावेशक प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे उच्च न्यायालय पुनर्विकास / बांधकामे यांच्यासंबंधीची योजना आखू शकले नाही. बांधकाम प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी मध्यम/दीर्घकालीन योजना आखण्याची आवश्यकता होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नोंदविलेले आहेत. परंतु बांधावयाच्या इमारतींचा प्राधान्यक्रम व आर्थिक वर्षात निधीची उपलब्धता याचा ताळमेळ व नियोजन न ठेवल्यामुळे ही कामे मोठ्या प्रमाणात प्रलंबित राहिली. राज्यातील सर्व न्यायालयीन इमारतीचे प्राधान्यक्रम ठरविण्यासाठी पायाभूत सुविधा समिती सन २०१६ मध्ये स्थापन करण्यात आली आहे. आता सन २०१८ वर्ष सुरु होवूनही अद्याप प्राधान्य क्रमाची यादी तयार झाली नाही. राज्यातील न्यायालयीन इमारतीचे प्राधान्य क्रमाच्या यादीचे काम माननीय उच्च न्यायालय स्तरावर सुरु आहे. सदर समितीच्या सहा ते सात बैठका होवूनही न्यायालयीन इमारतीच्या बांधकामाचा प्राथम्यक्रम निश्चित करण्यात आला नाही. सदर यादीचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे समितीला सांगण्यात आले.

**शिफारस**

**२.४ (१) महाराष्ट्रात एकूण ४६४ न्यायालयीन इमारती आहेत. देशात इतर राज्यांच्या तूलनेत महाराष्ट्रात जास्त न्यायालयीन इमारती आहेत. महाराष्ट्रातील न्यायिक अधिका-यांची संख्या जवळपास २१०० इतकी आहे. राज्यात मंजूर असलेल्या न्यायालयासाठी आवश्यकतेनुसार इमारतीचे बांधकाम प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी मध्यम/दीर्घकालीन योजना आखण्यात यावी व त्याचे योग्य ते नियोजन भविष्यात करावे. तसेच न्यायालयीन इमारतींच्या बांधकामाचा प्रस्ताव जिल्हा सत्र न्यायालयाकडून माननीय उच्च न्यायालयाकडे येणे आवश्यक असताना काही जिल्ह्यातील न्यायालयीन इमारत बांधण्यासंदर्भातील प्रस्ताव जिल्हा सत्र न्यायालयानी पाठविले नाहीत, काही प्रस्ताव माननीय उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित आहेत. तर काही ठिकाणचे प्रस्ताव गेल्या १० वर्षापासून प्रलंबित आहेत. ही कामे अमर्याद कालावधीसाठी प्रलंबित राहण्यामागील कारणे व अडचणी ब-याच आहेत. परंतु इमारतींच्या बांधकामाची कामे तातडीने व कालबध्द पध्दतीने पुर्ण करण्यासाठी व त्यासाठी येणा-या अडचणींचे निराकरण करुन उच्च न्यायालयाच्या पायाभूत सुविधा समितीने प्राधान्यक्रम ठरवून दिला पाहिजे. राज्यातील पूर्ण न्यायालयीन इमारती बांधण्यासंदर्भातील प्राधान्य क्रमासंदर्भात विधी व न्याय विभाग, वित्त विभाग, नियोजन विभाग आणि मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन ऑक्टोबर २०१६ मध्ये न्यायालयाने पायाभूत सुविधांसंदर्भात राज्यव्यापी धोरण निश्चित केलेले आहे. त्यामध्ये प्रलंबित तसेच भविष्यात हाती घ्यावयाच्या प्रकल्पांमध्ये सुसुत्रता आणण्यासाठी व प्रकल्प त्वरेने पुर्ण करण्यासाठी त्यांचा प्राधान्यक्रम ठरविण्यावर भर देण्यात आलेला आहे. राज्यातील न्यायालयीन इमारतीची आवश्यकता लक्षात घेता सदर यादी लवकरात लवकर तयार करण्यासंदर्भातील विनंती विधी व न्याय विभागाने माननीय उच्च न्यायालयाकडे करावी व मा.उच्च न्यायालयाकडून प्राप्त होणा-या प्राथम्यक्रमाच्या यादीनुसार कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्याबाबत**

**आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्यात यावी व त्यास पायाभूत सुविधा समितीची मान्यता घेऊन शासनास सादर करण्यात यावी व त्यास मान्यता मिळाल्यावर प्राधान्यक्रमानुसार या कामांसाठी वाढीव निधी उपलब्ध करुन देऊन ती टप्प्याटप्प्याने पुर्ण करण्यात यावी व धोरणाची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच राज्यातील एकूण न्यायालयीन इमारतींपैकी १३ इमारती मोडकळीस आलेल्या आहेत. या १३ इमारतींची कामे प्राधान्याने पुर्ण करावीत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**२.५** (२) सध्या न्यायालयीन इमारत बांधण्यासाठी सरासरी ५ कोटी पेक्षा जास्त खर्च येतो. ५ कोटी रुपयांपेक्षा जास्त निधीचा प्रस्ताव असेल तर तो वित्त विभाग, नियोजन विभाग आणि माननीय मुख्य सचिवांच्या समितीकडे सादर करावा लागतो. पूर्वी ५ कोटी रुपयांपेक्षा कमी रकमेमध्ये जिल्हा स्तरावरील न्यायालयीन इमारतीचे बांधकाम पूर्ण होत होते. परंतु आता ५ कोटी रुपयांमध्ये तालुका स्तरावरील न्यायालयीन इमारतीचे बांधकाम देखील होत नाही. त्यामुळे सदर प्रस्ताव उच्चस्तरीय समितीकडून मान्य होऊन येण्यात बराच कालावधी जातो. अतः मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीस सद्यःस्थितीत असलेली ५ कोटींची मर्यादा वाढवून ती १० कोटी करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

**परिच्छेद क्र. ३.३.२ "बांधकामांचे कार्यान्वयन"**

**परिच्छेद क्र. ३.३.२.१ "केंद्र पुरस्कृत योजनेखाली हाती घेतलेली कामे"**

**परिच्छेद क्र. ३.३.२.२ "प्रशासकीय मान्यता देण्यास विलंब"**

**अभिप्राय**

**२.६** महालेखाकारांनी तपासणी केलेल्या ३८ न्यायालयीन इमारती पैकी २५ न्यायालयीन इमारतीच्या कामांमध्ये उच्च न्यायालयांच्या इमारत समितीकडून प्रस्ताव प्राप्त झाल्याची तारीख आणि विभागाने दिलेली प्रशासकीय मान्यता याचा कालावधी हा सहा महिन्यापेक्षा जास्त आहे. ठाणे जिल्ह्यातील पालघर येथे न्यायालयाच्या इमारतीच्या बांधकामाचा प्रस्ताव उच्च न्यायालयाने डिसेंबर, १९९७ मध्ये विभागाला पाठविला होता तरी प्रशासकीय मान्यता १६ वर्ष विलंबाने म्हणजे जुलै २०१४ मध्ये देण्यात आली होती व सन २०१५-१६ मध्ये रु.८२.१७ लाख निधी मुक्त करण्यात आला. न्यायालयीन इमारतींच्या बांधकामाचे प्रस्ताव मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर शासनामार्फत प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येते.

**२.७** रु. ५.०० कोटी पेक्षा जास्त किंमतीचे प्रस्ताव- नियोजन विभाग, शासन परिपत्रक दिनांक ३० जानेवारी, २०१२ अन्वये रु. ५.०० कोटीपेक्षा जास्त असलेले किंमतीचे प्रस्ताव मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील सचिव समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येतात. सदर प्रस्ताव प्रथम सार्वजनिक बांधकाम विभाग, नियोजन विभाग, वित्त विभाग व तद्नंतर सचिव समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येतात.रु. ५.०० कोटीपेक्षा कमी किंमतीचे प्रस्ताव प्रथम सार्वजनिक बांधकाम विभागास तपासणीसाठी व प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास व सहमतीसाठी पाठविले जातात. सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दर्शविल्यानंतर सदर प्रस्ताव मा.मंत्री यांच्या अंतिम मान्यतेनंतर प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येते. सदर प्रस्ताव विविध टप्प्यावर तपासले जात असताना प्रस्ताव निहाय त्रुटी काढल्या जातात. सदर त्रुटींची पूर्तता मा.उच्च न्यायालय, मुंबई संबंधित प्रधान जिल्हा व सत्र न्यायालय व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेमार्फत करण्यात येते. प्रस्ताव विविध स्तरावरुन मंजूर होताना कालापव्यय होतो. तो टाळण्यासाठी विधि व न्याय विभागाने दिनांक १० ऑक्टोबर, २०१६ रोजी शासन निर्णय काढून न्यायालयीन पायाभूत सुविधा धोरण लागू केले आहे. त्यानुसार प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही आता सहा महिन्यामध्ये पूर्ण करण्यात येते.

**२.८** परंतु न्यायालयीन इमारतीच्या बांधकामांना प्रशासकीय मान्यता देण्यासाठी १ ते ४ वर्षापर्यंत विलंब झाला असल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर मान्य केले आहे. तसेच पालघर येथील इमारतीस प्रशासकीय मान्यता देण्यासाठी १६ वर्षाचा विलंब झालेला आहे. पालघर येथील न्यायालयीन इमारतीचा प्रस्ताव सन १९९७ मध्ये शासनास पाठविण्यात आला होता परंतु प्रस्तावाची नस्ती गहाळ झाल्यामुळे त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही. विधी व न्याय विभागाकडे सन २००७ मध्ये प्रथम प्रस्ताव आला होता. सदर प्रस्ताव सन २०१२ मध्ये कार्यवाहीसाठी घेण्यात आला त्यावेळी तो प्रस्ताव व अंदाजपत्रक

कालबाह्य झालेले होते. त्यामुळे सदर प्रस्ताव माननीय उच्च न्यायालयाने दिनांक १ मार्च, २०१२ रोजी शासनास पुन्हा सादर केलेला आहे. त्यामुळे सदर अंदाजपत्रकास पुन्हातांत्रिक मान्यता घ्यावी लागली. सदर मान्यता ही सन २०१४ मध्ये देण्यात आली आहे. इमारतींच्या बांधकामांमध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात, कार्यादेश जारी करण्यात, कामे पुर्ण करण्यात लक्षणीय विलंब झाल्यामुळे खर्चात देखील मोठ्या प्रमाणात वाढ झाली व ही बाब निश्चितच समर्थनीय नाही.

**शिफारस**

**२.९ ठाणे जिल्ह्यातील पालघर येथे न्यायालयाच्या इमारतींच्या बांधकामासंदर्भातील प्रस्ताव मा.उच्च न्यायालयाने डिसेंबर, १९९७ मध्ये विभागास पाठविलेला आहे या प्रस्तावाची नस्ती कार्यासनात शोध घेऊनही उपलब्ध झाली नाही. त्यामुळे अमर्याद विलंबाने पुन्हा प्रस्ताव सादर करुन अंदाजपत्रकास सुधारीत मान्यता घ्यावी लागली.ही बाब गंभीर स्वरुपाची असून प्रस्ताव अमर्याद कालावधीकरिता प्रलंबित राहण्यास कारणीभूत असलेल्या संबंधित अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी. तसेच पालघर येथील न्यायालयाच्या इमारतीचे बांधकाम तातडीने व प्राधान्याने पुर्ण करण्यात यावे व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात द्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.३.२.३ "कार्यादेश जारी करण्यातील विलंब"**

**अभिप्राय**

**२.१०** राज्यातील न्यायालयीन इमारतीच्या बांधकामासंदर्भातील तपासणी केली असता ३८ कामांपैकी तीन कामे निविदेच्या टप्प्यावर होती व ३५ कामांपैकी ३३ कामांना प्रशासकीय मंजूरी प्राप्त होण्यापासून कार्यादेश जारी करण्यामध्ये सहा महिन्यांपेक्षा जास्त विलंब झाला होता. यामध्ये ११ कामांना सहा ते बारा महिन्याचा विलंब, १४ कामांना एक ते दोन वर्षे व ८ कामास १ वर्षापेक्षा अधिक विलंब झाला होता. अहमदनगर जिल्ह्यातील नव्या न्यायालयीन इमारतीच्या बांधकामात कार्यादेश जारी करण्यात साडे सहा वर्षाचा विलंब झाला होता.

**२.११** अहमदनगर जिल्ह्यातील न्यायालयीन इमारतीच्या बांधकामास कार्यादेश जारी करण्यास साडे सहा वर्षाचा विलंब झाला आहे. हा विलंब जागा बदलामुळे झाला आहे. सदर कामासाठी मूळ प्रशासकीय मंजूरी दिनांक २५.५.२००५ रोजी मिळाली होती. सदरचे बांधकाम जुनी न्यायालयीन इमारत पाडून त्याठिकाणी करणे प्रस्तावित होते. तथापि, जुने न्यायालयीन इमारतीच्या भूखंडाच्या मालकीवरुन वाद सुरु होता. सदरची जागा वक्फ बोर्डाची असल्याने त्यांनी हरकत घेतली होती. त्यामुळे सदर नवीन न्यायालयाची जागा बदलून बांधकाम न्यायनगर परिसरात प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांच्या निवासस्थानाच्या ठिकाणी निवासाचे जुने बांधकाम पाडून करण्याचे निश्चित झाले व त्यानुसार सदर कामास दिनांक ८.४.२०११ रोजी सुधारित प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली. त्यानंतर सदर कामाच्या अंदाजपत्रकास मंजूरी होऊन निविदा कार्यवाही पूर्ण केली व कामास दिनांक ११.११.२०११ रोजी कार्यारंभ आदेश दिला. तथापि नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम न्यायनगर परिसरातील प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांच्या जुन्या बंगल्याच्या भूखंडावर करावयाचे होते. त्यामुळे सदरचा बंगला पाडून मोकळा भूखंड सार्वजनिक बांधकाम विभागाला विधी व न्याय विभागाकडून हस्तांतरीत होणे आवश्यक होते. तथापि सदर बाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वेळोवेळी पत्रव्यवहार होऊनही कार्यवाही करण्यात येत नव्हती. सदरचा बंगला पाडून मोकळा भूखंड सार्वजनिक बांधकाम विभागाकडे दिनांक १७.१२.२०१२ रोजी हस्तांतरीत झाला. त्यानंतर प्रत्यक्षात बांधकामास सुरूवात झाली. त्यामुळे यामध्ये मूळ प्रशासकीय मंजूरी मिळाल्यापासून ते प्रत्यक्ष काम सुरू होईपर्यंत ११ महिन्याचा विलंब झाला आहे.

**२.१२** राज्यात न्यायालयीन इमारतीच्या कामांना कार्यादेश जारी करणे यामध्ये सहा महिन्यापासून दोन वर्षापर्यंत विलंब झाला आहे. अहमदनगर येथिल न्यायालयीन इमारतींची वस्तुस्थिती स्पष्ट करताना सचिवांनी नमूद केले आहे की, सदर न्यायालयीन इमारतीच्या जागेत बदल केल्यामुळे साडे सहा वर्षे लागली असली तरी नवीन जागा प्राप्त झाल्यानंतर कार्यारंभ आदेश दिल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरु होण्यास ११ महिन्याचा विलंब झाला आहे. त्यामुळे सर्वसाधारणपणे सर्व प्रकरणामध्ये कार्यारंभ देण्यामध्ये सहा ते दोन वर्षाचा विलंब झाला आहे असे समिती समोर मान्य करण्यात आले.

**शिफारस**

**२.१३ इमारतीच्या बांधकामाकरिता तांत्रिक मान्यता मुख्य अभियंता स्तरावर देण्यात येते. विभागाने तांत्रिक मान्यतेमध्येच विलंब केला असल्यामुळे या कामांमध्ये विलंब होत आहे. कारण त्यानंतरच निविदा काढण्यात येते. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी न्यायालयीन इमारतीस तांत्रिक मान्यता देताना झालेल्या विलंबाबाबत कारण नमूद करताना असे सांगितले की, प्रशासकीय मान्यतेनंतर नकाशामध्ये बदल झालेली काही प्रकरणे आहेत. बेलापूर, पालघर, कसबा बावडा, म्हसवड, मेंढा, अकोला या ठिकाणी पायाभूत सुविधा समिती कडून प्रशासकीय मान्यता झाल्यानंतर सुद्धा नकाशात बदल करण्यात आले आहेत. पायाभूत सुविधा समितीकडून प्रशासकीय मान्यता झाल्यानंतर सुद्धा बदल करण्यात आल्यामुळे निविदा काढण्यास व प्रत्यक्ष काम सुरु करण्यास विलंब होतो. त्यामुळे इमारतींच्या बांधकामासाठी कालमर्यादा ठरविणे आवश्यक आहे. माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये पायाभूत सुविधा धोरण तयार केलेले आहे. यामध्ये रक्कम अर्थसंकल्पीत झाल्यापासून ६ महिन्याच्या आत कार्यारंभ आदेश देणे आवश्यक आहे. अगोदर ५ कोटी रुपयांच्या वरच्या कामांना ४५ दिवसाची मर्यादा असायची. त्या निविदा सूचनेची मर्यादा आता २५ दिवसाची केलेली आहे. आता ६ महिन्यात नाही तर ४ ते ५ महिन्यात वर्कऑर्डर निघतात. परंतु या धोरणाची अंमलबजावणी झालेली नाही आणि प्राथम्य क्रमाची यादी सुध्दा तयार झालेली नाही. विभागाने कार्यारंभ आदेश देण्यासाठी जी सुधारीत कालमर्यादा दिलेली आहे त्यांची तातडीने अंमलबजावणी करावी. प्रशासकीय मान्यतेच्या विषयासंदर्भात न्यायालयीन इमारतीच्या बांधकामाबाबत निकष लावून आराखडा तयार करणे आवश्यक आहे. त्यामध्ये तांत्रिक मान्यता किती दिवसात देणार, निविदा सूचना किती दिवसात देणार आणि निविदा प्राप्त झाल्यानंतर मंजूरी किती दिवसात देणार या सर्व बाबींचा समावेश करुन आराखडा तयार करण्यात येवून त्यांची अंमलबजावणी कालबध्द पध्दतीने करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात द्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.३.२.४ “पुर्ण झालेल्या आणि बांधकाम प्रगतीपथावर असलेल्या कामांसाठी लागलेला अतिरिक्त वेळ व वाढीव खर्च ”**

**अभिप्राय**

**२.१४** न्यायालयीन इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेल्या आणि बांधकाम प्रगतीपथावर असलेल्या कामांसाठी लागलेल्या अतिरिक्त वेळ व वाढीव खर्च या बाबत महालेखापालांनी असा आक्षेप नोंदविला की, डिसेंबर, २०१६ पर्यत, ३५ पैकी पाच कामांमध्ये कार्यादेशात नमूद केलेल्या तारखेपेक्षा सहा महिन्यापर्यंत वाढीव कालावधी लागला होता तर २५ कामामध्ये कार्यादेशात नमूद केलेल्या तारखेपेक्षा सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधी लागला होता. उर्वरित पाच कामे वेळेत पूर्ण झाली होती.

**२.१५** ३५ बांधकामांवरील प्रत्यक्ष खर्च मंजूर खर्चापेक्षा रु. ११२.२० कोटीने वाढला होता ज्यापैकी १७ पूर्ण झालेल्या आणि १८ प्रगतीपथावर असलेल्या कामांवर अनुक्रमे रु. ९६.९४ कोटी आणि रु. १५.२६ कोटी वाढीव खर्च झाला होता. इमारतीच्या पायामध्ये केलेला बदल, न्यायालयाच्या इमारतीमध्ये अतिरिक्त मजल्यांची तरतूद, अतिरिक्त सुविधा उपलब्ध करणे, अपु-या सर्वेक्षणांमुळे निविदेतील बाबीच्या संख्येत/नगात वाढ होणे, काम सोपविल्या नंतर आरेखनांमध्ये केलेले बदल हे वाढीव खर्चामागचे महत्त्वाचे कारणे होते जे कामाचे योग्य नियोजन केले गेले असते आणि काम सोपविण्याआधी त्याची व्याप्ती निश्चित केली असती तर मोठ्या प्रमाणात टाळता आले असते.

**शिफारस**

**२.१६ विधी व न्याय विभागाने दिनांक १० ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील न्यायालयांना सोयी-सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने पायाभूत सुविधा धोरण निर्गमित केले आहे. सदर धोरणाच्या परिच्छेद २.६ येथे नमूद केल्यानुसार न्यायालयीन इमारती व न्यायाधिश निवासस्थाने यांच्याकरीता प्रमाणित नमुना नकाशा तयार करण्यात यावा ज्यामध्ये आवश्यक घटक, सोयी-सुविधाचा समावेश असेल. त्यास नियोजन व वित्त विभागाची मान्यता घेण्यात येईल. तसेच प्रस्तावित इमारतीचा नकाशा हा प्रमाणित नकाशाशी सुसंगत आहे असे प्रमाणपत्र प्रधान न्यायाधिश यांनी प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक केले आहे. एखाद्या ठिकाणी प्रमाणबद्ध नमुना नकाशानुसार इमारतीचे काम करणे शक्य नसल्यास त्या ठिकाणच्या विशेष गरजा लक्षात घेऊन नमूना नकाशे तयार करण्याबाबत नमूद केले आहे. तसेच प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर**

**मा.उच्च न्यायालय व राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय त्यासंबंधित कामाच्या व्याप्तीमध्ये असा बदल करु नये की, ज्यामुळे मूळ प्रशासकीय मान्यतेशिवाय १० टक्केपेक्षा जास्त खर्च होईल.सदर पायाभूत सुविधा धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत प्रधान न्यायाधिश, सर्व जिल्हा न्यायाधीश यांना कळविण्यात आले आहे. परंतु त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.न्यायालयीन इमारतीचे पूर्ण झालेले व प्रगती पथावर असलेले बांधकाम यासाठी अतिरिक्त वेळ व वाढीव खर्च लागतो कारण उपयोग करणारा विभाग म्हणून संबंधित विभागाकडून ऐनवेळी आवश्यकता वाढते. त्यानुसार कामाची व्याप्ती वाढविली जाते किंवा अतिरिक्त सुविधा मागितल्या जातात. त्यामुळे काम विहित वेळेत पुर्ण होत नाही. संबंधित विभागाच्या मागणीमुळे तसेच निधीअभावी कामास उशिर झाला असल्यास अथवा रक्कम वाढवून द्यावी लागल्यास काही अंशी ही बाब समर्थनीय आहे. परंतु कंत्राटदारांनी कामाची किंमत वाढवून मिळावी या कारणासाठी जाणीवपूर्वक विलंब केला असेल तर तो कदापी समर्थनीय नाही.अतः सदर कामांमध्ये जाणीवपूर्वक विलंब केला आहे काय ? कामाच्या वाढीव निधीचा भार शासनावर पडला आहे काय ? ठेकेदारांनी विलंब केल्यामुळे न्यायालयीन इमारतीच्या बांधकामाला उशिर झाला आहे काय ? अशा सर्व कामांची तपासणी करण्यात यावी. ठेकेदारांनी विलंब केल्यामुळे न्यायालयाच्या किती इमारती ह्या विहित मुदतीत पुर्ण झाल्या नाही व त्याचा शासनावर किती बोजा पडलेला आहे याबाबतची सविस्तर माहिती समितीला सादर करण्याचे सचिवांनी आश्वासित करुनही अद्याप माहिती प्राप्त झाली नाही. याबाबत समिती नापसंती व्यक्त करीत आहे व सदर आश्वासित माहिती १ महिन्यात समितीस सादर करावी व समितीस आश्वासित करुनही माहिती न देणा-या अधिका-यांवर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.३.३ "सुरक्षाविषयक बाबी "**

**परिच्छेद क्र. ३.३.३.१ "इमारतींची संरचनात्मक लेखापरीक्षा न करणे"**

**अभिप्राय**

**२.१७** महाराष्ट्र शासनाच्या जानेवारी, २००९ च्या अधिसूचनेनुसार, ज्या इमारतींच्या बाबतीत पूर्तता प्रमाणपत्र प्राप्त होणे; किंवा इमारतीचा ताबा घेण्याची परवानगी प्राप्त होणे; किंवा तिच्या एकूण बांधिव (built-up) क्षेत्रापैकी किमान ५० टक्के क्षेत्राचा ताबा प्राप्त होणे यापैकी जी घटना आधी घडली असेल त्या तारखेपासून ३० वर्षे झाली असतील तर अशा इमारतींच्या प्रत्येक मालकाने किंवा भोगवटादाराने सदर इमारती मानवी वस्तीसाठी योग्य असल्याविषयी प्रमाणित करण्यास महानगरपालिका/नगर परिषद यांचेकडून नोंदणीकृत असलेल्या संरचना अभियंत्याकडून अशा इमारतींची तपासणी करुन घ्यावी अशी तरतूद आहे. परंतु राज्यातील शासकीय मालकीच्या न्यायालयाच्या ४६४ इमारतींपैकी २१८ इमारती ३० वर्षापेक्षा अधिक जुन्या होत्या परंतु जुलै २०१६ पर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यापैकी १४२ इमारतींची संरचनात्मक लेखापरीक्षा केली नव्हती. याबाबतची सद्यःस्थिती समितीने घेतली असता सद्यःस्थितीत त्यापैकी ८५ न्यायालयीन इमारतींची संरचनात्मक लेखापरीक्षा पूर्ण करण्यात आली असून, ५७ न्यायालयीन इमारतींची संरचनात्मक लेखापरीक्षा करण्याचे काम प्रगतीपथावर असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारस**

**२.१८ जानेवारी, २००९ च्या अधिसूचनेनुसार ज्या इमारतीस पूर्तता प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे किंवा इमारतीचा ताबा घेण्याची परवानगी प्राप्त झाली आहे किंवा इमारतीच्या एकूण बांधिल क्षेत्रापैकी किमान ५० टक्के क्षेत्राचा ताबा प्राप्त झाला यापैकी जी घटना घडली असेल त्या तारखेपासून ३० वर्षे पूर्ण झालेल्या इमारतीचे संरचनात्मक लेखापरीक्षण करणे बंधनकारक होते. विभागाने याकडे दुर्लक्ष केले असून महालेखापालांनी लेखापरीक्षण करताना १४२ इमारती संदर्भात आक्षेप नोंदविला. त्यानंतर विभागाने ८५ न्यायालयीन इमारतीचे संरचनात्मक लेखापरीक्षण पूर्ण केले आहे. परंतु अद्याप ५७ इमारतीची लेखापरीक्षा बाकी आहे. यावरुन असे दिसून येते की, विभाग इमारतींची संरचनात्मक लेखापरिक्षा करणे ही बाब गांभिर्याने घेत नसून केवळ महालेखापालांनी बाब निदर्शनास आणल्यानंतर या प्रकरणी कार्यवाही केली आहे. अतः विभागाने अशा सर्व इमारतींचा आढावा घेऊन ज्यांना ३० वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला आहे त्यांची संरचनात्मक लेखापरीक्षा पूर्ण करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती ३ महिन्यात समितीस देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.३.३.२ "अग्नी सुरक्षा उपाययोजना न करणे"**

**अभिप्राय**

**२.१९** महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने जून २०१२ मध्ये एका परिपत्रकाद्वारे इमारतींच्या मालकांनी किंवा भोगवटाधारकांनी वर्षातून दोनदा परवाना प्राप्त संस्थांकडून इमारतींची अग्नी लेखापरीक्षा करणे आणि संबंधित मुख्य अग्निशमन अधिका-यांना अग्नी लेखापरीक्षा अहवाल सादर करणे अनिवार्य केले आहे. वर्ष २०१५ मध्ये उच्च न्यायालयाने यामध्ये हस्तक्षेप करुन मुख्य जिल्हा न्यायाधीशांना सार्वजनिक बांधकाम विभागांमार्फत अग्नी लेखापरीक्षा करण्याचे निर्देश देईपर्यंत कोणतीही अग्नी लेखापरीक्षा करण्यात आली नव्हती. त्यानुसार, सार्वजनिक बांधकाम विभागांनी ऑगस्ट, २०१५ ते जून, २०१६ दरम्यान परवानाप्राप्त संस्थांकडून न्यायालयांच्या इमारतींची अग्नी लेखापरीक्षा केली आणि अग्नी सुरक्षा कामे जशी अग्नी सूचके (Smoke detectors) इत्यादी बसविण्यासाठी रु. १३०.३८ कोटी अंदाजपत्रक तयार केले. ऑगस्ट, २०१५ ते ऑक्टोबर, २०१६ दरम्यान उच्च न्यायालयाने विभागाला अंदाजपत्रके सादर केली. परंतु, विभागाने तांत्रिक बाजू तपासण्यासाठी नगरविकास विभागाच्या कार्यकक्षेत कामकाज करणा-या अग्निशमन विभागाकडे ही अंदाजत्रके सादर केली. ज्याची तपासणी डिसेंबर, २०१६ पर्यंत करण्यात आली नव्हती. अशाप्रकारे, केवळ अग्नी लेखापरीक्षा करण्यातच विलंब झाला होता असे नाही तर अग्नी सुरक्षा कामे पार पाडण्यासाठीच्या अंदाजपत्रकांना मंजूरी देखील प्राप्त झालेली नव्हती.

**२.२०** संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा, कलिना, मुंबई यांनी दिनांक १/१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये असे कळविलेले आहे की, सदर प्रस्तावांची तांत्रिकदृष्ट्या छाननी केली असता काही न्यायालयांच्या अग्नीशमन यंत्रणा व्यवस्थेचे परीक्षण स्थानिक अग्नीशमन अधिकारी यांनी केले असून काही न्यायालयांचे अग्नीशमन यंत्रणा व्यवस्थेचे परीक्षण हे अनुज्ञप्तीधारक अभिकरणे (License Agencies) तसेच सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आले आहे.

**२.२१** ज्या न्यायालयांच्या इमारतींचे अग्नीप्रतिबंधक यंत्रणा तपासणी स्थानिक अग्नीशमन अधिका-यांकडून करण्यात आली आहे अशा न्यायालयांच्या इमारतींमध्ये अग्नीशमन यंत्रणा बसविण्याचे काम अंदाजपत्रके मागवून विहित शासकीय निविदा पद्धती अवलंबून प्रथम टप्प्यात करण्यात यावे. तसेच ज्या न्यायालयांच्या इमारतींची अग्नीप्रतिबंधक यंत्रणा परीक्षण हे अनुज्ञाप्तीधारक अभिकरणे (License Agencies) तसेच, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आलेले आहे. त्या अहवालांची तपासणी अग्नीशमन सेवेतील नामनिर्देशित अधिका-यांकडून करुन घ्यावी व संबंधित न्यायालयांच्या इमारतींमध्ये अग्नीशमन यंत्रणा बसविण्याचे काम अंदाजपत्रके मागवून विहीत शासकीय निविदा पद्धती अवलंबून करण्यात यावे.

**२.२२** त्यानुसार अग्नीशमन यंत्रणा बसविण्याची अंदाजपत्रके स्थानिक अग्नीशमन अधिका-यांकडून तपासून सादर करण्याबाबत विभागाने जिल्हा न्यायालयांना कळविले आहे. काही न्यायालयीन इमारतींमध्ये अग्नीशमन यंत्रणा बसविण्याचे प्रस्ताव संबंधित अग्नीशमन अधैका-यांकडून तपासणी करण्यात येऊन रु. १०.३२ कोटी इतक्या किंमतीच्या प्रशासकीय मान्यता देखील देण्यात आली आहे.

**२.२३** अग्नी लेखापरीक्षणाचे काम दोन टप्प्यामध्ये पूर्ण करण्यात आलेले आहे. सर्व प्रथम अग्नी लेखापरीक्षण करण्यासाठी सर्व जिल्हा न्यायालयांना सांगण्यात आले होते. त्याप्रमाणे विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये १४ जिल्ह्यांमधील न्यायालयाचे अग्नी लेखापरीक्षण करुन अहवाल सादर केला आहे. तसेच, मुंबई आणि जळगाव शहरामधील सर्व न्यायालयांचे अग्नी लेखापरीक्षण पूर्ण करण्यात आलेले आहे. तसेच, पाच जिल्ह्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. काही ठिकाणचे फायर ऑडीट स्थानिक एजन्सीकडून करण्यात आलेले आहे. त्यासंदर्भात संचालक, अग्निशमन व सुरक्षा यांच्यासोबत एक बैठक घेण्यात आली असता असे निदर्शनास आले की, स्थानिक एजन्सीकडून करावयाच्या अग्नि लेखापरीक्षणासाठी २५० ते ३०० कोटी रुपये खर्च लागणार असल्या कारणाने डायरेक्टर ऑफ फायर सेफ्टी यांच्या ॲथोराईज फायर ऑफिसरकडून सर्व इमारतींचे अग्नी लेखापरीक्षण करुन घेण्यात यावे. त्यासाठी छाननी सुरू असल्याचे समितीस सांगण्यात आले. त्याचप्रमाणे ज्या पाच इमारतींसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यांच्यासाठी निधीची तरतूद डिसेंबर महिन्याच्या पुरवणी मागणीद्वारे करण्यात आल्याचे समितीस अवगत करण्यात आले.

शिफारस

२.२४ राज्य शासनाच्या नगरविकास विभागाच्या जून, २०१२ च्या परिपत्रकानुसार इमारतीच्या मालकांनी किंवा भोगवटाधारकांनी वर्षातून दोनदा परवाना प्राप्त संस्थाकडून इमारतींची अग्नी लेखापरीक्षा करणे आणि संबंधित मुख्य अग्निशमन अधिका-यांना अग्नी लेखापरीक्षा अहवाल सादर करणे अनिवार्य आहे. असे असतांना न्यायालयीन इमारतीची अग्नी लेखापरीक्षा संबंधीत विभागाकडून करण्यात आली नाही. त्याचप्रमाणे जुन्या इमारतीमध्ये अग्नी सुरक्षेची साधने बसविण्यासाठी प्राधान्य देणे आवश्यक होते. त्याबाबत सुध्दा कार्यवाही करण्यात आली नाही. याबाबत सचिवांनी खुलासा केला की, नवीन इमारतीमध्ये अग्नी सुरक्षेची साधने बसविणे खर्चिक नसते. परंतु जुन्या इमारतीमध्ये जर नवीन इमारतीं प्रमाणे अग्नी सुरक्षेची साधने बसवायची असतील तर जुन्या इमारतींची जी किंमत आहे, त्यापेक्षा जास्त अग्नी सुरक्षा साधने बसविण्याची किंमत येते त्यामुळे विभागाने याबाबत कार्यवाही केली नाही.

२.२५ लेखापरीक्षणाचा आक्षेप आल्यानंतर विभागाने राज्यामधील २० जिल्ह्यामध्ये अग्नी लेखापरीक्षणाचे काम पूर्ण केलेले आहे. यावरुन असे दिसून येते की, विभाग इमारत अग्नी लेखापरीक्षा करणेबाबत गंभीर नव्हते. न्यायालयांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने इमारतीची अग्नी लेखापरीक्षा ही बाब अतिशय महत्वाची आहे. त्यामुळे राज्यातील न्यायालयीन इमारतीची अग्नी लेखापरीक्षा करणेसाठी लागणारा खर्च विभागाने प्राधान्याने करावा. राज्यातील सर्व न्यायालयीन इमारतीची अग्नी लेखापरीक्षा नियमानुसार व नियमीतरित्या करण्यासंदर्भात विभागाने एक आराखडा तयार करावा व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

## वित्त विभाग

**३** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-२०१६ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील **परिच्छेद क्र. ३.७ "वापरात नसलेल्या कार्यालयीन जागेच्या भाड्यावर झालेला निष्फळ खर्च "** यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

**परिच्छेद क्र. ३. ७ "वापरात नसलेल्या कार्यालयीन जागेच्या भाड्यावर झालेला निष्फळ खर्च "**

**आयुक्त , अ .ब .व रा. लॉ. , महाराष्ट्र राज्य लॉटरी , महाराष्ट्र यांनी वाशी ,नवी मुंबई ,येथील भाडेपट्टीवर घेतलेली कार्यालयीन जागा जी ३६ महिन्यांच्या भाडेपट्टी कालावधीपैकी ३३ महिने विनावापर पडून राहीली त्या जागेच्या भाड्यापोटी झालेला रू.१.१४ कोटींचा निष्फळ खर्च**

महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील, आयुक्त, अल्पबचत व राज्य लॉटरी यांनी उपसंचालक (वित्त व लेखा ) , महाराष्ट्र राज्य लॉटरी,मुंबई यांचे कार्यालयासाठी जागा भाडेपट्टीवर घेण्यासाठी निविदा मागविल्या (सप्टेंबर, २०११). वित्त विभागाने, श्री वेंकटेश एंटरप्रायझेस (अनुज्ञप्तीकार) यांची वाशी, नवी मुंबई येथील अंदाजे ८,२८१ चौ. फुट ची सुसज्ज नसलेली (unfurnished) जागा मासिक रू. ३.४४ लाख भाडे ही बोली स्वीकारून ही जागा भाडेपट्टीवर घेण्यास मान्यता दिली (मार्च, २०१३). अनुज्ञप्तीकार व आयुक्तामध्ये भाडे करार झाला (मे, २०१३ ) जो ३६ महिन्यासाठी वैध होता (०१ मे, २०१३ते ३० एप्रिल, २०१६) मे, २०१३ मध्ये आयुक्तांनी जागेचा ताबा घेतला.

आयुक्तांच्या कार्यालयातील दस्तऐवजांच्या तपासणीत (ऑगस्ट २०१६) असे आढळून आले की जागेचा ताबा घेताना (मे २०१३) सदर जागेत इलेक्ट्रीक मीटर, पाणी पुरवठा , स्वच्छतागृहे ,गच्चीचा दरवाजा, खिडक्यांचे ग्रील्स इत्यादी प्राथमिक सुविधा उपलब्ध नव्हत्या, ज्यानंतर अनुज्ञप्तीकाराने सप्टेंबर,२०१३ पर्यंत उपलब्ध केल्या. त्यानंतर, भाडेतत्त्वावर घेतलेल्या या कार्यालयीन जागेत सजावट आणि विद्युतीकरण यासह फर्नीचर / मोड्युलर फर्निचर घेण्याची योजना तयार करून त्याची प्रत्यक्ष खरेदी करण्यासाठी आयुक्तांना २८ महिन्यांचा (ऑक्टोबर,२०१३ ते जानेवारी ,२०१६) कालावधी लागला.अखेर फेब्रुवारी २०१६ मध्ये उपसंचालक (वित्त व लेखा ) यांनी जागा ताब्यात घेतली. ही कार्यालयीन जागा ३३ महिने (मे २०१३ ते जानेवारी,२०१६) रिकामी/ विनावापर राहूनही आयुक्तांनी रू.१.१४ कोटीचे भाडे अनुज्ञप्तीकारास प्रदान केले.

एकूण ३६ महिन्यांच्या भाडेपट्टी कालावधीपैकी ३३ महिने (भाडेपट्टी कालावधीच्या ९२ टक्के ) रिक्त राहिलेल्या या जागेसाठी प्रदान केलेले रू. १.१४ कोटींचे भाडे (निष्फळ) ठरले.कारण सुरूवातीच्या पाच महिन्यात (मे २०१३ ते सप्टेंबर २०१३ ) सदर जागेत प्राथमिक सुविधाही, ज्या अनुज्ञप्तीकारांनी पुरवणे अपेक्षित होत्या, त्या उपलब्ध नव्हत्या. सबब, आयुक्तांनी भाडे दयावयास नको होते. या पाच महिन्यांच्या कालावधीचा वापर आयुक्तांना अंतर्गत सजावट व विद्युतीकरण कामासह फर्निचर/मोड्युलर फर्निचरची खरेदी करण्याची योजना योग्यप्रकारे आखून तिची खरेदी करण्यासाठी करता येऊ शकला असता, ज्या कामासाठी २८ महिने वाया घालवले गेले.

सप्टेंबर, २०१६ मध्ये ही बाब राज्य शासनाला संदर्भीत करण्यात आली. जानेवारी, २०१७ पर्यंत त्यांचे उत्तर प्राप्त झालेले नव्हते.

**ज्ञापन :-**

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील माहिती नमूद केली आहे.

उपसंचालक (वि.व.ले.) महाराष्ट्र राज्य लॉटरी या कार्यालयासाठी शिवडी येथे भाडेकराराने घेतलेल्या जागेच्या कराराची मुदत दि. १५.०५.२०११ रोजी संपली. सदर जागेच्या मालकाने भाडे करारास मुदतवाढ देण्यास नकार दिला. सबब या कार्यालयास आवश्यक असलेल्या सुमारे ८००० ते १०००० चौ.फुट क्षेत्रफळाची जागा मुंबई ,नवी मुंबई मध्ये उपलब्ध करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागास विनंती करण्यात आली तथापि इतक्या मोठ्या क्षेत्रफळाची शासकीय जागा उपलब्ध नसून खाजगी जागा भाडेपट्टीने घेण्याविषयी सामान्य प्रशासन विभागाने कळविले. त्यानुसार उपसंचालक (वि. व ले. ) कार्यालयासाठी जागा भाडेकराराने घेण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. सदर निविदा प्रक्रियेतुन श्री व्यंकटेश एंटरप्रायजेस ,वाशी यांची जागा निवडण्यात आली.

उपसंचालक (वि. व ले. ) महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालयात महाराष्ट्र राज्य लॉटरी विषयक कामकाज पार पाडले जातात. त्यानुसार सदर कार्यालयासाठी सोडत कक्ष, विक्री न झालेली तिकीटे ठेवण्यासाठी गोडाऊन ,पंच मंडळींना बसण्यासाठी कक्ष, अधिकारी, कर्मचारी यांना बसण्यासाठी कक्ष ,बक्षिस मिळालेली तिकीटे ठेवण्यासाठी कक्ष, नवीन तिकीटांसाठी गोडाऊन अशी विविध प्रकाराची रचना आवश्यक असते. सबब अशी सुविधा आवश्यकतेनुसार निर्माण करण्यासाठी मोकळ्या गोडाऊनच्या स्वरूपातील जागेची निवड करण्यात आली. सदर जागेसाठी दि. ०१.०५.२०१३ ते दि. ३०.०४.२०१६ या कालावधीसाठी भाडे करार वित्त विभागाच्या मान्यतेने करण्यात आला.

सदर जागेचे नुतनीकरणासाठी महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ यांची निवड दिनांक ०२/१२/२०१३ रोजी करण्यात आली. सदर कामासाठी रूपये ७६,१६,२११/- इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास दि. ०५.०९.२०१४ रोजी वित्त विभागाने मान्यता दिली. मात्र सदर रकमेत नुतनीकरण पूर्ण होणे शक्य नसल्याचे महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ यांनी कळविल्यामुळे रूपये २०,४१,९६५/- इतक्या अधिक खर्चाचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला.

तसेच याच दरम्यान नुतनीकरणाचे काम चालु करण्यासाठी महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ यांना कळविण्यात आले. महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ यांनी निविदा प्रक्रिया राबवून दि. १९/०१/२०१५ रोजी शक्ती इंजिनिअरींग, जालना यांची सदर कामासाठी निवड केली व वित्त विभागाने प्रशासकीय मान्यता दिलेले रू. ७६,१६,२११/- इतका निधी महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ यांना दि. ३१.०१.२०१५ रोजी अदा करण्यात आला . तथापि महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ यांना सदर काम पूर्ण करण्यास पुढील अडथळे आले.–

१. सदर जागेचे भाडे मालकास अदा न केल्यामुळे मालकाने नुतनीकरणाचे काम सुरू करण्यास नकार दिला जागेचा प्रत्यक्ष ताबा दि. २५.०५.२०१५ रोजी मिळाला.

२. कृषी उत्पन्न बाजार समितीने जागा नुतनीकरणाचे सामान आत घेण्यास नकार दिलेला होता.

३. दि. ०९.०७.२०१५ रोजी सदर जागेतील खाजगी दुकानदाराने त्यांच्या गाळ्यामध्ये पाण्याची गळती होत आहे. हे कारण सांगून जबरदस्तीने काम थांबविण्यास भाग पाडले.

४. तळमजल्यावरील गोदाम मालकाने कृषी उत्पन्न बाजार समितीचे कार्यकारी अभियंता व उप अभियंता तसेच उप पोलीस आयुक्त यांच्या कार्यालयात तक्रार दाखल केलेली होती.

५. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती,मुंबई यांच्या कडून ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यास झालेल्या विलंबामुळे काम दोन महिने उशिराने सुरू करण्यात आले.

६. कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी भिंतींचे काम सुरू केलेले असताना पुढील बांधकाम करण्यास मज्जाव केलेला होता त्यामुळे निर्णय घेण्यास विलंब झाला तसेच जिप्सम पार्टीशन बसवण्याबाबत मागणी केली.

७. वाशी येथील जागेचे मालक मे.व्यंकटेश एंटरप्रायजेस यांनी आपल्या वाशी येथील कार्यालयास त्यांचे पत्र दि.०८.०६.२०१५ अन्वये सदर बाब निदर्शनास आणून एम.स्टील.पाईप चे फ्रेम वर्क करून त्यावर फॉल सिलींग उभारण्याबाबत कंत्राटदारास सुचना देण्यास कळविले होते.

८. मजल्यावरील मोडतोडीचे सामान ठेवण्याकरीता कृषी उत्पन्न बाजार समितीने जागा उपलब्ध करून दिलेली नव्हती.

९. लॉटरी कार्यालयाने स्वागत कक्ष टेबल,मिटींग टेबल इत्यादीमध्ये बदल करण्यास सूचना केल्या होत्या.

१०. कृषी उत्पन्न बाजार समिती मधील कामगारांच्या संघटनेने बांधकाम साहित्य पहिल्या मजल्यावर उचलून नेण्यास परवानगी दिली नाही.

११. सदर जागेमध्ये पाण्याची गळती होत होती व ती थांबविण्यास मालकाने जवळपास दीड महिन्याचा कालावधी घेतला त्यामुळे आतील काम चालु करण्यास उशीर झाला.

सदर जागा मोकळ्या हॉलच्या स्वरूपात असल्यामुळे तेथे लॉटरी कार्यालयासाठी आवश्यक फर्निचर , गोदामे, बैठक व्यवस्था तयार करण्यासठी जागेचा ताबा घेणे आवश्यक होते. तथापि सदर जागेचा ताबा घेतल्यानंतर जागेचे भाडे अदा करणे शासनास बंधनकारक होते. वाशी येथील जागेत पायाभुत सुविधा उपलब्ध न केल्यामुळे जुलै, २०१३ पासुन सदर जागेचे भाडे

अदा करण्यात आले नव्हते. जागेच्या मालकाने पायाभूत सुविधा तात्काळ उपलब्ध करून देण्यात येईल, अशी सहमती दर्शविल्याने त्यांना माहे जुलै २०१३ ते मार्च २०१४ चे भाडे वित्त विभागाच्या मान्यतेने अदा करण्यात आले. उपसंचालक (वि व ले.), महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालय, शिवडी येथून वाशी, नवी मुंबई येथे स्थलांतरीत होण्यास झालेल्या विलंबाबत जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

**साक्ष :-**

**परिच्छेद क्रमांक ३.७ वापरात नसलेल्या कार्यालयीन जागेच्या भाड्यावर झालेला निष्फळ खर्च :**

**३.१** उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक २० फेब्रुवारी, ११ एप्रिल व ३ मे, २०१८ रोजी वित्त विभागाचे प्रधान सचिव व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. महालेखापालांचे आक्षेपांबाबत विभागीय सचिवांनी अनुक्रमवार पुढीलप्रमाणे थोडक्यात माहिती समितीस दिली. दिनांक ७.५.२०११ रोजी लॉटरी विभागाने सामान्य प्रशासन विभागाकडे जागेसाठी मागणी केली परंतु शासनाकडे जागा नसल्यामुळे विभागाने ही जागा खासगी स्वरुपात घ्यावी अशा सूचना लॉटरी विभागास देण्यात आल्या होत्या. त्यानंतर दिनांक १.६.२०११ रोजी यासंबंधी निविदा काढण्यात आली होती. मात्र सुरूवातीला त्यास प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर ११ लोकांनी या निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेतला. त्यापैकी ८ निविदा पात्र ठरल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता बनविण्यात आला होता. त्यावेळी आयुक्त, राज्य लॉटरी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती. ही संपूर्ण प्रक्रिया पार पडल्यानंतर व्यंकटेश एंटरप्राईजेस यांची जागा मान्य करण्यात आली. दिनांक २८.४.२०१३ रोजी जागेचा करार करण्यात आला व दिनांक ६.५.२०१३ रोजी प्रत्यक्ष जागेचा ताबा घेण्यात आला. महालेखाकारांच्या लेखापरीक्षणामध्ये उपस्थित केलेला मुद्दा असा होता की, मे, २०१३ मध्ये करार झाला. पण कार्यालय प्रत्यक्षात त्या ठिकाणी दिनांक २६.२.२०१६ रोजी स्थलांतरित झाले. म्हणजे दिनांक ६.५.२०१३ ते दिनांक २६.२.२०१६ या कालावधीत विभागाने १ कोटी १४ लाख रुपयांचे भाडे दिले ते निष्फळ ठरले आहे. विभागाने ती कच्चे बांधकाम झालेली इमारत वाशी, नवी मुंबई येथे घेतली आहे. त्या इमारतीमध्ये दरवाजे बसवायचे होते आणि इतरही अनेक फर्निशिंगचे काम इमारत मालकाने करायचे होते ते त्याने केले नाही. त्यानंतर विभागाने सुध्दा पुढील ४-५ महिन्यात फर्निचरच्या संबंधात कोणतेही नियोजन केले नाही. इमारत ताब्यात घेऊन ३३ महिने वापर न करता रिकामी ठेवली आणि त्याचे भाडे दिले असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

एका बाजूला विभागाला सन २०११ पासून जागेची गरज असताना दुस-या बाजूला विभागाने सन २०१३ मध्ये ताबा घेतला आहे. असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा सादर केला. शिवडी येथील लॉटरी कार्यालयाची जागा मालकाने खाली करण्यास सांगितल्यामुळे लॉटरी कार्यालयास ८ ते १० हजार चौ.फु.ची जागा देण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाकडे दि. ०३.०५.२०११ रोजी शासकीय जागेसाठी मागणी करण्यात आली. त्या विभागाने एवढया मोठ्या क्षेत्रफळाची जागा मुंबईत उपलब्ध नसल्यामुळे खाजगी जागा घेण्याबाबत दि. ०६.०५.२०११ च्या टिप्पणीन्वये कळविले. त्या अनुषंगाने दि. ०१.०६.२०११ रोजी निविदा काढली. त्यास प्रतिसाद न मिळाल्याने दि. १६ जून, २०११ रोजी २४ जून, २०११ पर्यंत निविदेत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा दि. २०.०८.२०११ रोजी जाहिरात देऊन दि. ०३.११.२०११ रोजी निविदा उघडण्यात आल्या. सदर निविदा प्रक्रियेमध्ये ११ लोकांनी भाग घेतला. त्यापैकी ८ निविदा पात्र ठरल्या. सदर ८ निविदांच्या मालकांच्या जागेची पाहणी करण्याकरीता आयुक्त, राज्य लॉटरी यांच्या अध्यक्षतेखाली दि.२०.०१.२०१२ रोजी समिती नेमण्यात आली. सदर समितीने दि. २८.०२.२०१२ रोजी मे.व्यंकटेश एंटरप्रायजेस यांची वाशी येथील जागा योग्य असल्याचा अहवाल दिला. सदर जागेचे भाडे कंपनीने रु. ४८.०० प्रती चौ. फूट इतके देण्याबाबत विनंती केली. त्यामुळे याबाबत दि. १५.०६.२०१२ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाने या जागेचे भाडे रु. ३७.४४ प्रती चौ. फूट इतके भाडे वाजवी असल्याचे प्रमाणपत्र दिले. त्यानंतर सदर प्रकरणास दि.३.१०.२०१२ रोजी शासनाची मान्यता घेऊन दि. २०.१२.२०१२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. तद्नंतर मे.व्यंकटेश एंटरप्रायजेस यांच्यासोबत आयुक्त, राज्य लॉटरी यांचा दि. ०६.०५.२०१३ रोजी जागेचा करार झाला.

त्या इमारतीमध्ये मालकाने बरेचसे काम करायचे होते आणि ते काम पूर्ण केले नसताना भाडे देणे मात्र सुरू होते. त्याचप्रमाणे विभागाने सुध्दा फर्निचर बसविण्याच्या दृष्टीने कोणतीच कार्यवाही केली नसल्यामुळे ३३ महिने ती इमारत निरुपयोगी राहिली व त्यातून शासनाला १ कोटी १४ लाख रुपयांचे भाडे द्यावे लागले आहे. तसेच वित्त विभागाकडे सर्व प्रकारच्या नस्ती जातात आणि सर्व विभागांच्या नस्तीवर वित्त विभागाकडून आक्षेप काढले जातात आणि तशा प्रकारची टिप्पणी संबंधित विभागाला पाठविली जाते. त्यामुळे भाड्याचा पैसा वाया गेला आहे. ही आर्थिक शिस्तीची बाब आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, तत्कालीन अपर मुख्य सचिव यांनी एक चौकशी समिती नेमली होती आणि

त्यामध्ये श्री. नक्वी तत्कालीन संचालक, लेखा व कोषागारे यांची निवड करण्यात आली. त्यांनी त्यांच्या समितीचा अहवाल शासनास दिला आहे. त्यामध्ये काही अधिकारी दोषी आढळून आले आहेत. जे भाडे दिले त्याचा उपयोग करु शकलो नाही. त्या अर्थाने ते निरुपयोगी ठरले आहेत. त्यामुळे तो पैसा वाया गेला आहे हे विभागाने मान्य केले आहे. परंतु त्यामध्ये दोषी अधिका-यांची नावे निश्चित करण्यात आली होती. त्यांची विभागीय चौकशी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे आणि त्या संबंधीची शिफारस सामान्य प्रशासन विभागाला करण्यात आली होती आणि सामान्य प्रशासन विभागाने अशा सूचना केल्या की विभागाने संबंधित मंत्री यांची मान्यता घेऊन त्याबाबत शिफारस करावी. त्यानुसार कार्यवाही सुरू आहे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

हे प्रकरण सन २०११ ते २०१३ पर्यंतचे आहे आणि सन २०१६ पर्यंत विभागाने त्याला भाडे दिले आहे. यासंबंधी शिफारस विभागाने सन २०१८ मध्ये केली आहे. दीड ते पावणे दोन वर्षे होत आली आहेत व त्या विभागीय चौकशीचे पुढे काही झाले नाही. तसेच, फेब्रुवारी, २०१६ मध्ये फर्निचर पूर्ण झाले आणि माहे एप्रिल, २०१६ मध्ये त्या इमारतीचा करार संपला आहे.

यामध्ये फर्निचरसाठी किती रुपये खर्च झाले आहेत व सदर कार्यालय कधी पासून कार्यरत आहेत? अशी विचारणा समितीने केली असता, फर्निचरसाठी ७६ लाख रुपये खर्च केला आहे. तेथे दिनांक २६.२.२०१६ पासून कार्यालय कार्यरत आहे. सन २०१९ पर्यंत सदर कंपनीसमवेत करारनाम्याचे नूतनीकरण करण्यात आले आहे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

नूतनीकरण केलेल्या करारामध्ये भाड्याचे दर वाढविण्यात आले आहेत काय ? भाड्याचा जुना दर किती होता आणि नूतनीकरण केलेल्या करारनाम्यानुसार किती दर आहे ? आधीच्या तीन वर्षाचे भाडे तर पूर्णपणे वाया गेले आहे अशी विचारणा समितीने केली असता, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मान्यतेने हे केले आहे. सध्याचे भाडे ३.९४ लाख रुपये आहे. पूर्वीचा भाड्याचा दर २.४४ लाख अधिक कर असे होते. असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. आता या ३.९४ लाख रुपये भाड्याशिवाय अधिक कराची रक्कम सुध्दा आहे काय ? अशी ही विचारणा समितीने केली असता, ३.९४ लाख रुपयांमध्ये करांच्या रकमेचा समावेश आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

नूतनीकरण केल्यानंतर २.४४ लाख रुपयेची ३.९४ लाख रुपये भाडेवाढ केली आहे ते म्हणजे आधीपेक्षा ५० टक्के भाडेवाढ केली आहे काय ? अशा प्रकारच्या भाडे करारामध्ये साधारणपणे १० टक्के भाडेवाढ असते. पण यामध्ये तर सरळ ५० टक्के भाडेवाढ केल्याचे दिसते. त्यामध्ये भाडेवाढीसंबंधी स्टँडर्ड पध्दत अशी आहे की, दरवर्षी ५ टक्क्यांपेक्षा जास्त भाडेवाढ केली जात नाही. ती सुध्दा प्रत्येक वर्षी न देता ३ वर्षाची एकत्रित करुन तिस-या वर्षी मिळते. मुंबई, नवी मुंबई आणि सर्वत्र ही स्टँडर्ड पध्दत आहे असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, विभागाने खालील खुलासा सादर केला.

दिनांक ६ मे, २०१३ ते ३० एप्रिल, २०१६ या कालावधीत सार्वजनिक बांधकाम विभागाने मान्य केलेल्या रु. ३७.४३३ प्रती चौरस फूट या दराप्रमाणे संबंधित जागा मालकास रु. ३,०६,३९७ + सेवाकर = रु.३,४९,२९३ प्रती माह या दराने भाडे अदा करण्यात आले.

त्यानंतर करार नुतनीकरणाच्या वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाने मान्य केलेल्या रु. ४०.३६ प्रती चौरस फूट या दराप्रमाणे संबधित जागा मालकास रु. ३,३४,२११ + सेवाकर = रु. ३,८४,३५४/- प्रती माह या दराने भाडे अदा करण्यात येत आहे. १ जुलै, २०१७ पासून वस्तू व सेवाकर (जीएसटी) लागू झाल्यामुळे त्या अन्वये भाडे अदा करण्यात येत आहे. (रु. ३,९४,३८०/-)

ही जागा किती चौरस फूट आहे. नवी मुंबईमध्ये सरकारी जागा उपलब्ध असताना खासगी जागा का घेतली ? सिडको सारखा शासन पुरस्कृत उपक्रम कार्यरत असताना त्यांच्याकडून अशी जागा का घेतली नाही. त्याशिवाय इतरही अनेक संस्थांकडून जागा घेता आली असती. त्याच्या बाजूला एमएससी बँकेची जागा सुध्दा रिकामी आहे. त्या जागेच्या बाजूलाच शासनाचे उपक्रम असलेल्या किंवा वित्तीय संस्थांच्या अनेक जागा उपलब्ध असताना त्यांच्याकडे किंवा सिडकोकडे विभागाने जागेची मागणी का केली नाही. कारण सिडकोकडे तर किती तरी जागा पडून आहे. मुंबईमध्ये जागा शोधण्याऐवजी नवी मुंबईला जागा घेण्यासाठी का गेलात तसेच या जागेचा प्रति चौरस फूट किती दर होता अशी विचारणा समितीने केली असता, सदरील जागाही ७ हजार चौरस फूट आहे. ज्यावेळी करारनामा करण्यात आला त्यावेळी हा दर ३७.४३३ असा दर प्रति चौरस फूटाचा होता असे विभागीय सचिवांनी सांगितले. विभागाने जे भाडे दिले ते कोणत्या कालावधीपासून कधीपर्यंत दिले आहे अशी विचारणा केली असता, दिनांक ६.५.२०१३ ते दिनांक २६.२.२०१६ या कालावधीत भाडे दिले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

दिनांक ६.५.२०१३ ते दिनांक २६.२.२०१६ या कालावधीत भाडे दिले असले तरी "सदर जागेचे भाडे मालकास अदा न केल्यामुळे मालकाने नूतनीकरणाचे काम सुरू करण्यास नकार दिला. जागेचा प्रत्यक्ष ताबा दिनांक २५ मे, २०१५ रोजी मिळाला. जर जागेचा ताबा सन २०१५ मध्ये मिळाला असेल तर विभागाने त्या मालकास सन २०१३ पासून त्या जागेचे भाडे का दिले? त्या जागेचा ताबा दिनांक २५.५.२०१५ रोजी दिला असल्याचे विभागाकडून उत्तरामध्ये तसे नमूद केले आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, याबाबत सचिवांनी खुलासा केला की, एमएसएसआयडीसीला जे काम दिले होते ते काम ते करु शकत नव्हते. विभागाकडून प्राप्त उत्तरामध्ये नमूद केले आहे की, प्रत्यक्षात त्या जागेचा ताबा सन २०१५ मध्ये मिळाला आहे. व्यंकटेश कंपनीकडून जी जागा देण्यात आली होती त्याचा ताबा माहे मे, २०१३ रोजी मिळालेला होता. दिनांक २६ फेब्रुवारी, २०१६ रोजी प्रत्यक्ष ताबा दिला. परंतु ती जागा फर्निचरशिवाय होती. त्या जागेचा ताबा त्यांनी पूर्वी दिला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

सदर जागेचे भाडे अदा न केल्यामुळे मालकाने सदर जागेचे काम सुरू करण्यास नकार दिला. विभागाला त्या जागेचा ताबा दिला नव्हता, म्हणून विभागाने भाडे दिले नाही. माहे मे, २०१३ मध्ये ताबा घेतला कारण विभागाला त्या जागेचे नूतनीकरण करायचे होते असे मत महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून व्यक्त केले. विभागाने उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, "सदर जागेचे भाडे मालकास अदा न केल्यामुळे मालकाने नूतनीकरणाचे काम सुरू करण्यास नकार दिला आहे. जागेचा प्रत्यक्ष ताबा दिनांक २५.५.२०१५ रोजी मिळाला आहे ही बाब समितीने सचिवांच्या निदर्शनास आणली ".

एखादी जागा शासन भाड्याने घेत असेल आणि त्या जागेत जर फर्निचर नसेल तर किमान ३ ते ४ महिन्यांचे भाडे देत नाहीत. संबंधित मालकांची जागा फर्निशिंग केलेली नसताना शासनाने त्यास भाडे अदा करणे ही चुकीची कृती असल्याचे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

विभागाने डिफेन्ड केल्यापेक्षा ज्या संबंधित अधिका-याने ही चूक केली असेल त्याच्यावर कारवाई करुन हा विषय संपवावा. अशा चुका दुरुस्त करण्याची सचिवांचीच मॉरल रिस्पॉन्सिबिलीटी आहे असे सचिवांना वाटते हे योग्य नसून ज्या अधिका-यांनी चूक केली आहे त्या अधिका-यांवर कारवाई करावी असे मत समितीने व्यक्त केले.

संबंधित अधिका-यांची विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू केल्यास कार्यवाही पूर्ण होण्यापूर्वी ते अधिकारी सेवानिवृत्त होतील. संबंधित विभागाच्या अधिका-यावर एफआयआर दाखल केला पाहिजे. कारण २८ महिन्यांचा हा कालावधी आहे. त्यांनी जी चौकशी केली होती. त्या चौकशीचे पुढे काय झाले ? याबाबत कार्यवाही सुरू करण्यास ३ ते ४ वर्षे विलंब का झाला आहे ? चौकशी कोण करीत आहे ? कोणाची चौकशी करीत आहेत आणि कोणावर जबाबदारी निश्चित करीत आहेत ? तसेच पैसे अदा करण्याचे आदेश स्वतः वित्त विभागाने दिले आहेत काय अशी विचारणा समितीने केली असता, विलंबाची जबाबदारी निश्तिच करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. यामध्ये तत्कालीन संचालक श्री. नक्वी यांना दिनांक २४.२.२०१६ रोजी नियुक्त करण्यात आले होते. त्यांनी समितीचा अहवाल दिनांक १७.५.२०१६ रोजी दिला आणि त्यानंतर दिनांक ३०.१०.२०१६ रोजी अपर मुख्य सचिव पातळीवर निर्णय घेण्यात आला की संबंधित अधिका-यांची विभागीय चौकशी करण्यात यावी. सामान्य प्रशासन विभागाकडे दिनांक १५.११.२०१७ रोजी नस्ती पाठविण्यात आली. सामान्य प्रशासन विभागाकडून माननीय मंत्री महोदयांची मान्यता घेऊन दोषारोप पत्र दाखल करावे अशा प्रकारच्या सूचना प्राप्त झाल्या असून त्यानुसार विभाग पुढील कार्यवाही करीत आहे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

किती जणांविरुध्द दोषारोप पत्र तयार करायचे आहे अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये ५ अधिका-यांना समितीने दोषी असल्याची शिफारस केली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

श्री. नक्वी हे लेखा व कोषागार विभागाचे संचालक असताना ते विभागाच्या वरिष्ठ अधिका-याची चौकशी कशी काय करु शकतात ? कारण याप्रकरणी आदेश सचिवांचे आहेत की, त्या मालकास भाडे द्यावे. चौकशी कोणत्या अधिका-यांविरुध्द करीत आहात. हे सर्व अधिकारी अद्याप कार्यरत आहेत किंवा सेवानिवृत्त झाले आहेत काय? अशी विचारणा समितीने केली असता, या चौकशीमध्ये तत्कालीन आयुक्त, उपसंचालक, लेखाधिकारी आणि कक्ष अधिकारी स्तरावरील अधिकारी आहेत व ते अद्याप कार्यरत आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले. तसेच श्री. नक्वी यांच्या अहवालामध्ये ५ अधिका-यांना दोषी ठरविण्यात आले आहे. हे प्रकरण सामान्य प्रशासन विभागाला पाठविण्यात आले होते. सामान्य प्रशासन विभागाने संबंधित विभागाच्या मंत्री महोदयांची मान्यता घेऊन कार्यवाही करावी अशा सूचना दिल्या आहेत असे विभागीय सचिवांनी समितीला सांगितले असता,

विभागाला सामान्य प्रशासन विभागाकडून सूचना केव्हा प्राप्त झाल्या आहेत. आता यानंतर पुढील कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे ? या बाबतीत विभागाची भूमिका काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता, सूचना नुकत्याच प्राप्त झाल्या असून या बाबतीत माननीय मंत्री महोदयांना अहवाल सादर करण्यात येईल. तसेच विभागाने यासंदर्भातील भूमिका सामान्य प्रशासन विभागाला कळविताना स्पष्ट केली होती. त्यामध्ये हे अधिकारी दोषी असून त्यांच्याविरुध्द कार्यवाही करण्यासाठी मान्यता मागितली होती आणि त्याबद्दलच्या सूचना प्राप्त झाल्या आहेत. पण माननीय मंत्री महोदयांची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करावी अशी सामान्य प्रशासन विभागाने शिफारस केली असल्यामुळे कारवाईस विलंब होत आहे.

उपरोक्त मुद्दयाबाबत विभागाने खालील खुलासा सादर केला आहे. यासंदर्भात श्री.नक्वी, तत्कालीन संचालक यांना प्राथमिक चौकशी करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यांनी पुढील अधिका-यांवर जबाबदारी निश्चित केलेली आहे :- १. तत्कालीन आयुक्त २. तत्कालीन उपसंचालक (वित्त व लेखा) ३. तत्कालीन लेखाअधिकारी ४. तत्कालीन कक्ष अधिकारी ५. तत्कालीन कक्ष अधिकारी त्याशिवाय तत्कालीन उपसंचालक (वि. व ले.) यांच्यावरही कार्यवाही करण्याची शिफारस आयुक्त, राज्य लॉटरी कार्यालयाने केलेली आहे. सामान्य प्रशासन विभागाने यासाठी शासनाची मान्यता घ्यावी असे सूचित केल्यामुळे नस्ती मा.मंत्री यांच्याकडे सादर करण्यात आली होती. यासंदर्भात लागलेल्या कालावधीचा थोडक्यात गोषवारा व नस्ती संदर्भात विवरणपत्र तारखेसह सादर करावे असे मा.मंत्री (वित्त) यांनी निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने सदर नस्ती माहितीसह पुढील आदेशाकरीता मा.मंत्री (वित्त) यांच्याकडे पुनश्च सादर करण्यात आली आहे.

विभागाने इमारतीच्या भाड्यामध्ये ५० टक्के वाढ केली आहे. ही ५० टक्के भाडेवाढ करण्याचे कोणते कारण आहे अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, मूळ करारामध्ये नमूद होते की दर ३ वर्षांनी ५० टक्के भाडेवाढ करण्यात यावी.

विभागाने प्रस्तुत प्रकरणी सखोल चौकशी करावी. असे निदेश समितीने दिले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली. प्रस्तुत विषयाबाबतची नस्ती तयार करण्याची कार्यवाही सुरु झाल्यानंतर त्यावर अंतिम स्वाक्षरी होईपर्यंत एकाही अधिका-याने कोणताही शेरा लिहिलेला नाही. नस्तीसंबंधीची सर्व माहिती समितीस देण्यात यावी. जेणेकरुन सदर प्रकरणी कोण दोषी आहेत याची माहिती समितीला समजू शकेल. तसेच नस्ती कोणी, कधी व केव्हा सादर केली आहे याची विभागाकडे सविस्तर माहिती उपलब्ध असल्यास सदर माहिती सादर करावी.

विभागाने यासंदर्भात लागलेल्या कालावधीचा थोडक्यात गोषवारा व नस्ती संदर्भात सादर केलेले **विवरणपत्र क्र. २** तारखेसह सोबत जोडलेले आहे.

लेखी स्पष्टीकरणात विभागाने असे नमूद केले आहे की, “सदर जागा मोकळया हॉलच्या स्वरुपात असल्यामुळे तेथे लॉटरी कार्यालयासाठी आवश्यक फर्निचर, गोदामे, बैठक व्यवस्था तयार करण्यासाठी जागेचा ताबा घेणे आवश्यक होते. तथापि सदर जागेचा ताबा घेतल्यानंतर जागेचे भाडे अदा करणे शासनास बंधनकारक होते. वाशी येथील जागेत पायाभूत सुविधा उपलब्ध न केल्यामुळे माहे जुलै, २०१३ पासून सदर जागेचे भाडे अदा करण्यात आले नव्हते. जागेच्या मालकाने पायाभूत सुविधा तत्काळ उपलब्ध करुन देण्यात येतील अशी सहमती दर्शविल्याने त्यांना माहे जुलै, २०१३ ते मार्च, २०१४ चे भाडे वित्त विभागाच्या मान्यतेने अदा करण्यात आले. माहे मार्च, २०१४ पर्यंत भाडे दिल्यानंतर जागा मालकाने विभागाच्या ताब्यात मुलभुत सुविधासह जागा देणे आवश्यक आहे. परंतु तशा स्वरुपाची कार्यवाही झाली नाही. सन २०१५ मध्ये इन्फ्रास्ट्रक्चर दिले.फर्निचर तयार करण्यास विलंब झाला ही विभागाची चुक आहे. परंतु, मालकाने इन्फ्रास्ट्रक्चर तयार करुन दिल्यानंतर भाडे देणे आवश्यक होते ”. तशी कार्यवाही विभागाने केली नसल्याने सदर प्रकरण अतिशय गंभीर स्वरुपाचे आहे.

वित्त विभागाच्या दोषी अधिका-यांविरुध्द कारवाई करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या आदेशानुसार नस्ती माननीय मंत्री महोदयाकडे सादर केली आहे काय ? विभागाने नस्ती कोणत्या तारखेला नस्ती सादर केली आहे? अशी विचारणा समितीने केली असता, माहे मार्च, २०१८ च्या शेवटी विभागाने नस्ती सादर केलेली आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

माहे फेब्रुवारी, २०१८ च्या बैठकीत सांगण्यात आले होते की, माननीय मंत्र्यांकडे नस्ती सादर केली आहे. विषय असा आहे की, या प्रकरणामध्ये आधीच चौकशी झालेली आहे आणि त्यानंतर तो प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविला आहे. त्यानंतर सुद्धा सामान्य प्रशासन विभागाने माननीय मंत्र्यांची मान्यता घ्या, असे सांगितले. एक म्हणजे या मान्यतेची गरज आहे काय आणि दुसरा मुद्दा असा आहे की, मान्यतेचा प्रस्ताव कधी पाठविला आहे कारण एकदा अनियमितता होऊन निर्णय झाला,

काही अधिकारी दोषी आढळले त्या अनुषंगाने विभागाने सामान्य प्रशासन विभागाकडे प्रस्ताव पाठविला होता. सामान्य प्रशासन विभागाने सांगितले की, यासाठी माननीय मंत्र्यांची मान्यता घ्या पण समितीला असे वाटते की, ही पद्धत योग्य नाही. मा.मंत्री महोदयांच्या मान्यतेची आवश्यकता असल्यास प्रस्ताव कधी पाठविला आहे आणि तो किती दिवसापासून प्रलंबित आहे ? अशी विचारणा समितीने केली असता यामध्ये सामान्य प्रशासन विभागाने सूचना दिलेली असल्यामुळे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सामान्य प्रशासन विभागाला तसे सांगता येते काय ? याबाबतचा नियम काय आहे याबाबत समितीला माहिती द्यावी माननीय मंत्र्यांना या विषयामध्ये घेण्याची गरजच नाही असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, विभागाने खालील खुलासा सादर केला.

याबाबत सदर प्रकरणाची नस्ती प्रशासन विभागास सादर केली असता त्यांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत :-

अखिल भारतीय सेवा (शिस्त व अपील) नियम १९६९ च्या नियम ७ मध्ये अखिल भारतीय सेवेतील अधिका-यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई सुरु करण्यास सक्षम प्राधिकारी कोण आहे. याची तरतूद विहित करण्यात आली आहे. त्यानुसार सदर नियमांच्या नियम ७ (१) (ब) मधील तरतुद पुढील प्रमाणे आहे.

"7- The Authority to institute proceedings and to impose penalty—

(i) (a) *****

(b) if such act or omission was committed after his appointment to the Service

(i) While he was serving in connection with the affairs of a State or is deputed for service under any company, association or body of individuals, whether incorporated or not, which is wholly or substantially owned or controlled by the Government of a State, or in a local authority set up by an Act. of the Legislature of that State, the Government of that State."

वरील तरतुदीनुसार राज्य शासनाच्या सेवेत असणा-या भाप्रसे अधिका-याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यास राज्य शासन सक्षम प्राधिकारी आहे. राज्य शासनाकडून भारतीय प्रशासन सेवेतील अधिका-याची विभागीय चौकशीची प्रकरणे सामान्य प्रशासन विभागाकडून हाताळण्यास येतात. त्यामुळे भाप्रसे अधिका-यांविरुध्द विभागीय चौकशी ही मा.मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेनंतर सुरु होते.

मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडून त्यांच्या विभागातील/अधिपत्याखालील भाप्रसे अधिका-याविरुध्द विभागीय चौकशी करण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग (का-१०-अ) कडे प्रस्ताव सादर करतांना प्रारुप दोषारोपपत्र व संबंधीत कागदपत्रांसह सादर करावा लागतो. असा प्रस्ताव सादर करतांना संबंधीत विभागाच्या मंत्री महोदयांची मान्यता आवश्यक असल्याबाबत अखिल भारतीय सेवा (शिस्त व अपील) नियम १९६९ स्पष्ट तरतुद नाही. मात्र महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या नियम १० नुसार विभागाचे प्रभारी मंत्री हे त्या विभागाचे कामकाज निकालात काढण्यास प्रथमतः जबाबदार असतात. त्यामुळे भाप्रसे अधिका-यांविरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव प्रशासकीय विभागाकडून सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवितांना विभागाच्या मंत्रीमहोदयांना ही बाब अवगत असणे आवश्यक आहे. यास्तव मा.मंत्रीमहोदयांची मान्यता असणे आवश्यक आहे.

प्रस्तावास उशीर झाला आहे. याबाबत विचारणा माननीय मंत्री महोदयाकडे करावी. प्रस्ताव मा.मंत्री महोदयाकडून प्राप्त करुन कार्यवाही करावी समितीने निदर्शनास आणले असता, यामध्ये अतिरिक्त मुख्य सचिव यांच्याकडून प्रस्ताव माननीय मंत्र्यांकडे सादर केला होता. त्यापुढे काही मुद्दे चर्चेमध्ये उपस्थित केले त्यानंतर माननीय मंत्र्यांकडे ते गेलेले आहेत. त्यामध्ये असा मुद्दा आहे की, जी चौकशी झालेली होती ती श्री. नक्वी, कोषागार संचालक यांच्या स्तरावर झाली होती. त्यात ४ अधिका-यांना दोषी ठरविले होते त्यामध्ये आयुक्तपण होते. या प्रकरणाला स्थलांतरासाठी ३३ महिने उशीर झाला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सामान्य प्रशासन विभागाला असे सांगण्याचा अधिकार आहे काय ? कारण ही प्रशासकीय बाब आहे आणि जर त्यांनी असे सांगितले असेल तर त्या नियमाची माहिती समितीला द्यावी. माननीय मंत्र्यांनी जी सुधारीत माहिती मागितली आहे ती माहिती द्यावी. तसेच यामध्ये दोषी आढळलेले अधिकारी कोणत्या पातळीवरील आहेत अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकरणामध्ये आयुक्तांना दोषी धरण्यात आले आहे ते सन १९८८ बॅचचे आय. ए. एस. अधिकारी आहेत त्यानंतर श्री. परामने, तत्कालीन उपसंचालक, श्री. ढाकणे, तत्कालीन लेखाधिकारी, दोन कक्ष अधिकारी आणि एक उपसंचालक, लेखा व कोषागार विभाग हे दोषी अधिकारी असल्याचे सचिवांनी समितीस सांगितले.

समितीच्या माहितीनुसार लिपिक दर्जाचे लोक असतील तर ते सचिव स्तरापर्यंत त्याचा विषय असतो. पण उप सचिव, संचालक आणि आयुक्त स्तरावरील असेल तर त्याची माहिती माननीय मंत्र्यांना दिली पाहिजे. माननीय मत्र्यांना हे दाखविण्याबाबत समितीचे काही म्हणणे नाही. पण त्याचा काहीतरी निर्णय होणे आवश्यक आहे. याबाबत विभागाने खालील खुलासा सादर केला.

सदर प्रकरणाची नस्ती मा.मंत्री (वित्त) यांना सादर केली असता त्यांनी सदर प्रकरणी अपर मुख्य सचिव दर्जाच्या अधिका-यांकडून चौकशी करण्याबाबत निर्देश दिले. त्यानुसार अपर मुख्य सचिव दर्जाच्या अधिका-याकडून चौकशी करण्याबाबत सदर नस्ती मुख्य सचिवांना सादर करण्यात आली आहे.

समितीला माहिती सादर करायची आहे ही बाब विभागाचे प्रधान सचिव व माननीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणली काय? अशी विचारणा समितीने केली असता, माननीय मंत्री आणि अप्पर मुख्य सचिव यांना याबाबत माहिती आहे. परंतु माननीय मंत्र्यांशी जी चर्चा झाली त्यावरुन असे निदर्शनास आले की, ३३ महिन्याचा जो कालावधी लागलेला आहे त्याचा तक्ता तयार केलेला आहे. कारण माननीय मंत्र्यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, ३३ महिन्याचा कालावधी हा कोणकोणत्या ठिकाणी लागला आहे आणि त्यासाठी फक्त आयुक्त जबाबदार होते काय ? त्याचा तक्ता समितीला सादर केलेला आहे. त्या तक्त्यामध्ये आयुक्तांकडे वेळ लागला नाही असे विभागाचे म्हणणे नाही. पण आयुक्तांनी करार करुन जेव्हा ही जागा ताब्यात घेतली किंवा शासनाने मान्य केलेल्या करारामध्येच असा उल्लेख आहे की, अंतर्गत सर्व दुरुस्त्या व काम आयुक्त कार्यालय करेल. या विषयामध्ये एमएसएसआयडीसी ही एजन्सी निश्चित करण्यात आली. ही एजन्सी निश्चित करुन आयुक्तांनी त्या एजन्सीला जे पत्र दिले त्याकरीता त्यासोबत एक तक्ता जोडलेला आहे. त्यासाठी ७ महिन्याचा कालावधी लागलेला आहे. त्यानंतर जवळपास ८७ दिवसांनी एमएसएसआयडीसी कडून प्रस्ताव आला. या प्रस्तावाला शासनाची मान्यता देण्यासाठी पुढे १७६ दिवस लागले. त्यानंतर एमएसएसआयडीसीने जे काम पूर्ण करुन घेतले त्याला साधारणपणे ५१० दिवस लागले आहेत. असे सर्व मिळून ३३ महिने होत आहेत. त्यापैकी ७ महिने आयुक्तांनी एमएसएसआयडीसी या खाजगी संस्थेकडून या जागेत काम करुन घेऊ, असे ठरवायला लागले तर यासाठी आयुक्त निश्चितच जबाबदार आहेत. यामध्ये संपूर्ण विभागाची जबाबदारी ही आयुक्तांचीच आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. मुद्दा असा आहे की, आयुक्तांना वाचविण्यासाठी एवढे प्रयत्नशील का आहात ? त्या इमारतीचा सन २०१३ मध्ये करार केला आणि सन २०१५ मध्ये इमारतीचा ताबा मिळाला पण तरी भाडे सुरुच आहे. सन २०१६ मध्ये फर्निचरचे काम पूर्ण झाले. याचा करार फक्त ३६ महिन्यांचा होता आणि ३३ महिन्यानंतर त्या ठिकाणी कार्यालय स्थलांतरित झाले तसेच याकरिता चौकशी समिती नेमली आणि त्यांनी काही लोकांना दोषी ठरवले. माननीय मंत्र्यांनी चौकशी समितीच्या निष्कर्षाबाबत काही खुलासा मागितला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, चौकशी समितीचा अहवाल व शिफारस याची नस्ती माननीय मंत्र्यांकडे सादर केली आहे. परंतु माननीय मंत्र्यांनी जेव्हा चर्चेला बोलावले होते तेव्हा ३३ महिने हा खूप मोठा कालावधी दिसत होता. ही समिती अत्यंत प्राथमिक स्वरुपाची होती याबाबत श्री. नक्वी यांचा अहवाल पाहिला तर त्यामध्ये मोघम स्वरुपाची चर्चा करुन सकृत दर्शनी हे अधिकारी दोषी दिसतात असे विभागीय सचिवांनी सांगितले.

चौकशी समिती विभागाने स्वतः नेमलेली होती. त्यांच्या निष्कर्षानुसार अंमलबजावणी करा, असे समितीने सांगितले. ती अंमलबजावणी करण्यासाठी आयुक्ताला वाचविण्याचा प्रयत्न करण्यात येतो कारण, he is responsible only for seven months. समितीचा मूळ मुद्दा असा आहे की, सन २०१३ मध्ये जागा घेतली त्यानंतर सन २०१५ मध्ये ताबा मिळाला अशी विचारणा समितीने केली असता, दिनांक ६ मे, २०१३ रोजी जेव्हा करार झाला तेव्हा ताबा मिळाला. असे विभागीय सचिवांनी सांगितले. विभागाकडून प्राप्त उत्तरामध्ये नमूद केले आहे की, सन २०१५ मध्ये त्यांनी इमारत तयार करुन दिली आणि ताबा घेतला. त्यामध्ये नमूद होते की, सन २०१३ ते सन २०१४ पर्यंतचे भाडे द्यावे त्यानंतर सर्व दरवाजे-खिडक्या लावून देण्याची व पाण्याची व्यवस्था करण्यात येईल. असे असताना ही सन २०१५ मध्ये इमारतीचा ताबा मिळाला.

सदर जागेचे भाडे मालकास अदा न केल्यामुळे मालकाने नुतनीकरणाचे काम सुरु करण्यास नकार दिला. दिनांक २५ मे, २०१५ रोजी जागेचा प्रत्यक्ष ताबा मिळाला असे विभागाकडील उत्तरामध्ये दिलेले आहे.याचा अर्थ असा होतो की, दिनांक ६ मे, २०१४ रोजी इमारतीचा जो ताबा घेतला होता तेव्हा ती इमारत वापरण्याजोगी नव्हती तरी देखील ताबा घेतला असे मत समितीने व्यक्त केले. त्यांच्यामध्ये जो करार झाला तो करार विधी व न्याय विभाग आणि शासनाने मान्य केलेला आहे. या कराराच्या क्लॉजमध्ये असे नमूद केले आहे की, “Only structural, external and major repairs of the said premises required during the term of leave and license shall be carried out by the licensor at his own cost. The licensee shall be responsible for carrying out repairs within the said premises”. त्यामुळे शासनाने ज्या मान्यतेने हा करार केलेला आहे त्यानुसार आयुक्त कार्यालयाने या सर्व दुरुस्तीची जबाबदारी स्पष्टपणे घेतली आहे. “The licensee shall be responsible for carrying out repairs within the said premises”. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

Repairs will be done by the Commissioner but it has to be kept in good condition for renting the premises. असे मत समितीने व्यक्त केले.यामध्ये ज्या काही त्रुटी होत्या त्या त्यांनी माहे सप्टेंबर, २०१३ मध्ये दूर करुन दिल्या आहेत. त्यासाठी दिनांक ३० सप्टेंबर, २०१३ चे पत्र समितीला दाखविण्यात आले.त्या इमारतीमध्ये लिकेज, टाईल्स दुरुस्ती अशा सर्व दुरुस्त्या करुन त्यांनी दिल्या आहेत. तशा प्रकारचे अधिकृत पत्र त्यांनी दिलेले आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

प्राथमिक चौकशी एका समितीने केली आणि त्या समितीने चार ते पाच लोकांना दोषी ठरवले आणि त्यांची सखोल चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता आहे, असे समितीचे मत आहे. त्यावर सामान्य प्रशासन विभागाने सांगितले की, हे विभागाच्या माननीय मंत्र्यांना दाखवावे. माननीय मंत्र्यांना मार्च महिन्याच्या शेवटी नस्ती सादर केली आहे. फेब्रुवारी महिन्यात समितीची साक्ष झाल्यानंतर मा.मंत्र्यांना नस्ती पाठविण्यासाठी एक महिना त्या चौकशी समितीच्या विरोधातील निर्णय माननीय मंत्र्यांनी घेतला का किंवा ते घेणार आहेत काय ? किंवा तो निर्णय त्यांनी घेतला तर विभागाची भूमिका काय राहिल किंवा तो चौकशी अहवाल कधी पासून सुरु करणार आहात ? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये माननीय मंत्र्यांना अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या मार्फत नस्ती सादर केली. महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, चौकशीनंतर हे सर्व कागदपत्रे आयुक्तांच्या ताब्यात होती. ज्या दिवशी समितीची साक्ष होती त्या दिवशी आयुक्त निवडणूकीच्या कामावर असल्यामुळे उपस्थित नव्हते. त्यानंतर दिनांक १६ मार्च, २०१८ रोजी निवडणूकीच्या कामावरुन ते परत आले. अधिका-यांविरुद्ध कडक कारवाई करण्याची शिफारस केली असेल तर विभागाची भूमिका अशी आहे की, सर्व नस्त्या पाहून त्यामागची पूर्ण भूमिका समजून घेऊन ती शिफारस करणे योग्य राहील असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आता यामध्ये फक्त कारवाईचाच मुद्दा आहे. या विषयामध्ये आयुक्ताची जबाबदारीच नाही, अशी विभागाची भूमिका आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, अशा प्रकारची भूमिका विभाग मांडत नाही तर एवढीच भूमिका मांडत आहोत की, यामध्ये जो प्रश्न निर्माण झालेला आहे किंवा जो उशिर झालेला आहे त्याचे विश्लेषण केले तर प्रत्येक स्तरावरच हा उशिर झालेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आयुक्त पातळीवर ७ महिन्यांचा वेळ लागलेला आहे. माहे मे, २०१३ पासून भाडे देत आहोत आणि त्या इमारतीचा वापर माहे फेब्रुवारी, २०१६ पासून करीत आहोत. ३३ महिन्याचा कालखंड हा चुकीमुळे लागलेला आहे. या सर्व कालखंडाचे एकूण १ कोटी १४ लाख रुपये भाडे दिलेले आहे कारण ३ वर्षाचा करार होता तो करार नंतर वाढून दिला आहे. हा सर्व निष्फळ खर्च आहे. फर्निचर बनविण्यासाठी किंवा पूर्ण कामासाठी समिती ६ महिन्याचा कालावधी समजणे शक्य आहे. ७६ लाख रुपये असून आणखी १९ लाख रुपये मागता याबाबत काही अडचण नाही. पण ३३ महिन्याचा उशिर हा विभागाने काळजी न घेतल्यामुळे झालेला आहे. यासाठी जे लोक जबाबदार आहेत त्यांना दंडित केले पाहिजे, हीच समितीची भूमिका आहे. समितीला असे वाटते की, या विषयावर योग्य तो निर्णय झाला पाहिजे. एका बाजूने राज्याच्या पूर्ण वित्तीय व्यवस्थांवर वित्त विभाग नियंत्रण ठेवतो आणि त्याच विभागामध्ये जर असे ढिसाळ नियोजन असेल तर ते इतर विभागांना कशा प्रकारे मार्ग दाखविणार त्यामुळे याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली.

चौकशी केल्यानंतर ही नस्ती माननीय मंत्र्यांकडे पाठविण्यात आली. प्रशासकीय सेवेचे नियम फॉलो करतो त्याप्रमाणे ही नस्ती माननीय मंत्र्यांकडे जाते का ती प्रशासकीय बाब आहे, याचा खुलासा झाला पाहिजे अशी विचारणा समितीने केली असता, सामान्य प्रशासन विभागाच्या सूचनेच्या आधारे ती नस्ती माननीय मंत्र्यांच्या मान्यतेसाठी सादर केली असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीने प्रशासकीय सेवेच्या नियमाचा उल्लेख केलेला आहे. त्या नियमानुसार माननीय मंत्री यावर निर्णय घेणार की विभाग प्रशासकीय सेवेनुसार निर्णय घेणार आहे अशी विचारणा समितीने केली असता, सामान्य प्रशासन विभागाकडून विभाग निश्चित अशा नियमाची माहिती घेतो. विभाग प्रमुख म्हणून आयएएस अधिकारी यामध्ये सहभागी आहेत. सामान्य प्रशासन विभागाने कोणत्या नियमाच्या आधारे शिफारस केली याची माहिती घेऊन समितीला सादर करतो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्यावेळी तत्कालीन कमिशनर कोण होते ? अशी विचारणा समितीने केली असता, श्री. अमिताभ जोशी हे तत्कालिन कमिशनर होते असे विभागीय सचिवांनी सांगितले. दोषी अधिका-यांवर कारवाई करण्यासाठी नेमलेल्या समितीचा अहवाल माननीय मंत्र्यांकडे पाठविला आहे. या समितीवर ते कारवाई करणार आहेत की नाही ? ह्याची माहिती समितीला एक महिन्याच्या आत द्यावी व चौकशी समितीचा अहवाल समितीला द्यावा असे निदेश समितीने दिले.

विभागाने समितीस दिलेली संचालक (ले. व को.) यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाची प्रत सोबत जोडली आहे. **(विवरण पत्र क्र. ३)**

विभागाने लेखी उत्तरात सादर केलेले आहे की, सामान्य प्रशासन विभागाने असे सांगितले होते की, माननीय मंत्री महोदयांची मान्यता घ्यावी आणि मग विभागीय चौकशीचा प्रस्ताव पाठवावा. सामान्य प्रशासन विभागाने कोणत्या नियमानुसार मा.मंत्री महोदयांची मान्यता घेण्यास सांगितले याबाबतचा खुलासा त्यांच्याकडून मागितला असता, सामान्य प्रशासन विभागाकडून हा विषय पाठविला होता. प्राप्त झालेला खुलासा सविस्तरपणे टिपणीमध्ये नमूद केलेला आहे. तसेच, दुसरा मुद्दा हा माननीय मंत्री महोदयांनी यावर काय निर्णय घेतला ? मंत्री महोदयांना हे प्रकरण सादर करण्यात आले होते. त्यावर मंत्री महोदयांनी या सर्व प्रकरणाची चौकशी अपर मुख्य सचिव दर्जाच्या अधिका-याकडून करावी, असा निर्णय दिलेला आहे. त्याप्रमाणे माननीय मुख्य सचिव यांच्याकडे अपर मुख्य सचिवांच्या दर्जाच्या अधिका-यांची नियुक्ती करण्यासाठी नस्ती सादर करण्यात आली आहे. मंत्री महोदयांनी परवानगी दिल्यानंतर आता मुख्य सचिव महोदयांकडे ही नस्ती गेलेली आहे. अपर मुख्य सचिव दर्जाच्या अधिका-यांची नियुक्ती करण्यात येईल व ते चौकशी करतील असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागाने सादर केलेल्या माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, "महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या नियम १० नुसार विभागाचे प्रभारी मंत्री हे त्या विभागाचे कामकाज निकालात काढण्यास प्रथमतः जबाबदार असतात". परंतु, विभागाचे कोणतेही काम असेल तर प्रथमतः विभागाचे प्रमुख म्हणून ते जबाबदार आहेत. जितके विषय येतात त्या सर्वांच्या नस्त्या माननीय मंत्री महोदयांकडे पाठविता काय ? अशी विचारणा समितीने केली असता, सर्वप्रथम सामान्य प्रशासन विभागाकडे ही नस्ती डायरेक्टली पाठविली होती. सामान्य प्रशासन विभागाने त्यावर असे अभिप्राय दिले की, यामध्ये भारतीय प्रशासन सेवेतील अधिका-यांचा समावेश असल्यामुळे यावर मंत्री महोदयांची मान्यता घ्यावी. यापूर्वी असा मुद्दा उपस्थित झाला होता की, सामान्य प्रशासन विभागाने हे अभिप्राय कशाच्या आधारावर दिले. त्यानंतर विभागाने सामान्य प्रशासन विभागाकडे हा विषय पाठविला असता त्यामध्ये नमूद केले होते की, सदर अभिप्राय विभागाला कशाच्या आधारावर दिले त्याचा खुलासा करावा. सामान्य प्रशासन विभागाने दिलेला खुलासा सादर केलेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मा.मंत्री महोदयांच्या अभिप्रायानुसार चौकशीची नस्ती मुख्य सचिव महोदयांकडे पाठविली आहे ? त्यावरील निर्णय कधीपर्यंत येणे अपेक्षित आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, मुख्य सचिव महोदयांकडे दिनांक १९.४.२०१८ रोजी नस्ती पाठविलेली आहे. नवीन मुख्य सचिव रुजू झाले आहेत. तेच वित्त सचिव होते. त्यांच्या मार्फत ही नस्ती गेलेली आहे. त्यांना हा विषय अवगत करुन लवकरात लवकर यावर निर्णय घेण्याबाबत विनंती करण्यात येईल.

मुख्य सचिवांनी अपर मुख्य सचिव दर्जाच्या अधिका-यांची नियुक्ती केल्यानंतर किती दिवसांत चौकशी पूर्ण होणे अपेक्षित आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, याबाबत मुख्य सचिव महोदयांकडे विचारणा करण्यात येईल. हे प्रकरण सामान्य प्रशासन विभागाकडे गेले असल्यामुळे आता त्या स्तरावर यावर कारवाई होईल. साधारणतः ३ महिन्यांचा कालावधी याला लागू शकतो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

संचालकांनी चौकशी अहवालामध्ये काय नमूद केले आहे ते समितीस थोडक्यात सांगण्याबाबत समितीने सूचित केले असता, संचालकांनी मुद्दा क्रमांक ७ मध्ये माहे मे, २०१३ ते मार्च, २०१५ या कालावधीतील विलंबाकरिता आयुक्त, अल्पबचत व संबंधित कक्ष अधिकारी हे पूर्णतः जबाबदार आहेत असे नमूद केले आहे. मुद्दा क्रमांक ८ मध्ये झालेल्या विलंबाकरिता एम.एस.एस.आय.डी.सी. जबाबदार आहे असे नमूद केलेले आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

जी चौकशी होणार आहे, त्यामध्ये संचालकांनी सांगितलेल्या २ अधिका-यांचीच चौकशी होणार आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने एकूण ६ लोकांची नावे सूचीत केली होती. परंतु, मागच्या बैठकीतही सांगितले की, संचालक स्तरावरील जी चौकशी होती त्यामध्ये मंत्रालयीन कागदपत्रे संचालकांनी कदाचित पाहिली नसावीत. त्यामुळे ती प्राथमिक स्वरुपाची चौकशी होती. जो विलंब दिसत आहे तो प्रत्येक स्तरावर झालेला आहे. त्यामुळे आता अपर मुख्य सचिव हे प्रत्येकाचा विलंब किती झाला होता हे निःपक्षपातीपणाने पाहतील व त्याप्रमाणे जबाबदारी निश्चित करतील. त्यामध्ये आयुक्तही निश्चितच आहेत. विभागाकडे आयुक्तांची २ पत्रे आहेत. आयुक्तांनी हे स्वतः निदर्शनास आणले होते की, यामध्ये लेखापरीक्षण आक्षेप येणार आहे. परंतु, आता कोणाकोणाचा किती विलंब झाला आहे, या सर्वच नस्त्या त्यांना देत असल्यामुळे यामध्ये निःपक्षपाती चौकशी होईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

**परिच्छेद क्र. ३.७ “वापरात नसलेल्या कार्यालयीन जागेच्या भाड्यावर झालेला निष्फळ खर्च ”**

**अभिप्राय**

**३.२** महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील आयुक्त, अल्प बचत व राज्य लॉटरी यांनी उपसंचालक (वित्त व लेखे), महाराष्ट्र राज्य लॉटरी, मुंबई यांचे कार्यालयासाठी नवीमुंबई येथे जागा उपलब्ध करुन देण्यासाठी सामान्य प्रशासन विभागास केलेल्या विनंतीनुसार आवश्यक इतक्या मोठ्या क्षेत्रफळाची शासकीय जागा उपलब्ध नसल्यामुळे खाजगी जागा भाडेपट्टीने घेण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने वित्त विभागास कळविले व त्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया राबवून श्री व्यंकटेश एन्टरप्राईजेस, वाशी येथील अंदाजे ८२८१ चौ. फु. सुसज्ज नसलेली जागा मासिक रु. ३.४४ लक्षने दि. १.५.२०१३ ते ३०.४.२०१६ या कालावधीसाठी ३६ महिन्याच्या भाडेपट्टीने घेण्यात आली. सदरहु जागा मोकळ्या गोडाऊनच्या स्वरुपातील असल्यामुळे त्याचे नुतनीकरणाचे काम महाराष्ट्र राज्य लघुविकास महामंडळामार्फत करण्यात आले. परंतु भाडेपट्टाकरार होऊन जागेचे नुतनीकरण करुन त्याचा प्रत्यक्षात वापर करण्यास झालेल्या विलंबाचा व अडथळ्यांचा उहापोह विभागाने त्यांच्या लेखी उत्तरात विस्तृतपणे केला आहे. परिणामी नुतनीकरणाचे काम पुर्ण होवून प्रत्यक्ष कार्यालय त्या ठिकाणी दि. २६.२.२०१६ रोजी म्हणजेच जवळजवळ ३४ महिन्यानंतर स्थलांतरीत करण्यात आले. भाडेकराराचा कालावधी हा फक्त ३६ महिन्यांसाठी असून त्यातील जवळजवळ ३४ महिने या सर्व जागेचा वापर करता आला नसून जागेचा प्रत्यक्ष उपभोग विभागाला करार संपायच्या केवळ २ महिने करता आला. परिणामी या ३४ महिन्याच्या कालावधीमध्ये भाड्यापोटी प्रदान केलेल्या रु. १.१४ कोटीचा खर्च निष्फळ ठरला व जागेचा उपयोग देखील विभागाला करता आला नाही. यावर समितीने विस्तृत चर्चा केली असून सदरहू भाड्याच्या जागेमध्ये प्राथमिक सुविधा देखील ज्या अनुज्ञाप्तीकारांनी पुरविणे अपेक्षित होत्या त्या देखील जर उपलब्ध नव्हत्या तर अशी जागा विभागाने भाड्याने घेण्याचे कोणतेही कारण नव्हते. तरीही ही जागा विभागाने घेतली. परंतु जर भाडेकराराच्या अटीप्रमाणे सोयी सुविधा अनुज्ञाप्तीकाराकडून पुरविण्यात आल्या नाहीत. तर त्याचे भाडे आयुक्तांनी अदा करावयास नको होते. एकूण ३६ महिन्याच्या भाडेपट्टयाच्या कालावधीतील ३४ महिने जागेचा वापर न करता वाया गेले याचा अर्थ विभागाला कराराच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून नुतनीकरणाचे काम कालबध्दरित्या करुन लवकरात लवकर जागेचा वापर करण्याची योजना योग्यप्रकारे व नियोजनबध्दरित्या करण्यास निश्चितच अपयश आल्याचे दिसून येते. शासकीय कार्यालयांसाठी सामान्य प्रशासन विभागाने शासकीय मालकीची जागा उपलब्ध करुन न दिल्यास नवी मुंबई येथील सिडको अंतर्गत असलेली शासकीय जागा (इमारती) देखील मिळविण्याचा विभागाने कोणताही प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. नुतनीकरणाच्या कामामध्ये येणा-या अडचणींचे कालबध्द पध्दतीने निराकरण करण्याचा देखील विभागाने कोणताही प्रयत्न केला नाही. परिणामी भाड्यापोटी झालेला कोट्यावधी रुपयांचा खर्च निष्फळ ठरला. सदरहु प्रकरणी झालेल्या विलंबाबाबत तत्कालिन अप्पर मुख्य सचिव यांनी संचालक, लेखा व कोषागारे यांचेमार्फत प्राथमिक चौकशी करण्याचे आदेश दिले. संचालकांनी केलेल्या चौकशीनुसार तत्कालिन आयुक्त यांचेसह अन्य चार अधिका-यांवर कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात आली. सदरहु कार्यवाही बाबतची नस्ती विभागाने सामान्य प्रशासन विभागाकडे सादर केली असता यात भारतीय प्रशासन सेवेच्या अधिका-याचा देखील समावेश असल्यामुळे अशा प्रस्तावास संबंधित विभागाच्या मा.मंत्री महोदयांची मान्यता घेण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाकडून कळविण्यात आले व त्यावर मा.मंत्री, वित्त यांनी सदरहू चौकशी अप्पर मुख्य सचिव दर्जाच्या अधिका-याकडून करण्याबाबत सादर केले असून सदरहू प्रकरण कारवाईसाठी मा.मंत्री महोदयांकडे प्रलंबित असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारस**

**३.३ आयुक्त, अल्प बचत व राज्य लॉटरी, महाराष्ट्र राज्य यांनी वाशी नवीमुंबई येथील भाडेपट्टीवर घेतलेली कार्यालयीन जागा जी ३६ महिन्यांच्या भाडेपट्टी कालावधीपैकी ३४ महिने विनावापर पडून राहिली त्या जागेच्या भाड्यापोटी झालेला रु.१.१४ कोटीचा निष्फळ खर्च याबाबत महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप हे गंभीर आहेत. या प्रकरणातील संपुर्ण घटनाक्रमच अतिशय आक्षेपार्ह, दिशाभूल करणारा व अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्याबाबत विभागाच्या भूमिकेवरच शंका उपस्थित करणारा आहे. या संपुर्ण प्रकरणाची प्राथमिक चौकशी करण्याचे आदेश संचालक, लेखा व कोषागरे यांचेकडे देण्यात आली. जे वित्त विभागांतर्गतच कार्यरत असलेले अधिकारी असून त्यांचेवर आयुक्त (भाप्रसे) यांची चौकशी करण्याचे आदेश देणे हीच बाब मुळात आक्षेपार्ह आहे. आयुक्तांच्या कामाची चौकशी संचालक, लेखा व कोषागरे हे करुच शकत नाहीत. असे असताना व ही चौकशी सक्षम प्राधिका-यांकडे देणे अपेक्षित व आवश्यक असताना अशा पध्दतीने या प्रकरणाची चौकशी करणे ही**

अतिशय गंभीर बाब आहे. विभागाने या संपुर्ण प्रकरणी अवलंबिलेल्या दोषपुर्ण कार्यपध्दतीमुळेच ३४ महिने जागेचा वापर विभागाला तर करता आला नाहीच परंतु संबंधितांवर कारवाई करण्यास देखील त्यापुढील २ वर्षे लागणे व अद्यापही कोणतीही ठोस कारवाई संबंधितांवर न करणे ही बाब निश्चितच आक्षेपार्ह असून कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नाही. राज्य शासनाच्या निधीचा योग्य विनियोग करणे व अपव्यय टाळणे व त्यातून वितीय शिस्तीचे उल्लंघन न करता सार्वजनिक हित साध्य करण्याची मुलतः जबाबदारी व त्याअनुषंगाने निधीचे नियोजन करण्याची प्राथमिक जबाबदारी ही वित्त विभागाची असताना त्यातही अन्य विभागाच्या तुलनेने वित्त विभागाने अतिशय शिस्तबध्द पध्दतीने व काटेकोरपणे आर्थिक शिस्त जपणे अपेक्षित व अभिप्रेत असताना वित्त विभागाच्या अंतर्गतच अवलंबिण्यात येणारी कार्यपध्दती ही अतिशय दोषपुर्ण व आक्षेपार्ह आहे. दोषींवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेवर तातडीने कारवाई करण्याबाबत स्पष्ट भूमिका विभागाने ठेवून त्यानुसार कार्यवाही करणे अभिप्रेत होते. त्यासाठी अवलंबिण्यात येणारी कार्यपध्दती अतिशय सुस्पष्ट व विहित असताना अशापध्दतीने हे प्रकरण हाताळणे व त्यात वेळ घालविणे निश्चितच योग्य नूसन विभाग दोषी अधिका-यांना वाचविण्याचा प्रयत्न करीत असल्याची शंका निर्माण करणा-या आहेत. महालेखाकारांनी या प्रकरणी उपस्थित केलेले आक्षेप अतिशय गंभीर असून ते विभागाने अतिशय गांभीर्याने घ्यावेत व संबंधितांवर कारवाई करावी अशी समितीची स्पष्ट भूमिका आहे. त्यासाठी विहित कार्यपध्दतीचा तातडीने अवलंब करुन दोषींवर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच या संपुर्ण प्रकरणात संबंधितावर कार्यवाही करण्यात विभागाकडून झालेल्या अमर्याद विलंबाबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. अशा प्रकारची कार्यपध्दती वित्त विभागासारख्या विभागाकडून तरी अपेक्षित नाही. विभागाने भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती व शासकीय निधीचा अपव्यय टाळावा व या प्रकरणी दोषींवर १ महिन्याच्या आत कारवाई करुन याची माहिती समितीस देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

## गृहनिर्माण विभाग

४ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-२०१६ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.८ **"व्याजाचे नुकसान "** यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

**बँकामधील चालू खात्यात भाडे व सेवाशुल्काची रु. ५.८४ कोटी रक्कम दोन वर्षापेक्षा अधिक काळ विनावापर पडून राहिल्याने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाला रु. १.२१ कोटी व्याजाचे नुकसान झाले.**

महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) नियंत्रणाखाली कामकाज करणारे मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्बांधणी मंडळ (मंडळ), मुंबई बेटावरील जुन्या आणि मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती/पुनर्बांधणी करते. इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती/पुनर्बांधणी करताना म्हाडाच्या संक्रमण शिबीरांमध्ये भाडेकरुंना तात्पुरता निवारा दिला जातो. ज्या भाडेकरुने तात्पुरते निवासस्थान वापरण्यास होकार दिला आहे त्याने मंडळाना मंडळाने निश्चित केलेल्या दराने भाडे किंवा सेवा शुल्क भरणे आवश्क असते. अशाप्रकारे प्राप्त केलेले भाडे व सेवा शुल्क हे मंडळाच्या मालमत्ता व्यवस्थापन शाखेकडून व्यवहार केल्या जाणा-या चालू बँक खात्यात जमा केले जाते.

म्हाडा ने जारी केलेल्या परिपत्रकानुसार (ऑगस्ट १९९६), चालू खात्यातील भाडे व सेवा शुल्कासह सर्व जमा रकमा प्रत्येक सोमवारी किंवा सोमवारी सुट्टी असल्यास त्यानंतरच्या कामकाजाच्या दिवशी मंडळाच्या मुख्य लेखाधिका-यांच्या मार्फत वित्त नियंत्रक (FC), म्हाडा यांना हस्तांतरीत करावयाच्या होत्या. व्याजाचे नुकसान टाळण्यासाठी FC, म्हाडा यांनी सर्व नियोजित खर्च भागविल्यावर राहिलेली अतिरिक्त रक्कम मुदत ठेवींमध्ये गुंतवणे आवश्यक होते.

मंडळाच्या मालमत्ता व्यवस्थापकांकडील बँक विवरणे आणि मासिक लेख्यांच्या लेखापरीक्षेत असे आढळून आले की, ९ ऑगस्ट, २०११ व ०३ जानेवारी, २०१२ पासून बँक ऑफ महाराष्ट्रमधील दोन चालू खात्यात रु. ५.८४ कोटीची रक्कम जरी पडून होती तरी, ती दोन वर्षापेक्षा अधिक विलंबाने ३१ जानेवारी, २०१४ रोजी FC, म्हाडा यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आली होती. परिणामी, तक्ता ३.८ मध्ये दर्शविल्याप्रमाणे रु. १.२१ कोटी व्याजाचे नुकसान झाले.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील माहिती नमूद केली आहे.**

यापुर्वी बँक खाते क्र. २००४५३०१८४७ आणि २००४५३०१५८६ मिळकत व्यवस्थापक, संक्रमण गाळे यांचे अधिपत्याखाली कार्यन्वीत होती. तत्कालीन कार्यालयीन पध्दतीनुसार सदर बँक खात्यात जमा होणारी भाडे व सेवा आकाराची रक्कम मिळकत व्यवस्थापक, संक्रमण गाळे यांचे मार्फत नियमितपणे वित्त नियंत्रक/ प्राधिकरण यांना जमा करण्यात येत होती. सन २०११ साली मुंबई इ.द.व पुर्नरचना मंडळातील विभागांची पुर्नरचना करतेवेळी मुख्य लेखा अधिकारी / दुवपु मंडळ यांच्या अधिपत्याखाली लेखा अधिकारी / जमा व लेखा अधिकारी /खर्च अशी दोनच बँक खाती कार्यान्वित करण्याचे ठरले व त्याप्रमाणे यापुर्वी मिळकत व्यवस्थापन विभागामार्फत नियंत्रित करण्यात येणारी बँक खाती बंद करून खात्यातील शिल्लक रक्कम नव्याने उघडण्यात आलेल्या लेखा अधिकारी /जमा यांचे बँक खात्यात जमा करण्याच्या सुचना निर्गमित करण्यात आल्या. तथापी, मिळकत व्यवस्थापक, संक्रमण गाळे यांनी त्यांच्या अखत्यारीतील वरील दोन बँक खात्यातील शिल्लक लेखा अधिकारी / जमा यांच्या खात्यात विलंबाने म्हणजेच जानेवारी- २०१४ मध्ये जमा केली. त्यानुषंगाने सदर रक्कम मुख्य लेखा अधिकारी / दुवपु मंडळ यांनी वित्त नियंत्रक / प्राधिकरण यांचेकडे पाठविली.

व्याजाच्या नुकसानीबाबत असे सादर करण्यात येते की, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळांतर्गत प्रचलीत पध्दतीनुसार मिळकत व्यवस्थापन विभागामार्फत जमा केलेली भाडे व सेवा आकार, विलंब आकार, हस्तांतरण शुल्क इ. महसूली जमा वित्त नियंत्रक / प्राधिकरण यांचे मार्फत मुदत ठेवीत गुंतविण्यात येत नाही. सदर जमा रक्कम मंडळाच्या वसाहतीवरील महसूली खर्च जसे विद्युत आकार, मालमत्ता कर, जल आकार इ. भागविण्यासाठी मंडळास पुनश्च उपलब्ध केली जाते. त्यामुळे सदर रक्कम प्राधिकरणामार्फत मुदत ठेवीमध्ये जमा होत नसल्यामुळे वरील विलंबाने जमा केलेल्या रक्कमेवर व्याजाचे नुकसान झालेले नाही. तसेच प्राधिकरणामार्फत गुंतवविण्यात येणा-या निधीवरील व्याज इतर विभागीय मंडळास त्यांनी प्राधिकरणाकडे जमा केलेल्या रक्कमेच्या प्रमाणात विभागून वितरीत करण्यात येते. तथापि, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास व्याजाची रक्कम वितरीत करण्यात येत नाही.

वित्त नियंत्रक / प्राधिकरण यांचे दि. २१.०८.१९९६ च्या परिपत्रकानुसार सदर रक्कम तात्काळ वित्त नियंत्रक/ प्राधिकरण यांचेकडे जमा करणे आवश्यक होते. तथापि, मंडळातील विभागांच्या पुनर्रचनेमुळे सदर रक्कम वित्त नियंत्रक / प्राधिकरण यांचे खात्यात जमा करणे राहून गेल्याचे निदर्शनास आले आहे. अश्या प्रकारची पुर्नरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेतलेली आहे. सद्यःस्थितीत उपरोक्त परिपत्रकानुसार मुख्य लेखा अधिकारी / दुवपु मंडळ यांचे खात्यात जमा होणारी रक्कम नियमितपणे वित्त नियंत्रक/ प्राधिकरण यांचे खात्यात जमा केली जाते.

**साक्ष :-**

**परिच्छेद क्र. ३.८ : व्याजाचे नुकसान -**

**४.१** उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी गृहनिर्माण विभागाचे सचिव व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. त्यावेळी विभागास या मुद्यावर अवगत करावयास समितीने सांगितले असता, सन २०११ पूर्वी २ बँक खात्यांमध्ये ट्रान्झीट कॅम्पची लोकांकडून जी वसूली करण्यात येत होती ती जमा करण्यात येत होती. सन २०११ मध्ये केंद्रीकृत खाते (centralised account) मुख्य लेखापालाच्या नावाने उघडण्याचा निर्णय म्हाडाने घेतला व त्यानुसार सध्या खाते ऑपरेट होत आहे. मिळकत व्यवस्थापकाच्या पातळीवर रक्कम हाताळली जात होती. ती त्यांनी म्हाडाच्या खात्यामध्ये भरायला पाहिजे होती. ती न भरल्यामुळे व्याजाचे नुकसान झाले आहे असा महालेखापाल यांचा आक्षेप आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

यात किती दिवसांचा विलंब झाला आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सन २०११ मध्ये आदेश काढले आणि सन २०१४ मध्ये वर्ग केले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०११ च्या आदेशाची सन २०१४ मध्ये अंमलबजावणी केली आहे अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली. या प्रकरणामध्ये मानवी चूक आहे. यात शासनाचे नुकसान आहे असे असेल तर तसे वाटत नाही. या दोन अकाऊंट ऑपरेटींगसंबंधात माहिती घेतली असता, हे ऑपरेटींग अकाऊंट होते. त्या अकाऊंटमध्ये पैसे यायचे देखभालीसाठी, सेवाशुल्कासाठी, पाण्याचे देयक भरण्यासाठी, वीज देयक भरण्यासाठी पैसे या खात्यामधून खर्च व्हायचे. पाण्याचे, विजेचे, सेवा शुल्काचे बिल किती येणार आहे हे निश्चित नसते. त्यामुळे ही रक्कम फिक्स करता येत नाही. महानगरपालिकेमध्ये प्रकल्प निहाय खर्चाच्या रकमेसाठी तरतूद केली जाते. ती रक्कम फिक्समध्ये जाते. ग्राऊंड लेव्हलवर म्हाडा अशा प्रकारचे फिक्स्ड डिपॉझिट करीत नाही. कंत्राटदाराचे डिपॉझिट आहे, ते त्यांना पुढच्या प्रकल्पासाठी खर्च करावयाचे आहे इत्यादीसाठी म्हाडा फिक्स डिपॉझिट अकाऊंट उघडते. त्यामुळे ही मानवी चूक आहे. त्यात शासनाचे जाणूनबुजून नुकसान करण्याचा कुणाचाही हेतू नाही. यात मुंबई इमारत व पुनर्रचना मंडळ, दुरूस्ती मंडळ यांचा काहीच फायदा नाही. परंतु, सन २०११ चे पैसे माहे मार्च, २०१२ अखेरपर्यंत शिल्लक होते. दरवर्षी पैसे येणार आहेत. पैसे हे येतात आणि जातात. दरवर्षी भाड्याचे पैसे येत असतात. यात मानवी चूक आहे. यात कोणाचाही हेतू नव्हता, फायदा नव्हता. पण ती मानवी चूक आहे. एका वर्षासाठी चूक केली नाही तर ती तीन-तीन वर्ष करण्यात आलेली आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, यात हलगर्जीपणा झालेला आहे, चूक झालेली आहे याबद्दल दुमत नाही. त्यामुळे जबाबदारी निश्चित करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून एक महिन्यामध्ये माहिती समितीला सादर करावी. असे निदेश समितीने दिले असता, आधी अनेक अकाऊंटस होती. ती ऑपरेटस होत होती. त्याऐवजी आता सिंगल अकाऊंट केले असून ते ऑपरेट करण्यात येते. आजही त्यातील सगळी रक्कम फिक्स डिपॉझिटमध्ये ठेवली जात नाही. आपॅरेशन कॉस्टसाठी काही पैसा हा लागतोच. ती खाती ऑपरेशनल पर्पजसाठी होती. ती खाती बंद करून त्यातील रक्कम दुसरीकडे ट्रान्सफर करण्यासाठी ३ वर्षांचा विलंब झालेला आहे. त्यात कोणताही हेतू नव्हता. पण त्यात हलगर्जीपणा मात्र आहे. यात व्याजाचे नुकसान झालेले आहे. ते किती झाले, फिक्स डिपॉझिट अकाऊंटमध्ये रक्कम ठेवली असती तर एवढे व्याज मिळाले असते, करंट अकाऊंटमध्ये पैसे ठेवले असते एवढे पैसे मिळाले असते हा वादाचा मुद्दा होऊ शकतो. ते सर्व तपासून जबाबदारी निश्चित करण्यात येत आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

**परिच्छेद क्र. ३.८ “व्याजाचे नुकसान”**

**अभिप्राय**

**४.२** महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) नियंत्रणाखाली कामकाज करणारे मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्बांधणी मंडळ (मंडळ), मुंबई बेटावरील जुन्या आणि मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती/पुनर्बांधणी करते. इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती/ पुनर्बांधणी करताना मंडळाच्या संक्रमण शिबीरांमध्ये भाडेकरुंना तात्पुरता निवारा दिला जातो. ज्या भाडेकरुने तात्पुरते निवासस्थान वापरण्यास होकार दिला आहे. त्याने मंडळाला मंडळाने निश्चित केलेल्या दराने भाडे किंवा सेवा शुल्क भरणे आवश्यक असते. अशाप्रकारे प्राप्त केलेले भाडे व सेवा शुल्क हे मंडळाच्या मालमत्ता व्यवस्थापन शाखेकडून व्यवहार केल्या जाणा-या चालू बँक खात्यात जमा केले जाते.

**४.३** म्हाडाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार (ऑगस्ट, १९९६) चालू खात्यातील भाडे व सेवा शुल्कासह सर्व जमा रकमा प्रत्येक सोमवारी किंवा सोमवारी सुट्टी असल्यास त्यानंतरच्या कामकाजाच्या दिवशी मंडळाच्या मुख्य लेखाधिका-यांच्या मार्फत वित्त नियंत्रक, म्हाडा यांना हस्तांतरीत करावयाच्या होत्या. व्याजाचे नुकसान टाळण्यासाठी वित्त नियंत्रक, म्हाडा यांनी सर्व नियोजित खर्च भागविल्यावर राहिलेली अतिरिक्त रक्कम मुदत ठेवींमध्ये गुंतवणे आवश्यक होते.

**४.४** मंडळाच्या मालमत्ता व्यवस्थापकांकडील बँक विवरणे आणि मासिक लेख्यांच्या लेखापरीक्षेत आढळून आले की, दि. ९ ऑगस्ट, २०११ व दि. ३ जानेवारी, २०१२ पासून बँक ऑफ महाराष्ट्र मधील दोन चालू खात्यात रु. ५.८४ कोटीची रक्कम जरी पडून होती तरी ती दोन वर्षापेक्षा अधिक विलंबाने दि. ३१ जानेवारी, २०१४ रोजी वित्त नियंत्रक, म्हाडा यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आली होती. परिणामी रु. १.२१ कोटी व्याजाचे नुकसान झाले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नोंदविलेले आहेत.

**४.५** याबाबत समितीने विलंबाच्या कालावधीबाबत विभागीय प्रतिनिधींना विचारणा केली असता सन २०११ मध्ये केंद्रीकृत (centralised) खाते मुख्य लेखापालांच्या नावाने उघडण्याचा निर्णय म्हाडाने घेतला. त्यामुळे ही रक्कम म्हाडाच्या खात्यामध्ये भरणे आवश्यक होते. परंतु ती रक्कम सन २०१४ मध्ये हस्तांतरीत करण्यात आली. मंडळाचा महसूली खर्च याच निधीमधून करण्यात येत असल्यामुळे नेमकी किती रक्कम लागणार आहे हे अगोदरच निश्चित नसते. त्यामुळे हा निधी चालू खात्यात ठेवणे आवश्यक होते. यात कोणाचाही अन्यथा हेतू नव्हता असे विभागीय प्रतिनिधींनी समिती समोर सांगितले असता याबाबत समितीने आक्षेप नोंदवत हा निधी केवळ १ वर्षासाठी नव्हेतर ३-३ वर्षे हस्तांतरीत न करणे हा केवळ हलगर्जीपणाच आहे. याचे कोणतेही समर्थन विभाग करु शकत नाही असे समितीने नमूद केले असता झालेली चूक विभागीय प्रतिनिधींनी समिती समोर मान्य केली व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याच्या सूचना दिल्याचे समिती समोर सांगण्यात आले. यासंदर्भात संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेवर कारवाई करुन १ महिन्याच्या आत समितीला माहिती सादर करण्याचे समितीने निर्देशित केले असतानाही सदरहू आश्वासित माहिती समितीस अद्यापही अप्राप्त आहे ही गंभीर बाब आहे.

**शिफारस**

४.६ **बँकामध्ये चालू खात्यात भाडे व सेवाशुल्काची रु. ५.८४ कोटी रक्कम २ वर्षापेक्षा अधिक काळ विनावापर पडून राहिल्याने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाला रु. १.२१ कोटी व्याजाचे नुकसान झाले. म्हाडाने माहे ऑगस्ट, १९८० मध्ये जारी केलेल्या परिपत्रकानुसार चालू खात्यातील भाडे व सेवाशुल्कासह सर्व जमा रकमा मुख्यलेखाधिका-यामार्फत वित्त नियंत्रक, म्हाडा यांना हस्तांतरीत करणे आवश्यक होते. व्याजाचे नुकसान टाळण्यासाठी वित्त नियंत्रकाने सर्व नियोजित खर्च भागविल्यानंतर राहिलेली अतिरिक्त रक्कम मुदत ठेवीमध्ये गुंतवणे बंधनकारक असताना त्याचे पालन करण्यात आले नाही व ही रक्कम २ वर्षापेक्षा अधिक विलंबाने वित्त नियंत्रकाकडे हस्तांतरीत केल्यामुळे व्याजाचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले. सदरहू प्रकरणी नुकसान झालेल्या व्याजाची रक्कम ही तब्बल रु. १.२१ कोटी इतकी आहे. माहे एप्रिल, २०११ मध्ये मंडळाची पुनर्रचना झाल्यानंतर सर्व चालू खाते बंद करणे आवश्यक होते परंतु तसे होवू शकले नाही. तसेच भाडे व सेवाशुल्काच्या माध्यमातून मंडळाला प्राप्त होणारी महसूली जमा गुंतविली जात नाही तर तिचा वापर महसूल खर्च जसे की, पाणी शुल्क, मालमत्ता आकार, विद्युत शुल्क इ. भागविण्यासाठी केला जातो म्हणून या प्रकरणात व्याजाचे नुकसान झाले नाही हे विभागीय प्रतिनिधींचे म्हणणे कदापि स्विकारार्ह नाही. आर्थिक वर्षातील नियोजित खर्च भागविल्यानंतर शिल्लक राहिलेली रक्कम दोन-**

दोन वर्षे वित्त नियंत्रक, म्हाडा यांच्याकडे हस्तांतरीत न करण्याचे कोणतेही समर्थन विभाग करु शकत नाही. प्रत्येक वर्षात भाडे किंवा सेवा शुल्काची वसुली सातत्याने होतच असते. म्हणून चालु वर्षात नियोजीत खर्चासाठी ह्या रकमेची आवश्यकता समर्थनीय नाही. प्रलंबित शिल्लक रकमेवर मिळणा-या व्याजामुळे म्हाडाला फायदाच होणार असल्यामुळे विभागाने त्यांचे आर्थिक हित जपणे आवश्यकच आहे. महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात गणना केलेल्या व्याजाच्या नुकसानीची रक्कम ही तब्बल रु.१.२१ कोटी असताना सदरहू रक्कम पाहता विभागाने हे प्रकरण शासनाच्या हिताच्यादृष्टीने अधिक गांभीर्याने हाताळणे आवश्यक होते. परंतु विभाग हे करु शकला नाही ही वस्तुस्थिती आहे. विभागीय प्रतिनिधींनी चूक झालेली असल्याचे समितीसमोर मान्य केले व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन १ महिन्याच्या आत कारवाई करणेबाबत समितीस आश्वासित केले असताना अद्यापही केलेल्या कारवाई बाबतची आश्वासित माहिती समितीस अप्राप्त आहे, ही बाब देखील गंभीर आहे. म्हाडाच्याच आदेशाचे पालन न करता ही रक्कम अमर्याद कालावधीकरिता चालू खात्यात ठेवल्यामुळे झालेल्या व्याजाच्या नुकसानीबाबत विभागाने तातडीने जबाबदारी निश्चित करुन संबंधितांवर कारवाई करावी व व्याजाच्या नुकसानीची आक्षेपित रक्कम सर्व संबंधित दोषी अधिका-यांकडून वसूल करावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस २ महिन्यात देण्यात यावी व त्याचप्रमाणे समितीला आश्वासित करुनही विहित मुदतीत ही माहिती समितीस न देणा-या अधिका-यांवर कारवाई करुन २ महिन्याच्या आत समितीला कळविण्यात यावे व भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळून विभागाने स्वतःचे आर्थिक हित जपले पाहिजे अशी समितीची शिफारस आहे.

# परिशिष्ट - अ

**विवरणपत्र क्र. - १**

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-१६ या वर्षातील सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्रमांक: ३.१०- "ई-विद्या प्रकल्पावरील निष्फळ खर्च" यासंदर्भात दि. १५.०२.२०१८ रोजीची अपूर्ण राहीलेल्या साक्षी संदर्भातील सविस्तर अहवाल.

---

- जिल्हा नियोजन विकास समिती गडचिरोली यांनी जिल्हा योजनेंतर्गत ई-विद्या प्रकल्पाची सुरुवात करुन त्यामध्ये विडिओ कॉन्फरन्सिंग सेंटर उभारुन वर्च्युअल (Virtual) वर्ग घेऊन गडचिरोली जिल्हयाच्या १२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या (ITIs) विद्यार्थ्यांना व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण देण्याचे ठरविले. सदर प्रकल्पाचा उपयोग विद्यार्थ्यांना विविध स्पर्धात्मक परीक्षेसाठी आणि त्यांचे संगणकीय कौशल्य (Soft Skills) व रोजगाराभिमुख कौशल्य विकसित करण्यासाठी तसेच प्रशिक्षण देण्यासाठी सुध्दा करावयाचा होता. सदर प्रकल्प राबविण्यासाठी एकूण प्रकल्प किंमत रु.४८.०० लाख अशी ठरविण्यात आली होती. तसेच देखभाल व दुरुस्तीचा खर्च प्रतिमाह १२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थासाठी रु. ३.४५ लाख प्रतिमाह असा ठरविण्यात आला होता.

- गडचिरोली जिल्हा योजनेंतर्गत ई-विद्या प्रकल्पाची सुरुवात करुन गडचिरोली जिल्हयातील १२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये विडिओ कॉन्फरन्सिंग सेंटर उभारण्या संदर्भात जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी १८ मार्च, २०१० मध्ये निविदा मागविल्या होत्या.

- जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत त्यांचे दिनांक ०६ ऑक्टोबर २०१० रोजीच्या आदेशान्वये, इवरॉन एज्युकेशन लिमिटेड, इवरॉन हाऊस, प्लॉट ९६-९९, इंडस्ट्रीयल इस्टेट, पेरुनगुडी, चेन्नई - ६०००९६ या अभिकरणास ३ वर्षाच्या कालावधीसाठी गडचिरोली जिल्हयातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था, गडचिरोली येथे Video Conferencing Centres व ११ तालुकास्तरावरील औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये Virtual Classroom उभारण्यासाठी एकुण १२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थासाठी कार्यादेश देण्यात आलेले होते.

- सदर ई-विद्या प्रकल्पास जिल्हा नियोजन विकास समिती, गडचिरोली यांचे, दिनांक.१४.१०.२०१० ,दि.३०.११.२०११ व १९.३.२०१२ नुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली होती.

- सदर योजनेस तांत्रिक मान्यता देण्याचा प्रस्ताव जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, गडचिरोली यांचेकडून दिनांक २७.१०.२०१० व दिनांक २४.१.२०११ अन्वये तांत्रिक मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयास प्राप्त झाला होता. तथापी, संचालनालयाने दिनांक ३०/११/२०१० च्या पत्रान्वये, दररोज ३ तास सेटेलाईट सेवेमार्फत प्रक्षेपणासाठी नियोजन अप्राप्त असल्याने व योग्य नियोजन न झाल्यास सदर रु.९१.४० लक्ष रक्कम वाया जाणार असल्याने, सदर प्रस्तावावर संचालनालयाच्या मान्यतेशिवाय कार्यवाही करण्यात येवू नये, असे कळविले होते. सदर पत्राची प्रत जिल्हाधिकारी, गडचिरोली व सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांना पाठविण्यात आलेली होती. तथापि, सदर वस्तुस्थितीचा विचार न करता संचालनालयाची तांत्रिक

मान्यता नसतांनाही जिल्हा नियोजन विकास समिती, गडचिरोली यांनी ई - क्लास रुम प्रकल्पासाठी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

- जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी निर्गमित केलेल्या कार्यादेशाच्या अनुषगाने दिनांक १९.१.२०११ रोजी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, गडचिरोली यांनी पुरवठादार इवरॉन एज्युकेशन लिमिटेड, इवरॉन हाऊस,प्लॉट ९६-९९, इंडस्ट्रीयल इस्टेट, पेरुनगुडी, चेन्नई - ६०००९६ यांच्या सोबत करार केलेला आहे. सदर करारामध्ये पुरवठादारांकडुन कार्याची पूर्तता करण्यास बाध्य करता येईल , असे दंडात्मक कलम अंतर्भुत केलेले नसून इतर आवश्यक असणा-या अटी व शर्तीचाही अंतर्भाव करण्यात न आल्याचे दिसून येत आहे. वास्तविक जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांनी या संदर्भातील कार्यादेश दिलेले असल्याने, नियमाप्रमाणे जिल्हाधिकारी व पुरवठादार यांच्यामध्ये जिल्हाधिकारी स्तरावर करार होणे आवश्यक असतांना, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, गडचिरोली यांनी करारनामा केलेला आहे. सदर करारनाम्यामध्ये नियमाप्रमाणे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, गडचिरोली व पुरवठादार यांच्यामध्ये अटी व शर्ती प्रमाणे करार होणे आवश्यक होते, ज्यामध्ये पुरवठादाराकडून कार्याची पुर्तता वेळेत पुर्ण करणे, प्रकल्प अर्धवट सोडून गेल्यास दंडात्मक कार्यवाही करणे, प्रकल्पाची अमंलबजावणी, कायदेशीर कार्यवाही इत्यादी दंडात्मक कलमांचा समावेश करणे आवश्यक होते तथापि, तसे दंडात्मक कलम व त्यानुसार पुरवठादारास बाध्य करता येईल अशा कलमांचा समावेश दि.१९.१.२०११ मधील करारनाम्यात करण्यात आला नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे कायदेशीर कार्यवाही करता आलेली नाही.

- जिल्हाधिकारी कार्यालयाने काढलेल्या निविदेच्या अनुषंगाने निवडलेल्या अभिकरणाच्या ई-विद्या प्रकल्पावर सन २०१०-११ मध्ये रु.९१,३९,६६५/- रक्कम आहरित करुन त्यापैकी
  (१) यंत्रसामुग्री साठी प्रती संस्था रु.४,००,००० प्रमाणे १२ संस्थांचे रु.४८,००,०००/-
  (२) ८७ Single Chair with pad साठी रु.१,९६,३५०/-
  (३) पुरवठादारास प्रति महिना रु.३,४५,०००/- प्रमाणे १२ महिन्याचे मानधन रु.४१,४०,०००/- असे एकूण रु.९१,३६,३५०/- खर्च झालेला आहे. तसेच, उर्वरित रक्कम रु.३,३१५/- चलन क्रमांक १७८, दिनांक १४/२/२०१२ अन्वये शासन जमा केलेली आहे.

- सन २०११-१२ मध्ये रु.४१,२०,०००/- रक्कम आहरित केलेली आहे. त्यापैकी पुरवठादारास प्रति महिना रु.३,४५,०००/- प्रमाणे माहे एप्रिल, २०१२ ते २६ ऑगस्ट, २०१२ पर्यंतचे मानधन रु.१६,६९,३५५ रक्कम अदा करण्यात आली असून, उर्वरित रु.२४,५०,६४५/- चलन क्रमांक १४१, दिनांक ३१/३/२०१३ अन्वये शासन जमा केली आहे.

- उपरोक्त प्रमाणे सन २०१०-११ मध्ये रु ८९,४०,०००/- व सन २०११-१२ मध्ये १६,६९,३५५/- असे एकुण रु १,०६,०९,३५५/- रक्कम पुरवठादारास अदा करण्यात आलेली आहे.

- पुरवठादाराने एप्रिल, २०११ पासून प्रशिक्षण सुरु करुन ते २६ ऑगस्ट, २०१२ पर्यंत सुरु होते. तद्नंतर ई-विद्या स्टुडीओमधील नेटवर्क बंद झाल्यामुळे सदर अभिकरणाने प्रशिक्षण देणे बंद

केले. यावाबत कंपनीने BSNLव्यतिरिक्त रिलायंन्स कंपनीचे टॉवर उभारले होते. परंतु पर्याप्त कनेटीव्हीटी मिळू न शकल्यामुळे प्रशिक्षण बंद झाले.

- प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, गडचिरोली यांचे दिनांक ३०.१०.२०१३ च्या पत्रानुसार इवरॉन एज्युकेशन लिमिटेड, चेन्नई यांना ई-विद्या अंतर्गत प्रशिक्षण बंद असल्यामुळे व ऑगस्ट २०१३ पासून नियमित सत्र सुरु झाल्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांना वसतिगृहामध्ये प्रवेश द्यावयाचा असल्यामुळे रुमचा तावा तात्काळ देण्यावावत कळविण्यांत आले होते. त्यानुषंगाने इवरॉन एज्युकेशन एज्युकेशन लिमिटेड, चेन्नई यांनी त्यांचे दिनांक १६ डिसेंबर, २०१३ च्या पत्रान्वये जागा खाली केल्यावावत प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांना कळविले आहे. त्याप्रमाणे प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, गडचिरोली यांचे दिनांक २०/१२/२०१३ च्या पत्रानुसार इवरॉन एज्युकेशन लिमिटेड, चेन्नई यांनी मुलांच्या वसतीगृहातील स्थापीत केलेल्या ई-विद्या स्टूडीओचे संपूर्ण साहीत्य इतरत्र घेवून गेल्याचे कळविले आहे. सदर साहित्य हे कंपनीचे होते. यावावत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, गडचिरोली यांनी दिनांक ४/१/२०१४ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांना कंपनीने साहीत्य नेल्यावावत कळविले होते. तथापि, यावावत प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, गडचिरोली किंवा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, गडचिरोली यांनी संचालनालयास अवगत केलेले नाही.

- ई-विद्या प्रकल्पांतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत एप्रिल, २०११ ते ऑगस्ट,२०१२ पर्यंत एकूण १७ माहिन्यात ड्राईंग,थेअरी व मॅथ्स या विषयात एकूण १०३०२ प्रशिक्षणार्थ्यांपैकी ७३१२ प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करुन दिलेल्या असून व्हर्चुअल क्लासरुमचे सर्व साधनसामुग्रीचा वापर प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रशिक्षणाकरिता करण्यात येत असल्याचे सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांच्या दि. ७.०४.२०१६ च्या अहवालात नमूद केलेले आहे.

- सदर ई विद्या प्रकल्पावावतची वस्तुस्थिती व घटनाक्रमांचा विचार करता सदर प्रकरणी खालील वावी स्पष्ट होतात:-

अ. जिल्हाधिकारी, गडचिरोली कार्यालयामार्फत निविदा प्रक्रीयेची कार्यवाही दिनांक १८.०३.२०१० रोजी करुन इवरॉन एज्युकेशन लिमिटेड, इवरॉन हाऊस,प्लॉट ९६-९९, इंडस्ट्रीयल इस्टेट, पेरुनगुडी, चेन्नई - ६०००९६ या अभिकरणास ३ वर्षाच्या कालावधीसाठी गडचिरोली जिल्हयातील औ.प्र.संस्था, गडचिरोली येथे Video Conferencing Centres व ११ तालुकास्तरावरील औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये Virtual Classroom उभारण्यासाठी एकूण १२ औ.प्र.संस्थासाठी दिनांक ०६.१०.२०१० रोजी कार्यादेश देण्यात आलेले होते.

ब. तद्नंतर सदर प्रकल्पाला व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाची तांत्रिक मान्यता नसतांना जिल्हा नियोजन विकास समिती, गडचिरोली यांनी सदर

प्रकल्पास दिनांक १४.१०.२०१०, दिनांक ३०.११.२०११ व दिनांक १९.०३.२०१२ अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

क. जिल्हाधिकारी व पुरवठादार यांच्यामध्ये नियमाप्रमाणे करार होणे आवश्यक असतांना, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, गडचिरोली यांनी करारनामा केला आहे. सदर करारनाम्यामध्ये पुरवठादारांकडुन कार्याची पुर्तता करण्यास बाध्य करता येईल, असे दंडात्मक कलम अंतभुर्त केलेले नसून इतर आवश्यक असणा-या अटी व शर्तीचीही अंतर्भाव करण्यात न आल्यामुळे पुरवठादाराकडुन कोणत्याही प्रकाराची दंडात्मक रक्कम वसुल करता आलेली नसून संबधित कार्यालयास कायदेशीर कार्यवाही करता आलेली नाही. सदर करारनामा करणारे तत्कालीन जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी हे दिवंगत झालेले आहेत.

ड. गडचिरोली जिल्हयातील धानोरा व कुरखेडा तालुक्यातील निश्चित केलेल्या शाळामध्ये ई-विद्या प्रकल्प राबविण्यासाठी झालेल्या ऍवरॉन एज्युकेशन लिमिटेड, चेन्नई व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा मानव विकास समिती व प्रकल्प संचालक तथा सदस्य सचिव, जिल्हा मानव विकास समिती, गडचिरोली यांच्या दिनांक २५.०१.२०१० मधील करारात कार्यसिध्दी व कार्यपूर्तता करण्यास बाध्य होईल असे दंडात्मक कलम लावण्यात आलेले आहे. तथापि, सदर करार हा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेशी संबंधीत नसून गडचिरोली जिल्हातील धानोरा व कुरखेडा तालुक्यातील निश्चित केलेल्या शाळांमध्ये ICT संबंधीत सेवा पुरविण्यासाठी करण्यात आलेला आहे.

इ. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्या कार्यादेशाप्रमाणे व्हर्चुअल क्लास रुमची यंत्र सामुग्री व साधन सामुग्री संबंधीत संस्थेमध्ये पुरवठा करण्यात आलेला असून एप्रिल, २०११ ते ऑगस्ट,२०१२ पर्यंत १७ माहिन्यात ड्राईंग,थेअरी व मॅथ्स या विषयात एकूण ७३१२ प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करुन दिलेले आहे. सद्यस्थितीत व्हर्चुअल क्लासरुमचे सर्व साधनसामुग्री औ.प्र.संस्थामध्ये उपलब्ध असून त्यांचा वापर संबंधीत औ.प्र.संस्थेमध्ये प्रशिक्षणासाठी करण्यात येत आहे.

-----------XXX-----------

(सुजाता कुमार)
कार्यासन अधिकारी,
महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,
मंत्रालय, मुख्य इमारत, २ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मुंबई - ४०० ०३२.

ई विद्या प्रकल्पातील निष्फळ खर्च या संदर्भातील पत्र व्यवहाराच्या प्रती

| अ.क्र | दिनांक | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | ६.१०.२०१० व २३.४.२०१० | व्हीडीयो कॉन्फरन्स रुम उभारण्यासाठी मा.जिल्हाधिकारी गडचिरोली यांनी इवरॉन एज्युकेशन लिमिटेड, चेन्नई यांना दिलेले कार्यादेश व व्हीडीयो कॉन्फरन्स रुम सेंटर उभारण्यासाठीचा प्रस्ताव | १ ते २ |
| २ | २५.११.२०१० | गडचिरोली जिल्हयातील धानोरा व कुरखेडा तालुक्यातील शाळामध्ये ई विद्या राबविण्यासाठीचे शुध्दीपत्रक | १३ ते १४ |
| ३ | १४.१०.२०१०, ३०.११.२०११ व १९.३.२०१२ | जिल्हा नियोजन समिती गडचिरोली यांनी प्रशासकीय मान्यता दिलेल्या प्रती | १५ ते २२ |
| ४ | २७.१०.२०१० व २४.१.२०११ | जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, गडचिरोली यांचे पत्र | २३ ते २४ |
| ५ | ३०.११.२०१० | संचालकांनी ई विद्या प्रकल्प राबविण्यास तांत्रिक मान्यता नाकारल्याचे पत्र | २५ |
| ६ | १९.१.२०११ | जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, गडचिरोली व इवरॉन एज्युकेशन यांच्या सोबत झालेला करारनामा | २६ ते ३५ |
| ७ | ३१.३.२०१० | इवरॉन एज्युकेशन लिमिटेड, चेन्नई यांनी मा. जिल्हाधिकारी यांना व्हीडीयो कॉन्फरन्स सेंटर १२ औ.प्र.संस्थामध्ये सुरु करण्यासाठी सादर कलेले पत्र | ३६ ते ४२ |
| ८ | १३.९.२०१०, २७.१०.२०१० | ई क्लास रुम च्या प्रस्तावास तांत्रिक मान्यता मिळण्याबाबत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, गडचिरोली यांनी संचालनालयास सादर केलेले पत्र | ४३ ते ४४ |
| ९ | ६.१०.२०१० | जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी गडचिरोली यांनी इवरॉन चेन्नई ई विद्या चालु नसल्यामुळे दर महिन्याला देण्यात येणारी रक्कम देय होणार नाही याबाबतचा प्रस्ताव | ४५ |
| १० | १०.१.२०११ | ई क्लासरुम च्या प्रस्तावास संचालनालयाच्या मान्यते शिवाय पुढील कार्यवाही न करण्याबाबत सहसंचालक, प्रा.का.नागपूर यांचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांना सादर केलेले पत्र | ४६ |
| ११ | १४.२.२०१२ | उर्वरित रक्कम शासनास जमा केलेले चलन क्रमांक १७८ | ४७ |
| १२ | ३१.३.२०१३ | चलन क्रमांक १४१ शासनास जमा केलेली रक्कम | ४८ |
| १३ | २०.१२.२०१३ | ई विद्या स्टुडीयो मधील साहित्य इवरॉन एज्युकेशन लिमिटेड, चेन्नई यांनी घेवुन गेल्याचे प्राचार्य, गडचिरोली यांचे पत्र | ४९ |
| १४ | ३०.१०.२०१३ | व्ही सॅट रुम खाली करण्याबाबत व्यवस्थापक, इवरॉन एज्युकेशन लिमिटेड, गडचिरोली यांना सादर केलेले पत्र | ५० |
| १५ | १६.१२.२०१३ | इवरॉन एज्युकेशन लिमिटेड, चेन्नई यांनी ई स्टुडीयो खाली केल्याबाबत संस्था प्रमुखांना दिलेले पत्र | ५१ |
| १६ | ३.१.२०१४ | ई विद्या स्टुडीयो खाली केल्याबाबतचे जिल्हाधिकारी गडचिरोली यांचे पत्र | ५२ |
| १७ | ५.१२.२०१५ | नियोजन समिती गडचिरोली यांचे निधी वितरण आदेश दिनांक २४.३.२०११ अन्वये रु ९१.४० लाख कोषागार कार्यालयाकडुन देयक | ५३ |
| १८ | ००.४.२०१६ | खर्चाचा तपशिल | ५४ ते ५५ |
| १९ | ०७.४.२०१६ | प्रा.का.नागपूर यांनी ई विद्या प्रकल्पाच्या निष्फळ खर्चाबाबत महालेखापाल, नागपूर यांना सादर केलेले पत्र | ५६ ते ५९ |

Office of the Collector, Gadchiroli
No. [illegible] - 516
Dated: 17 [illegible] 2010
06 OCT 2010

To,

Everonn Education Limited,
Everonn house, Plot No. 96-99
Industrial estate, Perungudi,
Chennai- 600 096 (india)

Subject : Setting up of Video Conferencing Center's at ITI, Gadchiroli & other 11 Taluka ITI's

Reference: 1) Advertisement Publish on Dated 18.03.2010 & Last Date of submission of Tender – 31.03.2010
2) receipt of your Tender on Dated 31.03.2010.

*****

With Reference to above subject mentioned the tender are received for setting up of Video Conferencing Centers. The undersigned is pleased to place an order for setting up of Video Conferencing Center for ITI Gadchiroli & 11 Virtual classroom network in the Gadchiroli District of ITI's (Taluka Level)

This would be connect the network to the VSAT Teaching studio being setup in Gadchiroli ITI & would be virtual classroom in the 11 ITI's spread across Gadchiroli District. The First part would be setup implement, establish, connectivity and commission in the 11 virtual classroom and second part would be to provide programme management and operational service for a period of 3 years

**The following basis of Terms & Condition given below :**

1) Technical specification & Accessories Required for all 12 ITI's Center
   - A) VSAT Equipment – 01
   - B) Projector – 01
   - C) Desktop System/Laptop – 01
   - D) Backup UPS – 01
   - E) Audio-Video Equipment – 01
   - F) Webcam – 01
   - G) Microphone – 01
   - H) Electrical, Earth it & wiring at each of the Location.
2) Price

| Sr.No | Item Specification | Quantity/Center | Total Amount |
|---|---|---|---|
| 01 | Setting up Virtual Video Conferencing Center & 11 Virtual Classroom | 12 ITI's | 48.00 lakh |
| 02 | Maintenance Charge/per month | 12 ITI's | 3.45 lakh |

Note : After establishing the Centers and classroom all the programme management and periodical maintenance of centers would be run by agency. Hence the quoted rate for maintenance charge Rs. 3,45,000/- (Three lakh fourty five thousand only) per month is applicable, to Everonn Education Limited, Chennai as per the Agreement made between the parties.

... the ... of work order will be Rs. ...15,000/- in word ... three lakh fourty ... has to be signed by both parties on a judicial ... stamp paper of Rs. 100/

... Sale Tax/Vat ... inclusive of
... not applicable

Period of execution of work ... month from the date of ... work order

... The following centers in the district of Gadchiroli ... would be setup video ... conference ... along with virtual classroom.

| | | |
|---|---|---|
| | ... | Video Conferencing Center |
| 1. | ... Ghiroli | Virtual Class Room |
| 2. | ... | Virtual Class Room |
| 3. | ... heda | Virtual Class Room |
| 4. | ... | Virtual Class Room |
| 5. | ... | Virtual Class Room |
| 6. | ... | Virtual Class Room |
| 7. | ... | Virtual Class Room |
| 8. | ... | Virtual Class Room |
| 9. | ... | Virtual Class Room |
| 10. | ... palli | Virtual Class Room |
| 11. | ... | Virtual Class Room |
| 12. | ... | Virtual Class Room |

... of payment :

90% payment would be payable against the proof of ... and ... of work from the ... receipt certificate ... after ... month ... payment would be payable after successful demonstration of ... Application, Software and other Equipment ...

The details of Hardware, Application, Software ... Payment schedule ... as per the ... would be applicable as per the ...

The Receipt of work order should ... Acknowledge ...

Collector & Chairman
Dist. Human Development Council
Gadchiroli

... Information and ... Mission ...
... Maharashtra ...
... Gadchiroli

Collector & Chairman
Dist. Human Development Council
Gadchiroli

FINANCIAL PROPOSAL FOR SETTING VIDEO CONFERENCING CENTRES IN ITI'S.

Open before us on 23.6.2010

1) [signature]

2) [signature]

3) [signature]

To,
The District Collector & Che
DHDC
GADCHIROLI

From,
Everonn Education Limited
96-99, Perungudi Industrial Estate
Perungudi
.... 600096.

Note Sheet

for evaluation and starting of ICT enabled Education in Dhanora and Kurkheda under HDM

The EOI for Education Services through ICT support was submitted by three vendors as per the details given below:

| Everonn | | Ideal | | Ekta | Students in |
|---|---|---|---|---|---|
| | 15040 | 16965120 | 15040 | | Class 1-4 |
| | 9863 | 11125464 | 9863 | | Class 5-7 |
| | 7334 | 8272752 | 7334 | | Class 8-10 |
| 1321920 | 1836 | 2071008 | 1836 | 27540000 | Class 11-12 |
| 1296000 | 1800 | 2030400 | 1800 | 32400000 | Degree and Above |
| 699500 | | | 1399 | 8394000 | Teachers To be Trained |
| 26528060 | | 40464744 | | 91544640 | Total |
| 2.6528 crore | | 4.04647 crore | | 9.154464 crore | |
| | | | | | |
| | | | | | |

Everonn submitted a rate of Rs 60/- per child per month for regular school students and Rs 500/- per teacher annually and did not charge anything from the HDM for any other students.

Ideal charged Rs 94/- per child and Ekta proposed Rs 60/- per student in class 1-10, Rs 1250 per student per month in class 11-12, Rs 1500/- per child per month in class 11-12 and Rs 500 per teacher. Hence the final rates emerged as listed in the table above. Ideal also requested time to change their bid before the collector, which was not allowed considering that the rates of other bidders were already known to them.

Based on the above and considering that Everonn:

1. Is working in 15 states on similar education programmes through ICT
2. Is approximately training in approximately 5300 schools,

Ekta did not submit any technical proposal. The technical proposal of Ideal consisted of a Bill of Material for the Hardware to be deployed and there was not much coverage on the details of the solution for education in the remote areas.

Hence the proposal of Everonn was found much better than any other proposal technically. They also provided the details of the solution, including Hardware, software and manpower details, and training programme as listed below:-

Classes 1 to 4:

[redacted]

Subjects Covered: Primary Education Course Material, Audio Visual CDs, E-Library

Teaching Mechanism Planned: Audio Visual Lab with projection on large screen

Classes 5 to 7 and above:

[redacted]

Total Number of such schools- 154 Schools with 154 Computer Labs

Subjects Covered: Upper Primary Education Course, Basics of Computer with Practical, E-Library

Teaching Mechanism Planned: Computer Lab with furniture where 3 students would be seated on a PC during the Computer class. Minimum 2 sessions every week every student

Classes 8 to 12:

For all such Schools with classes 8 to 12

Total Number of such schools- 36 with 36 VSAT enabled AV labs & [redacted]

[redacted]

Subjects Covered: Upper Primary Education Course, Basics of Computer with Practical, E-Library, Vocational Training (optional to the interested students), MSCIT, Engineering, Medical, Gram Sevak Bharti etc.

Teaching Mechanism Planned: Computer Lab with furniture where 3 students would be seated on a PC during the Computer class. Minimum 2 sessions every week every student

[redacted]

Total Number of PC/ System terminal proposed: 600 as per the details below:

Dy CEO. 21/12/09

21.12.09

DPO, NIC

21/12/09

# Quantitative Summary of the Labs

| | |
|---|---|
| VSAT Teaching Room | 1 |
| Audio Visual Labs only for Primary I - IV | 52 |
| Audio Visual Labs for Middle V - VII | 36 |
| Audio Visual labs for Primary cum Middle schools I - VIII | 82 |
| Virtual Classrooms VIII - X | 36 |
| Computer Labs (2 sys) | 45 |
| Computer Labs (3 sys) | 38 |
| Computer Labs (4 sys) | 18 |
| Computer Labs (5 sys) | 21 |
| Computer Labs (6 sys) | 12 |
| Computer Labs (7 sys) | 13 |
| Computer Labs (8 sys) | 7 |

# Computer Lab

- One System Server with OS and Open Office
- Minimum One Computer Terminal extending up to seven depending upon the strength of the class
- Each Computer will have 1 Table with 3 Chairs
- Cable & wiring
- 1 UPS 1.5 KVA line interactive 1hr backup
- 1 Printer DMP 80 col

A.C.O. 21/12/09

21/12/09

# AV lab Infrastructure

- Desktop only CPU with KB, mouse & OS 1 set
- Audio equipment with elect. wiring 1 set
- Projector with Screen 1
- Content 1st to 7th
- 1.5 KVA UPS Line interactive 1 hr back up with 40AH battery
- Tables 1

# VSAT Classroom

- Audio Video equipment 1set
- VSAT equipment 1 Set
- Web Camera & hand held microphone 1 each
- Projectable Screen

# Highlights in Infrastructure

206 schools will be covered under this project as follows

1. 170 AV labs

   52 in Primary, 36 in Middle and 82 in Primary cum Middle schools

2. 36 VSAT enabled labs

3. 154 Computer labs

4. In computer labs LG model of 1 server with 1 terminal extending up to 7 nodes as per the strength of the school and class size

5. Total number of systems terminals will be 600

Man Power Deployment Details

# Highlights of Operation

1. One Project Manager with 6 coordinators (2 for 36 VSAT centres, 4 for 154 comp labs), 1 MIS and 1 Admin assistant
2. 154 Computer faculty (One per computer lab
3. 75 hrs of VSAT a month
4. Other courses for high school and higher secondary will be conducted before & after school hours through VSAT
5. One Studio Operator will be provided at the teaching centre for operations and administration of VSAT delivery
6. Two faculty will be provided by Everonn at the teaching centre for conducting out of curriculum courses
7. The courses pertaining to the regular curriculum will be conducted by the departments teaching staff. The identified staff will be trained by Everonn

21/12/09

21/12/09 21/12

21/12/09

21.12

# Financial Overview

Revenue from Government @ Rs. 60/- per student per month
Number of students covered

| | |
|---|---|
| Primary school | 11,660 students |
| Middle school | 9,863 students |
| High School | 7,334 students |
| Higher Secondary School | 1,836 students |

Total number of students covered under this project 30693

At the end of every quarter payment will be made as follows 30693 x 60 x 3
Rs. 55,24,740.00

| ४७ | वरील प्रस्तावास सूट देण्याबाबत विनंती (खरेदीच्या प्रस्तावास १५ फेब्रु. नंतर आलेल्या प्रस्तावास मंजुरी देऊ नये अशा सूचनेच्या संदर्भात) | | क.अ.(लॉट.) ३१.०३.२०१५<br>अ.स. (लॉट.) रजेवर<br>आयुक्त (लॉट.) रजेवर<br>सचिव (व्यय)-३१.०३.२०१५<br>(पृ./६५/टि.वि.) | | | |
| ४८ | नवी मुंबई येथील कार्यालयाच्या अंतर्गत कामकाज व फर्निचरबाबत | २२.०४.२०१५ व<br>२२.०४.२०१५<br>(पृ.२९१/प.वि.) | -- | -- | -- | -- |
| ४९ | नवी मुंबई येथील कार्यालयाच्या अंतर्गत कामकाज व फर्निचरबाबत सुप्रमा रु. ९६ लक्ष मान्यता व काम करण्याबाबत सूचना | | | | २८.०४.२०१५<br>(पृ.२९३/प.वि.) | |

| क्र. | विषय | प्रस्ताव पाठविल्याचा व प्राप्त झाल्याचा दिनांक | सादर केल्याचा दिनांक | अंतिम मान्यता | आदेश निर्गमित केल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ५० | नवी मुंबई येथील कार्यालयाच्या अंतर्गत कामकाज व फर्निचरबाबत सुप्रमा रु. ९६ लक्ष | | क.अ.(लॉट.) २९.०४.२०१५<br>अ.स. (लॉट.) २९.०४.२०१५<br>आयुक्त (लॉट.) रजेवर<br>उ.स.(लॉट.) २९.०४.२०१५<br>उ.स.(व्यय-४) २९.०४.२०१५<br>(पृ ६७-६९/टि.वि.) | | | |
| ५१ | नवी मुंबई येथील कार्यालयाच्या अंतर्गत कामकाज व फर्निचरबाबत सुप्रमा रु. ९६ लक्ष | | क.अ.(व्यय-४)-०५.०५.२०१५<br>अ.स.(व्यय)- ११.०५.२०१५<br>उ.स. (व्यय)-१९.०५.२०१५<br>उ.स. (लॉट.)-२०.०५.२०१५<br>(पृ. ६७-७०/टि.वि.) | (पृ. ७०/टि.वि.) | | |
| ५२ | नवी मुंबई येथील कार्यालयाच्या अंतर्गत कामकाज व फर्निचरबाबत सुप्रमा रु. ९६ लक्ष | | क.अ.(लॉट.) २६.०५.२०१५<br>अ.स. (लॉट.) रजेवर<br>आयुक्त (लॉट.) २६.०५.२०१५<br>सचिव(बांधकामे)<br>२८.०५.२०१५<br>(७१ ते ७३/टि.वि.) | | | |
| ५३ | नवी मुंबई येथील कार्यालयाच्या अंतर्गत कामकाज व फर्निचरबाबत सुप्रमा रु. ९६ लक्ष | | क.अ.(साबांवि)-२८.०५.२०१५<br>अ.स.-(साबांवि) २९.०५.२०१५<br>उ.स.(साबांवि)- ०१.०६.२०१५<br>सचिव (बांधकामे)-<br>०२.०६.२०१५<br>प्र.स.(व्यय)-०६.०६.२०१५<br>(पृ. ७५ ते ७६/टि.वि.) | | | |

| क्र. | विषय | प्रस्ताव पाठविल्याचा व प्राप्त झाल्याचा दिनांक | सादर केल्याचा दिनांक | अंतिम मान्यता | आदेश निर्गमित केल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ५४ | नवी मुंबई येथील कार्यालयाच्या अंतर्गत कामकाज व फर्निचरबाबत सुप्रमा रु. ९६ लक्ष | | क.अ.(लॉट.) ०६.०६.२०१५<br>उ.स. (लॉ.)०८.०६.२०१५<br>क.अ.(व्यय-४) ०८.०६.२०१५<br>(पृ. ७७ /टि.वि.) | | | |
| ५५ | नवी मुंबई येथील कार्यालयाच्या अंतर्गत कामकाज व फर्निचरबाबत सुप्रमा रु. ९६ लक्ष | | क.अ.(व्यय-४)-०८.०६.२०१५<br>अ.स.(व्यय)- ११.०६.२०१५<br>उ.स. (व्यय)-१५.०६.२०१५<br>प्र.स.(विसु)-२५.०६.२०१५<br>(७९ ते ८३/टि.वि.) | | | |
| ५६ | नवी मुंबई येथील कार्यालयाच्या अंतर्गत कामकाज व फर्निचरबाबत सुप्रमा रु. ९६ लक्ष (पुन्हा सादर) | | उ.स.(व्यय-४)-२९.०६.२०१५<br>प्र.स.(विसु)-२९.०६.२०१५<br>(पृ. ८३-८४/टि.वि.) | | | |
| ५७ | लॉटरी कार्यालयासाठी नवीन जागेसाठी साप्रवि कडे मागणी (व्यय-४) | | क.अ.(व्यय-४)- ०२.०७.२०१५<br>अ.स.(व्यय)- .०२.०७.२०१५<br>उ.स. (व्यय)-.०२.०७.२०१५<br>प्र.स. (व्यय)-०४.०७.२०१५<br>(पृ. ८५/टि.वि.) | | | |
| ५८ | लॉटरी कार्यालयासाठी नवीन जागेसाठी साप्रवि कडे मागणी (व्यय-४) | | क.अ.(साप्रवि)- १४.०७.२०१५<br>अ.स.(साप्रवि)- १६.०७.२०१५<br>उ.स. (साप्रवि)-१७.०७.२०१५<br>अ.मु.स.(साप्रवि)१७.०७.२०१५<br>प्र.स. (व्यय)-२२.०७.२०१५<br>(चर्चा) MTNL व नवी मुंबई अहवाल मागविणे<br>(पृ. ८७/टि.वि.) | | | |

| क्र. | विषय | प्रस्ताव पाठविल्याचा व प्राप्त झाल्याचा दिनांक | सादर केल्याचा दिनांक | अंतिम मान्यता | आदेश निर्गमित केल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ५९ | लॉटरी कार्यालयासाठी नवीन जागेसाठी साप्रवि कडे मागणी (व्यय-४) मसुदा सादर-- | | क.अ.(लॉट.) २८.०७.२०१५<br>अ.स. (लॉट.) २९.०७.२०१५<br>(पृ. ८९/टि.वि.) | | २९.०७.२०१५<br>(पृ.३०५/प.वि.) | |
| ६० | लॉटरी कार्यालयासाठी नवीन जागेसाठी साप्रवि कडे मागणी (व्यय-४) सादर | | सहायक.(लॉट.) ०७.१०.२०१५<br>क.अ.-रजेवर<br>अ.स. (लॉट.) ०७.१०.२०१५<br>(पृ. ९१/टि.वि.) | | ०७.१०.२०१५<br>(पृ. ३०९/प.वि.) | |
| ६१ | वाशी येथे भाड्याने घेतलेल्या जागेत अंतर्गत सजावटीबाबत बैठक प्र.स.व्यय-दालन | | सहायक.(लॉट.) ०६.११.२०१५<br>क.अ. (लॉट.) ०६.११.२०१५<br>अ.स. (लॉट.) ०६.११.२०१५<br>(पृ. ९५/टि.वि.) | | ०६.११.२०१५<br>(पृ. ३२३/प.वि.) | |
| ६२ | वाशी येथे भाड्याने घेतलेल्या जागेत अंतर्गत सजावटीबाबत बैठक प्र.स.व्यय-दालन (कार्यवृत्त) | | सहायक.(लॉट.) ०९.११.२०१५<br>क.अ. (लॉट.) ०९.११.२०१५<br>आयुक्त(लॉटरी)०९.११.२०१५<br>(पृ. ९७/टि.वि.) | | ०९.११.२०१५<br>(पृ. ३२७/प.वि.) | |
| ६३ | वाशी येथील कार्यालय नवीन जागेत सुरु करण्याबाबत पत्राचा मसुदा | | सहायक.(लॉट.) ११.१२.२०१५<br>क.अ. (लॉट.) ११.१२.२०१५<br>अ.स. (लॉट.) ११.१२.२०१५<br>आयुक्त(लॉट.) ०१.०१.२०१६<br>(पृ. ९९/टि.वि.) after issue | | ११.१२.२०१५<br>(पृ. ३४१/प.वि.) | |
| ६४ | महाराष्ट्र लघुद्योग विकास महामंडळ (MSSIDC) कडून वाशी, नवी मुंबई येथे मे. व्यंकटेश यांच्याकडून भाड्याने घेतलेल्या जागेचे काम पूर्ण करुन जागेचा ताबा आयुक्त कार्यालयास दिला. | दि. २८.०१.२०१६ | | | | |
| ६५ | वाशी येथील जागेचा ताबा घेण्याबाबत | | सहायक.(लॉट.) १०.०२.२०१६<br>क.अ. (लॉट.) १०.०२.२०१६<br>अ.स. (लॉट.) १०.०२.२०१६<br>आयुक्त(लॉट.) १०.०२.२०१६<br>(पृ. १०१-१०२/टि.वि.) | | ११.०२.२०१६<br>(पृ.३६१/प.वि.) | |

| क्र. | विषय | प्रस्ताव पाठविल्याचा व प्राप्त झाल्याचा दिनांक | सादर केल्याचा दिनांक | अंतिम मान्यता | आदेश निर्गमित केल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ६६ | मे. व्यंकटेश एंटरप्रायजेस यांच्याकडून भाड्याने घेतलेल्या वाशी नवी मुंबई येथील जागेत उपसंचालक (वि. व ले.) यांचे कार्यालय स्थलांतरीत करण्यात आले. | दि. २६.०२.२०१६ | | | | |
| ६७ | वाशी येथील जागेचा ताबा घेतल्याबाबत | २९.०२.२०१६ व ०८.०३.२०१६ | सहायक.(लॉट.) २८.०९.२०१६<br>क.अ. (लॉट.) २८.०९.२०१६<br>(पृ. १०५-१०६/टि.वि.) | | | |
| ६८ | वाशी येथील जागेच्या अंतर्गत सजावटीच्या अतिरिक्त खर्चाबाबत मान्यता (रु. ३३७६५६०/- (MSSIDC कडून खुलासा) | | सहायक.(लॉट.) ०५.१०.२०१६<br>क.अ. (लॉट.) ०५.१०.२०१६<br>अ.स. (लॉट.) ०५.१०.२०१६<br>आयुक्त(लॉट.) ०६.१०.२०१६<br>(पृ. १०७-११०/टि.वि.) | | ०६.१०.२०१६<br>(पृ.४९७/प.वि.) | |

कक्ष अधिकारी तथा राज्य लॉटरी अधिकारी :
महाराष्ट्र राज्य लॉटरी, वित्त विभाग, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२.

## विवरणपत्र क्र. ३

महाराष्ट्र शासन कार्यनियमावली

सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ जून १९७५

भारताचे संविधान.

क्रमांक आरओबी. १०७५-आ.ओ.एम.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १६६, खंड (२) आणि (३) द्वारा [illegible] अधिकारांचा वापर करून व या बाबतीत पूर्वी करण्यात आलेल्या सर्व नियमांचे अधिक्रमण करून महाराष्ट्राचे राज्यपाल खालील नियम तयार करीत आहेत :

१. (अ) या नियमांना महाराष्ट्र शासन कार्यनियमावली असे म्हणता येईल.

(ब) ते १ जुलै १९७५ पासून अंमलात येतील.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "अनुच्छेद" म्हणजे भारताच्या संविधानाचा अनुच्छेद असा आहे.

(ब) "परिषद" म्हणजे अनुच्छेद १६३ अन्वये [illegible] मंत्रिपरिषद असा आहे [illegible]

(क) "अनुसूची" म्हणजे या नियमांना जोडलेली अनुसूची असा आहे.

३. [illegible] १८९७ चा [illegible] [illegible] लागू [illegible] तो या नियमांच्या अर्थ विवरणाच्या बाबतीत लागू होईल.

४. पहिल्या अनुसूचीत निर्दिष्ट केलेल्या [illegible] शासनाचे कामकाज चालविले पाहिजे आणि [illegible] त्या विभागात त्याचे वर्गीकरण व वितरण करण्यात येईल.

५. राज्यपाल, मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्यानुसार प्रत्येक मंत्र्याकडे एक किंवा अधिक विभाग नेमून देईल [illegible] परंतु, या नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे [illegible] अधिक मंत्र्यांकडे नेमून देण्यास प्रतिबंध केला जाणार नाही.

६. मुख्यमंत्र्याच्या [illegible] [illegible] विभागाशी अथवा [illegible] राज्यमंत्र्यांकडे किंवा उप-मंत्र्यांकडे नेमून देता येईल.

६-अ. [illegible] [illegible] [illegible] आपली सर्व किंवा कोणतीही [illegible] [illegible] त्यांचे [illegible] मुख्यमंत्री [illegible] निदेश देता येईल.

७. मंत्रालयाच्या प्रत्येक विभागात [illegible] सचिव असेल [illegible] विभागाच्या [illegible] हाताखाली राज्य शासन [illegible] अधिकारी व कर्मचारी असतील. परंतु,—

(अ) एकापेक्षा अधिक विभागांचा कार्यभार एकाच सचिवाकडे सोपविता येईल.

(ब) एखाद्या [illegible] दोन किंवा अधिक सचिवांमध्ये विभागून देता येईल.

८. मंत्रिपरिषद [illegible] [illegible] [illegible] [illegible] दिलेला असो किंवा परिषदेच्या बैठकीतील [illegible] दिलेला असो किंवा अन्य कोणत्याही प्रकारे दिलेला असो.

९. दुसऱ्या अनुसूचीत निर्दिष्ट केलेली सर्व प्रकरणे,—

(एक) अनुच्छेद १६७, खंड (क) अन्वये राज्यपालांच्या निदेशानुसार,

(दोन) (अ) मुख्यमंत्री किंवा,

(ब) मुख्यमंत्र्यांच्या [illegible] [illegible] मंत्रिपरिषदेपुढे आणली जातील. परंतु, [illegible] [illegible] [illegible] मुख्यमंत्र्यांच्या निदेशानुसार [illegible] [illegible] [illegible] नाही.

१०. (१) नियम-८ [illegible] [illegible] [illegible] निकालात काढण्यास प्रामुख्याने जबाबदार राहील.

(२) [illegible] [illegible] मंत्री, प्रत्येक राज्यमंत्री, [illegible] पाठविले पाहिजे.

२८ [illegible]

[illegible] करण्यास [illegible] अहेत, किंवा

[illegible]

[illegible] अनुसार, वित्त विभागाने [illegible]

[illegible] नाही.

[illegible] विभागाने [illegible]

[illegible] प्रशासकीय विभाग [illegible]

[illegible] असल्याचे दिसून आले आहे, असा [illegible]

[illegible] राज्यपालांच्या नावाने [illegible]

[illegible] आदेशाचे [illegible]

[illegible] पाहिजे.

[illegible]

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

[illegible], पी. साठे,

मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

# THE MAHARASHTRA GOVERNMENT RULES OF BUSINESS
## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Sachivalaya, Bombay 400 032, dated the 26th June 1975

**CONSTITUTION OF INDIA**

No. ROB-1075 / O. & M.—In exercise of the powers conferred by caluses (2) and (3) of Article 166 of the Constitution of India and in supersession of all previous rules made in this behalf, the Governor of Maharashtra is pleased to make the following rules namely :—

1. (a) These rules may be called the Maharashtra Government Rules of Business.
   (b) They shall come into force on the 1st day of July 1975.

2. In these rules, unless the context otherwise requires—
   (a) "Article" means an Article of the Constitution of India ;
   (b) "Council" means the council of Ministers constituted under Article 163 ; and
   (c) "Schedule" means a Schedule appended to these Rules.

3. The General Clauses Act, 1897 (10 of 1897) applies for the interpretation of these rules as it applies for the interpretation of a Central Act.

4. The Business of the Government shall be transacted in the Departments specified in the First Schedule and shall be classified and distributed between those Departments as laid down therein.

5. The Governor shall on the advice of the Chief Minister allot among the Ministers the business of the Government by assigning one or more Departments or part of Departments to the charge of a Minister :

Provided that, nothing in this rule shall prevent the assigning of one Department to the charge of more than one Minister.

6. The Chief Minister and a Minister in consultation with the Chief Minister may allot to a Minister of State or a Deputy Minister any business appertaining a Department or part of a Department.

6-A. When the Chief Minister is unable to discharge his functions owing to absence, illness, or for any other cause, the Chief Minister may direct any other Minister to discharge all or any of his functions during his absence. When any Minister is likewise unable to discharge his functions, the Chief Minister may direct any other Minister to discharge all or any of the functions of the Ministers during the Minister's absence.

7. Each Department of the Mantralaya shall consist of the Secretary to the Government, who shall be the official head of that Department and or such other officers and servants subordinate to him as the State Government may determine :

Provided that,—
   (a) more than one Department may be placed in charge of the same Secretary ;
   (b) the work of a Department may be divided between two or more Secretaries.

8. The Council shall be collectively responsible for all advice tendered to the Governor whether by an individual Minister on a matter appertaining his portfolio or as the result of discussion at a meeting of the Council or howsoever otherwise.

9. All cases referred to in the Second Schedule shall be brought before the Council—
   (i) by the direction of the Governor under clause (*c*) of Article 167 ;
   (ii) by the direction of—
      (a) the Chief Minister ; or
      (b) the Minister-in-charge of the case with the consent of the Chief Minister :

Provided that, no case in regard to which the Finance Department is required to be consulted under rule 11 shall, save in exceptional circumstances under the directions of the Chief Minister, be discussed by the Council unless the Finance Minister has had opportunity for its consideration.

10. (1) Without prejudice to the provisions of rule 8, the Minister-in-charge of a Department shall be primarily responsible for the disposal of the business appertaining that Department or part of the Department.

(2) Every Minister, every Minister of State, every Deputy Minister and every Secretary shall transmit to the Chief Minister all such information with respect to the business of the Government as the Chief Minister may from time to time require to be transmitted to him.

11. (1) No Department shall without previous consultation with the Finance Department authorise any order (other than orders pursuant to any general delegation made by the Finance Department) which—

(a) either immediately or by their repercussion, will affect the finance of the State, or which, in particular—

(i) involve any grant of land or assignment of revenue or concession, grant lease or licence of mineral or forest rights or a right to water power or any easement or privilege in respect of such concession ; or

(ii) in any way involve any relinquishment of revenue ;

(b) relate to the number or grading or cadre of post or the employments or other conditions of service or posts.

(2) No proposal which requires the previous consultation of the Finance Department under sub-rule (1) but in which the Finance Department has not concurred, may be proceeded with unless a decision to that effect has been taken by the Council.

(3) No appropriation shall be made by any Department other than the Finance Department, except in accordance with such general delegation as the Finance Department may have made.

(4) Except to the extent that power may have been delegated to the Departments under rules approved by the Finance Department, every order of an Administrative Department conveying a sanction to be enforced in audit shall be communicated to the audit authorities by the Finance Department.

(5) Nothing in this rule shall be construed as authorising any Department including the Finance Department, to make reappropriations from the grant specified in the Appropriation Act to another such grant.

12. All orders or instruments made or executed by on behalf of the Government of the State shall be expressed to be made by or by order of or executed in the name of the Governor.

13. Every order or instrument of the Government of the State shall be signed either by a Secretary, an Additional Secretary, a Joint Secretary, a Deputy Secretary, an Under Secretary or an Assistant Secretary or such other officer as may be specially empowered in that behalf and such signature shall be deemed to be proper authentication of such order or instrument.

14. The Secretary of the Department concerned is in each case responsible for the careful observance of these rules and when he considers that there has been any material departure from them, he shall personally bring the matter to the notice of the Minister-in-charge and the Chief Secretary.

15. These Rules may to such extent as necessary be supplemented by instructions to be issued by the Governor on the advice of the Chief Minister.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

D. D. SATHE,
Chief Secretary to Government.

[redacted]

गोपनीय

RIGHT TO INFORMATION

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय,लेखा व कोषागारे
नविन शासकिय कुटीर क्रमांक १५ व १६,प्लॉट क्रमांक १७६ फ्री प्रेस जर्नल मार्ग,मुंबई-४०० ०२१.
दुरध्वनी क्रमांक : ०२२-२२०२ २४७५ Website: www.mahakosh.in
फॅक्स क्रमांक : ०२२-२२०२५२७९ E-mail : dat@mahakosh.in

क्र.संलेवको/१५-१६/ स्वी.सहा./ लॉटरी३ / 1/2787 दिनांक : 17/5/2016

प्रति,

आयुक्त
अल्पबचत व राज्य लॉटरी,
वित्त विभाग,
७ वा मजला,नवीन प्रशासकीय भवन,
मुंबई-४०००३२.

विषय : उपसंचालक (वित्त व ले लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालय,एपीएमसी मार्केट, वाशी,नवी मुंबई येथील जागेत स्थलांतरीत होण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत.

संदर्भ : आपले पत्र क्र.मरालॉ-२०१५ /प्र.क्र.१८५/लॉटरी ३ दिनांक २४.०२.२०१६.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने उपसंचालक (वित्त व लेखा ) तथा उपआयुक्त,लॉटरी कर,महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालय, या कार्यालयासाठी भाडयाने घेतलेल्या एपीएमसी मार्केट,नवी मुंबई येथील भाडयाच्या जागेत त्यांचे पूर्वीचे शिवडी येथील कार्यालय स्थलांतरीत होण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत जबाबदारी निश्चित करण्यासाठी संचालक ,लेखा व कोषागार,मुंबई यांना सांगण्यात आले होते.

त्याअनुषंगाने संचालक, लेखा व कोषागारे,मुंबई यांनी प्रस्तुत प्रकरणी संबधित कागदपत्रे/नस्त्या उपलब्ध करुन घेतल्या व त्यांची छाननी केली.

तसचे उपसंचालक ( वि व ले ) महाराष्ट्र राज्य लॉटरी,शिवडी व त्यांचे कार्यालयातील अधिकारी यांच्याशी चर्चा केली व वस्तुस्थिती जाणून घेतली.

वरीलप्रमाणे कार्यवाही केल्यानंतरचा अहवाल दिनांक ३०/०४/२०१६ ला पाठविण्यात आलेला असून आयुक्त, (अ.ब.व.रा.लॉ) कार्यालयाची पोच घेण्यात आलेली आहे. तथापि आज आयुक्त, (अ.ब.व.रा.लॉ) यांचे दूरध्वनी संदेशान्वये सदर अहवालाची दुय्यम प्रत पुन्हा पाठविण्यात येत आहे.

सोबत : अहवाल पृष्ठ क्र. १ ते ११

आपला

(स अ मु नकवी)
संचालक, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.

७२५१५

दुय्यम प्रत

Duplicate Copy.

पृष्ठ क्र १ ते ११।

पत्र क्र.संलेवको/१५-१६/ स्वी.सहा./ लॉटरी ३ / दिनांक : ३०/०४/२०१६

गोपनिय

**उपसंचालक (वित्त व ले लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालय,एपीएमसी मार्केट, वाशी,नवी मुंबई येथील जागेत स्थलांतरीत होण्यासाठी झालेल्या विलंबाबाबतचा अहवाल सादर.**

**नवीन जागेची आवश्यकता:-**

महाराष्ट्र राज्य लॉटरीचे तिकीटांची विक्री सोडत बक्षिस प्रदान व या सर्वांचे लेखांकन करण्यासाठी उपसंचालक (वि व ले ) हे कार्यालय स्थापन करण्यात आले. सदर कार्यालयासाठी भाडे तत्वावर जागा घेण्याबाबत तत्कालीन संचालक अल्पबचत व राज्य लॉटरी यांनी दि.१५/०५/२००१ रोजी मे.जी. क्लेरीज लि. यांच्या बरोबर करार केला होता. सदरचा करार प्रथमत: पाच वर्षासाठी दि.१६/०८/२००१ ते १५/०५/२००६ या कालावधीसाठी करण्यात आला होता. पाच वर्षांची मुदत संपल्यावर पुन्हा तत्कालीन उपसंचालक तथा अवर सचिव राज्य लॉटरी यांनी त्याच जागेचा दि.१६/०५/२००६ ते १५/०५/२०११ असा वाढीव भाडे करार केला. सदरचा वाढीव करार संपुष्टात येत असल्याने उपसंचालक (वि व ले ) कार्यालयासाठी भाडे तत्वावर नवीन जागा घेणे क्रम प्राप्त झाले.

**नवीन जागा घेण्याबाबतची कार्यवाही :-**

उपसंचालक (वि व ले.) कार्यालयीन जागा मे जी क्लेरीज कंपनी यांनी रिक्त करुन द्यायाची असल्याने आयुक्त कार्यालयाकडून दि.०३/०५/२०११ रोजी सामान्य प्रशासन विभागाला मुंबई अथवा नवी मुंबई येथे अंदाजे ८ हजार ते १० हजार स्क्वेअर फूट इतकी जागा शिवडी कार्यालयासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत टिपणी पाठविण्यात आली होती. सामन्य प्रशासन विभागाने त्यांच्या माहे ७/०६ च्या टिप्पणी अन्वये लॉटरी संचालनालयाची विनंती अमान्य केली परंतु वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उपविभाग १ अनुक्रमांक १० नियम ११५ प्रमाणे प्रशासकीय विभागास जागा भाडयाने घेण्यास व भाडे प्रदान करण्याबाबतचे

अधिकार आहेत त्यानुसार पुढील निर्णय त्यांच्या स्तरावर घेण्यात यावा असे कळविले.

वरील सामान्य प्रशासन विभागाच्या टिपणीनुसार आयुक्त अ.ब.रा.लॉ शिवडी कार्यालयाकरीता किती जागा हवी आहे यांचा अहवाल मागविण्यात येऊन निविदा मागविण्यात याव्यात असे सूचित केले. आयुक्तांच्या निर्देशानुसार दि. १ जून २०११ रोजी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. जाहिरातीमध्ये निविदा सादर करण्याची मुदत दि.१० जून २०११ पर्यंत होती. परंतु दि.१० जून २०११ पर्यंत एकच निविदा प्राप्त झाल्याने सदर प्रक्रियेस दि.२४ जून २०११ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत दि.१४ जून २०११ रोजी आयुक्त कार्यालया तर्फे परत जाहीरात देण्यात आली.

दि. ०१ जुलै २०११ च्या परिपत्रकानुसार सदर निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आयुक्त अ.ब.व रा.लॉ यांच्या अध्यक्षते खाली समिती स्थापन करण्यात आली.

| | |
|---|---|
| १. अध्यक्ष | - आयुक्त अ.ब.व रा.लॉटरी |
| २. सदस्य | - उपसंचालक तथा अवर सचिव (वित्त विभाग) |
| ३. सदस्य | - उपसंचालक (वि व ले), महाराष्ट्र राज्य लॉटरी, शिवडी |
| ४. सदस्य | - लेखाअधिकारी (प्रशासन), महाराष्ट्र राज्य लॉटरी, शिवडी |
| ५. सदस्य सचिव | - कक्ष अधिकारी लॉटरी-३ |

निविदा सादर करण्यास दि. २४ जून २०११ पर्यंत मुदतवाढ दिल्यानंतर, लॉटरी संचालनालयाकडे चार निविदा प्राप्त झाल्या. सदर प्राप्त निविदा उघडण्यासाठी उपरोक्त समितीची दि.०२ जुलै २०११ रोजी बैठक झाली. सदर बैठकीत सर्व निविदाधारकांना जागेबाबतची Lease / मालकी हक्क याबाबतची अधिकृत कागदपत्रे दि.०५ जुलै पर्यंत सादर करण्यास सांगितले. वरील चार निविदांपैकी मे.जी.क्लेरीज यांचा दर कमी असल्याने त्यांना कागदपत्र सादर करण्याबाबत सूचित करण्यात केले. त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रानुसार व्यवस्थापक, मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्याकडे विचारणा करण्यात आली असता मे. जी क्लेरीज ॲण्ड कंपनी यांचा Lease संदर्भातील करार दि.०३ मार्च, १९८८ रोजी संपुष्टात आल्याचे दिसून आले.त्यामुळे मे. जी क्लेरीज ॲण्ड कंपनी यांची निविदा विचार घेण्यात आला नाही. समितीने फेर निविदा काढण्याबाबत दि.२०/०८/२०११ ला निर्णय घेतला. त्यानुसार दि.२९/०८/२०११ रोजी परत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली त्यामध्ये दि.१३ सप्टेंबर २०११ पर्यंत निविदा सादर करण्याबाबत

सांगण्यात आले.

लॉटरी संचालनालयाच्या दि.१८/१०/२०११ च्या परिपत्रकानुसार उपरोक्त समितीमध्ये संचालक,लेखा व कोषागारे यांच्या कार्यालयातील एक अधिकारी तसेच सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिक्षक अभियंता /कार्यकारी अभियंता दर्जाचा एक अधिकारी यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला त्यानुसार समितीमध्ये खालील सदस्यांचा समावेश करण्यात आला.

१) सदस्य : सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे प्रतिनिधी
२) सदस्य : उपसंचालक (दक्षता) लेखा व कोषागार ,मुंबई

नवीन जाहिरातीनुसार ११ निविदा प्राप्त झाल्या त्याची छाननी करण्याकरिता समितीने बैठकीमध्ये जागे संबंधीची कागदपत्रे दि.११/११/२०११ पर्यंत सादर करण्यास सांगितले समितीच्या दि.१४/११ च्या बैठकीमध्ये १) राजेंद्र व्हिजन २) चिराग शहा यांच्या अनुक्रमे नॉव्हेल्टी हाऊस-अ १६८ खैरणे एन आय डी सी ,ठाणे -बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७०९ व व्यंकटेश इंटरप्राईजेस प्लॉट नं.७ सेक्टर १९ बी, वाशी ,नवी मुंबई. यांच्या जागांना प्रत्यक्ष भेट देऊन जागा निवडावी व सदर जागेचे दर हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रमाणित करण्यात यावे असे ठरले. परंतु सदर इतिवृत्ताला दि.०५/१२/२०११ ला आयुक्ताने मान्यता दिली नसल्याचे व बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींची ०३ जानेवारी पर्यंत स्वाक्षरी झाली नसल्याचे कागदपत्रावरुन दिसुन येते. (४९७)

संचालनालयाच्या दि.२० जानेवारी २०१२ च्या परिपत्रकानुसार निविदा धारकांनी सादर केलेल्या कागद पत्रानुसार जागेची पाहणी करण्याकरिता खालील प्रमाणे अधिका-यांची समिती स्थापन करण्यात आली.

१. आयुक्त ,अ. ब.व रा.लॉटरी.
२. श्री. परामणे (उपसंचालक), वि व ले शिवडी कार्यालय.
३. श्री. सु. मा. ढाकणे,लेखाअधिकारी वर्ग-२ शिवडी.
४. श्री. अ. रा. राजपूत , कक्ष अधिकारी लॉटरी-२.

सदर समितीने ७ निविदाधारकांच्या जागांवर प्रत्यक्ष पाहणी केली. त्यानंतर मे. व्यंकटेश एण्टरप्राईझेस, शॉप नं.३ ही जागा निश्चित केली व तसा अहवाल दि. २८/०२/२०१२ ला साद र केला.

मे. व्यंकटेश एण्टरप्राईझेस, वाशी यांनी त्यांच्या जागेचे भाडे त्यांनी सादर केलेल्या दरपत्रकाप्रमाणे रु ४८/- प्रति चौ.फूट असे असल्याने सदर दरास सार्वजनिक बांधकाम विभागाकडून भाडेदर हा वाजवी

असल्याचे प्रमाणापत्र मिळावे याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागास दि.४ एप्रिल,२०१२ रोजी कळविण्यात आले.

सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सदरची जागा ही वाशी,नवी मुंबई येथे असल्यामुळे याबाबतचे अभिप्राय अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,ठाणे यांच्या कडून घेणे योग्य आहे. असे अभिप्राय देऊन दि.०५/०५/२०१२ रोजी लॉटरी विभागास परत केले. अधिक्षक अभियंता ,ठाणे यांच्याकडून दर वाजवी असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यांनतर सार्वजनिक बांधकाम विभागाने दि.२०/०६/२०१२ रोजी टिपणीस मान्यता दिली.

अधिक्षक अभियंता,सां.बा. विभाग, ठाणे यांच्याकडून भाडे दर रु.३७.४३ करीता वाजवी भाडे प्रमाणपत्र दि.२०/०६/२०१२ रोजी संचालनालय प्राप्त झाले. तदनंतर मे. व्यंकटेश एण्टरप्राईझेस यांच्या सोबत जागेसंबंधी करार करण्यासाठी जुलै -१२ मध्ये शासनाच्या मान्यतेसाठी वित्त विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला. यास ऑक्टोबर -२०१२ मध्ये वित्त विभागाकडून मंजूरी प्राप्त झाली.

**करारनामा ::-**

शासनाची मान्यता मिळाल्यानंतर मे. व्यंकटेश एण्टरप्राईझेस यांच्याशी जागेसंबंधी करण्यात येणा-या कराराचा मसुदा दि.२४ ऑक्टोबर, २०१२. विधी व न्याय विभागास पाठविण्यात आला. विधी व न्याय विभागाने त्याच्या दि.१ नोव्हेंबर-२०१२ च्या टिपणीव्दारे लॉटरी विभागाकडे स्पष्टीकरण मागितले,त्यावर लॉटरी विभागाने स्पष्टीकरण देऊन सदर नस्ती जानेवारी ,२०१३ मध्ये विधी व न्याय विभागास पाठविली.सदर नस्ती दि.२५/०३/२०१३ ला विधी व न्याय विभागाकडून लॉटरी विभागास परत आली. सदर कामाला अंतिम स्वरुप देऊन २६ एप्रिल ,२०१३ ला सचिव (ले व को ) यांची मान्यता घेण्यात आली व दि.०६/०५/२०१३ रोजी मे. व्यंकटेश एण्टरप्राईझेस यांच्याशी करार करण्यात आला.

**नवीन जागेचा ताबा :-**

मे. व्यंकटेश एण्टरप्राईझेस यांच्याशी करार झाल्यानंतर आयुक्त कार्यालयाने त्यांच्या दि.२० मे २०१३ च्या पत्रानुसार नवीन जागेचे पझेशन लेटर व करारनाम्याची छायांकित पत्र आणि जागेच्या चाव्या ताब्यात घेण्यासाठी उपसंचालक (शिवडी ) कार्यालयासाठी पत्र पाठविले. त्याचप्रमाणे करारनाम्याप्रमाणे

जागेचे भाडे देण्याबाबत कळविले. त्यानुसार उपसंचालक(वि व ले) महाराष्ट्र राज्य लॉटरी,शिवडी यांच्या स्तरावरुन कार्यालयीन पत्र २९/०५/२०१३ अन्वये भाडेतत्वावर घेतलेल्या जागेमध्ये दि.०४/०३/२०१३ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावानुसार नवीन फर्निचर इ. करुन मिळण्याबाबत विनंती करण्यात आली.

आयुक्त कार्यालयाने त्यांच्या दि.१७ जून २०१३ च्या पत्रानुसार नवीन जागेत स्थलांतरीत होण्याबाबतचे शिवडी कार्यालयास सूचित केले. त्यावर उपसंचालक (वि व ले), महाराष्ट्र राज्य लॉटरी,शिवडी कार्यालयाने त्यांचे पत्र दि.०६/०८/२०१३,अन्वये "नवीन जागेत दुरुस्तीची बरीच कामे अपूर्ण असून कामे पूर्ण करण्यबाबत जागा मालकांना वेळोवेळी कळविण्यात आले आहे. सदर जागेमध्ये छताला लिकेज आहे तसचे सर्व खिडक्यांची दुरुस्ती करुन घेणे आवश्यक आहे. पाईपलाईन दुरुस्त करणे, इमारतीच्या दोन्ही बाजूच्या प्रवेशव्दारामध्ये शटर दुरुस्त करुन त्याला सेफ्टी ग्रील्स बसविणे, लाईट मीटर बसविणे आवश्यक असल्याचे नमूद केले. तसचे सदर जागेत कोणत्याही प्रकारची लाईट फिटींग नसल्याने ती करुन घेणे आवश्यक आहे. शिवडी कार्यालयातील फर्निचर फिक्स स्वरुपाचे असल्याने ते काढून घेऊन जाणे कठीण आहे त्यामुळे कर्मचा-यांसाठी आसन व्यवस्था करणे आवश्यक आहे. या सर्व बाबी सदर पत्रामध्ये नमूद केल्या होत्या.

पुनश्च दि.०२/०९/२०१३ च्या पत्रान्वये उपसंचालक (वि व ले), महाराष्ट्र राज्य लॉटरी ,शिवडी कार्यालयाकडून आवश्यक दुरुस्ती, सुरक्षा व्यवस्था, नवीन फर्निचर इत्यादीची पूर्तता होण्याबाबत विनंती करण्यात आली. त्यानंतर पूर्तता करण्याच्या दृष्टीने ठोस सूचना न देता आयुक्त कार्यालयाने त्यांचे पत्र क्र. दि.२०/०९/२०१३ अन्वये पुनश्च शिवडी कार्यालयास नवीन जागेत स्थलांतर करण्याचे आदेश दिले. त्यावर उपसंचालक (वि व ले), महाराष्ट्र राज्य लॉटरी ,शिवडी कार्यालयाने त्यांच्या दि.१८ ऑक्टोबर २०१३ च्या पत्रान्वये लॉटरी कार्यालयाचे कामकाज सुरळीत होण्याचे दृष्टीने वाशी येथील नवीन जागेमध्ये आसन व्यवस्था, विद्युत जोडणी,फर्निचर, सुरक्षा व्यवस्था, तिकीट विक्री व सोडत याकरिता स्वतंत्र कक्ष इ.बाबींची पूर्तता करुन मिळण्याची विनंती केल्याचे व प्रसाधनगृह व्यवस्था अपूर्ण असल्याचे नमूद केले आहे

उपसंचालक (वि व ले), महाराष्ट्र राज्य लॉटरी ,शिवडी कार्यालयाने दि.०६ नोंव्हेबर २०१३ च्या पत्रान्वये कार्यालय नवीन जागेत स्थलांतरीत करण्यासाठी दि.१८/१०/२०१३ च्या प्रस्तावाप्रमाणे फर्निचर, विद्युत जोडणी, सुरक्षा व्यवस्था इ.बाबींना मंजूरी देण्याबाबत विनंती केली आहे.

उपसंचालक (वि व ले ), महाराष्ट्र राज्य लॉटरी ,शिवडी कार्यालय स्थलांतरीत करण्यासाठी जुने फिक्स स्वरुपाचे फर्निचर नवीन जागी घेऊन जाणे अवघड असल्याचे नमुद करुन नवीन जागेमध्ये फर्निचर व अंतर्गत काम पूर्ण करण्यासाठीचा आरखडा तयार करण्यासाठी आयुक्त,अ.व.व राज्य लॉटरी यांच्या कार्यालयाने दि.०२/१२/२०१३ रोजी व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ,मुंबई यांच्याकडे पत्र पाठविले. त्यानंतर पुन्हा आयुक्त, अ.व.व राज्य लॉटरी यांनी अर्धशासकीय पत्र दि.१५/०१/२०१४ अन्वये व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ,मुंबई यांना त्वरीत प्रस्ताव सादर करण्याबाबत विनंती केली.

उपसंचालक (वि व ले),महाराष्ट्र राज्य लॉटरी,शिवडी कार्यालय यांनी त्यांचे पत्र दि.०१/०२/२०१४ अन्वये महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ,मुंबई यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन पाठपुरावा करण्यात येत असल्याचे तसेच महामंडळाकडून योग्य प्रतिसाद न मिळाल्यास निविदा वा अन्य पर्यायाचा विचार करण्याबाबत आयुक्त,अ.व.व राज्य लॉटरी कार्यालयास विनंती केली आहे.

अशाप्रकारे उपसंचालक ( वि व ले ), महाराष्ट्र राज्य लॉटरी, शिवडी कार्यालयाने दि.०६/०८/२०१३,दि.०२/०९/२०१३,दि.१८/१०/२०१३,दि.०६/११/२०१३ व दि.०१/०२/२०१४ च्या पत्रान्वये नवीन जागेमध्ये स्थलांतरीत होण्यासाठी नवीन फर्निचर, आसन व्यवस्था, संपूर्ण विद्युत जोडणीचे काम होणे गरजेचे असल्याबाबत आणि जुने फिक्स फर्निचर घेऊन जाणे शक्य नसल्याबाबत नमूद करुन शिवडी कार्यालय स्थलांतरीत करण्याची असमर्थता वेळोवेळी निदर्शनास आणली आहे.

**जागा भाडे प्रदान :-**

आयुक्त कार्यालयाने त्यांच्या दि.२०/०५/२०१३ च्या पत्रानुसार माहे मे-२०१३ पासून भाडे अदा करण्यास कळविले. त्याप्रमाणे जागा मालकास माहे मे,२०१३ व जून,२०१३ या दोन महिन्याचे भाडे अदा केले असून माहे जुलैचे भाडे जागा मालकाने सोयीसुविधा पूर्ण न झाल्याने अदा केलेले नाही. असे त्यांच्या दि.१७ ऑगस्ट,२०१३ च्या पत्रामध्ये कळविले . त्यानंतर मा.आयुक्त , अल्पबचत यांच्या दालनात झालेल्या चर्चे दरम्यान मा.आयुक्त यांनी माहे जूलै,२०१३ ते ऑक्टोबर,२०१३ च्या भाडयाची रक्कम देण्याबाबत निर्देश दिल्याने तसेच त्यानंतर संचालनालयाच्या दि.२०/०५/२०१५ च्या ज्ञापना अन्वये दि.०१/११/२०१३ ते दि.३१/०३/२०१५ या १७ महिन्याच्या कालावधीच्या भाडे रक्कमेच्या प्रदानास शासन मान्यता

मिळाल्यानंतर उपसंचालक (वि व ले ),महाराष्ट्र राज्य लॉटरी,शिवडी कार्यालयाच्या स्तरावरुन भाडे अदा करण्यात आले.

नवीन जागेतील फर्निचर व अंतर्गत व्यवस्था :-

उपसंचालक (वि व ले ),महाराष्ट्र राज्य लॉटरी,शिवडी कार्यालय यांनी ०४ मार्च,२०१३ रोजी नवीन जागेत करावयाचा लागणा-या फर्निचर व अंतर्गत सोयीसुविधासाठी होणा-या कामाचा आराखडा वास्तु विशारदाकडून तयार करुन घेऊन अंदाजे २ कोटीचा प्रस्ताव आयुक्त कार्यालयास सादर केला होता. त्यावर आयुक्त कार्यालयाने सदरचा प्रस्ताव हा अव्यवहारीक असून सदरचे काम महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळामार्फत करण्यात यावे असा निर्णय घेतला. त्याप्रमाणे आयुक्त कार्यालयाने त्यांच्या दि.०२/१२/२०१३ च्या पत्रान्वये महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ,मुंबई यांना नवीन जागेची पाहणी करुन फर्निचर व इतर सोयी-सुविधा याकामासाठी आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या. तसेच मा.आयुक्त,अ.ब.व राज्य लॉटरी यांनी त्यांच्या दि.१४/०१/२०१४ च्या अर्धशासकीय पत्रान्वये व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ,मुंबई यांना सदरचे काम त्वरीत करण्याबाबत विनंती केली होती. MSSIDC यांनी त्यांच्या दि.२६/०२/२०१४ च्या पत्रान्वये वाशी येथील कार्यालयातील फर्निचर व अंतर्गत सजावट या कामासाठी रु.१ कोटी ५० लाखाचा प्रस्ताव तयार करुन प्रशासकीय मान्यता मिळण्याकरिता आयुक्त कार्यालयास सादर केला. सदरच्या प्रस्ताव आयुक्त कार्यालयामार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाची मान्यता घेण्यासाठी माहे मार्च ,२०१४ रोजी पाठविण्यात आला. सदरचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून आक्षेपासह दि.३०/०५/२०१४ रोजी लॉटरी विभागात परत आला . त्यानंतर परत सार्वजनिक बांधकाम विभागाने रु.१,५०,०२,१३२/- या रकमेच्या अंदाजपत्रकास अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ , ठाणे अधिक्षक अभियंता (विद्युत ) , विभाग,मुंबई यांच्या मंजुरी घेण्याच्या अटीच्या अधीन राहून माहे ऑगस्ट २०१४ ला सदर अंदाजपत्रकास सहमती दिली. वित्त विभागाने अंदाजपत्रकाची रक्कम जास्त वाढत असल्याने ती कमी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागास फेर विचार करण्यास नस्ती पाठविण्यात आली. दि.०५/०९/२०१४ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाने रु.७६,१६,२११/- रकमेस सहमती दर्शविली. त्याला अनुसरुन वित्त विभागाने प्रशासकीय मान्यता दिली. व त्यानुसार शासन निर्णय

क्र.मरालॉ२०१४/प्र.क्र.४५/१४/अवप्र दि.०६/०९/२०१४ अन्वये सदर खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

त्यानंतर आयुक्त कार्यालयाच्या स्तरावर शिवडी कार्यालयातील,संचालनालयातील अधिकारी, महामंडळाचे प्रतिनिधी, वास्तुविशारद यांची बैठक घेऊन फर्निचर व अंतर्गत कामे पूर्ण करण्याबाबत चर्चा करण्यात आली. मा.आयुक्त, अ.व.व राज्य लॉटरी कार्यालयाने दि.३१/०३/२०१५ च्या पत्रान्वये रु.७६,१६,२११/- इतकी रक्कम अधिदान व लेखा कार्यालयाकडून आहरित करुन MSSIDC यांना अदा करण्याबाबत उपसंचालक (वि व ले ) महाराष्ट्र राज्य लॉटरी,शिवडी कार्यालयास कळविले.

उपसंचालक (वि व ले ) महाराष्ट्र राज्य लॉटरी,शिवडी कार्यालयाने सदरची रक्कम आहरित करुन पत्र क्र.दि.२२/०४/२०१५ अन्वये रु.७६,१६,२११/- चा धनादेश क्र.५४१५८९ चे प्रदान महामंडळास केल्याचे आयुक्त कार्यालयास कळविले. तत्कालीन मा. आयुक्त,अ.व. व राज्य लॉटरी, श्री देशपांडे यांनी अर्ध शासकीय पत्र क्र. मरालॉ २०१४/प्र.क्र.४५/अवप्र दि.२८/०४/२०१५ अन्वये श्री दौंड,व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र लघुदयोग विकास महामंडळ,मुंबई यांना वाशी येथील फर्निचर अंतर्गत सजावट व विद्युत विषयक काम दि.१५/०६/२०१५ पर्यत पूर्ण करण्यबाबत विनंती केली.

परंतु सदरचे वाशीतील जागेचे काम ऑक्टोबर २०१५ महामंडळाकडून पूर्ण न झाल्याने आढावा घेण्यासाठी प्रधान सचिव (व्यय ), वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि.०९/११/२०१५ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत महामंडळाने वाशी येथील कार्यालयाचे काम दि.१५/१२/२०१५ पर्यत पूर्ण करुन दयावे असे ठरले. महामंडळाने त्यांचे पत्र दि.२८/०१/२०१६ अन्वये काम पूर्ण झाले असून ताबा घेण्याबाबत सूचित केले. तथापि शिवडी कार्यालयातील अधिकारी, वास्तुविशारद यांनी वाशी येथील जागेची पाहणी करुन अद्यापही काही कामे प्रलंबित असल्याचे दि.०१/०२/२०१६ च्या पत्रान्वये आयुक्त कार्यालयास कळविले.

उपसंचालक (वि व ले ) महाराष्ट्र राज्य लॉटरी,शिवडी कार्यालय यांनी त्यांचे पत्र दि.०९/०२/२०१६ अन्वये दि.०६/०२/२०१६ पासून टप्याटप्याने कार्यालय स्थलांतरीत करण्यास सुरवात केली असल्याचे नमूद केले असून दि.२६/०२/२०१६ रोजी वाशी येथून कामकाजास सुरुवात झाल्याचे दि.२९/०२/२०१६ च्या पत्रामध्ये नमूद केले आहे.

अभिप्राय :-

१. शिवडी येथील जागेच्या कराराची मुदत दि.१६/०५/२०११ रोजी संपणार आहे हे माहित असताना नवीन जागेचा शोध सहा महिने अगोदर पासून घेणे आवश्यक होते.परंतु प्रत्यक्षात दि.०१ जुन,२०११ ला जाहिरात प्रसिध्द करण्यात आली.

२. उपसंचालक (वि व ले ) महाराष्ट्र राज्य लॉटरी,शिवडी या कार्यालयासाठी वाशी येथील जागा दि २८/०२/२०१२ ला निवडण्यात आली. सदर जागेला शासनाची मान्यता माहे ऑक्टोबर, २०१२ मध्ये घेण्यात आली. करार मसूदयाला विधी व न्याय विभागाची मान्यता घेण्यास माहे मार्च,२०१३ मध्ये प्राप्त झाली. हया कालावधीचा विलंब हा प्रशासकीय कारणास्तव झालेला आहे. तसेच दुहेरी भाडे देण्याचा प्रश्न या कालावधीशी संबंधित नाही. याबाबत कोणालाही दोषी धरणे योग्य ठरणार नाही.

३. नवीन जागेच्या निवड समितीमध्ये उपसंचालक (वि व ले ) महाराष्ट्र राज्य लॉटरी,शिवडी कार्यालयाचे तत्कालीन उपसंचालक ( वि व ले ), म.रा. लॉ व तत्कालीन लेखा अधिकारी प्रशासन हे सदस्य होते. त्यानी सदरची जागा पाहून कार्यालयासाठी योग्य आहे अशी शिफारस दि.२८/०२/२०१२ च्या अहवालामध्ये केली. परंतु सदर जागेमध्ये उपसंचालक (वि व ले ) महाराष्ट्र राज्य लॉटरी,शिवडी.हे कार्यालय स्थलांतरीत करायचे अत्तल्दास नवीन फर्निचर,संपूर्ण विद्युत जोडणी,आसन व्यवस्था व इतर सोयीसुविधा आवश्यक आहे ही बाब त्यांनी पूर्ण वर्षभरात आयुक्त कार्यालयाच्या निदर्शनास आणून दिली नाही. तथापि एक वर्षानंतर दि.०४ मार्च २०१३ च्या पत्रान्वये फर्निचर व इतर सोयी सुविधा साठीचा आराखडा तयार करुन रु.दोन कोटीच्या अंदाज पत्रकाचा प्रस्ताव आयुक्त कार्यालयास सादर केला. यामुळे झालेल्या विलंबास हे दोन्ही अधिकारी जबाबदार आहेत.

४. आयुक्त कार्यालयाने सदर प्रस्तावाची तातडीने दखल घेऊन सदर काम निविदा प्रक्रीया, सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा MSSIDC यापैकी कोणाकडून पुर्ण करुन घ्यावे हयाचा निर्णय करारनामा करण्यापूर्वी घेणे आवश्यक होते. वास्तविक महाराष्ट्र राज्य लॉटरी ,शिवडी या कार्यालयाचे कामाचे स्वरुप पाहता कोटयावधी रुपयांची विक्रीस ठेवण्यात येणारी तिकीटे,बक्षीस

प्रदान करण्यासाठी आलेली तिकीटे,लेखा परिक्षण तिकीटे ही सुरक्षा कक्षाशिवाय उघड्यावर ठेवणे,कोणत्याही परिस्थितीत शक्य नव्हते. तसेच जुन्या कार्यालयातील फिक्स फर्निचर पुर्नवापरात आणणे शक्य नाही हे माहिती असून सुध्दा आयुक्त अ.ब. व रा. लॉ. यांच्या स्तरावरुन शिवडी येथील कार्यालय नवीन जागेत स्थलांतरीत करण्याचे आदेश दि.१७ जून,२०१३ व २० सप्टेंबर २०१३ या पत्रान्वये दिले.

५. उपसंचालक (वि व ले ) महाराष्ट्र राज्य लॉटरी,शिवडी कार्यालयाचा प्रस्तावाची दखल आयुक्त कार्यालयाकडून तब्बल आठ महिन्याने घेतली. सदर प्रस्ताव मोठया रक्कमेचा असून MSSIDC यांच्याकडे सदरचे काम सोपवावे असे ठरविले व त्यानुसार आयुक्त कार्यालयाने MSSIDC यांना दि.०२/१२/२०१३ च्या पत्रान्वये नवीन जागा पाहून आराखडा तयार करण्यबाबत सूचना दिल्या.

६. MSSIDC यांनी सदर कामाकरीता रु.१.५ कोटीचा प्रस्ताव दि.२६/०२/२०१४ रोजी आयुक्त कार्यालयास सादर केला. सदर प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग व वित्त विभाग यांची सहमती घेऊन शासन निर्णय क्र. मरालॉ२०१४/प्र.क्र.४५/१४/अवप्र, दि.०६/०९/२०१४ अन्वये रु.७६,१६,२११/- या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली. MSSIDC यांच्याकडून माहे फेब्रुवारी, २०१४ मध्ये प्रस्ताव सादर झाल्यानंतर सुमारे सहा महिन्यांच्या विलंबानंतर प्रशासकीय मान्यता मिळाल्याचे दिसते. वास्तविक पाहता फर्निचर अभावी कार्यालय स्थलांतरीत करण्यास विलंब होत असल्याचे माहिती असताना सार्वजनिक बांधकाम व वित्त विभाग यांच्याकडे प्रशासकीय मंजुरीसाठी संचालनालयाच्या स्तरावरुन सतत पाठपुरावा करुन विलंब काही प्रमाणात टाळता आला असता.

७. शासन निर्णय दि.०६/०९/२०१४ अन्वये रु.७६,१६,२११/- इतक्या खर्चास मंजुरी मिळाल्यानंतर सदरचा निधी त्वरीत MSSIDC यांच्याकडे सुपूर्द करुन विदयुतकरणाचे काम त्वरीत काम सुरु करण्यासाठी MSSIDC सूचित करणे अवाश्यक होते. त्यामुळे एकूण कामापैकी विद्युतीकरण व फर्निचरचे कामास सुरवात करता आली असती. तथापि विभागाकडे निधी उपलब्ध असताना संचालनालयाने दि.३१ मार्च,२०१५ रोजी रक्कम अहरित करुन धनादेश MSSIDC ला

अदा करण्यायत यावा असे शिवडी कार्यालयास सुचित केले. सदर रक्कम MSSIDC यांना अदा करण्यास सुमारे ७ महिन्याचा विलंब झालेला आहे.

वरील बाब लक्षात घेता मे ,२०१३ ते ३१ मार्च,२०१५ या कालावधीत निधी वितरीत करण्यास झालेल्या विलंबास तत्कालीन आयुक्त अल्पबचत व संबंधित कक्ष अधिकारी हे पूर्णतः जबाबदार आहेत.

८. आयुक्त ,अल्प बचत व राज्य लॉटरी यांच्या दालनात दि.२१/११/२०१४ रोजी झालेल्या बैठकीत MSSIDC यांच्या प्रतिनिधींनी फर्निचर अंतर्गत सजावट,विद्युत विषयक कामे १५/०१/२०१५ पर्यंत पुर्ण करुन देण्यात येइल असे सांगितले होते. माहे एप्रिल २०१५ मध्ये MSSIDC यांना रु.७६,१६,२११/- चे प्रदान करण्यात आले होते. तत्कालीन प्रधान सचिव (व्यय) यांनी त्यांचे पत्र दि.२८/०४/२०१५ अन्वये वाशी येथील काम दि.१५ जून,२०१५ पर्यंत पूर्ण करावे असे निर्देश दिले होते. मात्र ऑक्टोबर २०१५ पर्यंत देखील MSSIDC यांच्याकडून काम पूर्ण न झाल्याने प्रधान सचिव (व्यय) यांच्या अध्यक्षतेखाली दि.०९/११/२०१५ रोजी घेण्यात आलेल्या बैठकी मध्ये सदरचे काम दि.१५/१२/२०१५ पर्यंत पूर्ण करुन देण्यात यावे असे ठरले. सदर बैठकीस व्यवस्थापकीय संचालक, MSSIDC देखील उपस्थित होते तथापि माहे फ्रेब्रुवारी –२०१६ मध्ये देखील MSSIDC यांच्याकडून बरीच कामे अपूर्ण असल्याचे उपसंचालक (वि व ले) महाराष्ट्र राज्य लॉटरी यांनी दि.०१/०२/२०१६ रोजी आयुक्त कार्यालयास पाठविलेलया पत्रामध्ये नमूद केले आहे. उपसंचालक (वि व ले) महाराष्ट्र राज्य लॉटरी,शिवडी कार्यालय हे २६/०२/२०१६ ला स्थलांतरीत झाले असले तरी अजून काही कामे प्रलंबित आहेत. त्यामुळे माहे एप्रिल-२०१५ ते माहे फेब्रुवारी २०१६ या कालावधीसाठी MSSIDC जबाबदार आहे.

(स अ मु नकवी)
संचालक
संचालनालय लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.

# परिशिष्ट ब

## गुरुवार, दिनांक १५ फेब्रुवारी,२०१८

## लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८रोजी विधान भवन,मुंबई येथे दुपारी १२.३०वाजता सुरू होऊन दुपारी १.४०वाजता स्थगित झाली.

**समितीप्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(३) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(४) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(५) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(६) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(७) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

**विशेष निमंत्रित**

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :–**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि. अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

**निमंत्रित :-**

**महालेखाकार कार्यालय :**

(१) श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकर, मुंबई कार्यालय.

(२) श्री. दिनेश माटे, उप महालेखाकार, नागपूर कार्यालय.

**वित्त विभाग :-**

श्री. अनुदिप दिघे, उप सचिव, वित्त विभाग

**विभागीय प्रतिनिधी :-**

(१) श्री. संजय कुमार, अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग

(२) श्री. असिम गुप्ता, सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-२०१६या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.८ संदर्भात अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग तसेच परिच्छेद क्र.३.२, ३.९ संदर्भात सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी,२०१८**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०१८रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० वाजता सुरू होऊन दुपारी ३.३० वाजता स्थगित झाली.

**समितीप्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(४) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(६) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(८) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(९) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

(१०) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-**

श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

**निमंत्रित :-**

महालेखाकार कार्यालय

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार

**विभागीय प्रतिनिधी :-**

**वित्त विभाग :**

(१) श्री. नितिन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५- २०१६ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.७ संदर्भात प्रधान सचिव,वित्त विभाग यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी,२०१८**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरू होऊन दुपारी २.३० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(५) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(६) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(७) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.

(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

**विशेष निमंत्रित**

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :–**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

**निमंत्रित :-**

**महालेखाकार कार्यालय**

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

**वित्त विभाग :-**

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले. व को.) विभाग

**विभागीय प्रतिनिधी :-**

**विधी व न्याय विभाग :-**

श्री. एन. जे. जमादार, प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५- २०१६ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.३ संदर्भात प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक ११ एप्रिल,२०१८**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक बुधवार, दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरू होऊन दुपारी २.३० वाजता स्थगित झाली.

**समितीप्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(१०) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

**निमंत्रित :-**

महालेखाकार कार्यालय :

श्री. टि. एस. आर. गुप्ता, उप महालेखाकार, प्रधान महालेखाकार कार्यालय, नागपूर

**विभागीय प्रतिनिधी :-**

**वित्त विभाग :-**

(१) श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग (ले. व को.)

(२) डॉ. अमित सैनी, लॉटरी आयुक्त, वित्त विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-२०१६ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.७ संदर्भात प्रधान सचिव, वित्त विभाग यांची साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक ३ मे,२०१८**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक गुरुवार, दिनांक ३ मे, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरू होऊन दुपारी २.३० वाजता स्थगित झाली.

**समितीप्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(६) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.

(७) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(८) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(१) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

**निमंत्रित :-**

**महालेखाकार कार्यालय :**

श्री. टी. एस. आर. गुप्ता, उप महालेखाकार, प्रधान महालेखाकार कार्यालय, नागपूर

**विभागीय प्रतिनिधी :-**

**वित्त विभाग :-**

(१) श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग

(२) डॉ. अमित सैनी, लॉटरी आयुक्त, वित्त विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५- २०१६ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.७ संदर्भात प्रधान सचिव,वित्त विभाग यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक १३ जून, २०१८**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक बुधवार, दिनांक १३ जून, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरू होऊन दुपारी २.३० वाजता स्थगित झाली.

**समितीप्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(२) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(३) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(४) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(५) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(६) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित**

(७) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अरुण कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

**निमंत्रित :-**

**महालेखाकार कार्यालय :**

(१) श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

**वित्त विभाग :-**

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग

**विभागीय प्रतिनिधी :-**

(१) श्री. असिम गुप्ता, सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-२०१६ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.१० संदर्भात सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांची साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक १४ जून,२०१८**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक गुरुवार, दिनांक १४ जून, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरू होऊन दुपारी २.३० वाजता स्थगित झाली.

**समितीप्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(४) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(५) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(६) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अरुण कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

(४) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-२०१६या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालासंदर्भात परिच्छेद क्र. ३.३ (विधी व न्याय विभाग) व परिच्छेद क्र. ३.७ (वित्त विभाग) समितीने तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेतला.

**मंगळवार, दिनांक २६ जून, २०१८**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २६ जून, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० वाजता सुरू होऊन दुपारी ४.३० वाजता स्थगित झाली.

**समितीप्रमुख**

(१) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स. तथा कार्यकारी समितीप्रमुख

**सदस्य**

(२) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(३) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(४) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(५) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(६) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.

(७) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(८) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अरुण कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

(४) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-२०१६ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालासंदर्भात परिच्छेद क्र. ३.२, ३.९ व ३.१० (कौशल्य विकास व उद्योजकता विभाग) तसेच परिच्छेद क्र. ३.८ (गृहनिर्माण विभाग) समितीने तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेतला.

एचबी–२१३१–मविसना–०७-२०१८–८१० प्रती*